

डॉ. आंबेडकरवादी विद्रोही निबंध

डॉ. यशवंत मनोहर

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ..... निबंध .....
सं. क्र. 3493.



REFBK-0026834



संदर्भ
निबंध
3493
२६८३४
२१७१९३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

28 APR 1993

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

आंबेडकरवादी

विद्रोही निबंध

डॉ. प्रा. यशवंत मनोहर


REFBK-0026834

ऋचा प्रकाशन, नागपूर १५

प्रकाशन क्र.	१५
प्रकाशक	प्रदीप मुळे ऋचा प्रकाशन ९, गजानन नगर, वर्धा रोड, नागपूर - १५
©	यशवंत मनोहर अ/२, विद्यापीठ प्रा. निवास अमरावती मार्ग - १०
प्रथमावृत्ती	५ ऑक्टोबर १९९२
मुखपृष्ठ	सुहास चांडक
एकमेव वितरक	फेमस बुक सेंटर १९२, छत्रपती नगर, वर्धा रोड, नागपूर - १५
संगणक जुळवणी	न्यू विदर्भ कॉम्प्युटर इन्स्टिट्युट ८०, गजानन नगर, वर्धा रोड, नागपूर - १५
मूल्य	७५ रू.

या देशातील
रंजल्या-गांजल्यांच्या
माणुसकीचे संविधान सिद्ध
करताना मराठी भाषेत विद्रोहाचे
निखारे फुलविणाऱ्या
जोतीराव फुल्यांच्या संतप्त
गद्यशैलीस कृतज्ञतापूर्वक

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१. वैचारिकता डॉ. आंबेडकरांची	१
२. डॉ. आंबेडकर आणि सेक्युलॅरिझम	१७
३. आंबेडकर धम्म	२४
४. आंबेडकरवाद्यांची आजची जबाबदारी	२९
५. भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर	३२
६. आंबेडकरी चळवळीपुढील ज्वलंत प्रश्न	३५
७. डॉ. हेडगेवारांचा 'संघ' आणि डॉ. आंबेडकरांचा 'बुद्धसंघ'	४७
८. आंबेडकरी चळवळ समरसतेच्या मगरमिठीतून सोडवा	५२
९. आंबेडकरी चळवळीतील हिंदूत्ववादी	५७
१०. हल्लाबोल	६८
११. 'तो' खोटा आहे	७०
१२. आदिवासी साहित्य	७३
१३. थोर जीवनवादी साहित्यिक मामा वरेरकर	७६
१४. परंपरावादाला गोंजारण्याची पूर्वापार परंपरा मोडणारा अध्यक्ष : प्रा. गं.बा. सरदार	८४
१५. प्रा. गं.बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने	९४

१६. दलित रंगभूमी ही क्रांतीची युद्धभूमी	१०२
१७. वाचन संस्कृतीची दिशा आणि वाचकचळवळ	१०६
१८. साहित्य संस्कृतीमंडळापुढील खरी आव्हाने	१०९
१९. पुण्याचे साहित्य संमेलन कोणाचे?	११५
२०. संघीय साहित्यसंमेलन	१२०
२१. विलास सारंग यांची 'गर्भवती'	१२६
२२. आभार! लालूप्रसाद, हार्दिक आभार!	१३१
२३. नामांतर	१३७
२४. पँथरपुढील आव्हाने	१४१
२५. पँथर : आंबेडकरी युवाशक्तीचा धगधगता हुकार	१४७
२६. संविधान संस्कृतीच्या विजयासाठी नामांतर	१५२
२७. राष्ट्रीय शिक्षण आणि संविधानातील सेक्युलॅरिझम	१५५
२८. समरसतावाद की आंबेडकरवाद ?	१६१

प्रास्ताविक

'आंबेडकरवादी विद्रोही निबंध' हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. या पुस्तकात विविध विषयांवरील वैचारिक निबंध एकत्र प्रकाशित होत आहे.

या पुस्तकातील लेखांची विभागणी पाच भागात करता येईल. पहिल्या भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीविचाराचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे धर्मातीत आणि निरीश्वरवादी या अर्थाने कसे इहवादी (Secular) विचारवंत आहेत आणि या इहजीवनाला ते मानवी जीवन सुंदर आणि समर्थ करणाऱ्या धम्माशी कसे जोडताहेत त्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सूत्राचा मी सतत पाठपुरावा करतो आहे. अनेकांना हे सूत्र स्वीकारणे जड वाटते. याचे कारण धर्म आणि ईश्वर यांच्यात त्यांचे मन गुंतून आहे हे आहे. पण या लोकांच्या मनांची ही गुंतवणूक त्यांना आंबेडकरविरोधी विचाराच्या छावणीत दाखल करते हे त्यांच्या लक्षात येत नाही याचे वाईट वाटते. जाणता किंवा अजाणता आंबेडकर विरोधी विचारांच्या छावणीत वावरत आंबेडकरांसंबंधीचे प्रेमही व्यक्त करीत राह्याचे हा मला वैचारिक भ्रष्टाचार वाटतो. ही गोष्ट अनेकांच्या लक्षात आणून देण्यासाठी मला पुनरूक्तिचा दोष पत्करूनही हे लेखन करावे लागले आहे.

दुसऱ्या भागातील लेखनातूनही अलीकडच्या अशाच एका प्रश्नाचा वेध मी घेतलेला आहे. तो प्रश्न आहे समरसतेचा आंबेडकरी चळवळीतील काही भ्रष्ट डोकी आंबेडकरांचे हिंदूकरण करण्याच्या मोहिमेत सहभागी झाली आहेत. या आंबेडकरद्रोही लोकांपासून समाजाला सावध करणे मला फार निकडीचे वाटले. त्यामुळे या संदर्भातही सतत लेखन करुन समरसतावाद्यांनी आंबेडकरी चळवळीवर केलेले आक्रमण मी परतवून लावले. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रतिगामी शक्तीचाच नव्हे तर समरसतेत गेलेल्या दलितांमधील दिवाळखोरांचाही राग मी ओढवून घेतला.

तिसऱ्या भागात आंबेडकर चळवळीला पुरक ठरणाऱ्या साहित्यविषयक लेखांचा अंतर्भाव झालेला आहे. त्यात प्रतिक्रांतीच्या साहित्याचा आणि क्रांतीसाहित्याचा विचार अत्यंत परखडपणे मांडला गेला आहे.

चौथ्या भागात नामांतरासंबंधीचे दोन लेख आणि पाचव्या भागात पँथर संबंधीचे दोन लेख आलेले आहेत.

या सर्वच लेखांमधून संगती-विसंगती, विचार-अविचार, प्रकाश-अंधार, दिशाशून्यता आणि दिशायुक्तता, क्रांती-प्रतिक्रांतीतील संघर्ष, अध्यात्म आणि निरीश्वरवादी जीवन जाणीवेतील संघर्ष, कन्फ्युझन आणि वैचारिक सुस्पष्टता अशा असंख्य द्वंद्वाच्या नियंत्रणात जगणाऱ्या समकालीन समाजाचे कॅरेक्टरही स्पष्ट झालेले आहे. मी स्वतः या समाजाच्या वाटेवर निरीश्वरवादी आंबेडकरांच्या शब्दांमधील उजेड अंथरण्याचा माझ्यापरीने प्रयत्न केलेला आहे.

या पुस्तकात १९७९ पासूनचे वैचारिक लेखन संग्रहीत केलेले आहे तरी यातील बहुतांश लेखन १९९१ मधले बाबासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षातले आणि १९९२ मधले म्हणजे अलीकडचे आहे.

समजावून सांगितल्याशिवाय मी हा बाण कादू देणार नाही." या माणसाला वरील प्रश्नांची उत्तरे मिळण्यापूर्वीच मरण येईल. तसे ईश्वर, आत्मा, परलोक इत्यादी प्रश्नांच्या संदर्भात आहे. शिवाय वरील प्रश्नांची उत्तरे होकारार्थी मिळाली तरी माणसाच्या जगण्यात दुःख कालवणारे प्रश्न सुटत नाहीत. नकारार्थी आली तरीही प्रश्न सुटत नाहीत. म्हणून बुद्धाने अत्यंत प्रस्तुत प्रश्न तत्त्वज्ञांपुढे ठेवला. "मनोरमं जिवितम् मनुष्यानाम् " हा तो प्रश्न होता. बाबासाहेबांनी तो प्रश्न What is necessary is to change the world and to make it better असा ठेविला. मार्क्सनेही निराळ्या भाषेत हाच प्रश्न तत्त्वज्ञानापुढे ठेवला. 'The Philosophers have only interpreted the world in various ways, the point, however, is to change it.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेही या विश्वविचारवंतांच्या मालिकेतील एक युगप्रवर्तक तत्त्वज्ञ आहेत.

१४ एप्रिल १८९१ साली त्यांचा जन्म झाला आणि ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महानिर्वाण झाले. डॉ. आंबेडकरांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे एक अहोरात्र चाललेले महायुद्ध. संघर्षाच्या ज्वालांवरुन हा महामानव चालला. दीर्घकाळ एखादे वन धगधगत राहावे तसे त्यांचे आयुष्य धगधगत होते. एका प्रज्ञासूर्याची ज्ञानासाठी चाललेली अभूतपूर्व साधना हेच डॉ. आंबेडकारांच्या आयुष्याचे सार्थ वर्णन होईल. परदेशातील अनंत विषयांतील सर्वोच्च पदव्या, अनंत जनआंदोलने आणि जीवनाची सर्व दाने उजळून टाकणारे तत्त्वज्ञान अनंत ग्रंथांमधून सिद्ध करणे असे या आयुष्याचे दैदीप्यमान स्वरुप आहे.

या महापुरुषाला विषमतेचे हलाहल पचवावे लागले. मानहानीच्या यातनांनी तडफडावे लागले. दारिद्र्याशी भांडत ज्ञानप्राप्तीची जिद्द तेवत ठेवावी लागली. पापणी जागी ठेवून मनाच्या संवेदनशीलतेवर बाहेरच्या अमानुष परिस्थितीचे वार झेलावे लागले. या सर्व जाळपोळीच्या प्रक्रियेतून मनाची एक "आंबेडकर मूस" तयार झाली. आंबेडकरवाद म्हणजे या मनाने केलेले तत्त्वचिंतन होय.

आंबेडकरवाद म्हणजे सुधारणावादी तत्त्वज्ञान नसून ते क्रांतिकारी तत्त्वज्ञान आहे. सुधारणा म्हणजे वरवरचे बदल. मूळ पाया कायम ठेवून केलेली वरवरची डागडूजी म्हणजे सुधारणा. या प्रक्रियेत जसे सत्तान्तर अभिप्रेत नसते तशी समाजरचना तत्त्वांमधील उलथापालथही अभिप्रेत नसते.

क्रांती म्हणजे मूलभूत उलथापालथ. विद्यमान समाजरचनातत्त्वे नष्ट करुन नव्या निराळ्या तत्त्वांवर समाजाची रचना करणे, क्रांतीप्रक्रियेतील प्रश्न सत्तान्तराशी

निगडीत असतो तसा तो नव्या समाजरचनेच्या तत्वांशीही असतो. क्रांती हे मूलभूत पातळीवरचे मूल्यात्मक परिवर्तन असते. माणसांमधील जुने संबंध विसर्जित करुन नव्या सर्वांच्या हिताच्या संबंधांची प्रस्थापना म्हणजे क्रांती. संपूर्ण भारतीय समाजरचना क्रांती करुन आमूलाग्र बदलून टाकली पाहिजे हे बाबासाहेबांच्या क्रांतीविचाराचे ध्येय आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील सर्व अन्यायग्रस्तांना निर्वाणीच्या शब्दात "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." हा सर्जनशील संदेश दिला. हा त्यांचा संदेश कोणत्याही क्रांती करु इच्छिणाऱ्या समाजाने आपला जाहीरनामा मानावा असाच आहे. डॉ. आंबेडकर हे नाव एका अंतहीन संघर्षाचे नाव आहे. बाबासाहेबांचे आयुष्य समताधिष्ठित समाजाची जडणघडण करताना प्रखर प्रज्ञासूर्य झाले. अशा आमूलाग्र नव्या समाजासाठी त्यांनी आपली तत्त्वज्ञानशक्ती आणि आंदोलनशक्ती वापरली. या देशाच्या समाजव्यवस्थेतील कमाल विषमतेचा, तुच्छतेचा आणि अपमानाचा त्यांनी जीव रक्तबंबाळ होईपर्यंत अनुभव घेतला. विविध अपमानांनी दाहक झालेल्या डोळ्यांनी त्यांनी आपल्या समाजाचे अवलोकन केले. विषमतेचे हलाहल पचवीत त्यांच्या प्रज्ञेने भारतीय समाजात निर्माण केलेले माणुसकीचे दिवाळे पाहिले. इंग्रजी राजवट पाश्चात्त्य ज्ञानविज्ञान घेऊन येथे येते. आधुनिक मूल्यांची रुजवात होऊन एका प्रबोधनाची प्रक्रिया येथे अर्धे पाऊण शतक चालू राहते. डॉ. आंबेडकर हे ज्या समाजात वावरत असतात तो समाज विसाव्या शतकातला समाज असतो. त्याच्या पाठीशी एक प्रबोधन, एक सुधारणेचे आंदोलन उभे असते. तरीही काही वरवरचे दर्शनी बदल सोडले तर हा समाज मनुष्यता फुलविण्यात अजूनही असमर्थ समाज आहे हेच त्यांच्या अनुभवास येते. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता आणि अशाच सगळ्या जहरी विषमतांचे फडे निवडूंग येथे धर्मव्यवस्थेने आणि उच्चवर्णीयांनी पोसलेले असतात. याचा परिणाम म्हणून, येथील समाज, समाज म्हणून अस्तित्वात असण्याची योग्यताच गमवून बसलेला होता. येथे व्यक्तीला व्यक्ती म्हणून अस्तित्वात असणे अशक्य होऊन बसलेले होते. त्यामुळे हे राष्ट्र अर्धांगवायू झाल्याप्रमाणे दुबळे आणि निकामी झालेले होते. इथे वर्णांची उतरंड होती आणि या वर्णांची उपवर्गवारी म्हणून जातींची उतरंड होती. इथे अस्पृश्य होते, आदिवासी होते, भटकेविमुक्त होते आणि स्त्रिया होत्या, आणि हे सर्वच निर्दय सामाजिक गुलामगिरीचे अगतिक बळी होते. माणुसकी इथे मोडून पडली होती. न्याय इथे मरुन पडला होता. समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांची इथे राख केली गेलेली होती आणि बुद्धिवादाला इथे भयंकर अपमानीत - बहिष्कृत केले गेले होते.

जगातील आणि समाजवादी जगातील "लोकशाही समाजवाद" ही पहिली संकल्पना आहे. या क्रांतिकारक संकल्पनेचे, या अभिनव तत्त्वज्ञानाचे बाबासाहेब प्रवर्तक ठरतात. महत्वाच्या आणि मूलभूत उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करावे आणि शासनानेच ते चालवावेत. मूलभूत असलेले उद्योगधंदेही शासनाने स्वतःच्या अखत्यारीत चालवावे वा शासननियुक्त महामंडळाद्वारे चालवावेत, असे हा समाजवाद सांगतो.

विमा व्यवसाय ही सरकारची मक्तेदारी असावी. कोणत्याही प्रौढ नागरिकाला त्याच्या वेतनाच्या प्रमाणात पॉलिसी घेण्याची सक्ती शासनाने करावी. शेती हा शासनाचा उद्योग असावा. मालक कुळ, किंवा गहाणवट करणारा धनको यांच्या ताब्यातील उद्योगधंदे, विमा व शेती यांच्या वहिवाटीचे हक्क शासनाकडे असावेत. या खाजगी व्यक्तींना हक्काच्या मूल्याइतकी भरपाई सरकारी कर्जरोख्याच्या स्वरुपात दिली जावी. या प्रकारे जदळ जवळ सर्वच उद्योगधंद्यांचे आणि शेत जमिनीचे राष्ट्रीयीकरण करताना भरपाईची भरमसाठ व रोख रक्कम देण्याची तरतूदही बाबासाहेबांनी ठेवली नाही. ताब्यात घेतलेल्या जमिनीची विशिष्ट आकारात शेते पाडली जावीत आणि खेडूतांना कुळे म्हणून लागवडीसाठी दिली जावीत. शेताची लागवड सामुदायिक पद्धतीने व सरकारी नियमानुसार केली जावी. शेतावर योग्य ती आकारणी केली जावी आणि उरलेले उत्पन्न कुळांनी सरकारने ठरविल्याप्रमाणे वाटून घ्यावे. जात, पंथ असा भेद न करता भाडेपट्टीने जमीन दिली जावी. त्यामुळे कोणीही जमीनदार, कुळ किंवा भूमीहीन मजूर राहणार नाही. शासनाने शेतीसाठी पाणी, जनावरे, अवजारे, खत, बियाणे या बरोबर आर्थिक तरतूदही करावी. शासनाला पुढील हक्क असावेत - शेती उत्पन्नावर जमीन महसुलासाठी एक भाग, कर्जरोखे धारकांना परतफेड करण्यासाठी एक भाग आणि पुरवठा केलेल्या भांडवली वस्तूंच्या वापरासाठी एक भाग असे आकार (चार्जेस) लावता यावेत. कुळकायद्याच्या नियमांचा भंग करणाऱ्यांना, लागवडीच्या साधनांची हेळसांड करणाऱ्यांना किंवा सामुदायिक शेती योजनेला बाधक कृती करणाऱ्यांना शासनाने मुकर केलेली शिक्षा करावी. या राज्य समाजवादाच्या संकल्पनेला बाबासाहेबांनी सांसदीय लोकशाहीची जोड देऊन लोकशाही समाजवादाचे अभिनव स्वरुप सिद्ध केले आहे. विषमतेवर आधारलेली समाजरचना बदलण्यासाठी व राज्य समाजवादाच्या यशस्वितेसाठी डॉ. आंबेडकर औद्योगिकीकरणाचा पुरस्कार करतात. आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी, त्याला तेजस्वी अर्थ देण्यासाठी आणि समता संस्कृतीच्या संवर्धनासाठी व्यक्तीला कमीत कमी तास काम करावे लागावे. पशूप्रमाणे तिला सारखे कष्टाला जुंपू नये. कला व ज्ञानसाधना करण्यासाठी तिला भरपूर फावला

वेळ असावा. बाबासाहेबांचा लोकशाही समाजवाद व्यक्तीला ही हमी देऊ शकतो.

व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि समाजवाद यांच्यात परस्पर विरोध नाही. समाजात असूनही व्यक्तीचे जीवन स्वतंत्र असते. व्यक्तीला अर्थपूर्ण अस्तित्वनिर्मितीचे तिचे हक्क असावेत. यामुळेच कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रात व्यक्तीला कोणी गुलाम करु शकत नाही. व्यक्तीला गौण लेखणारा व वर्णात कोंडणारा धर्म बाबासाहेबांना मान्य नाही. समाजवाद हे बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान व्यक्तीच्या विकासाचेच तत्त्वज्ञान आहे. एका विशिष्ट मर्यादित खाजगी मालमत्तेची आणि भांडवलशाहीची उपयोगिता त्यांनी मान्य करुन वरील दोन्ही बाबींमधील समाजविघातक गोष्टींवर मात करण्याचे आवाहनही केले. पण या अवस्थेपेक्षाही बाबासाहेबांना लोकशाही समाजवादच आदर्श वाटत असे. भांडवलदार औद्योगिकीकरण करु शकत नाहीत. म्हणूनही समाजवाद त्यांना आवश्यक वाटतो. प्रचलित संस्कृतीत श्रमिकांचीही विभागणी झाली होती. बाबासाहेबांनी श्रमविभागणी पुरस्कारीली. श्रमिकांची विभागणी ही विषमतेला पोषक मानली.

डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही समाजवादात एका श्रेष्ठ सामाजिक नैतिकतेचा उद्घोष होताना दिसतो. यात बुद्धिप्रामाण्यवाद आहे. मैत्री आणि करुणा आहे. ऐहिकता आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आहे. समग्र ग्रामीण समाज या लोकशाही समाजवादानुसार जीवन जगायला लागावा ही तरतूद त्यात आहे. त्यातून या देशातील उपेक्षित माणूस उन्नत व्हावा, तो दास्य, दारिद्र्यातून मुक्त व्हावा, राष्ट्रजीवनाशी तो समरस व्हावा, त्यामुळे राष्ट्र स्वतंत्र होईल, आणि त्याला राष्ट्रपण लाभेल असे हा समाजवाद मानतो. जात, वर्ण आणि संप्रदायविहीन सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे, समाजातील सर्व घटकांमध्ये सुसंवाद निर्माण करणे म्हणजे राष्ट्रवाद होय असे बाबासाहेबांना वाटते.

राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष आणि बुद्धिप्रामाण्यवादी असावा. प्रतिगामित्वाचे पुनरुज्जीवन होईल असा तो नसावा. लोकसंख्येच्या बळावर एखाद्या धर्माचे नाव राष्ट्राला नाव देऊ नये. असा धर्मवाद व राष्ट्रवाद राष्ट्रविघातकच असतो. तो राष्ट्रवादी पिसाटपणा होय. कोणताही धर्म या राष्ट्राचे उपरोक्त राष्ट्रवादी धर्मनिरपेक्ष स्वरुप शबलित करणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. राष्ट्रवादाच्या नावाखाली जुन्या विषम समाजसंस्थेचे पुनरुज्जीवन करणे इष्ट नव्हे, असा आंबेडकरांच्या लोकशाही समाजवादाचा प्रस्ताव आहे.

मनुष्याच्या न्याय हक्कासाठी ते संघर्ष पुरस्कारतात. **"शिका, संघटित व्हा, संघर्ष करा."** किंवा **"बळी वाघाला देत नसतात, शेळीला देत असतात.** किंवा

"शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन जगा." अशा त्यांच्या विधानांमधून शक्तीची उपासना, सामर्थ्याची आराधना आणि संघर्षाचे महिमान व्यक्त होते. या लोकशाही समाजवादाला आंबेडकरांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दिलेले आहे. त्यांच्या या जडवादी लोकशाही समाजवादात अध्यात्माला, ईश्वराला वा आत्म्याच्या संकल्पनेला अस्तित्व नाही. ८.५.१९५५ च्या "जनतेत" त्यांनी बुद्धधम्माची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ईश्वर नाही, ईश्वर हा सृष्टीचा निर्माता नाही, आत्माही नाही असे सांगणारा बुद्धधम्म लोकशाही समाजवादाच्या यशस्वितेसाठी आवश्यक अशी बुद्धप्रामाण्यावादी मानसिकता घडविणारी शक्ती म्हणून त्यांना आवश्यक वाटतो. संविधानामध्येही [५१-ज] त्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी आणि सुधारणावाद यांचा पुरस्कार केला. या प्रकारे लोकशाही समाजवाद हे त्यांचे एक उन्नत जीवनदर्शन साकार झाले. घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांनी या दर्शनाची तेजोगर्भता वृद्धिंगत केली. या दर्शनात भांडवलशाहीला व हुकूमशाहीला जागा नाही. या सर्वच अनिर्बंध व व्यक्तिवादी गोष्टी टाळून आंबेडकर आपले चिंतन मांडतात. हा लोकशाही समाजवाद, मानवी मुक्तीचे हे दर्शन, ही आंबेडकरी नवनैतिकता जागतिक संदर्भात एक नवे योगदान, एक नवी निर्मिती ठरते. हाच आंबेडकरवाद होय.

आंबेडकरवाद प्रचलित भारतीय समाजरचनेला एक पर्यायी समाजरचना देणारा विचार आहे. "निरीश्वरवादाच्या तात्त्विक अधिष्ठानावर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय मूल्यांसाठी जगणारा समाज साकार करण्याची शक्ती या विचारात आहे.

Sincerity and Intellect हे दोन गुण महापुरुषात असले पाहिजेत. तसेच A great man must be motivated by the dynamics of a social purpose and must act as the scorge and the scavenger of society" याही गोष्टी त्याच्यात असल्या पाहिजेत. ही बाबासाहेबांनी केलेली महापुरुषाची व्याख्या बाबासाहेबांचे यथार्थ वर्णन करणारी आहे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

दोन सेक्युलॅरिझम आणि डॉ. आंबेडकर

मुळात सेक्युलॅरिझमचे स्वरुप पाहिले तर ते एक अत्यंत मौलिक असे इहवादी तत्त्वज्ञान आहे हीच गोष्ट आपल्या मनावर ठसते. ऐहिक जीवनाच्या संवर्धनाचे तत्त्वज्ञान असे सेक्युलॅरिझमचे स्वरुप आहे. जन्म आणि मृत्यूच्या मधला मानवी जीवनाचा परिसर हाच या इहवादाचा विषय आहे. या ऐहिक जीवनातील प्रश्नांची अचूक उत्तरे या इहजीवनाच्या परिसरातच मिळू शकत असतात, इहजीवनाच्या कक्षेतच त्यांचा शोध घेतला पाहिजे. ऐहिक जीवनाच्या कक्षेबाहेर न जाता माणसांच्या संबंधांमध्येच, त्यांच्या स्वभावांच्या गर्दीमध्येच मानवी जीवनाची उत्तरे शोधण्याचा संस्कार लोकमनावर केला पाहिजे यासाठी इहवाद जन्माला आलेला आहे.

अंतहीन गुलामगिरी

धर्म, ईश्वर आणि अध्यात्म यांची उत्तरे ठरलेली आहेत. या उत्तरांमागे परलोकनिष्ठा उभी असते. या निष्ठेतून काढलेल्या उत्तरांचा परिणाम इहजीवनावर होत असतो. मानवी जीवनाचा इतिहास असे सांगतो की परलोकदृष्टीने काढलेल्या उत्तरांचा फायदा इहजीवनातील केवळ मूठभर धूर्तांना आणि उच्चवर्णीय झालेल्यांना होतो. ही उत्तरे थोड्या उच्चवर्णीयांना जगवणारी आणि बहुसंख्य जनसामान्यांना मारणारी असतात. ही उत्तरे मूठभर मग्रूरांना मालक करणारी, बहुसंख्य लोकांना गुलाम करणारी असतात. परलोक अतिंद्रिय आणि पूर्वजन्म अशा, पडताळा घेता येऊ न शकणाऱ्या मानीव गोष्टींवर ती उत्तरे आधारलेली असतात. वरील उत्तरांचा खरेपणा तपासण्याचे सर्व मार्गच परलोकवाद्यांनी बंद केलेले असतात. ही उत्तरे, ती ज्यांच्या अहिताची असतात त्यांना त्यांच्या दुःखाची कारणेच कळू देत नसतात. त्यामुळे या नागवलेल्या

लोकांना केवळ खोटी उत्तरे उरी कवटाळूनच जीवन जगावे लागते असे नाही तर आपल्या अंतहीन गुलामगिरीला पूजनीय मानतच जगावे लागते.

धर्म, ईश्वर आणि अध्यात्म यांची उत्तरे मानवी समतेच्या विरोधी असतात. या उत्तरांचा खरे खोटेपणा तपासण्याची सोय नाही आणि मूठभर 'मजेत' व बहुसंख्य 'सजेत' ही मूठभरांच्या हिताची 'व्यवस्था' तुटणार नाही याची काळजी वाहण्याशिवाय या उत्तरांना काम नसते. बहुसंख्य नागवलेल्या लोकांना मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी इहवादी तत्वज्ञान, धर्म, ईश्वर आणि अध्यात्म यांची उत्तरे नाकारते. ही भ्रांत आणि फसवणारी, ही खोटी आणि अमानुष उत्तरे नाकारल्याशिवाय माणुसकीच्या मार्गावर चालायला प्रांरभही करता यायचा नाही. त्यामुळेच इहवादी मनोवृत्ती ही उत्तरे नाकारते.

पण परलोकवाद्यांची वरील उत्तरेच केवळ नाकारुन भागत नाही. त्यामुळे आहे त्या परिस्थितीत फारसा महत्वाचा बदल करता येत नाही. ही उत्तरे खऱ्या अर्थाने नाकारायची असतील तर ही उत्तरे ज्या धर्माशी, ईश्वराशी आणि अध्यात्माशी निगडीत आहेत ते धर्म, ईश्वर आणि अध्यात्मही नाकारले पाहिजे. त्याशिवाय वरील उत्तरे नाकारण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही. ती प्रक्रिया अर्थपूर्णही होत नाही.

तेव्हा खरी इहवादी मनोकृत्ती कोणती? तर विषमतेच्या वृक्षाचा दृश्य विस्तारच नाही तर त्यासोबत त्या वृक्षाला जमिनीत अदृश्य रुपात आधारभूत असणारी सारी मुळेही नाकारते ती!

लोकायत तत्त्वज्ञान

या इहवादाच्या भेटीसाठी आपणाला भारताबाहेर जायची गरज नाही. लोकायत तत्त्वज्ञान आपल्याकडे आहे. बुद्धपूर्वकाळातही या तत्त्वज्ञानाने येथील वैदिक ईश्वरशाहीविरुद्ध मूलगामी भूमिका घेतली. हे तत्त्वज्ञान चार्वाक तत्त्वज्ञान म्हणून आपणास माहीत आहे. या लोकायत तत्त्वज्ञानाच्यामधील 'लोक' म्हणजे इहलोकच होय. इहलोकासंबंधीचे तत्त्वज्ञान म्हणजे लोकायत तत्त्वज्ञान होय. लोकायत तत्त्वज्ञान ईश्वर, आत्मा, पूर्वजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग नरक असे काहीही मानत नव्हते आणि केवळ इहलोकाच्या कक्षेतच मानवी जीवनाच्या समस्या सोडविण्याचा प्रयास करीत होते.

भारताच्या सामाजिक इतिहासातील इहवादाचा आदरणीय आविष्कार म्हणजे गौतम बुद्धाचे तत्वज्ञान होय. बुद्ध या देशाच्या प्राचीन इतिहासातला एक महान सेक्युलर होता. धर्म, ईश्वर आणि अध्यात्म या भाकड गोष्टींना त्याने कधी मानले नाही. ऐहिक जीवनाचा परिसरच त्याने आपल्या विचाराचा विषय मानला. मानवाचे ऐहिक जीवन

त्याने विचारासाठी प्रस्तुत मानले. माणसाला जीवनाचा मध्यबिंदू मानून त्याने आपल्या विचाराची घटना निश्चित केली. बुद्ध या देशातला महान इहवादी विचारवंत आहे. ईश्वर, धर्म आणि अध्यात्म यांनी या देशातील बहुजनांच्या जीवनात कसे जहर कालवले हे बुद्धाने ओळखले होते म्हणून बहुजन हिताय, बहुजन सुखाय या ध्येयाने जीवनाच्या लढाईत उतरु शकणारा विचारच बुद्धाने जन्माला घातला. हा विचार निखळ इहवादी होता.

इहवादाचा प्रभावी आविष्कार

इहवादाचा अत्यंत प्रभावी आविष्कार पुढल्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकार केला. बुद्धाचा निरीश्वरवाद स्वीकारुन आणि त्याला विसाव्या शतकाच्या सामाजिक संदर्भात अन्वर्थकता प्राप्त करुन देऊन एक अत्यंत ज्वलज्जहाल सेक्युलॅरिझम त्यांनी साकार केला.

भारतातील काय आणि जगातील काय इहवादी तत्त्वज्ञाने ही समाजक्रांतीची तत्त्वज्ञाने ठरतात. देशकाल परिस्थितीप्रमाणे सेक्युलॅरिझमचे स्वरुप निश्चित होत असते, पण त्याची मूलभूत बैठक बदलत नाही. इतर तत्त्वज्ञाने ही प्रतिक्रांतवादी, क्रांतिविरोधी अशी तत्त्वज्ञाने असतात.

अर्थात एखादा विचारवंत ज्या प्रमाणात इहवादापासून तुटत जाईल त्याप्रमाणात तो क्रांतिविरोधी होत जाईल. ज्या प्रमाणात एखादा विचारवंत ईश्वर, धर्म वा अध्यात्म यांच्या छावणीशी नाते जोडील त्याप्रमाणात तो प्रतिक्रांतीवादी ठरत जाईल. स्थितीवादी साबीत होत जाईल.

आपल्याकडे काही लोक जाणीवपूर्वक तर काही लोक भाबडेपणाने बुद्ध आणि बाबासाहेब यांना धर्माशी आणि अध्यात्माशी जोडत आहेत. बुद्ध आणि बाबासाहेब दोघेही ईश्वरच मानत नाहीत त्यामुळे त्यांना अध्यात्माशी आणि धर्माशी जोडणे म्हणजे बुद्धाचा आणि बाबासाहेबांचा घनघोर अपमान करणे होय. स्थितीवादी समाज आपल्या सोयीच्या विचारालाच जगवतो. आपल्या विरोधी जाणाऱ्या विचाराला समरसीकरण आणि विकृतीकरण या मार्गांनी नष्ट करुन टाकीत असतो. कोणत्याही काळातील आणि देशातील प्रतिक्रांतीवादी मानसिकता क्रांतीविचारावर प्रेम करुच शकत नाही. क्रांतीविचाराचे अस्तित्व, त्याचा प्रभाव आणि त्या लोकांकडून त्याचा होणारा स्वीकार या गोष्टी प्रतिक्रांतीशक्तींना सहन होऊच शकत नाहीत. या शक्ती मग क्रांतीविचाराला शक्य त्या मार्गाने नष्ट करण्याचा विडा उचलित असतात.

राहूल सांकृत्यायनापासूनच्या या देशातील डाव्या विचारवंतांनी बुद्धाला

अभौतिकवादी वा अध्यात्मवादी ठरविणे ही गोष्ट सहज घडत नाही. बुद्ध विचारवंत आहे. तो फिलॉसाफर आहे. तो अत्यंत जबाबदार आणि सुसंगत इहवादी आहे. या देशातील डाव्या विचारवंतांनी बुद्धाला इहवादविरोधी विचारपंरपरेत ढकलण्याचे कारण समजावून घेण्याचा प्रयत्न आपण कधी करुन पाहणार आहोत की नाही? बुद्धाला धर्मसंस्थापक, धर्मपुरुष ठरवणारे आणि त्याच्या तत्त्वज्ञानाला धर्माच्या चौकटीत बसवणारे लोक ही गैर गोष्ट कोणत्या हेतूने करीत होते व आहेत याची तपासणी आपण करणार आहोत की नाही? दि. के. बेडेकर, गं. बा. सरदार या सर्व विचारवंतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मपुरुष आहेत असे मानणे बरोबर आहे काय? बाबासाहेबांनी धर्माचा स्वीकार केला? बाबासाहेब ईश्वर मानतात? बाबासाहेब अध्यात्मवादी होते?

धर्म, ईश्वर आणि अध्यात्म या संदर्भातील बाबासाहेबांच्या पूर्वायुष्यातील मते देऊन बाबासाहेबांना धर्मवादी, ईश्वरवादी वा अध्यात्मवादी ठरवणे हे सरळ बाबासाहेबांच्या उत्तरायुष्यातील परिपक्वता नाकारणे ठरते. पण या पूर्वायुष्यातील मतांचा हवाला देण्याची आणि बुद्ध तत्त्वज्ञानाच्या स्वीकाराला धर्म म्हणण्याची सोयीची भूमिका येथील डावी आणि हिंदुत्ववादी मंडळीसुद्धा घेतात तेव्हा त्यांच्या इराद्याबद्दल शंका राहात नाही.

भारतीय वर्गचारित्र्य!

दोन वेगवेगळ्या कारणांसाठी वरील मंडळी बाबासाहेबांना धर्मात खेचण्याचा आटापिटा करीत आहेत. डाव्यांच्या पुढले कारण बुद्ध आणि आंबेडकर यांच्या तुलनेत मार्क्सला क्रांतीवादी ठरवणे हे असते. त्यामुळे प्रतिक्रांतीवाद्यांच्या गटात बुद्ध आणि आंबेडकरांना ते टाकून देतात. इथे मार्क्सवरचे प्रेम कदाचित असेल पण विचारांचा द्वेषही आहे हे उघड आहे. विकृत केल्याशिवाय आंबेडकराला कसे नाकारणार? नाकारायचे तर आहे आणि नाकारता तर येत नाही. मग विकृती एवढेच जालीम हत्यार उरते. मार्क्सवाद्यांनी हे हत्यार वापरले. भारतीय तत्त्वज्ञान या पुस्तकात गांधी, विवेकानंद यांच्या विचारांचा परिचय असतो पण फुले नसतात, आगरकर नसतात आणि आंबेडकरही नसतात. मॉस्कोचे प्रगती प्रकाशन हे पुस्तक प्रसिद्ध करते. तेव्हा भारतीय डाव्यांनी अशी उजवी कृती करणे त्यांच्या ऐतिहासिक वर्गचारित्र्याशी सुसंगतच आहे असे म्हटले पाहिजे. या मार्क्सवादी पोपटांना क्रांती आणि विचार कळला नाही. आपले पारंपरिक भारतीय वर्गचारित्र्य कुरवाळत राहण्याशिवाय त्यांना दुसरे काहीही शक्य झाले नाही असेच म्हटले पाहिजे!

उरले हिंदुत्ववादी! हे बाबासाहेबांना धर्माच्या, अध्यात्माच्या चौकटीत बसवीत आहेत. त्यांचे हिंदुकरण करीत आहेत. मिळून वरील दोन्ही (अर्थात एकच) प्रवृत्ती बुद्धाला आणि विशेषतः आंबेडकरांना प्रतिक्रांतीवाद्यांच्या शिबिरात घेऊन जाऊ पाहात आहेत. समरसतेचे लोभस नाणे त्यासाठी आहे. बाबासाहेब इहवादी असणे, धर्म, अध्यात्म आणि ईश्वर या स्थितीवाद्यांच्या लाडक्या प्रमेयांच्या विरुद्ध टोकाला असणे ही गोष्ट परंपरावाद्यांची झोप उडवणारी आहे. तेव्हा सुखाने झोपता येण्यासाठी ही मूठभर मंडळी आता बाबासाहेबांचा इहवाद विकृत करायला निघालेली आहेत.

बाबासाहेबांना इहवादापासून तोडणे यातच धर्मवाद्यांचे भले आहे. असे केल्यानेच केवळ आंबेडकर नष्ट करता येते. आंबेडकरांचा विचार नष्ट करायचा असेल तर त्यांना इहवादाच्या विरोधी शिबिरात नेऊन दाखल करण्याशिवाय गत्यंतर नाही. परंपरावाद्यांच्या लक्षात ही गोष्ट आलेली आहे. डॉ. आंबेडकरांना इहवादापासून तोडण्याचा कार्यक्रम हा आंबेडकर निर्मूलनाचा कार्यक्रम असतो. आंबेडकरांना इहवादापासून तोडून प्रतिक्रांतीवाद्यांच्या रांगेत भरती करायचे असेल तर त्यांना धर्माशी आणि अध्यात्माशी जोडणे आवश्यकच असते. परंपरावाद्यांना आंबेडकर नको आहे असे नाही. त्यांना आंबेडकर हवा आहे पण तो त्यांच्या हिताचा. त्यांच्या मनातील सर्व श्रद्धांना संरक्षण देणारा आंबेडकर हवा आहे. त्यासाठी त्यांनी आंबेडकरांची धूर्त मोडतोड चालविलेली आहे.

हे बाबासाहेबांचे मारेकरी

वरील मंडळी आंबेडकरांच्या संदर्भात जे करीत आहेत तेच कार्य आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववादीही करीत आहेत. हे सर्वच लोक बाबासाहेबांचे मारेकरी आहेत. आंबेडकरद्रोही आहेत. जयभीम म्हटले की सगळ्या प्रकारचा तात्त्विक भ्रष्टाचार करायला आपण मोकळे असेच या मंडळींना वाटते. आपणही आंबेडकरवादी आहोत असे पुनः पुन्हा म्हणण्याने कोणाचे आंबेडकरवादपण सिद्ध होत नाही. आंबेडकरवादी असणे वेगळे आणि आंबेडकरवादी असल्याचे दाखविणे वेगळे. आंबेडकरवादी आहोत असे दाखवीत दाखवीत आंबेडकरवादाचे क्रांतिरसायन दूषित करणे वेगळे. आंबेडकरी चळवळीतील ही हिंदुत्ववादी मंडळी बुद्धाला आणि बाबासाहेबांना अध्यात्मवादी ठरविण्याचा आटापिटा करीत आहेत. हे लोक एकतर अप्रामाणिक तरी असले पाहिजेत किंवा आपण काय बोलतो आणि लिहितो आहोत त्याचा अर्थ तरी त्यांना कळत नसला पाहिजे. पण हे बोलतात वा लिहितात त्याचा अर्थ त्यांना कळत नसावा

असे तरी कसे म्हणावे? आपल्या विद्वत्तेचा बँडबाजा आपल्या अर्धवट अनुयायांकडून तर ते सततच बडवून घेत असतात. याचा एक अर्थ आपल्या लिहिण्याचा अर्थ त्यांना कळतो असा आपण केला तर मग ते अप्रामाणिक ठरतात. ते जाणीवपूर्वकच हिंदुत्ववाद्यांच्या आंबेडकर निर्मूलन मोर्चात सामील झाले आहेत आणि या प्रकारे आंबेडकरविकृतीकरण मोर्चात सामील झालेले लोक स्वतःला आंबेडकरवादीही म्हणवतात, ते आवाजाला आणि उत्साहाला अधिकच बेगड लावून जयभीमही करतात. याचा अर्थ ते निश्चितपणे अप्रामाणिक आहेत. ते दगाबाज आहेत. ते आंबेडकरद्रोही आहेत यात शंकेला कुठेही जागा नाही.

डॉ. आंबेडकरांना धर्माशी आणि अध्यात्माशी जोडणे म्हणजे क्रांतीच्या शिबिरातून बाहेर कादून बाबासाहेबांना प्रति क्रांतीवाद्यांच्या शिबिरात दाखल करणे होय. बाबासाहेबांनी बुद्धाला क्रांती म्हटले तर वेद, गीता, मनुस्मृती या मूठभरांचे वर्चस्व टिकविण्यासाठी या देशातील बहुसंख्य लोकांना गुलामीच्या गर्तेत टाकणाऱ्या ग्रंथांना आणि त्यांचा पुरस्कार करणारांना प्रतिक्रांतीवादी म्हटले आहे. बाबासाहेबांना अध्यात्मवादी ठरवणे, त्यांनी गीतेपासून प्रेरणा घेतली असे म्हणणे हा दखलपात्र गुन्हा आहे. हे नकळत होत नाही. हे अज्ञानाने होत नाही. बुद्ध आणि आंबेडकर ईश्वरच मानत नाही. तेव्हा ते अध्यात्मवादी ठरुच शकत नाहीत ही एवढीशी गोष्ट या विद्वान म्हणवणारांना कळत नाही? निश्चित कळते पण बाबासाहेबांना प्रतिक्रांतीवादी ठरवायचे असेल तर हा संभ्रम पसरविणे आवश्यकच असते आणि ते लोक तो पसरवतात.

बाबासाहेबांना परंपरावादी केले

इहवादी आंबेडकरांना अध्यात्मवादी ठरवून आपण त्यांना केवळ लहान करीत नाहीत तर त्यांना आपण पार कुरुप, पार परंपरावादी करुन टाकतो आहोत हे यांना कळत नाही? इहवादापासून एखाद्या माणसाला जितके आपण तोडतो तितके त्याला आपण परिवर्तनविरोधी ठरवितो हे त्यांना कळत नाही? परंपरावाद्यांना अत्यंत सोयीस्कर असा आंबेडकर घडवण्यात आपणही अग्रेसर आहोत हे यांना कळत नाही? कळते, पण त्यांना तेच करायचे आहे त्याला काय करणार? परंपरावाद्यांचीच त्यांना सेवाचाकरी करायची आहे, आपल्या जुन्या हिंदुत्वनिष्ठांशीच इमानदार राहायचे आहे त्याला कोण काय करणार? ही मंडळी यापेक्षा वेगळे काही करुच शकत नाही. लोकांच्या लक्षात यांच्या पोटात काय आहे ते दिसले आहे.

बाबासाहेबांचे इहवादपण

यावेळी आंबेडकरवादी अभ्यासकांनी आपली जबाबदारी ओळखून वागण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब हे इहवादी तत्त्वज्ञ आहेत. ते भारतीय क्रांतीचे फिलॉसॉफर आहेत. बाबासाहेबांचे हे इहवादपण समजावून घेणे आणि हे इहवादपण पुनःपुन्हा मांडत राहणे, त्याचा संस्कार लोकमानसावर करीत राहणे फार आवश्यक आहे. असे झाले तर बाबासाहेबांना अध्यात्मवादी ठरवणाऱ्या, प्रतिक्रांतीवादी ठरवणाऱ्या परंपरावादी आक्रमणांना आपण परतवून लावू शकू.

आपली जबाबदारी

ही वैचारिक लढाई आहे. बाबासाहेबांना अध्यात्मवादी ठरविणारी मंडळी जिंकली तर या देशात प्रतिक्रांतीवादी धार्मिक शक्ती मोकाट सुटल्याशिवाय राहणार नाहीत. धर्मांध शक्तींचा नंगा नाच इथे सुरु झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून म्हणतो बाबासाहेबांचा इहवादीपणा पुढे नेणारे आपण हरता कामा नये. बाबासाहेबांचा इहवाद हरला तर आपण जिंकण्याच्या सर्व शक्यताच नष्ट होऊन जातील. बाबासाहेबांचा इहवाद जिंकला तर आपण पराभूत होण्याच्या सर्व शक्यताच संपून जातील. म्हणून बाबासाहेबांना धर्मवादी, अध्यात्मवादी ठरवायला निघालेल्या सर्वांपासूनच बाबासाहेबांच्या इहवादाची इस्टेट आपण जपायला पाहिजे. आज आपणा सर्वांवर हीच सर्वात मोठी ऐतिहासिक जबाबदारी आहे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

तीन आंबेडकरधम्म

१४ ऑक्टोबर १९५६ साली बाबासाहेबांनी हिंदूधर्माचा त्याग केला. बुद्धधम्माचा स्वीकार केला. या हिंदूधर्मत्यागाच्या आणि बुद्धधम्म स्वीकाराच्या घटनेला 'धर्मांतर' असा शब्द वापरला जातो. पण हा शब्द बरोबर आहे का असा प्रश्न आपल्याला पडला पाहिजे.

बाबासाहेबांनी हिंदूधर्माचा त्याग केला, हे ठीक आहे; पण त्या धर्माचा त्याग करुन त्यांनी दुसरा कोणताही धर्म घेतला असता तर वरील घटनेचे वर्णन या शब्दाने सहज झाले असते. उदाहरणार्थ, हिंदूधर्माचा त्याग करुन त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला असता, तर ते धर्मांतर झाले असते. हिंदू धर्म सोडून ख्रिश्चन, शिख धर्म स्वीकारला असता तरी धर्मांतर झाले असते. कारण हिंदू हा जसा धर्म आहे तसे इस्लाम, ख्रिश्चन आणि शिख हेही धर्म आहेत. वरील धर्मांमधल्या कोणत्याही व्यक्तिने आपला मुळचा धर्म सोडून इतर कोणताही धर्म घेतला तरी ते धर्मांतर होते. इथे धर्मांतर हा शब्दच योग्य आहे. तो इथे बरोबर लागू पडतो.

बाबासाहेबांनी बुद्धधम्म घेतलेला आहे. 'बुद्ध धम्म' हा 'धम्म' आहे, 'धर्म' नव्हे. बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग करुन ख्रिश्चन, इस्लाम वा शिख यापैकी कोणताही 'धर्म' घेतला असता तरच १९५६ च्या १४ ऑक्टोबरच्या त्या ऐतिहासिक घटनेला धर्मांतर म्हणता आले असते. पण त्यांनी वरीलपैकी कोणताही धर्म घेतला नाही आणि त्यांनी बुद्धधम्म स्वीकारला. त्यामुळे त्या घटनेला धर्मांतर हा शब्द लावता येत नाही. वरीलपैकी कोणताही धर्म बाबासाहेबांनी कटाक्षाने टाळलेला असल्याने त्यांनी केवळ एका धर्माचा त्याग केला असे नाही तर कोणत्याही धर्माचा स्वीकार करायचे कटाक्षाने टाळलेले आहे. याचा अर्थ त्यांनी धर्मसंस्थेचाच त्याग केला आहे. त्यांनी धर्मांतर केले नाही. याचा

अर्थ एक धर्म सोडून दुसरा धर्म घेतला नाही, त्यांना दुसरा धर्म स्वीकारायचाच नव्हता. त्यांना धर्मांतर करायचे नव्हते तर त्यांना धर्मातीत व्हायचे होते. धर्मविहीन व्हायचे होते. तुम्हा-आम्हा सगळ्यांना आणि भारतातील सर्व लोकांनाच याप्रकारे धर्मविहीन करावे, धर्मातीत करावे हा उद्देश बाबासाहेबांच्या मनात होता.

धर्म आणि धम्म

'धर्म' आणि 'धम्म' या शद्वांच्या अर्थासंबंधी बाबासाहेबांनी सविस्तर चर्चा केली आहे. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथामध्ये त्यांनी ही चर्चा केलेली आहे.

धर्म म्हणजे काय? बाबासाहेब म्हणतात, ईश्वर असल्याशिवाय 'धर्म' संभवत नाही. आत्मा असल्याशिवाय धर्म संभवत नाही. मोक्ष, मुक्ती, भक्ती, पूजा, प्रार्थना, पुर्वजन्म आणि पुनर्जन्म या सर्व गोष्टी धर्मात असतात.

धर्मात ईश्वराला सर्वश्रेष्ठ स्थान असते आणि नीतिला आनुषंगिक स्थान असते. ईश्वराभोवती धर्म फिरतो. हा ईश्वरसुद्धा मूठभर लोकांच्या स्वार्थाचीच रखवाली करतो.

धर्म ईश्वराला केंद्र करतो आणि त्यानिमित्ताने 'चुझन पिपल्स'ना केंद्र करतो. निवडक लोकांच्या हिताची राखण करणारा धर्म बहुसंख्य लोकांच्या गुलामीचीच तयारी करुन ठेवतो.

धर्मात ईश्वर ही सर्वकर्तीकरविती शक्ती (Supreme Authority) मानल्याने समाजाचे रुप निश्चित होते आणि त्यात मूल्यात्म असा कोणताही बदल नाकारला जातो. मनुष्याच्या विचारशक्तीचे 'स्वतंत्र' विचार करण्याचे स्वातंत्र्य नष्ट केले जाते. ईश्वरकेंद्री धर्माचा पहिला मुद्दा माणसाला विचारप्रक्रियेपासून तोडणे हाच असतो. धर्माबाहेरचा विचार करणारा वा 'स्वतंत्र' विचार करणारा मनुष्य हा धर्माचा शत्रू असतो. पाखंडी म्हणून धर्म त्या माणसाला शासन करतो. धर्म ही निर्विकार मने निर्माण करण्याची फॅक्ट्रीच असते. त्यामुळे व्यवस्थांतर ही गोष्ट धर्म कधीच मान्य करीत नाही. धर्म ईश्वरापुरता असण्याचा अभिनय करीत असला तरी समाजरचनेचा ढाचा कायम ठेवणे ह्यासाठीच धर्माची खटपट चाललेली असते. जुनीच समाजरचना कायम ठेवायची असेल तर 'स्वतंत्र विचार' करणारी मने जन्माला येणार नाहीत याची काळजी घेणे धर्माला भागच असते. हे असते धर्माचे स्वरुप.

धम्म म्हणजे काय?

धम्माचा ईश्वराशी संबंध नसतो. परलोकाशी आणि त्याच्याशी संबंधीत

स्वर्गा-नरकाशी धम्माचा काहीही संबंध नसतो. धम्म-

१. ईश्वर मानत नाही.

२. आत्मा मानत नाही.

३. पुर्वजन्म - पूनर्जन्म मानत नाही.

४. धम्म कोणतीही अंधश्रद्धा मानत नाही.

५. धम्म भक्ती, पूजा, नवस सायास मानत नाही.

६. सामाजिक, आर्थिक अशी कोणतीही विपमता मानत नाहीत.

७. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था मानत नाही.

मुक्त मानव हे बाबासाहेबांच्या विचारांचे ध्येय आहे. ही मुक्तता कशापासून? तर त्याचे मुक्त विकसन स्वातंत्र्य मारणाऱ्या गोष्टींपासून!

ऊर्जा कधी थांबत नाही. झोपत नाही. ऊर्जा ही अखंड जिवंतता आहे. अखंड गतिमानता आहे. आणि आपण सर्व ऊर्जापुत्र आहोत. आपली सर्वांचीच नाळ या ऊर्जेशी बांधलेली आहे. ऊर्जेच्या पुत्रांनी, ऊर्जेचे सेंद्रिय घटक असणारांनी ऊर्जेसारखे वागणे ही प्रकृती. ऊर्जेच्या विरुद्ध जाऊन गतिशून्य होणे ही विकृती. परस्परातील बंधुत्व म्हणजे संस्कृती. बाबासाहेब धार्मिकांची विकृती टाळतात. धर्म ऊर्जेसोबत शत्रूप्रमाणेच वागतात. जगाच्या पाठीवर धर्ममानसिकतेचे आणि ऊर्जामानसिकतेचे भयानक झगडे झालेले आहेत. हे झगडे गतिचे आणि गतिविरोधकांमधील झगडे होते. धर्म चौकटीबाहेरचा विचार जन्माला न येण्याची खबरदारी घेतो तर ऊर्जा कोणीही चौकटीत राहणार नाही यासाठी धडपडते. धर्म ऊर्जेच्या विरुद्ध वागतो म्हणून तो विकृती ठरतो. तो मानवी मुक्तिचा शत्रूच ठरतो. धर्माची एकच भूमिका असते, तो मानवाला मानव होऊ देत नाही. त्याला ऊर्जापुत्र होऊ देत नाही. त्याला मुक्त होऊ देत नाही.

खरे तर धर्म हे मुळात अवैज्ञानिक मनाचे अप्रगल्भ स्वप्न असते. अजाण मनाची ती सुखनिद्रा असते. धर्म मानवाच्या मेंदूची वाढच होऊ देत नाही. रांगण्याच्या अवस्थेपुढला प्रवास तो मानवी बुद्धिला करुच देत नाही.

अमुक देशात अमुक इतकी शतके समाज धर्माच्या प्रभावात होता अशी विधाने केली जातात. काहींना या विधांनाचा गौरव वाटतो. पण अशा विधानाचा अर्थ तेवढी शतके तो समाज गतिला पारखा झाला होता असा असतो. ऊर्जेपासून त्या समाजाने फारकत घेतली होती. तो समाज विकृतीच्या दरीत कोसळलेला समाज होता. असा त्याचा अर्थ असतो. म्हणून एखादे आगरकर हा समाज मागील हजारो वर्षे जडमूढ होऊन पडला

होता असे लिहू शकत असतात.

धर्म इहवादाच्या पूर्णतः विरोधात उभा असतो. सेक्युलॅरिझमशी त्याचे घनघोर वैर असते. उलट सेक्युलॅरिझमला अर्थात इहवादाला धर्माशी युद्ध करीतच जन्माला यावे लागते आणि शक्तीशाली व्हावे लागते. धर्म हा एक स्वभाव असतो. ती एक प्रवृत्ती असते तर इहवाद (Secularism) हा एक स्वभाव असतो. ती एक प्रवृत्ती असते.

भारतात या दोन स्वभावांचे कधी क्षीण तर कधी प्रखर संघर्ष झाले. कधी कधी तर अनेक शतके धर्म हा स्वभावच इथे वास्तव म्हणून वावरला. ज्या समाजात धर्म हा स्वभाव शतकानुशतके वास्तव म्हणून वावरतो त्या समाजाच्या वाट्याला केवळ विकृत जगणे आलेले असते. आपण हजारो वर्षे विकृत जगणे जगत आहोत हेही त्या समाजाच्या लक्षात येत नाही. इतकी ती प्रभावी विकृती असते. ही विकृती जेव्हा प्रकृती म्हणून एवढेच नव्हे तर संस्कृती म्हणून हजारो वर्षे नांदते तेव्हा त्या समाजाच्या अधःपतनाला पारावार उरत नाही. भारतीय समाज हजारो वर्षे धर्मप्रभावात राहिला हा पुरावा तो युरोपच्या मागे का राहिला याचा आहे. हा समाज हजारो वर्षे विषमतेच्या नरकात राहिला हा पुरावा हा समाज धर्मप्रभावात होता याचा आहे.

इथे समतेव्या अखंड परंपरा नाहीत. इथे बुद्धाची इहवादी परंपरा खंडित झाली. इथे दैववादाला एक अव्याहत प्रतिष्ठा आहे. इथे खुळचटपणाचा सतत विकास झाला आहे. इथे भौतिक विद्यांना प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही. समतेच्या प्रयत्नांना गावकुसाबाहेर हाकलले गेले. मानवी कर्तृत्वाला इथे वाव मिळाला नाही. अख्खे जीवन इथे खुरटे निपजले. याला कारण या समाजाने ऊर्जेशी फारकत घेतली हे आहे. हा समाज प्रकृतीपासून ढळला आणि तो विकृतीची आराधना करु लागला हे आहें.

बाबासाहेबांनी धर्म सोडला, धर्मसंस्था सोडली कारण धर्म हा मानवी व्यक्तित्वाच्या विकासाला बांध घालतो. त्यामुळे स्वतंत्र विचार करण्याची प्रक्रियाच जन्माला येत नाही. स्वतंत्र विचार करण्याची प्रक्रिया जन्माला न आल्याने चौकटीबाहेर पाय टाकण्याची मानसिकता जन्माला येत नाही. विषमतेविरुद्ध आणि सर्वच प्रकारच्या कुरुपतेविरुद्ध उभे राहू शकणारे मनच निर्माण होत नाही. मुक्त मानवी मनाच्या निर्मितीचा क्षणच समाजात जन्माला येत नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी धर्म सोडला, त्यामुळेबाबासाहेबांनी धर्मसंस्था सोडली आणि ते मानवाला मुक्तपणे वाढू देणाऱ्या 'धम्माकडे' गेले. ते इहवादाकडे गेले. धम्म म्हणजे इहवाद. धर्मातीतता. धम्म म्हणजे स्वतंत्र विचार. धम्म म्हणजे मुक्त मन. धम्म म्हणजे बंधुता. धम्म म्हणजे अखंड गतिशालीनी ऊर्जा. म्हणून बाबासाहेबांनी धम्म स्वीकारला.

बाबासाहेबांनी धम्मस्वीकार केला. धर्मस्वीकार केला नाही. म्हणून बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर रोजी केले ते धर्मांतर नव्हे. तो होता धर्म त्याग. आणि तो होता धम्मस्वीकार! इहवादी तत्त्वज्ञानाला त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात एक आगळे, अत्यंत प्रभावी आणि क्रांतीशाली व्यक्तिमत्व दिले म्हणून तो ठरतो आंबेडकरधम्म!

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

चार आंबेडकरवाद्यांची आजची जबाबदारी

आपल्या देशात स्थितीवादी विचार पूजनीय मानण्याच्या आणि तो विचार शताकृशतके वाहून नेण्याच्या परंपरा आहेत. चौकटी बाहेरचा विचार सहन करणारी, असा विचार मान्य करणारी आणि असा विचार जगण्यात उतरवणारी मानसिकता एका मर्यादेपलीकडे इथे वाढीस लागल्याचे दिसत नाही. अशी मानसिकता वाढविणारे अधूनमधून झालेले प्रयत्न नष्ट करणाऱ्या परंपरा मात्र इथे शक्तीशाली होताना दिसतात. त्यामुळे आमूलाग्र क्रांतीचा किंवा किमान चौकटीबाहेरचा विचार मांडणाऱ्या महापुरुषाच्या वाट्याला अशा समाजात नेहमीच एक भोगवटा येतो. त्या महापुरुषाच्या विचाराला बगल देऊनच त्याचा क्रांतीविचार वजा करुनच त्यांच्यासंबंधीच्या आदराचा वा त्याच्या स्वीकाराचा आभास निर्माण केला जातो. लोकलाजेखातर घडणारी ही कृती समाजपरिवर्तनाच्या मार्गातील मोठी विषारी, मोठी प्रतिक्रांतीवादी कृती ठरत असते.

बाबासाहेब हे या भारतीय समाजरचनेत वरवरच्या दुरुस्त्या सुचविणारे विचारवंत नव्हते. भारतीय समाजरचनेला आधारभूत असलेल्या मानवद्रोही जीवनमूल्यांचा पायाच नष्ट करुन टाकणारे आणि नवा सर्वांगपरिपूर्ण पाया देणारे ते थोर प्रज्ञासूर्य आहेत. निरीश्वरवादी समता हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्राण आहे. या निराळ्या पायावर या समाजाची उभारणी करण्याचे आवाहन करणारा विचार मान्य करण्याचे दूरच, पण असा विचार सहन करण्याची साधी कुवतही मागल्या हजारो वर्षात हा समाज गमावून बसलेला आहे आणि बाबासाहेबांचा विचार तर भारतीय समाजाला सर्वस्वी नवा पाया देणारा, नवा मानव सिद्ध करणारा आणि नव्या समता मानवाच्या सिद्धीत आड येणाऱ्या सर्व गोष्टींना निर्दयपणे नष्ट करुन टाकणारा विचार आहे. क्रमाने हा विचार सहन करण्याची, तो मान्य करण्याची आणि त्यानुसार जगण्याची समाजाची

शक्ती वाढविणे हे कार्य जन्मशताब्दी वर्षापुढले सर्वात महत्वाचे कार्य होते.

हे खरेच आहे की दलित साहित्याची चळवळ, नामांतराची चळवळ आणि मंडल आयोग यांच्यामुळे आपल्या देशातील प्रत्येकच उपेक्षित स्तराला आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षितांसाठी केलेल्या बंधमुक्तीच्या कार्याची महती क्रमाने पटू लागली आहे. प्रस्थापित समाजातील मूठभर उच्चभ्रूंनी निर्माण केलेल्या भ्रमांमुळे आंबेडकरविरोधी छावण्यांमध्ये असलेले हे गट आता क्रमाने जागे होत आहेत. त्यांचे हे जागणे त्यांना बाबासाहेबांजवळ आणीत आहे. कळत नकळत आता बाबासाहेबांना अंगिकारण्याची प्रक्रिया या देशातील शोषित गटांमध्ये सुरु झाली आहे. गुलामीची नशा उतरु लागली आहे. भ्रमांचे धुके वितळू लागले आहे. नाना प्रकारची दुःखे बाबासाहेबांजवळ इलाजासाठी सरकत आहेत. समतेचा दिवस उगवण्याची चिन्हे स्पष्ट होऊ लागली आहेत. मूठभर उच्चभ्रूंना मात्र हा काळ संकटकाळ वाटतो आहे.

संस्कृतीच्या टाळूवरचे लोणी शतकानुशतके मजेत खाणारांना हे घडू पाहणारे स्थित्यंतर अशूभ वाटत आहे. त्यामुळे बाबासाहेबांचा विचार विकृत करण्याचे, त्यांची प्रखरता नष्ट करण्याचे आणि या क्रांतीविचाराला कुप्रसिद्ध प्रतिगामी विचारासोबत जोडून त्याचे पौरुष नष्ट करण्याचे कारस्थानही इथे सुरु झाले आहे. प्रतिक्रांतीच्या ज्या अमानुष विचाराला बाबासाहेबांनी जीवनभर कडाडून विरोध केला त्याच्याशी समरस होण्याचा मुद्दा, बाबासाहेबांचे हिंदूकरण करण्याचा मुद्दा असे असंख्य मुद्दे आहेत. शिवाय शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वैचारिक अशा सर्व पातळयांवरचे अत्यंत चलाखीने चाललेले शोषण आहे. सांस्कृतिक भ्रष्टाचाराची कीड आज समाजाला चोहोबाजूंनी लागलेली आहे. या सर्वंकष वैचारिक भ्रष्टाचाराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजच्या युगातले सर्वात प्रभावी उत्तर आहे. आंबेडकरांना पर्याय नाही. त्यामुळे एका बाजूने दुःखे उत्तरे मागत आहेत. देश आंबेडकरमय होतो आहे. शोषित गटांकडून बाबासाहेबांचा स्वीकार व्हायला लागलेला आहे. आणि दुसऱ्या बाजूने या गोष्टीला स्वतःवरचे संकट मानून मूठभर उच्चभ्रू परंपरावाद्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे विकृतीकरण करण्याचे षडयंत्र उभारलेले आहे. अशी द्वंदशील परिस्थिती आपल्या समाजात जन्मशताब्दीवर्षाच्या काळात निर्माण झालेली आहे.

काही तथाकथित समाजवाद्यांनी बाबासाहेब निरीश्वरवादी नव्हते हे सांगणे, काही संघाश्रित दलित बुद्धिजीवींनी बाबासाहेबांना अध्यात्मवादी ठरविण्याचा विडा उचलणे आणि प्रतिगाम्यांनी त्यांना हिंदूव्यवस्थेशी जोडून घेण्याचे प्रयत्न करणे या सर्वच गोष्टीमागे उभे असलेले मन एकच आहे. हे मन परंपरावादी आणि आंबेडकरद्रोही

आहे.

या स्थितीमध्ये बाबासाहेबांच्या क्रांतीविचारांचे विकृतीकरण थांबविणे आणि या देशातील अन्यायग्रस्तांपर्यंत बाबासाहेब जाण्याची प्रक्रिया गतिमान ठेवणे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येकच चाहत्याची आणि अनुयायाची जबाबदारी ठरते.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

पाच
भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

नरेंद्र चपळगावकर याचे "भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर" हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान यांच्या संबंधावर नवा आणि उद्‌बोधक प्रकाश टाकणारं अत्यंत देखणं पुस्तक असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी वर्षात हे पुस्तक प्रकाशित करुन प्रकाशक आणि लेखक यांनी एक विशेष औचित्य साधले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान हे पुस्तक तसे लहानच आहे. पण या पुस्तकाचे महत्वाचे वैशिष्ट्य असे की विद्वत्तेचा आव आणून काही आंबेडकर विरोधी अभ्यासक भारतीय संविधानाचे बाबासाहेबचे शिल्पकारपण अत्यंत धूर्तपणे नाकारण्याचा प्रयत्न करीत असताना नरेंद्र चपळगावकर यांचं हे पुस्तक ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे कुटील अभ्यासकांचे विपारी प्रयत्न हाणून पाडत आहे. चपळगावकर यांचा संविधान आणि या संविधानाच्या निर्मितीचा खोल अभ्यास आहे. कायद्याच्या क्षेत्रातले ते उत्तम जाणकार आहेत.

त्यांनी या पुस्तकात बाबासाहेबांचे भारतीय संविधानाचे शिल्पकारपण मांडून दाखविणे ही बाब महत्वाची आहे. ही गोष्ट त्यांनी या पुस्तकात अत्यंत ताकदीने केल्यामुळे मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

नरेंद्र चपळगावकर हे बाबासाहेबांनी औरंगाबादेला काढलेल्या मिलिंद महाविद्यालयाचे विद्यार्थी. ही बाब चपळगावकरांनी या पुस्तकाच्या निवेदनात मोठ्या गौरवाने सांगितली आहे. या निवेदनातच लेखकाने भारतीय संविधान व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पुस्तक लिहायला आपण का प्रवृत्त झालो आणि क्रमाने हे पुस्तक आपल्या हातून कसे लिहिले गेले हे सांगितले आहे.

उच्च न्यायालयात वकिली करताना भारतीय संविधानाचा लेखकाला विशेष अभ्यास करावा लागला. त्या निमित्ताने घटना समितीच्या इतिवृत्ताचे सर्व खंड त्यांच्या वाचनात आले. त्यावेळी देशाचे नेतृत्व करणाऱ्या पिढीची असामान्य उंची आणि द्रष्टेपण त्यांना जाणवले. संविधान निर्मितीच्या प्रक्रियेसंबंधीचे इतरही लेखन जिज्ञासेपोटी त्यांनी वाचले. भारताच्या संविधानाची पार्श्वभूमी पाहिली. संविधान निर्मितीचा इतिहास सांगणारं पुस्तक मराठीत नाही हे त्यांच्या लक्षात आलं आणि या विषयासंबंधी आपण लिहावं असं त्यांना प्रकर्षानं वाटलं. याच विषयावर त्यांनी नांदेड येथे दोन व्याख्यानेही दिली. आणि त्यातून या पुस्तकाचा जन्म झाला.

पुस्तकाचा याआधी एक उद्देश आला आहे. संविधान निर्मितीमधील बाबासाहेबांचे महनीय कार्य सांगणे आणि बाबासाहेब केवळ दलितांपुरता विचार करणारे राजकारणी नव्हते, तर संपूर्ण भारताच्या भवितव्याची चिंता बाळगणारे ते थोर राष्ट्रनेते होते. त्यामुळे संविधानाचे शिल्पकार आणि थोर राष्ट्रनेते यांचे बाबासाहेबांच्या व्यक्तित्वातील नाते समजावून घेणे हाही उद्देश या पुस्तकाच्या लेखनामागे आहे.

नऊ प्रकरणांपैकी चपळगावकरांनी पहिल्या आठ प्रकरणांमध्ये संविधानाच्या निर्मितीचा इतिहास सांगितला असून शेवटच्या म्हणजे नवव्या प्रकरणात संपूर्ण भारताच्या सर्वंकष क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडणारे थोर राष्ट्रनेते आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार या बाबासाहेबांच्या भूमिकांमधले नाते लक्षात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतीय संविधानाच्या निर्मितीची पार्श्वभूमी सांगताना प्रथम चपळगावकरांनी १९३३ सालच्या टॉमस मेकॉलेच्या भाषणात भारताच्या अशा संविधानाचा संकेत असल्याची नोंद केली आहे. यानंतर क्रमाने १८८५, १८८९, १८९५, १९०९, १९१५, १९१७, १९१९, १९२७ सालापर्यंतच्या या संदर्भातील घटनांच्या नोंदी घेवून चपळगावकरांनी १९३५ सालच्या भारत सरकारच्या कायद्याची या संदर्भात महत्वाची घटना म्हणून नोंद केलेली आहे. हा कायदा आपल्या संविधानासाठी कच्चा आराखडा मानला गेला होता. त्याआधी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी १९१५ पासून भारतात संसदीय लोकशाहीच्या मर्यादित प्रयोगास सुरवात केली होती. १९३९ साली संविधान करण्यासाठी घटना समीती बोलावण्यासंबंधीचा ठराव काँग्रेसने केला होता. १९४० साली भारतीयांचीच घटना समिती असावी या मागणीला व्हॉइसरॉयने मान्यता दिली होती.

१९४५ साली तेजबहादूर सप्रू यांच्या अध्यक्षतेखाली अपक्षांच्या समितीने घटनात्मक बाबीसंबंधीचा अहवाल सादर केला होता. १९४६ साली घटना समितीचे सदस्य निवडण्यासाठी निवडणूका झाल्या. डॉ. आंबेडकरांना मुस्लीम लीगच्या पाठिंब्यावर बंगालमधून निवडून यावे लागले. पुढे फाळणीने त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आले. त्यावेळी ते काँग्रेसच्या पाठिंब्याने घटना समितीवर निवडून आले. पुढे त्यांना घटनासमितीचे अध्यक्षपद देण्यात आले.

या प्रकारच्या सर्व घडामोडी कशा घडत गेल्या त्याचा विस्ताराने या पुस्तकात विचार झाला असून पुढील भागात चपळगावकरांनी डॉ. आंबेडकर हेच भारतीय संविधानाचे शिल्पकार कसे आहेत हे दाखवून दिले आहे.

मसुदासमितीच्या कामात आंबेडकरांना व्यासंगी सहकारी लाभले असले तरी भारतीय संविधानातील अत्यंत महत्वाच्या गोष्टी डॉ. आंबेडकरांचा संशोधनशात्राचा व्यासंग, दूरदृष्टी यांच्या कशा द्योतक आहेत हे लेखकाने सांगितले आहे. मसुदा समितीचे अनेक सहकारी बैठकांना गैरहजर असत. अनेकदा केवळ बाबासाहेबांनीच काम केले.

देशानं या कामासाठी आंबेडकरांबद्दल कृतज्ञ असले पाहिजे. ज्या प्रभूताने आंबेडकरांनी घटनाविधेयक सागृहात संचलित केले त्याबद्दल केवळ आपणच नव्हे तर भविष्यकाळानंही त्यांच्याबद्दल कृतज्ञ राह्यले पाहिजे असे घटना समितीचे एक सदस्य श्यामकांत सहाय म्हणाले होते.

चपळगावकर म्हणतात त्याप्रमाणे संविधानातील काही गोष्टींना बाबासाहेबांची संमती नव्हती हे खरे आहे आणि त्याहून अपरिहार्यही आहे. पण असे असले तरी या संविधानाच्या रचनेत आंबेडकरांचा न्याय आणि राज्यशास्त्राचा व्यासंग जसा दिसतो तसे त्यांचे या देशाच्या भवितव्याची चिंता वाहणारे एक देशभक्त मनही दिसते. हे लक्षात घेण्यासारखे आहे. मुन्नीस्वामी पिल्ले यांनी नंदनारसारखा भक्त, निरुपझनालवारसारखा संत आणि निरुवल्लुवरासारखा तत्त्वज्ञ मागास जातीतही जन्माला येवू शकतो. त्यातच आता आंबेडकरांसारख्या घटनातज्ञाची आज भर पडली आहे. या शद्वात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांचा गौरव केला आहे. बाबासाहेबांच्या घटना समितीतील कार्याबद्दल सर्व देशाचीच मान उंच व्हावी असे हे कार्य आहे असेच या पुस्तकाच्या लेखकाप्रमाणे प्रत्येकाला हे पुस्तक वाचून वाटेल यात शंका नाही.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

सहा

आंबेडकरी चळवळीपुढील ज्वलंत प्रश्न

भीमज्योत कर्मचारी समितीच्या मंचावरुन दिलेले अध्यक्षीय भाषण (१९९२)

धम्मबंधूनो! आपल्या क्रांतीपुरुषाला विनम्र अभिवादन करतो आणि आपण अत्यंत आपुलकीने आपल्या क्रांतीपुरुषाच्या जयंती-उत्सवात मला सहभागी करुन घेतले आणि आपल्या चळवळीच्या स्थितीगतीसंबंधी माझे काही विचार मांडण्याची संधी मिळवून दिली त्याबद्दल भीमज्योत कर्मचारी समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आणि संघटनेतील सर्च सभासदांचे मी मनापासून आभार मानतो.

बंधूंनो, आपण सर्वच लोक आंबेडकर संस्कृतीचे साक्षीदार घटक आहात. आंबेडकरी चळवळीच्या संदर्भात सजग आणि कृतीशील असे घटक आहात. बाबासाहेबांच्या चळवळीला आपण फार मोठे योगदान देत आला आहात. एखाद्या समाजातील कर्मचाऱ्यांनी मनात आणले तर ते परिवर्तनाच्या प्रक्रियेत एक महाशक्ती म्हणून भूमिका करु शकतात. नोकरीपाणी करुन, काम करुन जगतो तो कर्मचारी. याप्रकारे ज्याच्या पोटाचा प्रश्न सुटला आहे तो कर्मचारी. पण पोटाच्या प्रश्नाच्या उत्तरापाशी जो थांबून राहतो त्याला समाजाचा जबाबदार घटक म्हणवून घेता यायचे नाही. या ठिकाणावरुनच एक समाजघटक म्हणून आणि एक माणूस म्हणून आपल्या जगण्याला प्रारंभ होत असतो. म्हणून **'केवळ पोटाचे पाईक बनू नये.'** असे बाबासाहेबांचे आपणाला कळकळीचे सांगणे आहे, **"तुमच्याबद्दल इतर लोकांना आदर वाटेल,**

मानसन्मान वाटेल, अशी तुम्ही कृती केली पाहिजे." असे बाबासाहेब म्हणाले होते. आपण केवळ पोटाचे पाईक असणे मान्य करीत नाहीत आणि इतरांना आपल्याविषयी आदर वाटेल अशी कृती आपण आपल्या समितीच्या विद्यमाने करीत आहात ही गोष्ट मला विशेषच मोलाची वाटते. त्यामुळे मी मनापासून आपणाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतो. आपणा सर्वांच्या वतीने आणि मी स्वतःही अंतःकरणपूर्वक पुन्हा एकदा बाबासाहेबांच्या वैचारिक आंदोलनाला अभिवादन करतो.

आपल्यापुढे मी बाबासाहेबांच्या चरित्रातील काही घटनांचे निवेदन करावे आणि प्रसंग साजरा करावा अशी आपली अपेक्षा नसणार याची मला खात्री आहे. बाबासाहेबांच्या जयंतीचा प्रसंग एका बाजूने बाबासाहेबांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि दुसऱ्या बाजूने समाजाच्या सद्यकालीन स्थितीगतींचे अत्यंत वस्तुनिष्ठ आणि अत्यंत परखड असे चिंतन करण्याचा आहे असे मला वाटते. आज बाबासाहेबांची चळवळ कोणत्या टप्प्यावर उभी आहे, ती गतिमान आहे की तिच्यातील गती हरवलेली आहे, ही चळवळ बाबासाहेबांचे क्रांतदर्शी बोट ज्या दिशेचा निर्देश करीत आहे त्याच दिशेने चाललेली आहे की त्या बोटाच्या विरुद्ध दिशेने जात आहे, या चळवळीचा रक्तदाब कोणत्या अवस्थेत आहे, आपल्या चळवळीची प्रकृती निरोगी आहे की अनेक असंख्य रोगांनी तिच्यात राहुट्या उभारलेल्या आहेत? काय झाले आहे?

वरील प्रश्नांच्या अनुषंगाने आजची अत्यंत उद्वेग आणणारी परीस्थिती आपणापुढे मांडावी आणि या रोगजर्जर परिस्थितीतून बाहेर येण्याचा काही मार्ग सुचतो काय ते पाहावे असे मला या निमित्ताने वाटते.

अख्ख्या जगाला नवा उजेड देणारे बाबासाहेब आंबेडकर हे एक बिनीचे सेक्युलर प्रज्ञापुरुष आहेत, या देशातील महान धम्मक्रांतीचे ते थोर शिल्पकार आहेत, आणि समग्र दुनियेलाही अधिक उच्च कोटीचे नैतिक आणि भौतिक जीवन वाढू शकणारे ते माणुसकीचे महान तत्वज्ञानी आहेत हे आपण जाणताच. पण बुद्धधम्माच्या स्वीकारानंतर आज उणीपुरी तीन तपे होऊन गेली तरी आपण बुद्धाच्या आणि बाबासाहेबांच्या खऱ्या विचाराला सारखी बगल देत आहोत, त्याला सारखे ठकवीत आहोत, असेच आपण जरा अंतर्मुख होऊन विचार केला तर दिसल्याशिवाय राहणार नाही असेच मला स्पष्टपणे दिसते.

बुद्ध धम्मीय असणे म्हणजे काय?

आंबेडकरवादी असणे म्हणजे काय?

या अगदी मूळ प्रश्नांचाही आपण प्रामाणिकपणे विचार केला आणि आजच्या

आपल्या राजकीय, सामाजिक, वाङमयीन, धार्मिक आणि वैचारिक जीवनाची तपासणी केली तर मन भांबावून जावे इतके आपण धम्मापासून आणि आंबेडकरवादापासून दूर गेलो आहोत याची प्रचिती येते. आपल्या जीवनाची सर्वच क्षेत्रे आज कन्फ्युझनमध्ये सापडलेली आहेत. एक असाधारण कन्फ्युइड समाज असेच आपल्या समाजाचे आज वर्णन करावे लागेल. एवढ्या भयानक भ्रमांमध्ये गटांगळ्या खात असूनही या समाजाला आपण भ्रमात सापडलो आहोत असे वाटत नाही यापेक्षा आणखी मोठा भ्रम कोणताही असणार नाही. हे लक्षण महाभयंकर रोगाचे असते. आंबेडकर समाज आज केवळ नाममात्र आंबेडकर समाज राहिला आहे, याचे कारण या समाजात भावनांचे आणि विचारांचे भयावह प्रदूषण माजले आहे.

खरे तर बाबासाहेब आंबेडकरांचे इहवादी (Secular) तत्त्वज्ञान हीच आपणाला लाभलेली सर्वात मोठी इस्टेट आहे. दुनियेच्या पाठीवरचे सर्वात ज्वलंतहाल असे क्रांतीचे रसायन ते आहे. असे रसायन आपल्याशिवाय जगात क्वचितच कुणाच्या वाट्याला आले असेल, पण या क्रांतीकारी रसायनात आज आपल्यातली काही मंडळी कारण नसताना वेगवेगळ्या गोष्टी मिसळवून या क्रांतीकारी रसायनातील क्रांतीच संपवून टाकीत आहेत. इतर अनेक रोगी तत्त्वज्ञानांची बाबासाहेबांच्या निरोगी तत्त्वज्ञानाला जोड देऊन या तत्त्वज्ञानाचे निरोगीपणच नष्ट केले जात आहे. हे कसे थांबेल? हे विकृतीकरण, हे हिंदुकरण कसे थांबेल?

व्यक्तिगत क्षूद्र - स्वार्थ, निष्ठाशून्यता, लाचारी, दूरदृष्टीचा अभाव इत्यादी गोष्टींमुळे हे लोक आंबेडकरांपासून दूर चाललेले आहेत. बाबासाहेब म्हणाले होते -

"आम्हाला आमच्या तत्वांची किंमत देऊन कोणाची सहानुभूती विकत घेण्यास मात्र आम्ही तयार नाही, अशा प्रकारचा तत्त्वविक्रय नीतीशुद्ध तर नव्हेच, परंतु परिणामी तो इष्टही नव्हे." (बहिष्कृत भारत –दि. ६-९-१९२९)

आपल्यातील अनेक नामवंत मंडळीही आज गर्वाने गद्दारी करु लागली आहेत. या बेइमान लोकांनी बाबासाहेबांचे वरील विचार जरा लक्षात घ्यावेत. कोणी सामाजिक समरसतेत शिरत आहेत. कोणी राजकीय समरसतेत घुसत आहेत. कोणी वाङमयीन समरसतेत स्वतःला बुडवीत आहेत. आपल्या तत्त्वांना विकू नका. ते अनैतिक आहे. अत्यंत घातकी आहे असे बाबासाहेब वरील अवतरणात कळवळून सांगत आहेत. पण वरीलप्रकारे नाना प्रकारच्या समरसतांची एवढी करंटी धुंदी या काही लोकांच्या डोळ्यांवर चढली आहे की, हे भगव्या रंगात न्हाऊन निघणारे लोक आपल्या गुन्हेगारीची अत्यंत मुजोर आणि बेशरम वकिलीही करायला घाबरेनासे झालेले आहेत.

आपल्यातल्या काही लोभाच्या मांजरांना सामाजिक समरसतेचा महारोग लागलेला आहे. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या निवडणूक जाहीरनाम्यातील चौथ्या भागातील चौपन्नाव्या कलमात हिंदुमहासभा किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या सारख्या प्रतिगामी संघटनांशी कोणतेही सहकार्य शेड्युल्ड कास्ट फेडरेशन करणार नाही असे बाबासाहेबांनी स्वच्छच सांगितले आहे. कोणत्याही संदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी आंबेडकर समरस होऊच शकत नाहीत. हेडगेवार हिंदू धर्म सोडायला सांगू शकत नाहीत आणि आंबेडकर हिंदू धर्म घ्यायला सांगू शकत नाहीत. हिंदू अध्यात्मवादी. बाबासाहेब निरीश्वरवादी. हेडगेवार हिंदूधर्मवादी तर बाबासाहेब आंबेडकर Secular अर्थात धर्मातीतवादी. कुठल्याही पातळीवर आंबेडकरी चळवळ संघाशी समरस होऊ शकत नाही. संघवाल्यांचा संघ आणि बुद्धाचा संघ यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. समरसतावाले बाबासाहेबांच्या १९३५ पूर्वीच्या लेखनातील सोयीची अवतरणे निवडून बाबासाहेब कसे हिंदू धर्माचे पुरस्कर्ते होते, हिंदू धर्माबद्दल त्यांना किती प्रेम होते हे सांगू लागले आहेत. पुढल्या काळातील हिंदू धर्म सोडणारे, हिंदू धर्म सोडल्यामुळे माझी नरकातून सुटका झाली असे म्हणणारे, हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही असे स्वच्छपणे सांगणारे बाबासाहेब हे समरसतावाले लोकांपुढे का ठेवीत नाहीत?

हे सर्व असताना आपल्यातले काही वीर समरसतेत जात आहेत. बाबासाहेबांचे हिंदूकरण करण्याच्या, बाबासाहेबांची चळवळ मारण्याच्या कामाला लागले आहेत. सर्वसामान्य माणूस त्यामुळे संभ्रमात पडला आहे. त्याची दिशाभूल होत आहे. समरसतेत जाणारे, हेडगेवार आणि आंबेडकर यांना एका पातळीत आणणारे आंबेडकरी चळवळीतील हे अस्तनीतले निखारे कन्फ्युइड आहेत, आणि ते इतरांना कन्फ्युइड करीत आहेत. याप्रकारची सामाजिक समरसता हा वैचारिक भ्रष्टाचार आहे. तात्त्विक दिवाळखोरी आहे. दलितांमधले समरसतेत जाणारे हे लोभी लोक आंबेडकरी चळवळीचे भयंकर मारेकरी आहेत. आंबेडकरद्रोही आहेत.

सामाजिक समरसता हे आंबेडकरी समाजाला ग्रासणारे वैचारिक कन्फ्युझन आहे. हे कन्फ्युझन आंबेडकरांना विघातक पद्धतीने हेडगेवारांशी जोडते. हेच कन्फ्युझन बाबासाहेबांना सावरकरांशी जोडते. बाबासाहेब **'हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही'** असे म्हणतात तर बुद्धिवादाच्या दृष्टीनेही सर्व धर्मात ग्राह्यतम हिंदू धर्मच आहे असे सावरकर मानतात. बौद्ध धम्माचा स्वीकार करणाऱ्या बाबासाहेबांना सावरकर बाटले म्हणतात. **"बौद्ध धम्म ही हिंदू धर्माचीच**

शाखा आहे तेव्हा बुद्धधम्म घेऊन हिंदुत्वाच्या सीमेबाहेर आंबेडकर उडी घेऊच शकले नाहीत" असे सावरकर म्हणतात. जिथे बुद्धाने हात टेकले तिथे आंबेडकर कोणत्या झाडाचा पाला, असे सावरकर बाबासाहेबांसंबंधी बोलतात. हे म्हणणारे सावरकर आणि सावरकर नरक ओकले असे म्हणणारे बाबासाहेब यांच्यात समरसता होऊच कशी शकते? पण आपल्यातील काही भाकड विद्वान, डोक्यात बिघाड झालेले अतिशहाणे, हिंदू व्यवस्थेच्या ताटाखालची मांजरे झालेले मतलबी सावरकरांच्या विचारांना कृतीची जोड मिळाली असती तर दलित समाजाने वीर सावरकरांनाही डोक्यावर घेतले असते असे समरसतेच्या टायफाईडमध्ये बरळत सुटलेले आहेत. आणि आपण सर्व मंडळी हे सर्व ऐकून घेता? बंधूंनो वैचारिक भ्रष्टाचार करणाऱ्या एवढाच वैचारिक भ्रष्टाचार सहन करणारा माणूसही गुन्हेगार असतो. हे लोक बाबासाहेबांनी गीतेपासून प्रेरणा घेतली असेही सांगतात. गीता हा बुद्धाच्या क्रांतीला नष्ट करण्यासाठी जन्माला आलेला ग्रंथ आहे. हा अनर्थकारी ग्रंथ आहे. देशातील सत्ताकेंद्रावर आपली हुकमत चालावी म्हणून ब्राह्मणांनी चातुर्वर्ण्य मजबूत करण्यासाठी या ग्रंथाची योजना केली असे बाबासाहेब सांगतात. तर हे वैचारिक समरसतावाले बाबासाहेबांनी गीतेपासूनच प्रेरणा घेतली असा खोटा प्रचार करीत सुटलेले आहेत. बाबासाहेब अध्यात्मवादी आहेत असा बाबासाहेबांना विकृत करणारा प्रचार ते करीत आहेत. हे विचाराला महारोग झाल्याचे लक्षण आहे. वेड लागल्याशिवाय असे कोणी बोलूच शकत नाही. पण हे सर्व बोललेले आपण सहन करता. या वैचारिक दिवाळखोरीला आपण केवळच सहन करता असे नाही तिचा सन्मानही आपण करता. आपल्या चळवळीची ही भयानक परवड चाललेली आहे. तिची वैचारिक पडझड सुरु आहे आणि आपण निमूटपणे सहन करीत आहोत ही गोष्ट चळवळ अधःपतनाच्या दरीत भरधाव निघाल्याची द्योतक आहे.

बाबासाहेबांना हेडगेवारांशी जोडणे, सावरकरांशी, गीतेशी आणि संताशी जोडणे हा जसा बिनडोकपणा आहे, तशी बाबासाहेबांना विक्तूशी जोडणे ही सुद्धा वैचारिक गुन्हेगारीच आहे. साई, गजानन, सती यांच्यांशी फोटोंमध्ये आणि मनांमध्येही समरसता प्रस्थापीत करणे ही केवळ तत्त्वशून्यताच नाही तर तत्त्वद्वेष आहे. आंबेडकर विचारांचा वध करणे आहे. काही लोक अलीकडच्या काळात बाबासाहेबांना रजनीशाशीही जोडायला लागले आहेत. रजनीश हा स्वतः कन्फ्युझड मनुष्य आहे. हा मनुष्य दांभिक यासाठी आहे की तो स्वतःला भगवान म्हणवून घेतो, ओशो म्हणवून घेतो. सारखा वाऱ्याच्या दिशेने पाठ फिरविण्याचा, विशेषणांमागे धावण्याचा आजार असलेला हा मनुष्य

आहे. हेडगेवार आणि आंबेडकरांना एकत्र आणणे ही जशी दिवाळखोरी आहे, तशी रजनीश आणि आंबेडकर यांना एकत्र आणणे हाही वैचारिक भ्रष्टाचारच आहे. रजनीश म्हणतात,

"सिर्फ बदला लेने के लिए आम्बेडकर बौद्ध हुआ और हरिजनोंके एक समूह को बौद्ध कर लिया। यह राजनीति थी। बुद्ध धर्म लौटा भी तो न लौटने जैसा लौटा, गलत आदमी के हाथों लौटा। वैसे ही बुद्ध धर्म का भारी नुकसान हुआ, और आम्बेडकर उसे वापस लाया तो और नुकसान हो गया। अब उसके लौटने के सब द्वार ही बंद हो गये।"

(एक धम्मो सनंतनो, खंड २, संपा. मा अमृत साधना, स्वामी योगप्रताप भारती, रजनीश फांऊडेशन प्रकाशन, पुणे १९७७ पृ. ५४२-४३)

रजनीश हे खुद्द तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास असे दासप्रथेचे पुरस्कर्ते आहेत. विचार क्षेत्रात अशी व्यक्ती बिनबुडाच्या गाडग्यासारखी असते. आंबेडकर आणि बुद्ध दोघेही निरीश्वरवादी. म्हणजे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील जडवादाचे पुढारी आहेत आणि रजनीश हे चैतन्यवादी परंपरेचे पुजारी आहेत. "प्रिय आत्मन्" शिवाय त्यांचे पान हलत नाही. ह्या मनुष्याला कोण चालत नाही? कृष्णही चालतो, गीताही चालते, आणि बुद्धही चालतो. ज्या माणसाला बाबासाहेबांनी केलेला बुद्धधम्माचा स्वीकार हा राजनीती वाटतो तो मनुष्य बाबासाहेबांचा आणि बुद्धाचा भयानक विरोधक आहे हे आपण समजावून घेतले पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर या रजनीशांना 'गलत आदमी' वाटतो. आंबेडकरी चळवळीतील रजनीशांच्या भक्तांनी हे जरा बारकाईने समजावून घ्यावे. रजनीश आंबेडकरवाद्यांना कन्फ्युझ करीत आहेत. काही आपले बिनबुडाचे लोक त्यांच्या भजनी लागले आहेत. याचा अर्थ आपल्या चळवळीतील काही लोकांना तरी कन्फ्युझ करण्यात रजनीशांना यश आलेले आहे. आंबेडकरांच्या माध्यमातून आल्यामुळे बुद्धाचे मोठे नुकसान झाले असे म्हणणाऱ्या रजनीशांना आंबेडकर समजूच शकत नाही. आंबेडकर त्यांना समजावूनही घ्यायचा नाही. फक्त स्वतःला आंबेडकरांपेक्षा मोठे करण्याचा खुळेपणा रजनीश करीत आहेत. पण रजनीशानी हे लक्षात ठेवायला हवे होते की भाषेची चैतन्यवादी रागदारी आळवून हे शक्य व्हायचे नाही. आंबेडकरी चळवळीतल्या काही लोकांना खूळ लागले तरी असे खूळ कधीही लागणार नाही असे अनेक लोक या चळवळीत अजून आहेत रजनीशसाहेब, आणि ते या कन्फ्युझनचे आक्रमण मोडून काढण्यास समर्थ आहेत.

काही वर्षांपूर्वी आमच्या काही मित्रांनी आंबेडकर-मार्क्स अशी जोडी लावण्याचा

प्रयत्न केला होता, त्यामागे दलितांमधील विचारवंतांचे अज्ञान आणि दलितेतर मार्क्सवाद्यांची चलाखी होती. अशी जोडी आंबेडकर मोठा करण्यासाठी होती की मार्क्सला स्वीकारार्हता लाभावी यासाठी होती? असा प्रश्न आहे. येथील काही चटपटीत माणसांच्या लक्षात आंबेडकरांचा प्रभाव आला आणि प्रभावी होत चाललेल्या आंबेडकरांची सोबत घेतल्याशिवाय हेडगेवार असो, सावरकर असो, विक्कू असो, रजनीश असो वा मार्क्स असो या कोणालाही अर्थ मिळवून देता येणे कठीण आहे हे त्यांनी जाणले. आपापल्या नेत्याला आंबेडकरांशी जोडणाऱ्यांच्या हे लक्षात येत नाही की आंबेडकराला पर्याय नाही हा मुद्दाच ते सिद्ध करीत सुटलेले आहेत. आता राहिला आंबेडकर विकृत करण्याचा मुद्दा. तर याला उत्तर असे की जे लोक आपल्या दुबळ्या आणि अर्थवत्तेला पारख्या असलेल्या नेत्यांना आंबेडकरांशी जोडल्याशिवाय आपल्या नेत्यांचे खरे नाही हे कबूल करतात, ते लोक नितांत दुबळे आहेत आणि काहीही झाले तरी अंतिम विश्लेषणात हे दुबळे लोक आंबेडकरांना विकृत करु शकत नाहीत.

समरसतेच्या आणखी काही आंबेडकरघातकी दालनांचा विचार करायला हवा. त्यातले पहिले दालन राजकीय समरसतेचे आहे. संघाशी समरस होण्यात आपल्या मंडळींचा जेवढा खुळेपणा आणि वैचारिक बाजारुपणा व्यक्त होतो तेवढाच आंबेडकरद्रोह काँग्रेसच्या हातातील खेळणी बनण्यात होतो. काँग्रेस संस्कृतीच्या विरुद्ध आंबेडकर जन्मभर लढले.

(१) **"काँग्रेसपासून अलग राहण्यातच दलितांचे हित आहे."**
(१०-१२-४५. अकोला)

(२) **"काँग्रेसच्या तिकिटावर राखीव जागेवर जी माणसे येतात ती आपली तोंडे बंद करुन बसतात."**
(प्रबुद्ध भारत : २७-१०-१९५६.)

(३) **"मी असे ऐकले आहे की लोकांनी जुलुमाविरुद्ध झगडे करु नये यासाठी त्यांना आपल्या पक्षात ओढण्यासाठी काँग्रेस काही लोकांना पैसे वाटत आहे, सरकार मलाही पैसा घेण्यास सांगत होते. हेतू हा की माझे तोंड बंद करावे. पण मी पैसा कधीच घेतला नाही. मी तुम्हाला विनंती करतो की काही झाले तरी तुमचा स्वाभिमान कोणी विकत घेऊ शकणार नाही याची खबरदारी घ्या आणि समाजाची मान उंच राहील यासाठी डोळ्यात तेल घालून दक्ष राहा."**
(प्रबुद्ध भारत : २९-७-५६.)

बाबासाहेबांनी काँग्रेसवर ग्रंथच लिहिला आहे. 'व्हॉट काँग्रेस अँड गांधी हॅव डन टू दि अनटचेबल्स' हा तो ग्रंथ होय. आणि इतरही मराठी लेखनातून काँग्रेसच्या प्रतिगामी, फसव्या आणि परिवर्तनवादी चळवळीला कायम मारक राहिलेल्या धोरणावर वेळोवेळी त्यांनी कठोर प्रहार केले आहेत. सत्तेला चिकटून राहू इच्छिणाऱ्या काँग्रेसचा मूल्यात्मक परिवर्तनाशी संबंध आहे असे बाबासाहेबांना कधीच वाटले नाही. नामांतर, जन्मशताब्दी, दलितांवरील अत्याचार, आरक्षण या सर्वच बाबतीत काँग्रेसचे धोरण काय होते व आहे हे सर्वांनाच ज्ञात आहे. काँग्रेसमध्ये गेलेल्या, काँग्रेसच्या दारात लुंघळणाऱ्या आपल्यातल्या संधी साधूंची गत कशी नखे आणि दात काढलेल्या सिंहांसारखी झालेली ते आपण पाहतोच. भाजपाच्या भयाने काँग्रेसकडे जाणे कसे आहे? बाबासाहेबांनी एकदा अशाच संदर्भात म्हटले होते ते उद्धृत करतो. ते म्हणाले होते - **"तरसाचा हल्ला चुकविण्यासाठी मेंढ्या जर लांडग्यांच्या गोटात जाऊन बसू लागल्या तर ते हिताचे होईल काय?"** (जनता ६-१-१९४४) आजच्या दलित संघटनेच्या चिंध्या करीत काँग्रेसच्या दारापुढे लाळघोटेपणा करण्यासाठी जाणारांनी हे लक्षात ठेवावे. बाबासाहेबच म्हणाले होते -

१) **'जो विकला जातो, लोभाला बळी पडतो. त्याचा काही उपयोग नाही.'**

(सोलापूर. १४१४८.)

२) **'अशा नकली पुढाऱ्यांची संख्या तुम्ही वाढविता कामा नये.'**
(कानपूर. २६-१-४४.)

३) **'आपली संघटना आपण स्वतंत्रच ठेवली पाहिजे. स्वतंत्र संघटनेशिवाय आपल्याला स्वाभिमानाने राहता यायचे नाही ... आपण आपली सध्याची सूस्त अवस्था फेकून दिली पाहिजे. येथून पुढे आपल्याला जे काही मिळवायचे आहे ते इज्जतीने मिळविले पाहिजे. कोणाची हांजी-हांजी करुन अथवा भीक मागून आम्हास काहीही नको.'**
(जनता : २९-११-४९.)

बाबासाहेब आपल्याला विनंती करुन कळकळीने सांगत आहेत की स्वतंत्र राहा. आपली एकी कायम राखा. विकले जाऊ नका. लोभाची मांजरे होऊ नका. भीक मागू नका. स्वाभिमान जतन करा. नकली पुढाऱ्यांची संख्या वाढवू नका. पण बाबासाहेबांच्या विनंतीला ठोकरुन आपली राजकारणी मंडळी तत्त्वशून्य युती करीत आहेत की नाही?

एकाच ऑटोला एका बाजूने काँग्रेसचा झेंडा आणि दुसऱ्या बाजूने निळा झेंडा! कुठे चालले आहे सगळे हे! या सर्व भ्रष्टाचारात आंबेडकर असूच शकत नाही.

हे राजकारणाचे झाले. आता साहित्यात काय चालले आहे? सामाजिक समरसतेत, राजकीय समरसतेत जाणारे सर्व एकत्र येऊन परवा याच ठिकाणी गवनि वाङमयीन समरसतेत सामील झाले होते. वाङमयीन समरसतेत सामील झालेले, या समरसतेत सामील न होणाऱ्या काही थोड्या लोकांना फाटक्या तोंडाने कशा शिव्या देतात त्याचे प्रात्यक्षिक संयोजकांना सादर करायचे होते. ते जिंकले. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे प्रयोग रंगला. सामाजिक समरसतेत जाणारांना, राजकीय समरसतेत शिरणारांना जशा निरनिराळ्या मार्गांनी काही गोष्टी दिल्या जातात तशा वाङमयीन समरसतेत जाणारांनाही लगेच काही गोष्टी मिळाल्या. असे करुन या समरसतेत न जाणारांना अशा वाकुल्या दाखविल्या गेल्या. त्यांना चिडविले गेले. बेइमानीला फार लवकर पुरस्कृत करते व्यवस्था! इतरांना मोह पडावा यासाठी हे सापळे मांडले जातात. या सापळ्यांमध्ये माणसे स्वखुशीने केवळ जातच नाहीत तर ही माणसे या जाण्याचे अत्यंत मुजोर पद्धतीने समर्थनही करतात. पण एवढेच नाही तर सर्व चळवळ गारद करणारी, समाजाचे वैचारिक आरोग्य धोक्यात आणणारी ही समर्थने आपण सहन करीत राहतो. त्याचे वाईट वाटते.

बाबासाहेबांचा विचार हा लखलखीत सोन्यासारखा विचार आहे. त्यात तांब्यासारख्या इतर धातू मिसळवून या सोन्याचा बावनकशीपणा नष्ट होणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे. बाबासाहेबांचे क्रांती तत्त्वज्ञान ही आपली सर्वात मोठी इस्टेट आहे. आपली ती सर्वात मोठी श्रीमंती आहे. ही श्रीमंती आपण गमावली तर जगाच्या पाठीवर आपल्या कंगालपणाला कुठेही तोड उरणार नाही. जगातले क्रमांक एकचे भणंग आपण ठरु. हे होऊ नये. "महार लोकांनी बौद्धधम्म निंदाजनक स्थितीस आणला" असे म्हणण्याची संधी जगाला मिळू नये याची खबरदारी बाबासाहेबांनी शेवटच्या भाषणात आपल्याला घ्यायला सांगितली होती. आज मी म्हणतो आपण आणखी पाच-दहा वर्षे असेच नाना प्रकारच्या समरसतांच्या सापळ्यात अडकत राहिलो तर महारांनी स्वार्थाच्या बाजारात आंबेडकर नावाची आपली सर्वश्रेष्ठ इस्टेट हिस्से पाडून-पाडून फुंकून टाकली असे म्हणण्यासारखी स्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही याची भयंकर भीती वाटते आहे.

वरील नाना प्रकारच्या समरसतावाल्यांनी आपल्यात अशी भांडणे माजवून दिली आहेत की आपल्यामधील काही तोंडे केवळ शिव्यांचे शेण टाकण्याशिवाय दुसरे काहीच करताना दिसत नाहीत. लोकांनाही आता या लोकांची तोंडे ही तोंडेच आहेत की

काय याबद्दल जबर शंका येऊ लागली आहे. आणि भाषणे? इतकी भाषणे आपले वक्ते देतात, पण चळवळीचा विचार पुढे सरकत नाही. समाजाला सडवणाऱ्या भोवतीच्या वैचारिक प्रदुषणावर कोणी हल्ला करीत नाही. भाषणे रंजक करण्याची स्पर्धा या समाजात लागली आहे. शेरशायरीच्या बेगडांनी भ्रष्टाचारी भाषणे सजवण्याचा आव आणला जातो आहे. प्रामाणिक विचाराला या शेरशायरीच्या पोकळ आखाड्यात अपराध्यासारखे वागावे लागते. ज्ञानसूर्य आंबेडकरांच्या समाजातील ही रंजनाची मैफिल पाहिली की वाईट वाटते. असूया-द्वेष यांनी आपल्यातील अनेक लोक निवडुंग फुलावेत तसे फुललेले आहेत.

या सर्वच गोष्टींची बेरीज केली तर आपल्या चळवळीला केवढी दुःखद ओहोटी लागली आहे याचा प्रत्यय येतो. माणसे परस्परांना जितक्या निकराने बोलतात तेवढी प्रतिक्रांतीवादी सत्तेच्या आणि प्रवृत्तींच्या, धर्माच्या आणि आंबेडकरवाद्यांना सहज दावे लावणाऱ्या कसायांच्या संदर्भात बोलत नाहीत. ही मोठी गंमतीची गोष्ट आहे.

धम्मबंधूंनो, अशा असंख्य समरसतांची भांग झोकून डौलात मिरवणाऱ्या, श्रीमंत होणाऱ्या, मग्रूर होणाऱ्या आणि आंबेडकरांचा लिलाव मांडणाऱ्या धडांची पाशवी शक्ती वाढते आहे. रात्र केवळ वैऱ्यांचीच नाही तर ज्यांची संख्या वाढते आहे अशा वैऱ्यांची आहे. रात्रीचा अंधार अधिक गडद होतो आहे. आपल्याच काहीच्या अशुभ आणि विनाशकारी हातांनी आंबेडकरी चळवळीला सुरुंग लावण्यात प्रतिगामी शक्ती यशस्वी झाल्या आहेत. या करंट्यांच्या विघातक हातांनी बाबासहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात बाबासाहेबांच्या चळवळीवर निखारे ओतण्याचे आंबेडकरद्रोही कर्म केलेले आहे हे आपण स्वच्छपणे समजावून घेतले पाहिजे. बधिर मनाने आणि मिटल्या डोळ्याने वावरण्याचा हा काळ नव्हे. वरील लोकांच्या घरभेद्या कृत्यांची आज आपल्या चळवळीत एक साचलेपणा आला आहे. हा चळवळीचा डोलारा या घुशींनी पार पोखरुन टाकला असून तो कोणत्याही क्षणी पार कोसळू शकतो हे लक्षात घ्या.

धम्मबंधूंनो! या वास्तवापासून आपल्याला दूर पळता यायचे नाही. दूर राहता यायचे नाही. या वास्तवाकडे जितके आपण दुर्लक्ष करु, या भयानक वास्तवातील प्रश्न तितके आपण टाळण्याचा प्रयत्न करु, वा त्यांच्या संबंधी भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करु त्या प्रमाणात आपण आपल्या चळवळीचे मारेकरी ठरु हे आपण लक्षात घेण्याची गरज आहे. समाजाचा गाडा मी इथवर आणला आहे. पुढे नेता आला नाही तर नेऊ नका, पण निदान हा गाडा मागे तरी नेऊ नका, असे बाबासाहेब म्हणाले होते. आज हा गाडा पुढे तर जात नाहीच. जागच्या जागीही तर तो थांबवून ठेवला जात नाहीच; पण हे

दिवाळखोर लोक या गाड्याला खड्ड्यात नेत आहेत. बाबासाहेब असे मोठ्या संतापाने म्हणाले होते -

"तुम्ही पंढरी, आळंदी किंवा जेजुरी किंवा दुसऱ्या कोणा देवाच्या नादी लागलात तर तुम्हाला वाळीत टाकण्याचा मला हुकूम द्यावा लागेल." (जुलै १९५३)

बंधूंनो, वरच्या तीर्थांमध्ये आपली ही मंडळी जातातच; पण त्यात शेगाव, शिर्डी, पारडशिंगा, टाकळघाट.. अशा नाना उत्सवांची--तीर्थांची भर पडली आहे. पण सामाजिक समरसता, राजकीय समरसता, वैचारिक समरसता, वाङमयीन समरसता या नव्या तीर्थांचीही आज भर पडली आहे. तीर्थे वाढत आहेत. बाबासाहेबांच्या बावीस प्रतिज्ञा लाथाडल्या जात आहेत. बाबासाहेब बहिष्काराचा हुकूम द्यावा लागेल असे म्हणाले होते; पण आज नाना प्रकारच्या समरसतांपासून सर्व प्रकारच्या तीर्थांना जाणाऱ्या आपल्या या आजच्या भटक्या भाईबंदांबद्दल आपण काय करीत आहोत? आपण या नाना प्रकारच्या घाणेरड्या तीर्थांना जाणाऱ्यांवर बहिष्कार तर टाकत नाहीच पण आपण त्यांचा सन्मान करतो. आपणाला तेही चालतात. बेइमानीला असे समर्थन मिळाले तर ती फार मग्रूर होते बंधूंनो. या दगाबाजीला पुरस्कृत करु नका. यांच्या या दरोडेखोरीचा पंचनामा व्हायला पाहिजे. हा रोग साधा नाही. त्यावर कठोर इलाज झालेच पाहिजेत. नाहीतर हे समरसतावीर आपल्या अहंकारांचे फोड कुरवाळत डोईजड होतील, आणि आपली वाट वाळवंटात शिरेल. तेव्हा या समरसतावाद्यांना वाळीत टाका. त्यांना अद्दल घडवा. कुकर्माची काय फळे भोगावी लागतात हे यांना कळू द्या. वैचारिक प्रबोधनाचे एवढे वादळ परत उठू द्या की या प्रदूषणवीरांची पूर्ण गँगच गारद होऊन जाईल. या सडलेल्या आंब्यांना वेळीच दूर करा अन्यथा इतरानाही ते सडविल्याशिवाय राहणार नाहीत. कर्मचारी बंधुंनो, या रसातळाला जाऊ पाहणाऱ्या समाजाचे आपण निदान जागृत घटक आहात. आपण या काळात फार मोठी भूमिका वठवू शकता. नाना प्रकारच्या समरसतावीरांकडून केला जाणारा समाजाचा बुद्धिभेद आपण थांबवू शकता. आंबेडकरवादाला आपल्या दूराचारी करणीचे डांबर फासणारे हे हात आपण वठणीवर आणू शकता. या प्रदूषणाने धोक्यात आलेले समाजाचे वैचारिक आणि नैतिक आरोग्य सुरक्षित ठेवण्याचे महत्वाचे कार्य आपण करु शकता. बाबासाहेबांच्या समाज क्रांतीचा गाडा अधःपाताच्या दरीत कोसळण्यापूर्वी आपण सावधपणे सर्व शक्ती एकवटून उभे राहिलो तर तेवढ्यामुळे हा गाडा बाबासाहेबांच्या विचारामागे धावू लागेल.

अर्थात परिस्थिती कठीण असली तरी अजून तशी आटोक्याच्याबाहेर ती गेली

नाही. कारण आपल्यासारखे हजांरो कर्मचारी आणि कार्यकर्ते या सर्व विषारी समरसतांपासून दूर आहेत. आता आधार अशाच लहान - लहान माणसांचा आहे. अनेक प्रामाणिक बेटांचाच आधार आहे. तेवढीच शक्ती या अरिष्टातून आपल्या चळवळीस वाचवू शकेल याची मला खात्री आहे. फक्त आपण पुढे यायचे आहे, एक व्हायचे आहे. बाबासाहेबांच्या विचारांना आपल्या कृती-शक्तीतून मुक्तपणे फुलवायचे आहे. असे झाले तर याही कठीण परिस्थितीत कठीण काहीही नाही याची खात्री आपणास देतो, आणि भीमज्योत कर्मचारी समितीने माझे विचार मांडण्याची संधी प्राप्त करुन दिल्याबद्दल या समितीच्या सर्व कार्यकर्त्यांचे आणि आपण माझे हे भाषण विचारपूर्वक ऐकून घेतल्याबद्दल आपणा सर्वांचे मनापासून आभार मानतो आणि आपली रजा घेतो.

जयभीम! जयबुद्ध! जयभारत!

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

सात
डॉ. हेडगेवारांचा 'संघ' आणि डॉ. आंबेडकरांचा 'बुद्धसंघ'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मवादी होते काय? ते आध्यात्मिक होते काय? की ते धर्मनिरपेक्षतावादी होते? डॉ. बाबासाहेबांच्या अनुयायांनी वरील सर्वच प्रश्नांची उत्तरे आज निश्चित करुन घेण्याची नितांत गरज आहे.

आंबेडकरांना धर्मवादी ठरविण्याचा प्रयत्न

आपल्या देशातील धर्मवादी लोक बाबासाहेब आंबेडकरांना धर्मवादी ठरविण्याच्या प्रयत्नाला लागले आहेत. या देशातील अध्यात्मवादी लोक बाबासाहेबांना अध्यात्मवादी ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दि. ६ जानेवारी १९९१ च्या "डॉ. हेडगेवार ते डॉ. आंबेडकर एक सामाजिक प्रवास" या लोकमतमधील लेखात शेवटी "धर्म आणि संघ यांना शरण जाण्यास दोघांनीही सांगितले आहे" असे वाक्य प्रा. डॉ. तळघट्टी यांनी लिहिले आहे. या वाक्याचा संदर्भ सांगितला पाहिजे. यातील 'दोघांनीही' म्हणजे डॉ. हेडगेवार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांनीही! लेखातील अवतरणाच्या आरंभी मी लोपचिन्ह घातले आहे. कारण अवतरणातील वाक्य 'धर्म' या शद्वापासून सुरु होत नाही. धर्म या शद्वाआधीच वाक्य सुरु झालेले आहे ते मी वरील अवतरणात गरज नसल्याने घेतले नाही पण ते सोडलेले वाक्य असे. "बुद्ध म्हणजे यथार्थज्ञान---" हे वाक्य यथार्थज्ञानानंतर स्वल्पविराम असल्याने पुढील वाक्याशी जोडून आहे हे खरे पण पुढच्या भागातील वाक्यही पूर्ण आहे. त्याची पूर्णता, त्याचा

आशय मागील वाक्य दिले नाही तरी बाधीत होत नाही. लेखकाच्या म्हणण्याचा आशय पुढील वाक्यात पूर्ण रुपात व्यक्त होतो. त्यामुळे आधीचे वाक्य अवतरणात घेतले नाही तरी पुढील वाक्याच्या आशयावर कोणताही अन्याय होत नाही. असो.

संघाची समरसता

सामजिक समरसता मंचाचे कार्य सध्या जोरात सुरु आहे. अनेक दलित मंडळी या कार्याशी निष्ठेने समरस झाली आहेत. डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. केशव मेश्राम, प्राचार्य प्र. ई. सोनकांबळे, प्रा. दत्ता भगत, प्रा. मनोहरराव गरुड, टेक्सास गायकवाड, गीतकार शांताराम नांदगावकर, प्राचार्य गांगुर्डे असे अनेक लोक संघाच्या समरसतेत सामील झाले आहेत. संघाशी समरस झाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दीवर्षात ही माणसे संघाशी समरस व्हावीत ही गोष्ट अत्यंत लक्षणीय आहे. निदान जे बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाशी इमानदार आहेत त्यांनी तरी या घटनेचा गंभीरपणे विचार केला पाहिजे या कळकळीने या संदर्भात थोडे लिहित आहे.

"धर्म आणि संघ" यांना शरण जा असे हेडगेवारांनीही सांगितले आणि डॉ. बाबासाहेबांनीही सांगितले हे वाक्य सामान्य माणसाच्या मनात गोंधळ निर्माण करणारे आहे आणि असा गोंधळ निर्माण करुन त्यांची दिशाभूल ते वाक्य करु शकते.

धर्म आणि संघ

धर्म म्हणजे 'बुद्धधर्म' आणि संघ म्हणजे 'बुद्धसंघ' असा त्या वाक्यातील धर्म आणि संघ या शद्वाचा अर्थ घेतला आणि हेडगेवारांनी आणि डॉ. आंबेडकरांनी सर्व हिंदूंना बुद्धधर्माकडे व बुद्धसंघाकडे जाण्यास सांगितले अशी समजूत करुन घेतली तर ते डॉ. तळघट्टी यांना मान्य होईल काय असा माझा प्रश्न आहे.

किंवा त्या वाक्यातील 'धर्म' आणि 'संघ' या शद्वांचे अर्थ 'हिंदू धर्म' आणि 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' यांच्याकडे हेडगेवार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व लोकांना अर्थात दलितांनाही जायला सांगितले अशी समजूत सर्व हिंदूंनी करुन घेतली तर ते बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना मान्य होईल काय असा माझा प्रश्न आहे.

क्रमाने वरीलपैकी पहिल्या परिच्छेदातील अर्थ हिंदूंना मान्य व्हायचा नाही आणि दुसऱ्या परिच्छेदातील अर्थ 'बुद्धधम्मीयांना' मान्य व्हायचा नाही. तरी वरील वाक्याची योजना दलितांची अर्थात बुद्धधम्मीयांची दिशाभूल व्हावी या हेतूने केल्यासारखी वाटते.

प्रा. तळघट्टी यांनी लिहिलेल्या वाक्याशी जे समरस झाले असतील त्यांनी

पुढील काही गोष्टी काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात अशी विनंती करतो.

धम्म व धर्म यातील फरक

बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्धधर्माचा' स्वीकार केला नाही तर 'बुद्धधम्माचा' स्वीकार केला. 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' (अनु तळवटकर, चिटणीस, रेगे, आवृत्ती सातवी, १९८८) या ग्रंथातील पृ. १७६ ते २५२ या पानांवरील विवेचन सर्वांनीच काळजीपूर्वक वाचले पाहिजे. या भागात बाबासाहेबांनी धर्म आणि धम्म यांच्यातील फरक सविस्तर समजावून सांगितला आहे.

यापूर्वीच्या काळात आणि सर्वसामान्यांसाठी याही काळात त्यांनी 'धर्म' शब्द वापरला असला तरी आयुष्याच्या अगदी शेवटी लिहिलेल्या 'बुद्धा अँड हिज धम्मा' या ग्रंथात त्यांनी बुद्धाचा धर्म असे शब्द वापरायचे काळजीपूर्वक टाळले आहे. त्यांनी 'बुद्धाचा धम्म', 'धम्म' असेच शब्द जाणिवपूर्वक वापरलेले आहेत. धम्मात ईश्वर नसतो. आत्मा नसतो. वर्णव्यवस्था नसते. जाती नसतात. धम्म म्हणजे नीती, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि विज्ञाननिष्ठा म्हणजे धम्म. म्हणून 'बुद्ध अँड हिज धम्मा' हा ग्रंथ धर्मग्रंथ ठरत नाही तर तो इहवादाचा नीतीग्रंथ ठरतो. तो सामाजिक समतेच्या, स्वातंत्र्याच्या, बंधुत्वाच्या आणि न्यायाच्या तत्त्वज्ञानाचा ग्रंथ ठरतो. ही बाबासाहेबांचीच भूमिका आहे आणि ती बुद्धा अँड हिज धम्मा या ग्रंथातच आहे.

भारतीयांनी बौद्ध धर्म स्वीकारावा

आता हेडगेवारांनी धर्माकडे जायला सांगितले आणि तेही हिंदू धर्माकडे जायला सांगितले असे तळघट्टींचे म्हणणे असेल तर निदान त्याचा अर्थ आपण समजून घेऊ शकतो. पण डॉ. आंबेडकरांनी धर्माकडे आणि हिंदू धर्माकडे जायला सांगितले हे सुचवणेसुद्धा बाबासाहेबांचे धर्मविषयक विचार लक्षात घेता सर्वस्वी अशक्य असेच ठरते. त्यांनी तर "सर्व भारतीयांनी बौद्ध धर्म स्वीकारावा" (अशा भाषणातून बुद्धाच्या धम्माला अनुलक्षून ते बुद्धाचा धर्म असे शब्द वापरीत असत. हे लक्षात घ्यायला हवे) या ८-५-१९५५ रोजी दिलेल्या व १०-५-५५ च्या जनता पत्रात आलेल्या भाषणात स्पष्टच म्हटले आहे. "साऱ्या हिंदुस्थान देशाने बौद्ध धर्म स्वीकारावा. बुद्ध धर्म व हिंदू धर्म एकच आहे, ही गोष्ट खोटी आहे. त्यात जमीन अस्मानचे अंतर आहे." (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे, गजानन बुक डेपो, मुंबई १९८६ पृ. १८) असे सांगून हिंदू धर्म आणि बुद्ध धम्म यातील मूलभूत तफावत समजावून सांगितली आहे. हिंदू धर्म, ईश्वर, आत्मा आणि चातुर्वर्ण्य मानतो. बुद्धधम्म ईश्वर, आत्मा आणि चातुर्वर्ण्य मानत नाही ही ती तफावत होय.

निरिश्वरवादी धर्म

हिंदू धर्म चैतन्यवादी, अध्यात्मवादी परंपरेतील धर्म आहे. तर बुद्ध धम्म निरीश्वरवादी आहे. तो जडवादी परंपरेतील आहे. हिंदूधर्माचा परलोकावर भर आहे. बौद्ध धम्म हा ऐहिकाची नीती तेवढी सांगतो. अगदी वि. दा. सावरकरांसारखेही काही लोक मानतात त्याप्रमाणे बुद्धधम्म हा हिंदू धर्माचा एक पंथ नव्हे वा त्याची शाखा नव्हे. बुद्धधम्म भारत देशातच जन्माला आलेला जडवादी परंपरेतील धम्म आहे. धर्म अणि धम्म यांचा निराळेपणा बाबासाहेब सांगतात आणि धम्माकडे लोकांना जायला सांगतात याचा अर्थ ते धर्मापासून, 'धर्म' या संस्थेपासूनच या देशातील लोकांना दूर जायला सांगतात. त्यांना धर्मनिरपेक्षतेकडे म्हणजे खऱ्या अर्थाने सेक्युलॅरिझमकडे जायला सांगतात. बाबासाहेबांची 'बुद्धा अँड हिज धम्मा' या अधिकृत ग्रंथातील परिभाषाच प्रमाण मानायला हवी आणि ती मानली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाला आणि आपल्या अनुयायांना धर्माकडे बिलकूल जायला सांगितले नाही हे अगदी स्पष्ट होते. हे सर्वांनीच लक्षात घेण्याची गरज आहे. निदान बाबासाहेबांच्या अनुयायांनी तर विशेष काळजीने हे लक्षात घेण्याची गरज आहे.

बाबासाहेबांची प्रतिज्ञा

आता मुद्दा दुसरा. संघाचा. हेडगेवार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांना अभिप्रेत असलेला संघ एकच होता काय? असा प्रश्न आहे. हेडगेवारांचा संघच बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असता आणि तो त्यांना मान्यच असता तर संघाची स्थापना तर हेडगेवारांनी १९२५ सालीच केली होती. हेडगेवारांच्या संघापासून, हिंदू महासभेपासून बाबासाहेब १९३५ पर्यंतही दूरच होते आणि १९३५ साली तर त्यांनी हिंदू धर्माच्या त्यागाची घोषणाच केली. 'हिंदू म्हणून मी जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मी मरणार नाही.' अशी भीमप्रतिज्ञाच त्यांनी केली आणि पुढे १९५६ साली त्यांनी 'बुद्ध धम्माचा' स्वीकार केला. हे सर्व आपल्याला माहीत आहेच. तेव्हा हेडगेवार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांनीही संघाकडेच जायला सांगितले या विधानाचा आशय समजून घेतला पाहिजे. बाबासाहेबांचा संघ म्हणजे निरिश्वरवादी लोकांचा संघ आहे. तो अनात्मवाद्यांचा संघ आहे. ईश्वर मान्य नसल्याने तो अध्यात्म मान्य नसलेल्या लोकांचा संघ आहे. स्वर्ग नरकाच्या कल्पना मान्य नसणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांचा तो संघ आहे. तो धर्मनिरपेक्षतावाद्यांचा , अर्थात निधर्मी लोकांचा संघ आहे. या बुद्धसंघात ऐहिक नीती आहे. तोच धम्म होय. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या संघाकडे जायला सांगितले तो हा बुद्ध संघ होय. डॉ. हेडगेवारप्रणीत संघवाले समरसतेचे अनेक प्रकार आहेत. हे सर्वच प्रकार बाबासाहेबांची चळवळ धुळीस मिळवीत आहेत.

समरसतेच्या या प्रकारांपैकी सामाजिक समरसता या पहिल्या प्रकारासंबंधी इथे थोडे पाहू!

दोन्ही संघ वेगळे आहेत

तेव्हा डॉ. हेडगेवार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संघ वेगवेगळे आहेत. ती दोन वैचारिक जगे आहेत. त्या दोन भिन्न विचारप्रणाली आहेत. एक विचारप्रणाली चैतन्यवादी अध्यात्मवादी आहे तर दुसरी विचारप्रणाली जडवादी धर्मनिरपेक्षतावादी आहे. एक विचारव्यूह हिंदू धर्मियांचा आहे तर दुसरा विचारपक्ष निधर्मी लोकांचा आहे. सामान्य मंडळी बुद्धधम्माबद्दलही धर्माच्या परिभाषेत बोलत असली तरी मुळात ते बाबासाहेबांना अभिप्रेत नाही. त्यांच्या 'बुद्ध अँड हिज धम्मा'तील त्यांच्या मांडणीलाही ते अभिप्रेत नाही.

तेव्हा बाबासाहेबांच्या प्रामाणिक अनुयायांनी डोळ्यात तेल घालून आजच्या वैचारिक आक्रमणाच्या व प्रदूषणाच्या काळात बाबासाहेबांनी आपल्याला दिलेली वैचारिक अस्मिता (आयडेंटिटी) जपायला पाहिजे. या अस्मितेचा आशय आणि आकृती बिघडणार नाही यासाठी सजग राहिले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणवून घेत आपल्यातलेही काही आपल्या या अस्मितेला बरबाद करायला निघालेले आहेत. तेव्हा डॉ. हेडगेवारांनी धर्म आणि संघ यांनाच शरण जायला सांगितले याचा अर्थ हिंदू धर्म आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनाच शरण जायला सांगितले असा आहे. हे स्पष्टपणे लक्षात ठेवायला हवे आहे.

पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माकडे जायला सांगितले नाही. हिंदू असो, ख्रिश्चन असो वा मुस्लिम असो कोणत्याही धर्माकडे बाबासाहेबांनी जायला सांगितले नाही तर त्यांनी शरण जायला सांगितले 'धम्माला'. हिंदू धर्माचा त्याग करुन त्यांनी धम्माचा स्वीकार केला. धम्माचा स्वीकार हा धर्मविहीनतेचा --सेक्युलॅरिझमचा स्वीकार होय आणि बाबासाहेबांनी ज्या बुद्धसंघाला शरण जायला सांगितले त्याची हेडगेवारांच्या संघाशी कोणताही संबंध नाही. असलाच तर सर्वस्वी विरोध संबंध मात्र आहे. हेही सर्व भारतीयांनी लक्षात ठेवायला हवे आहे.

या गोष्टी केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनीच ध्यानात ठेवायच्या आहेत असे नाही तर प्रा. डॉ. तळघट्टींप्रमाणे ज्यांची भूमिका असेल त्या सर्वांनीच या गोष्टी लक्षात ठेवाव्यात अशी अत्यंत कळकळीची आणि नम्र विनंती या छोट्याशा लेखाद्वारे मी करतो.

ΘΘΘΘΘΘ

आठ

आंबेडकरी चळवळ समरसतेच्या मगरमिठीतून सोडवा

हिं दू समाजाच्या चौकटीबाहेर जे लोक गेले किंवा जात आहेत त्यांना परत हिंदू समाज रचनेच्या चौकटीत कैद करण्यासाठी वेगवेगळ्या समरसतांचे मोहक गळं तयार होत आहेत. या गळांमागचे कारस्थान भल्याभल्यांच्या लक्षात येत नाही. आणि या समरसंताचे समर्थन आंबेडकरी चळवळीमधील संपूर्ण एक गँगची गँग करीत आहे. हिंदूत्वाशी समरस होऊ पाहणारे आता संघटित होत आहेत आणि आंबेडकरी चळवळीतील जे लोक हिंदूत्वाशी समरस होऊ इच्छित नाहीत त्यांना एकाकी पाडण्याचा, त्यांना हतबल करुन शरण आणण्याचा कार्यक्रम राबवीत आहेत. हिंदुत्वामध्ये कैद होणारे हे सर्व आंबेडकरी चळवळीतील समरसता वीर आणि हिंदूत्ववादी शक्ती एकत्र येऊन समरसतेबाहेर राहण्याचा अपराध करणारांना वठणीवर आणणाच्या कामाला लागलेले आहेत. समरसतेच्या गळयात गळा घालणारांना ते काय करीत आहेत हे आज कळत नसले तरी जे समरसतेपासून दूर आहेत त्यांना मात्र हे समरसतेत जाणारे नेमके काय करीत आहेत ते चांगले कळलेले आहे.

समरसतेत गेलेल्यांचे पाय हिंदुत्वाच्या चादरीत आता असे अडकले आहेत की समरसतेची वकिली करण्याशिवाय त्यांना गत्यंतरही नाही. दुसऱ्या बाजूने जे समरसतेत गेले त्यांचा सारखा गौरव हिंदूत्ववाद्यांची प्रसारमाध्यमे करीत आहेत. त्यांना पारितोषिके देऊन त्यांचा गौरव केला जातो आहे. त्यांचे झगझगीत रंगीत फोटो औरंगाबादच्या तरूण भारतात सतत छापून समरसतेत न जाणारांना खिजविले जात

आहे. समरसतेबाहेर राहणारांना नाकावर टिच्चून समरसतेत गेलेल्यांना घवघवीत प्रसिद्धी दिली जात आहे. त्यांना मालामाल केले जात आहे. त्यांच्यासाठी सर्वप्रकारची लयलूट केली जात आहे. अशी किंमत मोजून बाबासाहेबांचा क्रांतीकारी विचार नष्ट करण्याचा घाट घातला गेला आहे.

समरसतेचे अनेक प्रकार आहेत. हे सर्वच प्रकार बाबासाहेबांची चळवळ धुळीस मिळवीत आहेत. समरसतेच्या या प्रकारांपैकी सामाजिक समरसता या पहिल्या प्रकारासंबंधी इथे थोडे पाहू!

सामाजिक समरसता

आर.एस. एस. च्या भूमिकेशी समरस होणे, आंबेडकरांचे हिंदूकरण करणे आणि हिंदूत्वाच्या चौकटीत स्वतःला कोंडून घेणे ही सामाजिक समरसता होय.

हिंदूमहासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवू नका असे १९५२ साली शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या निवडणूक जाहिरनाम्यात बाबासाहेबांनी म्हटले आहे. बाबासाहेब असे कां म्हणाले? या संघटना उघड उघड ब्राह्मणवादी आहेत. आपल्याला अस्पृश्य करणारी तत्त्वज्ञाने, ग्रंथ, परंपरा, देव इ. सर्वच गोष्टी या संघटनांना पूजनीय आहेत. वर्णव्यवस्था, जाती आणि इतरही सर्वच विषमतांचा तळी उचलून धरणारे आचार - विचार त्यांचे आदर्श आचारविचार आहेत. ज्यांनी आपला तिरस्कार केला त्यांचा पुरस्कार या संघटना करतात. पण यांच्याशी समरस व्हायला सांगणाऱ्या कारस्थानी सामाजिक समरसता मंचाचे उद्घाटन समरसताचार्य गंगाधर पानतावणे यांनी केले आहे. सामाजिक समरसता पत्रिकेत उद्घाटन करतांनाचा फोटो आहे. संघाशी त्यांचे कसे घरोब्याचे संबंध आहेत आणि आंबेडकरवाद्यांच्या शिव्या खातही त्यांनी संघाच्या वाढीसाठी कसे कार्य केले आहे हे सांगणारा त्यांचा मोठा परिचय त्या पत्रिकेत आहे. सामाजिक समरसता मंचाच्या उद्घाटनाच्या पत्रिकेत प्रा. केशव मेश्राम यांचे नाव प्रमुख अतिथी म्हणून झळकलेले आहे. आपल्या भाषणातून या समरसतावीरांनी संघाच्या शिस्तिचा तोंड भरून गौरव केला आहे. संघाशी आपली जन्माला आल्यापासून कमिटमेंट असून, आमचा सगळा ग्रुप संघाशी समरस करून आम्ही ही कमिटमेंट पाळणार आहोत अशी आश्वासने यांनी दिली आहेत. औरंगाबादेला पानतावणेंच्या घरी भाजपाच्या कार्यकर्त्यांची इतकी ये जा कशी? पानतावण्यांना ते आपला नेता कसे काय मानतात? अशी कोणती सल्लामसलत चालते? संघवाल्यांचे, भाजपावाल्यांचे हे असे आजीव सल्लागार का आहेत? पानतावणे यांच्या ओठात दाखविण्यापुरता आंबेडकर असला तरी पोटात काय आहे ते आंबेडकरवाद्यांनी नीट

समजावून घेतले पाहिजे. औरंगाबादेला आंबेडकरी चळवळीतील लोक त्यांच्याकडे जात नाहीत. आणि ते नागपूरास आले की संघवाल्यांकडेच त्यांचा राबता असतो. धर्म राजकारण आणि साहित्य या क्षेत्रातील संघवाल्यांसोबत त्यांची सारखी खलबते सुरू असतात. आंबेडकरी चळवळीतील लोकांच्या विरोधात खोटे काय छापून आणायचे, कोणाला कसे बदनाम करायचे यासंबंधीची पडयंत्रे रचिली जातात. पानतावणेंचे जन्मजात कॅरेक्टर असे संघीय कॅरेक्टर आहे. सामाजिक समरसता मंचाचे थाटात उद्घाटन करायला त्यांच्याइतका दुसरा बेईमान मनुष्य सापडणे शक्यच नव्हते. म्हणून संघासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून आंबेडकर चळवळीशी त्यांनी केलेल्या बेईमानीचा पुरस्कार म्हणून सामाजिक समरसता मंचाच्या उद्घाटकपदाची माळ त्यांच्याच विपारी गळ्यात पडणे न्याय्य होते.

आता पानतावणे, संघाशी समरस होणाऱ्यांची संघटना बांधत आहे. जालन्यात या बांधणीचा पहिला टप्पा साकार झाला. नाशिकच्या नाट्यसंमेलनात त्या पुढाली पायरी गाठली गेली. समरसते मध्ये जाईल त्यालाच अध्यक्ष केले पाहिजे, समरसतेत जाणाऱ्याच्या बाजूने जे राहतील त्यांनाच पुरस्कार मिळाले पाहिजे. जे समरसतेत जाणार नाहीत वा समरसतेत जाणारांची बाजू घेणार नाहीत त्यांना कोणतेही पुरस्कार मिळणार नाहीत, त्यांची कोणत्याही प्रकारे प्रतिष्ठा वाढणार नाही, वर्तमानपत्रांमधून त्यांच्यासंबंधी चांगले काहीही लिहून येणार नाही याचा बंदोबस्त आता हे करताहेत. समरसतेबाहेर राहणारांची अशी नाकेबंदी करण्याचे कारस्थान ते रचत आहेत. या मुद्यावर आता औरंगाबाद आणि नागपूर ब्राह्मण संघवाल्यांशी त्यांची जोरदार खलबते सुरु आहेत. तर अशी ही आंबेडकरी चळवळीतील समरसतावादी माणसे यांच्या मदतीने हिंदुत्ववादी आणि हिंदुत्ववाद्यांच्या मदतीने हे समरसतेत न जाणाऱ्याच्या विरोधात वातावरण उभे करीत आहेत. समरसतेत गेलेल्यांना नैतिक समर्थन प्राप्त करुन देत आहेत. श्री. देवरस बाबासाहेब आंबेडकर हिंदूधर्म सुधारक ठरविले. त्याबद्दल समरसतेत गेलेले हे दलितांमधले लोक काहीही बोलत नाहीत. त्यांनी तसे काही बोलू नये असेच ठरवलेले आहे. असेच केवळ ठरले नाही तर बाबासाहेबांना हिंदूधर्मसुधारक ठरविणाऱ्या देवरसांविरूद्ध कोणी बोलले तर त्यांना कोणीही सोबत करायची नाही. त्यांचे ऐकून घ्यायचे नाही. त्यांच्याविरूद्ध प्रचार करायचा. त्यांची बदनामी करायची हे तंत्र हे दलितांमधले समरसतावीर अवलंबीत आहेत.

या साहित्यातील समरसतावीरांचा राजकारणात एक रिपब्लिकन पक्ष आहे. त्या त्यांच्या पक्षाचे भाजपाशी त्यांच्या त्या विशिष्ट गटाच्या नेत्यापासून घरोब्याचे संबंध आहेत. भाजपाचे अनेक आमदार खासदार निवडून आणायला हा रिपब्लिकन गट मदत


करीत असतो. याचा उलट अर्थ असा आहे की दलितांमधले हे समरसतावीर आंबेडकर चळवळ बुडवायला निघालेले आहेत. प्रारंभीच्या काळात यांच्याच भाईबंदानी, नातेवाईकांनी बाबासाहेबांची चळवळ नागपूर-विदर्भात रुजू नये यासाठी बाबासाहेबांच्या विरोधी कार्य केले आहे. धर्मान्तराला कधी प्रकट तर कधी अप्रकट पद्धतीने विरोध केलेला आहे. आजपर्यंतही बांबासाहेबांच्या चळवळीपासून दूर राहणारे, हिंदूधर्माचे काम करणारे, बुद्धधर्माच्या विरोधात मोहिमा चालवणारे काही जुने लोक आहेत. त्यांच्यावर यांनी लेखन करावे. त्यांचे गोडवे गावे, त्यांना गौरवाने हे असे चाललेले असते. असे हे हिंदूधर्मीय या नात्याने ऋणानुबंध जपले जातात., संघाशी, हिंदूत्ववाद्यांशी आबेडकरसमाजाचे लोक समरस झाले पाहिजेत या मताचा पुरस्कार करणारे व या मताचा पुरस्कार करणाऱ्या सामाजिक समरसतेचे १९८३ साली उद्घाटन करणारे पानतावणे हे आज संघ, भाजपा अर्थात हिंदूत्ववादाशी समरस होऊ पाहणाऱ्या सर्व लोकांचे थोर नेते आहेत. उद्या भाजपाचे राज्य आले तर याना खासदारकी मिळणे अटळ आहे. इतके यांचे भरीव कार्य या समरसतेच्या संदर्भात चाललेले आहे. मुखवटा आंबेडकरवादाचा पण पोटात मात्र जहर समरसतेचे. ही भयंकर परिस्थिती आहे. ही प्रक्रिया जर आपण आंबेडकरवाद्यांनी बंद पाडली नाही तर आंबेडकरी चळवळ हे लोक नष्ट केल्याशिवाय राहणार नाही. आंबेडकरी चळवळीतील सर्व बंधू भगिनींना या लेखाद्वारे मी कळकळीची विनंती करतो की आपण सर्वांनी बाबासाहेबांची शपथ घेऊन हे जाहिर करावे की, "आम्ही समरसतेत जाणार नाही. आम्ही बाबासाहेबांचे विकृतीकरण कोणालाही करू देणार नाही. आम्ही बाबासाहेबांचे हिंदूकरण होऊ देणार नाही." बांधवानो. वेळच तशी आहे. रात्र वैऱ्याची आहे आणि दिवसही वैऱ्यांचाच आहे. हे वैरी मोठे गोडबोले आणि आपल्यातलेच आहेत. सांभाळा रे माझ्या बांधवानो!

आंबेडकर हे क्रांतीचे तत्त्वज्ञान आहे. या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचारच क्रांती करू शकतो. पण अशी क्रांती होऊ नये असे ज्यांना वाटते ते बाबासाहेबांना मनातून आपला सर्वात मोठा शत्रू समजतात. क्रांती होऊच द्यायची नसेल, इथे सगळी विषमता जपायची असेल आणि मनूचे राज्य सुरू राह्यचे असेल तर लोकांच्या मनावर पडलेला डॉ. आंबेडकरांचा प्रभाव पुसून टाकणे अत्यंत आवश्यक आहे. असे मनूच्या वारसदारांना वाटते. त्यांना हे वाटते की बाबासाहेबांना विकृत केले की क्रांती मारता येते. इथला विषमतेचा अमर करायचे असेल तर लोकांच्या मनातून आंबेडकर पार पुसून टाकणे आवश्यक आहे. या निर्णयाला या देशातील प्रतिक्रांतीवादी आलेले आहेत. त्यांच्या हे लक्षात आले आहे की विचारांची लढाई लढून आंबेडकर विचारावर विजय मिळविता येणे आज अशक्य आहे, आपला विषारी फौजफाटा आंबेडकरांचा पराभव

करूच शकत नाही. वैचारिक युद्धभूमीवर आपला आता आपण काहीही केले तरी निभाव लागणे शक्य नाही. यावेळी प्रतिक्रांतीवादी शक्ती आंबेडकरविचाराचा गळा स्नेहाच्या केसाने कापायला निघाल्या आहेत. प्रतिक्रांतीवाद्यांचे हे प्रेम विषारी आहे. विघातक आहे. हे प्रेम जिवघेणे आहे. हे माझ्या बांधवांनो, या प्रेमाचे राजकारण ओळखा ! हे प्रेम आपल्या चळवळीला फक्त नष्ट करू शकते. आंबेडकरांशी सरळ वैचारिक युद्ध करून आंबेडकर हा या युगाचा आवाज पराभूत करता येत नाही हे नीट ध्यानात घेऊन हे प्रतिक्रांतीवादी लोक संभ्रमाच्या, विकृतीच्या आणि जहरी प्रेमाच्या शस्त्राने आंबेडकर पराभूत करायला निघालेले आहेत. त्यासाठी ते दलितांमधील सहज खरिदता येणाऱ्या स्वस्त धडांना हाताशी धरीत आहेत. आणि त्यांच्या मदतीने आंबेडकरी चळवळीच्या घरात शिरून आंबेडकरी चळवळ पोखरून टाकीत आहेत. समरसतेत जाणारे हे दलितांमधले लोक या प्रकारे आंबेडकर चळवळ मारायला निघालेल्यांचे मित्र आहेत.

धम्मबंधूंनो ! ही घडी शांत बसण्याची नाही आहे. सर्व मुकाटपणे पाहण्याची ही वेळ नाही . ह्या समरसतेच्या धुशीचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर सर्व घर पोखरले जाईल हे लक्षात घ्या. तेव्हा शांत बसू नका ! यावेळी आपण काय केले पाहिजे त्याचा विचार करा. बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी आपण आहात. आपण या घरभेद्यांना घर फोडू देणार? चळवळ मारू देणार? बाबासाहेबांना हिंदू करू देणार? पुन्हा मनूचे राज्य येवू देणार? विचार करा. उद्या जिकडे तिकडे मनूचे पुतळे बसवले जातील. आणि या पुतळ्यांचे उद्घाटन करायला योग्य माणूस म्हणून ते पानतावणे यांचीच निवड करतील. तेच या चळवळ मारण्याच्या मोहिमेत नेते आहेत. समरसतावाद्यांचे लाडके नेते आहेत. धम्मबंधूंनो ! आपण पुन्हा विनंती करतो की या समरसतावाद्यांपासून आंबेडकरी चळवळ वाचवा. आपण कामाला लागा.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗



नउ आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववादी

आंबेडकरी चळवळीपुढे आज अनेक जटिल आव्हाने आहेत, त्यांतील चळवळीत राहून चळवळीचे तीनतेरा वाजविणारे हिंदुत्ववादी हे आव्हान सर्वांत घातकी आव्हान आहे. आंबेडकरी चळवळीला लागलेला हा घाणेरडा रोग आजचा नाही, तो जुनाच आहे. या रोगाची लक्षणे आपल्या लक्षात उशीरा यायला लागली, पण रोग फार पूर्वीपासूनच सुप्रतिष्ठित आहे.

१९५६ साली बाबासाहेबांनी हिंदुधर्माचा त्याग केला, त्यांच्या सोबत अनेकांनी हिंदुधर्म सोडला. ज्यांनी हिंदुधर्म सोडला ते बुद्धधम्मात आले. धर्मातीत झाले. पण काही लोकांना मात्र १९५६ साली हिंदुधर्मही सोडता आला नाही, बुद्धधम्म स्वीकारताही आला नाही. १९५६ पूर्वी जे कट्टर हिंदु होते, म्हणजे जे राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटनामध्ये होते, त्यांना हिंदु धर्म सोडता येणे ही गोष्ट जमलीच नाही. त्यातले अनेक हिंदुधर्म कसा श्रेष्ठ आहे ते आजही आग्रहाने सांगत असतात. यात आपले काही मातंग बंधू आहेत, काही चर्मकार बंधू आहेत, काही भंगी बांधव आहेत आणि काही लोक महारांमधीलही आहेत. महारांमधले अनेक लोक आजही महानुभाव असण्यात धन्यता मानताना दिसतात. काही महार लोक अजूनही संघात असण्यात धन्यता मानताना दिसतात. 'आंबेडकरी चळवळीला काही अर्थ नाही, क्रांतिकारी चळवळ खरी संघाचीच!' असा आग्रही प्रचारही काही मंडळी करीत असतात. काही महार लोक आजही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत, ते नागपुरात निष्ठेने संघाचे कार्य करीत असतात. काही लोक तर भारतभर हे संघकार्य करीत बाबासाहेबांच्या चळवळीला सुरुंग लावीत आहेत. सामाजिक समरसतावीर डॉ. गंगाधरराव पानतावणे यांचे सख्खे

वडील बंधू श्री. सदाशिवराव पानतावणे हे बिहारमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रभावी संघटक असून ते त्या भागात पूर्णवेळ कार्य करीत असतात. त्यांनी त्यासाठी जीवन वाहून टाकलेले आहे. त्याशिवाय दुसरे एखादे पुण्यकार्य असेल असे त्यांना चुकूनही वाटत नाही. स्वतः गंगाधरराव पानतावणे नागपुरात होते तोपर्यंत अर्धी खाकी चड्डी घालून संघाच्या शाखेमध्ये गेले आहेत. त्याच पेहरावात त्यांनी त्या काळात अनेक शाखांवर भाषणे दिली आहेत. विदर्भात त्याकाळात बाबासाहेबांच्या हिंदूविरोधी नेतृत्वाला अनेक पूर्वास्पृश्यांचा कडवा विरोध होता. गणेश अक्काजी गवई होते, किसन फागुजी बनसोडे होते, ठवरे होते आणि संघाच्या शाखा़वर अर्धी खाकी चड्डी आणि काळी टोपी घालून भाषणे देणारे अतिउत्साही गंगाधर पानतावणेही होते. हेडगेवारांचे, गुरुजी गोळवलकरांचे, हिंदुहृदयसम्राट सावरकर यांचे महत्व पटवून देण्यात आणि बाबासाहेबांचा हिंदुधर्मत्यागाचा विचार किती घातकी आहे हे सांगण्यात ते दंग होते. खूप उत्साहाने सांगत होते. अशी रक्तात चड्डी भिनलेली आहे. आंबेडकरांचा केवळ उच्चार करुन काय होणार आहे?

आधी होता वाघ्या
दैवयोगे झाला पाग्या
त्याचा येळकोट राहीना
मूळ स्वभाव जाईना

तसे हे आहे. गंगाधर पानतावणेंचे असे अनेक भटके भाईबंद आहेत. या सर्व लोकांना त्यांच्या मर्जीविरुद्धच आंबेडकरी चळवळीत यावे लागले. त्यामुळे त्यांचे येणे हे अर्धवटच राहिले. हिंदुधर्मत्यागाला ज्यांनी विरोध केला होता ते दलितांमधील हिंदु आंबेडकरी चळवळीत तोंडदेखले आले, पण मनातून बुद्ध धम्मावर त्यांचा राग असल्याने ते धम्माशी समरस होऊच शकले नाहीत. ते संघाशी समरस होण्याच्या गोष्टी बोलत राहिले. संघ हे त्यांचे खरे माहेर होते. ते त्यांना मनापासून कधी सोडताच आले नाही. आंबेडकरी चळवळीत ते लोकलाजेखातर आले असले तरी हिंदुत्वाच्या चादरीत त्यांचे पाय कायमच अडकले होते. मधल्या काळात आंबेडकरी चळवळीला विकृत करण्याची हिंमत त्यांना झाली नाही, पण अलीकडच्या काळात ते बाबासाहेबांचे हिंदुकरण करण्याची खटपट करायला लागले आहेत. हे लोक आंबेडकरी चळवळीत मनाने येऊ शकले नाहीत. चळवळीत आल्याचा अभिनय मात्र ते करीत राहिले. हिंदु धर्म मनाने सोडून ते आंबेडकरांकडे आलेच नाहीत, उलट बाबासाहेबांनाच ते, संधी मिळताच, हिंदु

धर्मात घेऊन चाललेले आहेत. ते बाबासाहेबांना हेडगेवारांशी आणि सावरकरांशी जोडायला निघालेले आहेत. हे लोक असे का करतात? त्याची कोणती कारणे संभवतात? हे मूर्ख आहेत काय? नाही! हे आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववादी लोक मूर्ख नाहीत. पैसा, प्रतिष्ठा आणि हिंदुधर्माविषयीची पूज्यबुद्धी ही तीन कारणे या लोकांना आंबेडकरी चळवळीपासून दूर नेतात. या लोकांचे वर्तन दुहेरी असते. आबेडकरी चळवळीतील मनुष्य घरी आला तर ते बाबासाहेबांचा फोटो त्याला दाखवितात आणि हिंदु मनुष्य आला तर त्याला चोरघरातील हिंदू देवतांचा देव्हारा दाखवितात. त्यात सर्व असतात - साईबाबा, वित्तूबाबा, ताजोद्दीनबाबा, राम, कृष्ण, विठ्ठल, दत्त आणि महादेवाची लिंगपिंडही असते. असा समृद्ध देव्हारा. आणि आंबेडकरवाद्यांसाठी बाहेर आंबेडकर. हिंदू देवतांसाठी उपासतापास, व्रतवैकल्ये, सणवार निष्ठापूर्वक केले जातात. नवससायास फेडले जातात. आवडीच्या हस्तसामुद्रिकाला हात दाखविले जातात. भविष्य पाहण्याचा, त्यात रंगण्याचा खेळ खेळला जातो. असे दिशाशून्य अनेक आहेत. ओठात आंबेडकर, पोटात हिंदूधर्म असे हे चाललेले असते. त्यामुळेच यांच्यापैकी एखादा समरसता परिपदेचा उद्घाटक आपल्या मुलीला वसिष्ठाच्या गाईचे नाव एखाद्या ब्राह्मणाकडून ठेवून घेतो. आपली संघवाली मंडळी आतल्या घरात घेऊन जातो. त्यांना महादेवाची लिंगपिंड दाखवितो, घरातील हेडगेवारांचा फोटो दाखवितो. तेव्हाच्या भारी भारी काळ्या टोप्या आणि खाकीच्या अर्ध्या चड्ड्या टूंकेच्या तळाशी ठेवलेल्या असतात, त्या कौतुकाने काढून दाखवितो. निष्ठावंत म्हणून वाहवा मिळवितो.

शांताराम नांदगावकर बाबासाहेबांवरही गाणी लिहितात. गणपतीवरही लिहितात. साईबाबावरही लिहितात. तसे हे आहे. सूरमणी प्रभाकर धाकडे यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी धनवटे रंगमंदिरात चक्रधरस्वामी यांच्यावरच सगळी गीते गाऊन दाखविली. हा प्रसार कशाचा झाला? हे बाबासाहेबांच्या चळवळीला पुढे नेण्यासाठी चाललेले असते की मागे नेण्यासाठी? बाबासाहेबांवरील निष्ठेची अशी सहज वासलात लावली जाते. बाबासाहेबांच्या निरीश्वरवादी धम्माच्या विरोधी असलेले काहीही करणार नाही अशी प्रतिज्ञा करणारे आणि त्यानुसार वागणारे मनच खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी असते.

आंबेडकरी चळवळीबाहेरील हिंदुत्ववाद्यांनी मागल्या २५-३० वर्षांमध्ये हे ओळखले आहे की आंबेडकरी चळवळीत प्रारंभकाळात आंबेडकरी चळवळीला विरोध

करणारे लोक आहेत. त्यांच्या मनातून पूर्वीचे हिंदुत्वाचे आणि संघाचे संस्कार अजूनही गेलेले नाहीत. ते त्यांच्या मनात चांगले ठाण मांडून बसलेले आहेत. शिवाय या लोकांना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होणे, समरसता मंचावर जाणे, कीर्ती मिळविणे या गोष्टींचे मोह आहेत हे हिंदुवाद्यांनी चांगले ओळखले आहे. भारतीय संविधानाच्या लेखी काय किंवा नव्या जागतिक ज्ञानविज्ञानाच्या लेखी काय, हिंदुधर्माची पकड सैल होत चाललेलीच आहे. निरीश्वरवादी आंबेडकरी चळवळ या देशातील प्रांतोप्रांती आता पसरु लागली आहे. वैचारिक आणि ललित साहित्य या क्षेत्रात आंबेडकरी चळवळ उड्डाणे घेत आहे. देशाचे वैचारिक हवामानच बदलायला लागले आहे. शिवाय आंबेडकरी चळवळीच्या पाठीशी संविधान आहे. नवे विज्ञान आहे. हिंदुधर्म कालवाह्य तर आंबेडकरी चळवळ अत्यंत कालोचित आहे. त्यामुळे ही चळवळ नष्ट केल्यावाचून हिंदुधर्म वाचवता येणे अशक्य आहे. हे हिंदुत्ववाद्यांनी पुरते जाणले आहे. आणि आंबेडकरी चळवळ मारता येणे तर शक्य नाही. आंबेडकरी चळवळ आंबेडकरी विचाराचे अग्निजल प्यालेली आहे. तिची वैचारिक शक्ती मोठी आहे. तेव्हा या चळवळीला नष्ट करायचे असेल तर तिला शत्रू कल्पून तिच्यावर बाहेरुन मारा करणे योग्य व्हायचे नाही. या चळवळीला आपुलकीच्या अभिनयानेच नष्ट करता येईल. तिचा केवळ प्रेमानेच गळा कापता येणे शक्य आहे. प्रेमाने गळा कापण्यासाठी आत शिरणे आवश्यक आहे. तेही सोपे आहे. आपले जासूद आधीच आत आहेत. आपण पाठविलेले हेर आधीच आत जाऊन बसले आहेत. आंबेडकरी चळवळीत लोभाची मांजरे आहेतच. त्यांना हाताशी धरावे. त्यांचे दोर आपल्या हाती आहेतच. पूर्वीचे संस्कार त्यांना सहज दगाबाज व्हायला मदत करतील! झाले! प्रश्न मिटला! आंबेडकरांचा जयजयकार सुरु झाला. शोभायात्रेत हेडगेवारांसोबत बाबासाहेबांचा फोटो ठेवला गेला. क्रांतिविचार विकृत करण्याची ही जुनीच हिंदु टेक्नॉलॉजी आहे. बुद्धाच्यावेळी ही टेक्नॉलॉजीच वापरली गेली. हे यश त्यांच्या खाती जमा होतेच. त्याच ब्रह्मास्त्राचा उपयोग त्यांनी आंबेडकर विकृत करण्यासाठी करायला प्रारंभ केला. सामाजिक समरसता मंचाची स्थापना झाली. सामाजिक समरसता परिषदेचे उद्घाटन आंबेडकरी चळवळीतील सुप्रसिद्ध हिंदुत्ववादी गंगाधर पानतावणे यांच्या हस्ते ४ डिसेम्बर १९८८ रोजी झाले. डॉ. आंबेडकरांच्या विकृतीकरणाला पानतावणे यांच्या हस्ते समारंभपूर्वक आणि रीतसर सुरवात झाली. बाबासाहेबांच्या हिंदुकरणाला ख्यातनाम हिंदुत्ववादी श्री. पानतावणे यांच्या अशुभ हस्ते प्रारंभ झाला. व्यासपीठावरील खास

आणि प्रमुख अतिथीमध्ये नागपूर येथे नोव्हेम्बरमध्ये फुले-आंबेडकर संसदेतर्फे होऊ घातलेल्या दलित साहित्य संमेलनाचे (जे संमेलन झालेच नाही.) नियोजित अध्यक्ष सुप्रसिद्ध समरसतावादी प्रा. केशव मेश्राम हे होते. अशा आंबेडकर-द्रोह्यांना हाताशी धरुन हिंदुत्ववाद्यांनी प्रेमाने आंबेडकरी चळवळीचा गळा कापण्याचे तंत्र अवलंबिले.

आंबेडकर आणि हेडगेवार हे एकत्र येऊच शकत नाहीत. त्यांची नांवे एकत्र आणणे हे सुद्धा प्रज्ञापुरुष डॉ. बाबासाहेबांवर अन्याय करण्यासारखे आहे. बाबासाहेबांनी हिंदुधर्माचा पूर्णतः त्याग केला आणि ते बुद्धाच्या निरीश्वरवादी - जडवादी जीवनसरणीकडे गेले. हेडगेवार हे कट्टर हिंदुत्ववादी. स्वतः हेडगेवार आणि आज हेडगेवारांना मानणारे लोक हिंदुधर्माचा त्याग करुन निरीश्वरवादी बुद्धाचा, धर्मातीत आणि केवळ इहवादी बुद्धाचा स्वीकार करु शकत असतील तर आणि तरच या दोघांची नावे एकत्र घेण्याला अर्थ आहे. पण काय वाटेल ते झाले तरी एक हिंदुत्व सोडू शकत नाही. तर दुसरा काय वाटेल ते झाले तरी हिंदूत्व मान्य करु शकत नाही. हेडगेवार आणि आंबेडकर या अशा दोन परस्परविरोधी भूमिका आहेत. मनुस्मृती आणि भारतीय संविधान एकत्र जाऊच शकत नाहीत, तसे हेडगेवार आणि आंबेडकर एकत्र येऊच शकत नाहीत. हेडगेवारांच्या आदर्शांना बाबासाहेबांनी आयुष्यभर प्रखर विरोध केला. पांडित्य, प्रज्ञा, व्यासंग, लेखन, जडवादी जीवनदृष्टी आणि धर्मातीत (Secular) जीवनदर्शन अशा कोणत्याही संदर्भात हेडगेवारांची आंबेडकरांशी तुलना होऊ शकत नाही. हेडगेवार डॉक्टर असणे आणि आंबेडकर डॉक्टर असणे या दोन गोष्टी फार वेगळ्या आहेत.

पी.एच.डी., एल.एल.डी., डी.लिट्., डी.एस्सी. याप्रकारे डॉ. आंबेडकर हे कितीतरी वेळा डॉक्टर होते. हिंदुत्वाबाहेर हेडगेवार पाहू शकले नाहीत, हिंदूत्वाबाहेर गेल्याशिवाय काही चांगले पाहता यायचे नाही हा आंबेडकरांच्या आयुष्याचा इत्यर्थ आहे. हेच सावरकरांच्या संदर्भातही म्हणता येते. सावरकर आणि आंबेडकर यांच्यात समन्वय होऊच शकत नाही. राम, कृष्ण, गीता, हिंदुत्व यासंबंधी सावरकरांनी घेतलेली भूमिका, ब्राह्मणवर्ग आणि भारतीय हिंदू परंपरा यांच्यासंबंधी सावरकरांनी घेतलेली भूमिका आणि आंबेडकरांनी वरील सर्वच गोष्टीसंबंधी घेतलेली भूमिका या परस्परविरोधी भूमिका आहेत. त्यांचा समन्वय होऊच शकत नाही. गंगाधर पानतावणे मात्र आंबेडकर आणि हेडगेवार, आंबेडकर आणि सावरकर, यांच्या समन्वयाची भाषा करतात. त्यामागे त्यांच्या मनात हूंदडणारे हिंदूत्व हेच कारण आहे हे उघड आहे. पानतावणे लहानपणापासून संघात नाचले आहेत. ती लय त्यांच्या रक्तात चांगली मुरली

आहे. विचार करण्याची त्यांची पद्धती, खऱ्या आंबेडकरवादी प्रतिभावंताविषयी आणि विचारवंतांविषयीची त्यांच्या मनातील कुत्सितभाव, त्यांचे एकूण आंबेडकरी चळवळ तोडण्याचे तंत्र पाहिले की ही विषारी फांदी कोणत्या झाडाची आहे त्याचा सहज अदमास लागतो. बाबासाहेब म्हणतात - सावरकर नरक ओकले तर पानतावण्यामधला संघप्रिय म्हणतो - दलितांनी सावरकरांना समजावून घेतले असते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच वीर सावरकरांनाही दलित समाजाने डोक्यावर घेतले असते. आंबेडकरवादी समाजाला हा बदसल्ला देणारे पानतावणेंचे डोके आरपार हिंदूत्ववादी आहे यात कोणतीही शंका नाही. बाबासाहेब म्हणतात - भगवद्गीता क्रांतीविरोधी ग्रंथ आहे. तर पानतावणे म्हणतात - भगवद्गीता हेच डॉ. आंबेडकरांचे प्रेरणास्थान आहे. त्यामुळे जन्मशताब्दी वर्षातील इंदूरच्या अस्मितादर्श मेळाव्याचे उद्घाटन दत्तोपंत ठेंगडी यांनी करावे यासाठी पानतावणे आकाशपाताळ एक करतात. काही वर्षापूर्वी नागपूरला अस्मितादर्श मेळावा घ्यायचा होता तेव्हा, ताजोद्दीन साई यांचे भक्त असलेल्या, गुरुचरित्राची पारायणे करणाऱ्या आणि गोळवलकरांवर कविता लिहिणाऱ्या एका कवीला त्या मेळाव्याचे अध्यक्ष करण्यासाठी विनंती करायला ते गेले होते. त्यांची त्यासाठी त्यांनी मनधरणी केली होती. इंदूरच्या अस्मितादर्श मेळाव्याला आंबेडकरवादी लोक कोणीच गेले नाहीत. कारण तो मेळावा भाजपचा असावा असे त्या मेळाव्याच्या स्वागताध्यक्षा खासदार सुमित्रा महाजन असल्याने लोकांना वाटले. आंबेडकरी चळवळीतही लोकांना सहजच वाटले असावे की हिंदूत्ववाद्यांच्या त्या मेळाव्यात कशाला जा! त्यामुळे पाचपन्नास लोकांच्या उपस्थितीतच तो मेळावा पार पाडावा लागला. रत्नागिरीला, जळगावला अशा अनेक ठिकाणी मेळाव्याला पाचपंचवीस लोकांच्यावर लोक नसतात. याचे कारण उघडच आहे की पानतावणे यांनी जे काही कारस्थान चालवले आहे ते आंबेडकरवादी लोकांच्या आता चांगले लक्षात आहे. पुण्याच्या ४ डिसेम्बर ८८ च्या समरसता परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केशव मेश्राम प्रमुख अतिथी होते. नाशिकला समारोपाच्या कार्यक्रमासही ते विशेष सन्माननीय अतिथी म्हणून गेले होते. अस्मितादर्श मेळाव्याला पानतावणे आणि मेश्राम हे आंबेडकरी चळवळीतील हिंदूत्ववाद्यांचे नेते असतात आणि त्याच्या मागे दहापाच हिंदुवादी अंधभक्त असतात.

आंबेडकरी चळवळीमध्ये एक प्रवाह खरा धम्मवादी आहे. तो धर्म, अगदी कोणताही धर्म मानत नाही. सेक्युलर किंवा निधर्मी बुद्धधम्म तो मानतो. हा प्रवाह निरीश्वरवादी आहे. जडवादी आहे. चमत्कार, दैवी असे तो काहीही मानत नाही.

हिंदूधर्मावर बाबासाहेबांनी जी घनघोर टीका केली ती या प्रवाहाला मान्य आहे. दुसरा प्रवाह हिंदूत्वादी आहे, पण तो आंबेडकरी चळवळीतच राहून आंबेडकरी चळवळ पोखरुन काढीत वावरतो. त्याचे नेतृत्व गंगाधररावांकडे आहे. हा आंबेडकरी चळवळीतील हिंदूत्ववाद्यांचा सांस्कृतिक नेता होय. हा नेता अस्मितादर्शमध्ये उत्थानगुंफेमध्ये हिंदू देवदेवतांवर टीका असल्याने ह्या पुस्तकातील लेखन कविताच होत नाही असे छापतो. बुद्धाच्या आणि बाबासाहेबांच्या निरीश्वरवादाचा पक्ष लढवणाऱ्या उत्थानगुंफेस सारा महाराष्ट्र श्रेष्ठ कविता मानतो, आंबेडकरी चळवळीतील हिंदूंचे नेते पानतावणे मात्र तसे मानत नाहीत. पुण्याच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी कविवर्य नारायण सुर्वे यांच्याविरुद्ध संघवाली मंडळी 'त्यांचा उमेदवार' म्हणून पानतावण्यांनाच उभे करतात. सामाजिक समरसता परिषदेच्या उद्घाटनाला आंबेडकरी चळवळीत संघाचे काम करणाऱ्या त्यांच्या पानतावण्यांनाच ते पाचारण करतात. भांडवलशाही आणि ब्राह्मणशाही हे आपले दोन शत्रू आहेत असे बाबासाहेब म्हणतात, तर ब्राह्मणशाही शक्तीशाली व्हावी यासाठी पानतावणे आणि त्यांचे आदरणीय सदाशिवराव भाऊ सतत कार्य करतात. इचलकरंजीच्या कुळकर्णी - भांडवलशाहीकडून पानतावण्यांना विनाकारण पुरस्कार मिळत नाहीत! म्हणे फाय फाउंडेशन! ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही यांच्यातर्फे दिला जाणारा तो पुरस्कार आहे. आंबेडकरी चळवळीला पोखरण्याचे काम करणाऱ्या नामवंत घुशींनाच तो पुरस्कार दिला जातो. गंगाधररावांना मात्र तो आपला सन्मान वाटतो. त्यामुळेच केवळ आता संघाविषयी स्नेहभाव बाळगणारे, गीतेसंबंधी पूज्यभाव वाटणारे, सावरकरासंबंधी आदरभाव वाटणारे अनेक लोक निर्माण व्हायला लागले आहेत. पानतावणे या आपल्या नेत्याच्या प्रभावामुळेच आता त्यांच्या अनुयायांच्या घरी आंबेडकरांसोबत हेडगेवारांचे फोटो दिसायला लागले आहेत. त्यांच्या हिंदुत्ववादी गटातील लोकातून गीतेसंबंधी, सावरकरासंबंधी, हेडगेवारासंबंधी आणि हिंदू अध्यात्मासंबंधी गौरवपर लेखन करणारे लेखक निर्माण होऊ लागले आहेत. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद संघवाल्यांनी जमवून आणण्याचे अफाट प्रयत्न केले. मुख्यमंत्र्याचे फायनल शिक्कामोर्तब व्हायच्या आधीच त्यांच्या हिंदूमधल्या हिंदूत्ववाद्यांनी त्यांना तसे होण्याची शक्यता सांगून टाकली आणि 'उघडीला मिळालं लुगडं, आता नेसू का मंग नेसू!' प्रमाणे पानतावण्यांचा नाच सुरु झाला. सत्कारावर सत्कार सुरु झाले. जालन्याला सत्कार, औरंगाबादेला सत्कार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक कर्णधार मा. गो. वैद्य यांच्या

अध्यक्षतेखाली नागपूरच्या धनवटे रंगमंदिरात सत्कार निश्चित झाला होता. वक्तेही तिकडचेच ठरले होते. आंबेडकरी चळवळीत कोणीही अध्यक्ष व्हायला तयार नव्हते. आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववाद्याच्या सत्काराला यायचे नाही, अध्यक्ष म्हणून जायचे नाही आणि वक्ता म्हणूनही जायचे नाही, श्रोता म्हणूनही जायचे नाही असे नागपूरच्या आंबेडकरी चळवळीतील सर्वांनीच ठरवून टाकले होते. तो सत्कार यामुळे झालाच नाही. म. ना. वानखडे मार्क्सवादी, बाबुराव बागूल मार्क्सवादी, ढसाळ मार्क्सवादी, यशवंत मनोहर मार्क्सवादी, अशी टीकामोहिम पानतावणे आणि त्यांच्या नेतृत्वाखालील त्यांच्या हिंदुत्ववादी अनुयायांनी सतत राबविली. पानतावणे असे संघात जातात, समरसता परिषदेच्या उद्घाटनाला जातात त्याबद्दल त्यांच्या अनुयायांपैकी कोणीही बोलत नाहीत. कोणत्याही विषयावर भाषण असो यशवंत मनोहरावर मूर्खासारखे काही बोलल्याशिवाय, कुठल्यातरी प्रकारचा पोरकटपणा केल्याशिवाय ज्याचे एकही वाळलेले पान हलत नाही ते पानतावण्यासंबंधी कधीच कसे काही बोलत नाहीत? काय कारण? कारणे खूप सांगता येतील, पण या सर्व कारणांच्या पाठीशी असलेले मूलभूत कारण त्यांचा हिंदुत्ववाद हेच आहे. आंबेडकरी चळवळीतील हे हिंदुत्ववादी आंबेडकरी चळवळीतील हिंदूत्ववाद्यांवर कधीही टीका करीत नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शिवसेना यांच्याबद्दल पानतावणे आणि केशव मेश्राम यांनी कधीही शब्द उच्चारला नाही. या गंभीर मौनाचे कारण काय? आंबेडकरांचा, बुद्धाचा संघ आणि हेडगेवारांचा संघ एकच आहे असे लिहिणाऱ्या तळघट्टींना पानतावणे, मेश्राम आणि त्यांची आंबेडकरी चळवळीत हिंदुत्ववादी पिलावळ का उत्तर देत नाही? नागपूरच्या तरुण भारतामध्ये निरीश्वरवादी डॉ. आंबेडकरांना पानतावणे अध्यात्मवादी ठरवतात आणि हिंदुमध्ये नेऊन बसवतात. जो मनुष्य ईश्वरच मानत नाही तो अध्यात्मवादी होतोच कसा? अध्यात्म म्हणजे काय? ते ईश्वराशिवाय संभवते काय? पानतावणे बाबासाहेबांनाही हिंदू करु पाहतात कारण ते स्वतः कट्टर हिंदू आहेत. आणि आंबेडकरी चळवळीतले त्यांचे मूठभर अनुयायी हिंदु आहेतच, पण ते बाबासाहेबांनाही विकृत करु पाहतात. बाबासाहेबांचे हिंदूकरण ते यासाठीच करु लागले आहेत. एवढे सगळे कोणी फुकटात कसे करणार? हिंदुत्वावरील निष्ठेखातर तर हे होतेच, पण केवळ निष्ठेखातर हे होणार नाही. या मंडळींना मिळालेले महत्व स्वतः 'अर्थ'पूर्ण आणि बोलके आहे.

अनेक प्रकारचे स्वार्थ साधण्यासाठी आंबेडकरी चळवळीत हिंदुत्वाचे कार्य

करणाऱ्या पानतावण्यांच्या नेतृत्वाखालील सर्व लहान-मोठ्या हिंदुत्ववाद्यांनी आजवर जो धुडगुस घातला तो आता पुरे झाला. आंबेडकरी चळवळीची त्यांनी केली ती दिशाभूल पुरे झाली. त्यांचा अभिनय आता लोकांच्या लक्षात येऊ लागला आहे. त्यांचे आतले दात दिसले आहेत. पोटात काय आहे ते कळले आहेत. या आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववादी गटामुळे आंबेडकरी चळवळीत दोन भाग पडले आहेत. दोन छावण्या पडल्या आहेत. नवी पिढी त्यामुळे संभ्रमात पडली आहे. आंबेडकरी नैतिकता दुभंगून गेली आहे. पानतावणे यांनी आज आंबेडकरी चळवळीत महायान पंथ सुरु केला आहे. आणि हिंदु समाजव्यवस्था, त्यातील विषमता, त्याचे अध्यात्मवादी, कर्मविपाकवादी तत्त्वज्ञान या सर्वांच्याच विरुद्ध लिहिणाऱ्या खऱ्या आंबेडकरवाद्याविरुद्ध हिंदु मानसिकता चिडतेच पण पानतावण्यांचा आंबेडकरी चळवळीतील गटही तेवढाच चिडतो. पानतावण्यांचा गटही या आंबेडकरवाद्यांच्या विरोधातच सतत लिहितो-बोलतो. आजच्या खऱ्या आंबेडकरवाद्याला आंबेडकरी चळवळीबाहेरील हिंदुत्ववाद्यांना आणि आंबेडकरी चळवळीतील पानतावण्यांसारख्या हिंदुत्ववाद्यांना एकाच वेळी तोंड द्यावे लागते. हे मोठे विलक्षण आहे. पानतावणे आणि त्यांचा हिंदुत्ववादी गट हिंदुत्ववाद्यांविरुद्ध लिहीत नाही तर आंबेडकरवाद्यांविरुद्ध निंदामोहीम सुरु ठेवतो, हा पुरावा कशाचा आहे? हा पुरावा त्यांच्या हिंदुत्ववादी बांधिलकीचा आहे. यात वाद नाही.

आंबेडकरी चळवळीतील या स्वमनाधन्य हिंदुत्ववाद्यांना हे कळले पाहिजे की बाबासाहेबांनी १९५६ साली हिंदुधर्माचा त्याग केला. 'माझी नरकातून सुटका झाली' असे बाबासाहेब म्हणाले. माझ्यासारख्या आंबेडकरवाद्याचे या करंट्यांना एवढेच सांगणे आहे की, हे दिवाळखोरांनो, आंबेडकरी चळवळीला परत त्या नरकात नेऊ नका. त्यांच्याशी समन्वय साधू नका, त्यांच्याशी समरस होऊ नका. आंबेडकर ओळखा जरा! यांनी लक्षात घ्यायला हवे की हिंदुधर्म हा सर्वांना समतेचे जगणे नाकारणाराच धर्म आहे. सर्व परमेश्वराचीच लेकरे आहेत असे सारखे म्हणायचे आणि काही लोकांना, परमात्म्याच्याच काही अंशांना अस्पृश्य करायचे? काहींना शूद्र करायचे, काहींना भटकत विमुक्त ठेवायचे, तर काहींना आदिवासी करुन जंगलाच्या अंधारात मारायचे हे वर्तन खलनायकाचे असते. स्नेहाचा अभिनय हा सूडाच्या क्षणापर्यंतच असतो. तसे हे आहे.

या आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववाद्यांना हे कळायला हवे की हिंदुत्ववादी तत्त्वज्ञान कधीच कालोचित नव्हते. जन्माला आले त्यावेळीही हे तत्त्वज्ञान कालबाह्यच होते. ते कधीही प्रस्तुत नव्हते. कारण ते कधीही माणसांमधील समतेचे तत्त्वज्ञान नव्हते,

जे मानवताबाह्य असते ते कोणत्याही क्षणी कालबाह्यच म्हटले पाहिजे. शिवाय आंबेडकरी चळवळीतील या निष्ठावंत हिंदुत्ववाद्यांना हे कळले पाहिजे की आंबेडकरी चळवळ ज्या हिंदुत्ववादाशी ते जोडत आहेत, ज्या हेडगेवारांशी ते आंबेडकरांना जोडत आहेत ती हिंदुत्ववादी तत्त्वदृष्टी ही निखालसपणे विज्ञानविरोधी आहे. ईश्वर विज्ञानविरोधी आहे. कर्मविपाकापासून, वर्णव्यवस्थेपर्यंतचे सर्व हिंदुधर्माचे प्रताप विज्ञानाच्या विरोधातच आहेत.

या आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववाद्यांना हे कळले पाहिजे की समतेचे, माणसांच्या उज्वल जगण्याचे तत्त्वज्ञान केवळ धम्म हेच आहे. आंबेडकरधम्म! धम्म हे विश्वाच्या उज्वल अस्तित्वाचे तत्त्वज्ञान आहे.

आंबेडकर चळवळीतील या हिंदुत्ववाद्यांपासून आंबेडकरी जनतेने डोळ्यात तेल घालून सावध राहिले पाहिजे. ते आपल्याला परत खाटीकखान्यात न्यायला लागलेले आहेत, बाबासाहेबांनी आपणाला ज्यातून काढले त्या नरकात आपल्याला ते घेऊन जात आहेत, त्यांची पद्धती मोठी लाघवी आणि फसवी आहे, त्यांचा अभिनय एवढा जबरदस्त आहे की ते कट्टर हिंदुवादी असूनही ते हिंदुत्ववादी वाटू नयेत. असे सर्व बारकावे या आंबेडकरी चळवळीतील हिंदुत्ववाद्यांचे आंबेडकरानुयायांनी समजून घ्यायला हवे आहेत. या आंबेडकरी चळवळीची 'अस्मिता' हेडगेवारांच्या समरसतेत बुडवायला निघालेल्या अस्मितादर्शकारापासून आंबेडकरी जनतेने सावध राहिले पाहिजे. डॉ. म. ना. वानखेडे यांनी त्यावेळच्या या नवख्या पोराकडे अस्मितादर्श यासाठी दिले नव्हते. अर्थात यांचे संघचरित्र वानखडे साहेबांना माहीत असते तर ही चुक त्यांच्या हातून घडली नसती.

आंबेडकरी चळवळीतील या हिंदूत्ववाद्यांपासून आंबेडकरी जनता सावध झाली नाही तर आंबेडकरी जनतेला बाबासाहेबांनी जी निरीश्वरवादी तत्त्वदृष्टी आणि प्रखर समतादृष्टी दिली ती क्षीण होत जाऊन एके दिवशी नष्ट होऊन जाईल आणि ती बाबासाहेबांसंबंधी आपण केलेली फार भयानक गद्दारी होईल.

आंबेडकरी समाज आज या देशात ज्याच्याजवळ क्रांतीचे अत्यंत अचूक तत्त्वज्ञान आहे, तत्त्वज्ञानाची अजोड श्रीमंती आहे असा समाज आहे. या समाजाजवळचे हे क्रांतीचे तत्त्वज्ञान जर दडपले गेले तर या समाजाइतका कंगाल समाज जगाच्या पाठीवर कोणताही नसेल. तेव्हा पानतावणे, केशव मेश्राम, शांताराम नांदगावकर, या आणि अशाच हिंदूत्ववादी लोकांपासून सावध असावे.

आंबेडकरवादी साहित्याची चळवळ का थांबली? तिच्यात अवरोध का निर्माण

झाले? या चळवळीतील विद्रोहाची आग शांत का झाली? या सर्वच गोष्टींची कारणे 'आंबेडकरी चळवळीतील हिंदूत्ववादी' हेच आहे.

आंबेडकरवादी म्हणवत लोक वित्तूकडे का जातात? साईकडे आणि गजाननाकडे का जातात? घरी हिंदू देवतांचे देव्हारे का ठेवतात? हिंदूची व्रतवैकल्ये आणि सण का करतात? दारावर गणपतीचे फोटो का वागवतात? घरात साई, वित्तूचे फोटो का लावतात? साठ-सत्तरच्या सुमारास आंबेडकरी चळवळीत हे नव्हते. आता का आले? याला कारण आंबेडकरी चळवळीतील हिंदूत्ववादी हेच होय. 'बुद्धधम्म' हा हिंदूधर्माचाच भाग होय हा प्रचार ही मंडळी आणि प्रेरक मंडळी करतात. उद्या सर्वसामान्य जनता अनवधानाने या गोष्टी मानायला लागेल आणि त्यातून अगदी प्रारंभकाळात बाबासाहेबांनी हिंदूधर्माविषयी काढलेले उद्‌गारच तेवढे पुढे करुन बाबासाहेबांना आणि आंबेडकरी चळवळीला ही मंडळी हिंदूधर्मात बुडवून टाकतील. माणुसकीचा सर्वात तेजस्वी लढा नष्ट होईल. सगळ्या अस्मितेचे दिवाळे निघेल. म्हणून खऱ्या आंबेडकरवाद्यांनी या आंबेडकरी चळवळीतील हिंदूत्ववाद्यांपासून सावध राहिले पाहिजे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

दहा हल्लाबोल

दलितांनी समरसतेत जाणे ही आंबेडकरी संस्कृतीशी तात्त्विक गद्दारी होय. इतर गेले हे सांगून आपल्या जाण्याचे समर्थन करणे ही हरामखोरी होय. या अक्करमाशांना संघवाले न म्हणणे हे हास्यास्पद आहे. भारताला विषमतेच्या नरकातून काढून समतेत आणण्याचे विज्ञान केवळ आंबेडकर देतात. हा ज्यांना गुन्हा वाटतो ते आंबेडकरांना आपला सर्वश्रेष्ठ शत्रू मानतात. आंबेडकरांचा विचार नष्ट करण्यासाठी समरसतेचा गनिमी कावा उभारतात. समरसता म्हणजे प्रेमाने गळा कापणे.

बाबासाहेबांचा निरीश्वरवाद आणि समतावाद मान्य नसेल, आपले देव, धर्म, जाती, रुढी, परंपरा व मंदिरे सोडणे शक्य नसेल तर फुले-आंबेडकरांचे फोटो लावणे ही विषारी बनवाबनवी ठरते. आंबेडकरांच्या विचाराविरोधी कोणताही संस्कार समाजाच्या मनावर होऊ देणे हा राष्ट्र आणि माणुसकी या दोन्हींच्या संदर्भात गुन्हा आहे हे मान्य करता येत नसेल तर दलितांना समरसतेत बोलावणे म्हणजे त्यांना परत हिंदू करुन घेणे ठरते. 'हिंदू धर्मात मरणार नाही.' ही प्रतिज्ञा खरी करुन दाखविली तेव्हा 'नरकातून सुटलो' असे बाबासाहेब म्हणाले होते.

भांडवलदारांचा फाय फाउंडेशन पुरस्कार घेणे ही आर्थिक समरसता, ब्राह्मणी साहित्य संमेलनात जाणे ही वाङमयीन समरसता, त्यांच्या शैक्षणिक परिषदांमध्ये जाणे म्हणजे शैक्षणिक समरसता आणि हेडगेवारांच्या हिंदुत्वाचा स्वीकार करणे म्हणजे सामाजिक समरसता होय. या सर्व जहरांशी समरस होणे म्हणजे 'भांडवलदारी आणि ब्राह्मणधर्म' हे आपले दोन शत्रू होत हे सांगणाऱ्या बाबासाहेबांशी द्रोह करणे होय.

आंबेडकर ही क्रांती तर हेडगेवार प्रतिक्रांती. आंबेडकरांशी हेडगेवारांची कोणत्याही बाबतीत तुलनाच होऊ शकत नाही. प्रतिक्रांती आज समरसतेच्या शस्त्राने क्रांतीला मारण्याचा अनाठाई प्रयत्न करीत आहे.

भाजपाच्या व संघाच्या समरसतेत जाणारे दलित मूर्ख, संधीसाधू आणि आंबेडकरद्रोही आहेत. समरसतेत जाणारांनी शेण खाल्ले असते, ते नरकात गेले असते तरी दुःख झाले नसते पण समरसतेत जाऊन बाबासाहेबांच्या तत्त्वांच्या उरात त्यांनी खंजीर खुपसला याचे दुःख असह्य आहे. कारण समरसता म्हणजे समतेला विषमतेत, उजेडाला अंधारात, विचाराला विचारशून्यतेत, प्रगतीला अधोगतीत आणि सौंदर्याला कुरुपतेत बुडवून मारण्याचे कारस्थान आहे.

म्हणून - 'बोल दलिता हल्ला बोल समरसतापे हल्ला बोल. आंबेडकरद्रोहीपे हल्ला बोल.' समरसतेत जाणाऱ्यांवर बहिष्कार टाका. त्यांचे निषेध करा. पुतळे जाळा. या अस्तनीतल्या निखाऱ्यांना धडा शिकवा. सर्व आंबेडकरवाद्यांनी आज हेच करण्याची गरज आहे. जयभीम!

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

अकरा तो खोटा आहे

स्वतःचा चेहरा तो लोकांना दाखवूच शकत नाही. तो आतून फार तडकलेला आहे. तो आंबेडकरवादाचा बुरखा घालून मिरवू पाहतो आहे. पण त्याचे खायचे दात लोकांना दिसल्याशिवाय राहत नाहीत.

तो १९८३ पर्यंत स्वतःचे मूळ रुप झाकण्यात यशस्वी झाला होता. आपले सत्यरुप लोकांपुढे येवू नये म्हणून आंबेडकर चळवळीतील मान्यवरांसंबंधी त्याने नाना प्रकारचा खोटा मजकूर लिहून प्रकाशित केला. डॉ. म.ना. वानखडे, बाबूराव बागूल, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, विलास वाघ, रावसाहेब कसबे इत्यादींसंबंधी अत्यंत खोटे, खोडसाळ आणि व्यक्तिगत निंदानालस्ती करणारे लेखन त्याने केले. वरीलपैकी अनेकांसंबंधी हलगीतून तो नरक ओकला. अलीकडे प्रा. अविनाश डोळस, दत्ता भगत इत्यादींसंबंधीही तो असे बोलू लागला आहे. हे सर्व तो स्वतःच्या बचावासाठी करीत होता. लोकांची मने गुंतवून ठेवायची. महत्वाच्या मुद्यावर येवूच द्यायचे नाही. ही या देशातील दलितांच्या वाट्याला आलेली हिंदूत्ववादीच नीती आहे. देव, धर्म, कर्मकांड यांच्यात लोकांना गुंतवायचे आणि त्यांचे शोषण करणारा कोण त्या प्रश्नाची गाठच पडू द्यायची नाही. स्वतःची दुष्कृत्ये लपविण्यासाठी इतरांच्या सत्कृत्यांवर डांबर फासायचे ही परत स्थितीवादी वा प्रतिक्रांतीवादी व्यवस्थेचीच नीती असते. त्याने बरोबर याच नीतीचा अवलंब केला. कारण त्याच्या रक्तात ती त्याच्या अनेक पिढ्यांपासून मुरलेली आहे. पण तो हे सांगणार नाही.

तो लहानपणापासून संघात आहे. गोखले गुरुजींनी त्याच्यावर ते संस्कार फार खोलवर केले. रात्रंदिवस तो गोखले मास्तरांकडे असायचा. त्यांनी त्याच्या रक्तात हे

विषाणू अगदी ठासून भरलेले आहेत. नागपूरला असताना तो सतत संघात जायचा. आपण ब्राह्मण आहोत हे भासविण्यासाठी त्याने 'पंत' आडनाव घेतले होते. ते संघाच्या एका कार्यक्रमात रीतसर त्याला दिले गेले हे तो सांगेल काय? 'प्रदीप'ला दिलेल्या खराब अभिप्रायाखाली पाहा. त्यां काळातले त्याचे लेखन त्याने पार दडवून ठेवले आहे. कोणालाही तो ते दाखवीत नाही. दाखवूच शकत नाही. त्या लेखनाने तो संघपरिवारात त्याकाळी फार लोकप्रिय होता. हे त्याचे संस्कार. त्याचा मोठा भाऊ ओरिसामध्ये थोर संघटक आहे संघाचा. सदाशिवराव. त्यामुळे याच्या घराचे आडेच संघाशी बांधले आहे. पण हे तो सांगू शकणार नाही.

राजेंद्रसिंहजी सोबत सामाजिक समरसता परिषदेचे उद्घाटन करतानाचा त्याचा फार प्रसन्न आणि कृतार्थ असा फोटो आहे (पाहाः सामाजिक समरसता मंच. स्मरणिका. पृ. २८) सामाजिक समरसता मंच पत्रिकेत "परिषदेचे उद्घाटन याच्या हस्ते पार पडले" याने तिथे अत्यंत समयोचित भाषण केले असे रिपोर्टिंग आहे. (जाने. १९८९) तर डिसेंबर १९८८ च्या अंकात याने उद्घाटनाला जाऊ नये म्हणून विरोध करणारांबद्दल अत्यंत तुच्छतेने उल्लेख केला. हे लोकांना काहीही माहीत नाही आणि तो हे सांगणार नाही. १९९१ सालच्या इंदोरच्या ५० लोकांच्या विराट उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात एका डॉ. प्राध्यापिकेने समरसतेविरुद्ध बोलायला प्रारंभ करताच याने तिच्या हातचा माईक हिसकावून घेऊन तिला खाली बसवले. या अपमानाबद्दल ती प्राध्यापिका स्टेजवरच रडली बिचारी. हे तो सांगणार नाही. तो खरे काहीच सांगत नाही. त्यास खोटे सांगण्याचे बाळकडू मिळालेले आहे. अडवाणी, अटल बिहारी वाजपेयी यांचेसोबत त्याचा कृतार्थ फोटो आहे. सामाजिक समरसता मंच पत्रिकेत (फेब्रु. १९८९ च्या अंकात पृ. ३) फार प्रचंड परिचय लेख असून त्यात त्याच्या 'त्या' संदर्भातील कार्याचा फार गौरव केलेला आहे. पण हे तो सांगणार नाही. नागपुरात आला की तो कुठे मुक्कामाला असतो? तो कोणाकडे जातो? बाबासाहेबांच्या विरोधकांशी त्याचे घरोब्याचे नाते आहे. आंबेडकरी चळवळीतील कोणाही आंबेडकरवाद्यां विरुद्ध कोणी वाईट लिहिले की याचे त्याला अभिनंदन करणारे पत्र फार तातडीने जाते. हे तो सांगणार नाही पण याला हिंदूत्ववाद्यांनी आंबेडकरवाद्यांविरुद्ध लिहिले तर आनंद का होतो? या स्वभावाचे नाव काय आहे? ही वृत्ती कोठून आली? तिची गंगोत्री कुठे आहे?

मी आंबेडकरवादी आहे असे तो आता अंगात आल्याप्रमाणे सांगत सुटतो. आपले आंबेडकरवादीपण सिद्ध करण्यासाठी पैसा खर्च करतो. पण यामुळे त्याचे मुळ रुप झाकले जाऊच शकत नाही. कारण त्याचे वागणे, त्याचे विचार करणे हे आंबेडकरवादी

नाही आहे. ते पूर्णतः संघशिस्तीतून आलेले आहे.

बाबासाहेबांसकट बुद्ध आणि फुले हे अध्यात्मवादी कसे आहेत हे तो तरुण भारत (डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी विशेषांक, नागपूर, १९९०) मध्ये सिद्ध करुन दाखवितो. तो आता लपविण्यासाठी काहीही सांगो पण त्याची विचार करण्याची पद्धती समरसतावादीच आहे. कोणी समरसतेत गेल्याने समरसतावादीच होतो का असा त्याचा प्रश्न फार फालतू आहे. तो गेला हे खरेच आहे. पण तो गेला नसता तरी तो मनाने, वृत्तीने, विचाराने समरसतावादीच आहे ही गोष्ट कोणीही नाकारु शकत नाही. औरंगाबादेला ही गोष्ट लक्षात आली तेव्हा मी त्याच्यापासून कायमचा दूर गेलो. त्याने कोणताही अपराध केला असता तरी चालले असते पण त्याच्या या स्वभावाला कशी क्षमा करणार?

'डॉ. आंबेडकरांचे प्रेरणास्थान भगवद्गीता' असे तो (तरुण भारत, नागपूर. १०-९-८३) म्हणतो, 'वीर सावरकराचे साहित्य आणि सामाजिक सुधारणेचे विचार अत्यंत ज्वालाग्रही होते. मात्र ते विचार अनुयायांना पचले नाहीत. परिणामी त्या विचारांना कृतीची जोड मिळाली नाही. त्या विचारांना कृतीची जोड मिळाली असती तर डॉ. आंबेडकरांप्रमाणेच वीर सावरकरांनाही दलित समाजाने डोक्यावर घेतले असते' असे तो (दै. नागपूर पत्रिका १४-७-८९) म्हणतो. ही विचार करण्याची पद्धती कोणती आहे. तो आता कितीही बरळलो, तो स्वभावामुळे उघडा पडला आहे. हे रक्तातले संस्कार आहे. ब्लड कॅंसर असावा तसे हे रक्तसंस्कार आहेत. त्याला आता कोणीच काही करु शकत नाही. त्यामुळे तो आंबेडकरी चळवळीची बेमालुमपणे दिशाभूल करीत आहे, आंबेडकरवादी व्यक्तिंवर घाणेरडे लेखन करतो आहे. आंबेडकरवाद्यांसंबंधी वाईट लिहिणाऱ्यांचे अगत्याने, कृतार्थतेने तो अभिनंदन करतो आहे. तो शब्दांनी काहीही सांगो स्वभावाने आंबेडकरद्रोही आहे. हिंदुत्ववादी आणि समरसतावादी आहे. विचार करण्याची त्याची पद्धती, आंबेडकरवाद्यांशी वागण्याची त्याची पद्धती संघीय आहे याला आता त्याचाही इलाज नाही.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

बारा आदिवासी साहित्य

या संमेलनात मी स्वतःच्या जाणिवेत भर घालण्यासाठी म्हणून येणार होतो, परंतु उद्‌घाटनाची जबाबदारी माझ्यावर सोपवून संयोजकांनी माझ्यासंबंधी जी आपुलकी व्यक्त केली त्याबद्दल मी संमेलनाच्या संयोजकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

साहित्य हा संस्कृतीचा आरसा आहे. ज्यांच्या वाणीतून असे साहित्य निर्माण होईल ते उद्याच्या जगाचे शिल्पकार होणार आहेत.

भारतातील पहिले आदिवासी साहित्यसंमेलन १० व ११ डिसेंबर १९७९ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे झाले. त्या संमेलनाचे हे उद्‌घाटकीय भाषण.

आजपर्यंतच्या साहित्याच्या इतिहासात ज्यांनी साहित्य निर्माण केले ते समाजात आधीच अधिक प्रतिष्ठाप्राप्त होते. साहित्य ही अशी वस्तुस्थिती आहे की, ती चकवते, अंधारही दाखविते. माणसाला मार्गदर्शन करते आणि मार्गघातही करते. माणसाला वाचा देते. वाचाघातही करते. पाय तोडते आणि युगाच्या वाटा चालण्यासाठी पायांना शक्तीही देते.

आदिवासी हे या भूमिचे आदिपुत्र आहेत. गेल्या पाच हजार वर्षांपासून हा आदिवासी संस्कृतीच्या दारात कायम भिकाऱ्यासारखा उभा आहे. गुलामगिरीच्या सर्पमाळा व्यवस्थेने त्याच्या गळ्यात घातल्या आहेत. आपणासमोर उभे असणारे साहित्य हे या आदिवासींचे नाही, आदिवासींच्या संबंधीचे नाही. रामाच्या चवदा वर्षांच्या वनवासाचे कौतुक करणारांनी हजारो वर्षे वनात राहणाऱ्या या वनपुत्रांचे कधीच कौतुक केले नाही. जीवनातील खऱ्या वेदनांकडे पाठच फिरविली गेली आहे म्हणून आजच्या साहित्यात ज्या वेदना आहेत त्या खोट्या आहेत आणि या खोट्या वेदनांचे

गुणगानहे. खोटेच आहे.

हा देश अनेक जखमांनी जर्जर झालेला देश आहे. आदिवासी ही अशीच एक जखम आहे. ही जखम आता बोलू लागली आहे. त्यातून आदिवासी साहित्य जन्माला येत आहे. स्वतःच्या गुलामगिरीची जाणीव गुलामांना करुन द्यावी लागते. म्हणजे ते त्या गुलामीच्या बेड्या तोडून टाकण्यासाठी प्रवृत्त होत असतात. म्हणून आदिवासींचे यानंतरचे जे साहित्य निर्माण होईल ते शब्दांमध्ये मशाली पेटवणारे साहित्य असेल.

स्वतःच्या मुक्तिसाठी मनगट आणि परिस्थिती तयार असावी लागते. मित्रहो, आज हा जो विचार आपण करु शकतो ते या युगाचे योगदान आहे. आदिवासी बंधूला आपल्या मित्रासारखे आणि उद्धारकासारखे वाटावे असे हे शतक आहे. हे शतक आपल्या सोबत आहे. या शतकाने हाक मारली आहे क्रांतीच्या नावाने! आपण क्रांतीच्या दाराकडे मनगट घेऊन गेले पाहिजे. शत्रू कोण नि मित्र कोण हे ओळखले पाहिजे. यासाठी फुले-आंबेडकरांच्या वाङमयातील इत्यर्थ लक्षात घ्या. काही साहित्य नरकाचीही उपासना शिकविते. काही साहित्य उज्ज्वल जीवनाचीही उपासना करायला शिकविते. आपण उज्जवल जीवनाची उपासना करायला शिकविणारे साहित्य निर्माण केले पाहिजे. म्हणून आपल्याला डोक्यात मशाली घेऊन पुढे जावयाचे आहे. मागे जायला सांगणारे स्तरांकित आणि वर्णांकित साहित्य लाथाडून आपल्याला पुढे जायचे आहे.

साहित्य ही 'प्रबुद्ध' मनाची निर्मिती आहे. दोन विचारधारा एकूण जगाच्याच पाठीवर आहेत. अनेकांच्या डोक्यात चैतन्यवादी अर्थात स्थितिवादी आणि कर्मवादी विचारसरणी घट्ट बसलेली आहे. हा मुद्दाच महाभयंकर विषारी मुद्दा आहे. ही विचारसरणी समाजाला चालू देत नाही. दगडासारखे निर्जिव करते. याउलट दुसरी भौतिकवादी विचारसरणी आहे. समाज गतिमान आहे असे ही विचारसरणी मानते, हे गतितत्त्व ज्यांनी ज्यांनी नाकारले ते स्वतःचेच खुनी झाले. म्हणून जडवादाचा विचार हाच खरा विचार आहे हे आपण पक्के लक्षात ठेवले पाहिजे.

माझे साहित्य लोकांसाठी आहे. ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांच्यासाठी आहे. पीडितांसाठी आहे. मी अन्यायग्रस्तांच्या उत्थापनाचा, संघर्षाचा विचार मांडतो. क्रांतीचा संदेश शिकविणारे माझे साहित्य जाती, वर्ण आणि धर्माचे साहित्य नाही. बंधूंनो, मी, माझे साहित्य आणि आंबेडकरवादी साहित्यिकांचा क्रांतिकारक काफिला तुमच्यासोबत आहे. हे शतक तुमच्यासोबत आहे. यापुढे वर्गसंघर्ष पेटेल. हा वर्गसंघर्ष विचारवर्गामधला संघर्ष असेल. कुठल्या विचाराच्या, किंवा कुठल्या वर्गाच्या बाजूने

आपण उभे राहणार आहोत ते आपणाला ठरवावे लागेल. जे जे प्रबोधनशील आहेत, गतिशील आणि पुरोगामी आहेत ते सगळे आपले दोस्त आहेत. आम्ही कुणाचे गुलाम नाही. दलित साहित्यातून आदिवासी वजा नाही आणि आदिवासी साहित्यातून दलित वजा नाही. हे झाले पाहिजे. असे झाले तर बंधूंनो आपले एकूण साहित्य क्रांतिकारक होईल. एकूणच समाज क्रांतिकारक होईल.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

तेरा
थोर जीवनवादी साहित्यिक मामा वरेरकर

मामा वरेरकर हे मराठीतील जीवननिष्ठ साहित्यिकांच्या परंपरेतील एक महत्त्वाचे आणि मान्यवर साहित्यिक होत. १९०८ सालापासून १९६४ साली निधन होईपर्यंत त्यांनी मराठी साहित्याची आणि महाराष्ट्रीय समाजाची एखाद्या एकनिष्ठ व्रताप्रमाणे सेवा केली. मानवी जीवनाचे थोर भाष्यकार म्हणून कीर्ती मिळविली.

कादंबरी, नाटक, एकांकिका, आत्मचरित्र, कथा इत्यादी बहुतेक सर्वच वाङमयप्रकारांमधून त्यांनी विपुल लेखन केले. या लेखनातून आपल्यापुढे एका परिवर्तननिष्ठ, गतिशिल, पुरोगामी आणि आशयनिष्ठ कलावंताचे एक श्रेष्ठ व्यक्तिमत्व उभे राहते.

केशवसुत आणि हरिभाऊ आपटे यांच्या काळात मराठी साहित्याचे नेतृत्व परिवर्तननिष्ठ कलादृष्टीनेच केले. सुंदर-स्वस्थ समाजाचे स्वप्न पाहणाऱ्या या कलावंतांनी आपली अस्वस्थ मने साहित्यातून साकार केली. परिवर्तननिष्ठ कलादृष्टीचे अग्निध्वज त्यांनी कधीही खांद्यावरुन उतरुन ठेवले नाहीत. पुढल्या काळातील मध्यमवर्ग मुख्यत्वे पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादाच्या छावणीत शिरला आणि सामाजिक प्रतिष्ठेची आयती अंगडी-टोपडी फुकटात देणाऱ्या आपल्या गतकालीन सांस्कृतिक कोषाच्या संवर्धनासाठी धडपडू लागला. राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक संदर्भातील स्थितिवादी निष्ठा प्रज्वलित करुन आश्रय घेतला. या मंडळींनी पुढच्या काळात मराठी वाङमयात काहीसा निराळा सूर लावला. सदर सूर परिवर्तनवादी चळवळींशी, पुरोगामी शक्तींशी अर्थातच विरोधी होता. आणि

परिणामतः त्यामुळे तत्कालीन पुनरुज्जीवनवादी किंवा प्रतिगामी शक्तींचेच हात बळकट झाले. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी या काळाला विस्मृतीवादी कादंबऱ्यांचा काळ म्हटले आहे, ते अर्थात खरेच आहे. पण या काळातील कादंबरीच नव्हे तर एकूणच मराठी वाङमय वास्तववादाकडे पाठ फिरवून स्वस्त आणि सुरक्षित जनाच्या स्वप्नाळू दुनियेत शिरले होते. साहित्याचे तंत्र, सजावट हा वस्तुतः कलाकुसरीचा बाह्य भाग. परंतु त्यालाच या काळाने श्रेष्ठ कलेची पदवी देऊन टाकली होती. या काळाने कारागिरीलाच कला म्हणून जाहीर केले होते. शब्दरचनेच्या सुंदर परिकथा, प्रेमश्रृंगाराच्या मादक स्वप्नकथा यांच्याद्वारा भोवतीच्या जीवनाकडे पाठ फिरवणारा वाचकवर्ग या वाङमयाने निर्माण केला. गुंगी आणणाऱ्या या वाङमयाने जीवनातले जीवघेणे प्रश्नच नाकारले. या वाङमयाचा परिघ पांढरपेशांच्या जीवनापुरता आणि सुखवस्तु मनांना आवश्यक असतो इतका स्थितिशिल आहे. १९२० पासून १९६० पर्यंत ही कलावादी समाजविन्मुखता मराठी वाङमयात प्रामुख्याने नांदली. फडके, मर्ढेकर आणि गंगाधर गाडगीळ या मंडळींनी या काळात तिचे संवर्धन केले.

या 'कलेसाठी कला' गौरवाच्या प्रदीर्घ काळात ज्या बाणेदार कलावंतांनी प्रत्यक्ष जीवननिष्ठच नव्हे तर परिवर्तननिष्ठ भूमिका मांडून आणि या भूमिकेचे प्रत्यंतर घडवणारी समर्थ साहित्यनिर्मिती करुन कलेत समतेच्या चळवळीचा-सुधारणावादाचा पक्ष लढवला, त्या थोर जीवननिष्ठ प्रतिभावंतांमध्ये मामा वरेरकर यांना सन्मानाचे स्थान आहे. आयुष्याच्या अंतापर्यंत समकालीन वाङमयातील प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी वास्तववादाचे निशाण आग्रहपूर्वक फडकत ठेवले आणि परिवर्तननिष्ठ कलादृष्टी पराभूत होऊ दिली नाही.

अक्षरवाङमयाच्या नावाखाली भ्याडांचे वाङमय निर्माण करणाऱ्या, कलेचे क्षेत्र त्रिकालाबाधित राहिले पाहिजे, त्यात प्रासंगिकता नसावी, प्रचार नसावा, त्यात लोकशिक्षण किंवा बहुजनांना आवश्यक ते मार्गदर्शन नसावे असे नियम घालून देणाऱ्या साहित्यधुरीणांना मामा वरेरकरांनी अक्षरशः धारेवर धरले. एवढेच नव्हे तर या काळात मजूर-शेतकरी यांची आंदोलने झाली परंतु नुसती मनगटे चावीत बसलेला बुद्धिजीवी वर्ग त्यात सामील न होता तटस्थ राहिला त्यामुळे या बुद्धिजीवी वर्गालाही वरेरकरांनी चांगलेच फटकारले आहे.

वरेरकरांवर कडक कलावाद्यांनी सतत प्रचाराचा आरोप केला. या आरोपाची मीमांसा करताना रामायण, महाभारत या ग्रंथाबरोबरच, समुदायाच्या गरजा, त्याच्या उणिवा, त्याच्या जाणिवा आणि त्याचे हक्क लक्षात घेऊन त्याला मार्गदर्शन करणाऱ्या

संतवाङमयाचा दाखला त्यांनी दिला आणि हे सर्व वाङमय कसे प्रचारी होते ते विशद करुन सांगितले.

१९३० चे क्रांतिपर्व, गोलमेज परिषद अशा सर्व महत्वाच्या घटनांकडे मराठी साहित्यिकांनी कशी पाठ फिरविली ही बाब त्यांच्या स्पष्टपणे लक्षात आली आणि तिची त्यांनी परखडपणे नोंद केली. मराठी साहित्यिक प्रत्यक्ष जीवनातील अशा महत्वाच्या घटनांकडे दुर्लक्ष करीत राहिले आणि स्वप्नाच्या धुक्यात वावरत राहिले. काल्पनिक अडथळयांची सोपी-सोयीची मीमांसा त्यांनी केली. जीवनाच्या केंद्राशी अशी धूर्त फारकत घेणाऱ्या पळपुट्या साहित्यिकांचा वरेरकरांनी खरपूस समाचार घेतला.

जीवनापासून पळणारे हे साहित्यिक व्यवहारनिरपेक्ष वाङमयाची तरफदारी करतात. असे साहित्यिक बेफिकीर असतात. ते केवळ सवडीच्या वेळी साहित्यनिर्मिती करतात. परंतु अंतर्यामी प्रसिद्धीची व लोकप्रियतेची भावना प्रबळ असल्यामुळे त्यांच्या हातून प्रामाणिक वाङमयसुद्धा निर्माण होत नाही, त्यामुळे खरी, प्रामाणिक वाङमयनिर्मिती व्हावयाची असेल तर साहित्योपजीवी लेखकच निर्माण व्हायला हवेत. साहित्योपजीवी लेखकांचा उपहास करणाऱ्या केवलांना त्यांनी उलटा अहेर दिला.

बेफिकिरीच्या वृत्तीने किंवा अंगचोरपणाने निर्माण केलेले वाङमय परिणामकारक होऊ शकत नाही. मनोरंजनाच्या पायावर उभारलेले तत्कालिन वाङमय सवंग लोकप्रियता मिळवायला उपयोगी ठरु शकेल पण त्यामुळे आजच्या परिस्थितीला उपयुक्त व आवश्यक असलेल्या वाङमयाची मागणी व गरज पुरी होऊ शकणार नाही, ही मामा वरेरकरांची वाङमयाकडे पाहण्याची भूमिका आजच्या युगाच्या हातात हात घालूनच बोलत आहे आणि आज-उद्याच्या समाजाला आणि साहित्याला ती अत्यंत आदरणीय वाटावी अशीच भूमिका आहे. सामान्य माणूस आणि त्याचे उत्थापन करीत असताना जीवनासंबंधीची अत्यंत गंभीर जाणीव वाचकांच्या मनात फुलविणे हे साहित्याचे प्रधान कार्य आहे, या जाणिवेमुळेच रंजनवादी नाटके, कादंबऱ्या आणि कामुक काव्ये यांच्यावर त्यांनी सडकून टीका केली आहे.

वाङमयाने जीवनाची संगत सोडू नये. जीवनाच्या गतीची स्पंदने त्याने मनापासून टिपावीत. खरी कला या प्रक्रियेतूनच निर्माण होते. अक्षरवाङमयाच्या कल्पनेच्या धुक्यावर तरंगत केलेली वाङमयनिर्मिती आज निरुपयोगी आहे. कलेसाठी कला म्हणणाऱ्यांचे वाङमयसुद्धा मोठ्या शिताफीने प्रचार करीतच असते, ही मामा वरेरकरांची वाङमयाकडे पाहणारी समग्र भूमिका परिवर्तननिष्ठ जीवनवादी आहे उपयोगितावादी

आहे. माहाराष्ट्राच्या वाङमयसमीक्षेतच नव्हे तर जगात वाङमयविचाराला प्रारंभ झाला तेव्हापासून देशोदेशीच्या वाङमयसमीक्षेत आजपर्यंत उपयोगितावादी-जीवनवादी भूमिका कायम जीवननिरपेक्ष कलादृष्टीशी किंवा केवळ कलावादी भूमिकेशी भांडत, झगडत आलेली आहे. वरेरकर जीवननिष्ठ साहित्याचे आणि जीवननिष्ठ साहित्यदृष्टीचे प्रखर पुरस्कर्ते आहेत याचा अर्थ कलागुणांना, वाङमयीन सौंदर्याला ते नाकारतात असा नाही. परंतु परिवर्तननिष्ठा, पुरोगामित्व हे संदर्भ घेऊन येणारी उपयोगिता आणि तिला उपकारक अशी कलात्मकता यांचा संयुक्त पुरस्कार ते करतात. केवळ कलावाद्यांच्या आशयनिरपेक्ष अशा रचनासौंदर्याला ते प्रेतावरचा श्रृंगार समजतात, आणि कलेच्या जगात केवळ रचनेचे कितीही पराक्रम केले तरी अंतिमतः ते कलेच्या आणि वाङमयाच्याही उपयोगाचे नाहीत असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. आणि हे त्यांचे वाटणे योग्यच आहे.

साहित्यिकांनी जीवनविन्मुख अशी कंपुशाही सोडावी. दुराभिमान सोडून जन्माला येणाऱ्या प्रचंड जनशक्तीशी विद्वानांनी एकजीव व्हावे. आता साहित्यात जीवनवेत्यांची आमदानी सुरु झालेली आहे. नवे जीवन, नवी दृष्टी, यांचा अंगीकार करुन नवीन वाङमय निर्माण केले पाहिजे. सामुदायिक जीवनाची प्रचंड शक्ती समोर दिसत असताना तिच्याकडे डोळेझाक करुन पांडित्याची चर्चा करीत बसणे आजवर पुरेसे घातक ठरलेले आहे. जनजीवनाशी समरस झाल्यानेच भावी साहित्य निर्माण होईल. मामा वरेरकरांची ही समग्र कलादृष्टी जीवनवादाचेच आग्रही समर्थन करीत होती.

मामा वरेरकरांनी ललित वाङमयासंबंधीच आपले विचार मांडले असे नाही तर त्यांनी लोकवांङमयासंबंधी आणि बालवाङमयासंबंधीही अत्यंत मूलगामी दृष्टीकोण मांडला. समाजाच्या जीवनात बालवाङमय अत्यंत महत्वाची भूमिका वठवीत असते. त्या त्या समाजाच्या बालवाङमयाच्या स्वरुपावरुन त्या त्या समाजाच्या भौतिक आणि वैचारिक प्रगतीची नोंद करता येते. परंतु मामा वरेरकरांना मराठीतील बालवाङमयात नावीन्य दिसले नाही. तयामुळेच नव्या विचारांची बीजे बालमनात रुजवायला हवीत जुन्या समजुती, जुने आचार जुने विचार यांनी बुरसटलेले बालवाङमय निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे असा इशारा त्यांनी या वाङमयाच्या निर्मात्यांना दिला. लोकवाङमयाच्या अभ्यासकांनाही त्यांनी असाच इशारा दिला. आजच्या लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी व बालवाङमयाच्या निर्मात्यांनी आणि स्वकालापासून व समाजजीवनापासून दूर पळून जाऊन भूतकाळाच्या कुंजवनात रमणाऱ्या आजच्या ललित लेखकांनीही वरेरकरांच्या या औषधी बोलांनी आपली मस्तके शेकून घ्यावीत

आणि शुद्धीवर यावे इतके महत्व त्यांच्या बोलांना आहे.

वरेरकर आयुष्यभर असे कलावादाच्या नावाने हल्ला बोलले. जुन्या (अ) व्यवस्थेचे गोडवे गाणाऱ्या प्रतिगाम्यांवर त्यांनी प्रहार केले. वास्तवता, परिवर्तननिष्ठा आणि जनशक्तीचे उत्थापण यांचा ध्यास घेतला. त्या बदल्यात प्रतिगामी आणि कलावादी यांनी केलेली घोर उपेक्षाही सहन केली. पण त्यांनी कच खाल्ली नाही. धुक्यात फिरणाऱ्या तथाकथित विद्वानांची पर्वा केली नाही. माघार घेतली नाही आणि या युद्धात कधी तडजोडही पत्करली नाही. एवढेच नव्हे तर या भूमिकेची वाङमयी-मूर्ती शोभेल अशी कादंबरी, नाटक, कथा, एकांकिका, आत्मचरित्र इ. वाङमयप्रकारांत विपुल ललितसाहित्यनिर्मिती केली. वाङमयीन भूमिका आणि वाङमय यांत विसंगती शिरु दिली नाही. दोन्हीकडे एकच इमान त्यांनी पाळले.

कादंबरीच्या क्षेत्रात वरेरकर हरिभाऊंचे श्रेष्ठ वारसदार ठरतात. हरिभाऊंना पुणे आणि पुण्याची सदाशिव पेठ अशी मर्यादा तरी होती, परंतु वरेरकरांची प्रतिभा या संदर्भात समाजाच्या वरच्या स्तरापासून तळागाळापर्यंत अप्रतिहत संचार करताना दिसते.

'विधवाकुमारी' या कादंबरीत कौमार्यावस्थेत वैधव्य प्राप्त झालेल्या स्त्रीची जीवनकथा त्यांनी चितारली. या कादंबरीची नायिका मधू ही मनातील पुनर्विवाहाचे विचार काढून टाकते उच्च शिक्षण घेऊन देशाच्या सेवेला वाहून घेते आणि वरेरकरांची ही मधू हरिभाऊंच्या नायिकांच्या पुढे चार पावले पुढे निघून जाते.

'धावता घोटा' या कादंबरीत त्यांनी समाजजीवनाचे नवे व्यापक वास्तव मांडले. ही कादंबरी लिहून वरेरकरांनी गिरणगावातील मजुरांच्या दुःखदारिद्र्याचा नवा आशय मराठी कादंबरीला मिळवून दिला.

मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्रीची मनोव्यथा त्यांनी 'गोदू गोखले' या कादंबरीतून साकार केली. या कादंबरीत त्यांनी स्त्रीचे बंडखोर, तडफदार रुप उभे केले. 'पेटते पाणी' मधून त्यांनी मद्यपानबंदीचा संदेश दिला. एवढेच नाही देवाच्या पायावरील पाप आणि देवाघरच्या कुटुंबातल्या लेकीसुना असे ज्यांच्याबद्दल बोलले जाते त्या देवदासींचे जीवनही त्यांनी मराठी कादंबरीतून उभे केले. 'उमलत्या कळी' तून पुराणमतवादी मनोवृत्तीविरुद्ध विद्रोह उभा केला. फाटकी वाकळ मी रामजोशी इ. कादंबऱ्यातून त्यांनी ग्रामीण जीवन आणि त्याच्या सुधारणेची निकड चित्रित केली. न पूजलेली देवता, सात लाखातील एक, तोंडमिळवणी अशा कादंबऱ्यातून स्त्रियांचे हक्क, अस्पृश्योद्धार,

ग्रामोद्धार अशा निकडीच्या विषयांना त्यांनी वाचा फोडली.

वरेरकरांच्या काही कादंबऱ्यातील असे काही विषय आणि त्यातील आशय ह्यांच्याकडे ओझरता दृष्टीक्षेप टाकला तरी त्यांचा स्त्रीसुधारणेवरील व समाजसुधारणेवरील रोख स्पष्ट होतो. हा रोख अत्यंत सच्चा आहे. कारण त्यामागे मनापासूनची कळकळ उभी आहे. माणुसकीची तहानभूक उभी आहे. काही दोष पत्करुनही स्त्रीस्वातंत्र्य आणि स्त्रियांची प्रतिष्ठा यांचा आग्रही पुरस्कार त्यांनी केला. या प्रकारे उपेक्षित, बहिष्कृत आणि रंजलेगांजले याच्या दैनंदिन कलहाशी, दुःखदारिद्र्याशी त्यांनी मराठी कादंबरीला जोडले हे त्यांचे थोर ऐतिहासिक कार्य होय हे मान्य केलेच पाहिजे.

स्वैरविचार या कथासंग्रहातील कथांमधून त्यांनी विघातक परंपरावादाला कडवा विरोध केला. सामाजिक अन्याय आणि पुरुषांकडून होणारा अन्याय झुगारणारी क्रमाने पुरुष व स्त्रीपात्रे या कथांमधून त्यांनी उभी केली.

नाटककार म्हणूनही वरेरकर विशेष प्रसिद्ध आहेत, आणि या क्षेत्रातील त्यांचे कार्यही विशेष मोलाचे आहे. समाजात वेळोवेळी उत्पन्न होणाऱ्या सामाजिक, राजकीय आणि धार्मिक प्रश्नांचे पडसाद त्यांच्या नाटकातून उमटलेले आहेत.

स्नेहलता नावाच्या बंगाली मुलीने वडिलांमध्ये हुंडा देण्याची शक्ती नाही म्हणून स्वतःला जाळून घेतले. अशा अगणित स्त्रियांचे बळी घेणाऱ्या हुंडापद्धतीमधील अमानुषत्व दाखविण्यासाठी त्यांनी 'हाच मुलाचा बाप' हे नाटक लिहिले. वकिलीच्या धंद्यातील भ्रष्टाचार व अमानुषता मांडण्यासाठी त्यांनी 'सत्तेचे गुलाम' उभे केले. परंपरेच्या पहाडाखाली सापडल्याने हिंदू समाज कसा अधःपतित झाला आणि मानवतत्वाला लाज आणणारे अस्पृश्यतेसारखेप्रकार त्यामुळेच त्याने कसे जोपासले हे 'तुरुगांच्या दारात' या नाटकातून त्यांनी सांगितले. 'पापी पुण्य', 'जागती ज्योत', 'सदा बंदिवान', 'समोरासमोर' या नाटकांमधून त्यांनी स्त्रीअत्याचारविरोध, साकार करुन स्त्रीमुक्तीचा आशय फुलविला. 'भूमिकन्या सीता' या नाटकातून नवी स्वातंत्र्योपासक, तडफदार सीता त्यांनी उभी केली आणि उरावरील शूद्रत्वाचा सुलतानी पहाड लाथाडून टाकून रामराज्यातील अमानुष अशा वर्णिय समाजव्यवस्थेला आव्हान दिल्यामुळे 'मर्यादा पुरुषोत्तम' प्रभू रामचंद्र यांच्याकडून वधिल्या गेलेल्या शंबुकाची कैफियत सादर केली.

वरेरकरांचे नाट्यवाङमय असे स्त्री-शूद्रांवरील, उपेक्षितांवरील अत्याचाराच्या करुण कहाण्यांनी प्रामुख्याने गजबजलेले आहे. शिवाय सट्ट्याचे दुष्परिणाम, कर्जाचे दुष्परिणाम, धार्मिक भांडवलशाहीमुळे होणारा अन्याय इत्यादी अनेक प्रश्नांनी त्यांच्या

नाटकांमधून नाट्यरुप घेतले आहे. इहवादी संत गाडगेमहाराज यांनी आपल्या कीर्तनांमधून जसा दैनंदिन जीवनावर झगझगीत प्रकाश टाकला आणि उपेक्षितांना, सामान्यांना विपरीत परिस्थितीमधून बाहेर पडण्याचा संदेश दिला त्याप्रमाणे वरेरकरांनी आपल्या सर्वच ललित लेखनातून स्वातंत्र्याचा, मुक्तीचा आणि पतितोद्धाराचा संदेश दिला.

वरेरकरांच्या लेखनातील सर्वच विषय आणि त्यातील आशयरुपे अशी या ना त्या नात्याने अन्यायग्रस्तांच्या दुनियेशी निगडित आहेत. त्यांची प्रतिभा अष्टांगांनी वर्तमानाशी आणि त्यातील कलहांशी बांधलेली होती. स्वकालाशी तिची मनोमन गोवणूक होती. समकालीन अमानुष समस्यांची भेदक चित्रे काढून भोवतीच्या समाजात होणारी माणुसकीची विटंबना तर मांडलीच, पण सोबतच समाजाला माणुसकीसंबंधीचे नवे प्रागतिक भानही त्यांनी दिले.

आपल्या वाङमयातून वरेरकर समाजातील पीडितांचा पक्ष घेऊन लढले. त्यांना जगणे दुस्तर करणाऱ्या प्रश्नांशी ते झुंजले. त्यातील काही प्रश्न सरंजामी शोषणाशी निगडित आहेत. काही राजकीय शोषणाशी निगडित आहेत. काही आर्थिक शोषणाशी निगडित आहेत. काही सामाजिक शोषणाशी निगडित आहेत. तर त्यातील बहुसंख्य प्रश्न आणि विषय पुरुषी संस्कृतीने केलेल्या स्त्रीशोषणाशी निगडित आहेत. या विषयांच्या अनुषंगाने त्यांच्या ललित साहित्यातून साकार होणारी आशयसृष्टी ही परिवर्तननिष्ठ, सुधारणावादी तशीच समता, स्वातंत्र्य आणि बंधुतावादी आहे.

त्यांच्या वाङमयातून साकार होणारे त्यांचे एवंगुणविशिष्ट व्यक्तिमत्व हे महाराष्ट्रातील फुले - आगरकरी विचारपरंपरेशी आपले नाते सिद्ध करते. कादंबरी - कथेच्या क्षेत्रात ते हरिभाऊंचे श्रेष्ठ वारसदार ठरतात तर नाटकाच्या संदर्भात ते अण्णासाहेब किर्लोस्कर आणि देवल यांचा वारसा चालवितात. पुढे दलितांच्या विद्रोही साहित्याशी सख्यत्व सांगण्याइतके जीवनविषयक दृष्टिकोणाचे सामार्थ्य आपल्या वाङमयातून ते निश्चितच साकार करतात. तेव्हा अर्थातच आज-उद्याच्या परिवर्तननिष्ठ साहित्यिकांनी करावयाच्या मानाच्या मुजऱ्याचे तेही एक सन्माननीय शिलेदार ठरतात हे निःसंशय.

१९२० ते १९६० या काळात तंत्रवाद, कारागिरी यांची तरफदारी करीत कलावाद प्रतिष्ठेला चढला. जीवनविन्मुखता म्हणजे पर्यायाने स्थितिशीलता समाजमनावर बिंबवण्याचा घाट, घाटदार शैलीतून कला वादाने घातला होता. कलावादाचा बुरखा पांघरुन मराठी वाङमयात मिरवणाऱ्या जीवनातील प्रतिगामित्वाच्या नावाने व प्रत्यक्ष जीवनातील परंपरावाद व रुढी यांच्या नावाने वरेरकर निकराने हल्ला बोलले. उत्तान

शृंगार, स्वप्नाळू वातावरण, रंजनवाद आणि पलायनवाद यांची गुंगी देणारे प्रस्थापित वाङमय निर्माण होत असताना वरेरकरांनी बहिष्कृत भारताचा पक्ष आपल्या कलेतून लढविला आणि वि. स. खांडेकर म्हणतात त्याप्रमाणे ते सहित्यातले शेलारमामा ठरले. साहित्यविचारातील परिवर्तननिष्ठ जीवनवादाचे अग्निध्वज त्यांनी निष्ठेने फडकत ठेवले. अनेक दुषणे झेलत वास्तववादाची आयुष्यभर लाज राखली. महाराष्ट्रातील कोवळ्या व दुबळ्या बुद्धिजीवी वर्गाला व साहित्यातील बहुसंख्य नजाकतदारांना मामांचे सडेतोड सत्य परवडले नाही, आणि कलेच्या बुरख्याआडून या वर्गाने मामांवर आग पाखडली. वरेरकरांनीही कुणाची कधी पर्वा केली नाही. प्रतिगामित्वाचाच पक्ष विजयी होण्याची जिथे हमी होती तिथे पुरागामीत्वाचा पक्ष घेऊन वरेरकर हरले,पण पक्षांतर केले नाही. स्थितिवाद्यांच्या कळपात प्रतिष्ठेसाठी ते शिरले नाहीत. हा बाणेदारपणा तेव्हाही दुर्मिळ होता आजही आहेच. आता तो जास्तच दुर्मिळ होत चालला आहे इतकेच. आपल्याकडील परंपरानिष्ठ मध्यमवर्गीय बुद्धिजीवी (?) स्वतःच्या भिकार मापट्याने वादळांचा वेग मोजण्याचा खटाटोप करतो. आणि ते अशक्य झाले की आपल्या मापट्यांच्या लघुत्वाला आणि भिकारपणाला दोष देण्याऐवजी तो वादळांच्या नावाने बोटे मोडीत कुरकुर करतो. वरेरकरांची उपेक्षा आणि विस्मृती यांचा संबंध महाराष्ट्रातील परंपरावादी आणि दुबळ्या मनोवृत्तीशी आहे. आणि या पंगू पांडित्याची त्यांनी कधी पर्वाही केली नाही. स्वतःला त्यांनी साहित्यक्षेत्रातला 'नांगऱ्या शिपाई' मानले, आणि त्या क्षेत्राची नांगरणी करताना त्याचे संरक्षण करण्यासाठी कोणत्याही शेतकऱ्याप्रमाणे तत्पर राहणे हे आपले कर्तव्य मानले. आणि शंभर वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या या थोर साहित्यिकाने आयुष्याच्या अंतापर्यंत - १९६४ सालापर्यंत व्रताप्रमाणे ते अंगीकृत कार्य पार पाडले.

सामान्यांच्या जीवनाशी बांधिलकी सांगणारा, त्यांच्या सुखदुःखाची धगधगती जीवनभाष्ये बेडरपणे मांडणारा, परिवर्तननिष्ठ कलादृष्टीचा थोर शिलेदार आणि श्रेष्ठ जीवननिष्ठ साहित्यिक म्हणून मामा वरेरकर हे उद्याच्या महाराष्ट्रात आदराने सन्मानिले जातील याबद्दल कुणाला शंका असण्याचे तिळमात्र कारण नाही.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

चौदा

परंपरावादाला गोंजारण्याची पूर्वापार परंपरा मोडणारा अध्यक्ष : प्रा. गं. बा. सरदार

प्रा. गं. बा. सरदार हे यावर्षी बार्शी येथे भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले ही घटना मराठी साहित्याच्या प्रबोधनप्रवासाच्या दृष्टीने अत्यंत उपकारक अशीच म्हटली पाहिजे. मराठी साहित्य संमेलनाच्या प्रथेचे वय आता सुमारे शंभर वर्षांचे झाले आहे. या शंभर वर्षांच्या आयुष्यात स्वतः अध्यक्षपदालाच अभिमान वाटावा असे अध्यक्ष फार कमी वेळा साहित्य संमेलनाला लाभले आहेत. अध्यक्षपदालाच स्वतःचा गौरव झाल्यासारखे वाटावे, सत्कार झाल्यासारखे वाटावे आणि स्वतः संमेलनालाच कृतार्थतेचे समाधान वाटावे असे दहापाचच संमेलनांच्या बाबतीतच यापूर्वी घडले असावे. आणि समाज प्रबोधनाला बळ यावे, समाज सुधारणेच्या चळवळींना हिंमत यावी असे अध्यक्षही यापूर्वी पाच-दहा साहित्य संमेलनांनाच लाभले असावे. अशा या थोड्या अध्यक्षांच्या मध्ये प्रा. गं. बा. सरदार यांची गणना करावी लागते. वेगवेगळ्या वृत्तीच्या लोकांना, वेगवेगळ्या कारणासाठी गं. बा. सरदार यांना अध्यक्षपद मिळाले याचा आनंद होईल. पण गतिवादाचा एक पुरस्कर्ता, परिवर्तनाचा भोक्ता, एक भौतिकवादी, अनात्मवादी, निरिश्वरवादी विचारवंत, समाजरचना आमूलाग्र बदलली पाहिजे असे प्रतिपादन करणारा संयमशील विद्रोही, आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि विज्ञानयुक्त नव्या

समाजसंस्कृतीचे आयुष्यभर स्वप्न पाहणारा भारतीय प्रबोधनाचा एक विवेकनिष्ठ शिल्पकार म्हणून गं. बा. सरदारांना अध्यक्षपद मिळाल्याचा आनंद किती जणांना होईल हे एकदा आजमावून पाहिले तर मजा येईल. महाराष्ट्रातील फॅसिस्ट जगाला या कारणामुळे आनंद व्हायचा नाही. उलट याच कारणासाठी दलित साहित्यिकांना अपूर्व आनंद होईल. डाव्या साहित्यशक्तींना आनंद होईल. समता-स्वातंत्र्याच्या पाईकांना आनंद होईल. प्रबोधनाच्या वाटा चालणाऱ्या शिपायांना आनंद होईल. **'जुने जाऊ द्या मरणालागुनी'** म्हणणाऱ्या समग्र नव्या जगाला आनंद होईल. परंपरावाद्यांना या कारणामुळे आनंद होणे शक्य नाही.

प्रा. गं. बा. सरदार या वर्षी अध्यक्ष असल्याने प्रबोधनवाद्यांना माहेर गवसल्याचा आनंद होईल. यापूर्वीच्या काळात पुणे, चंद्रपूर येथील संमेलनांना जे अध्यक्ष लाभले होते त्यांच्या जीवनातल्या आणि वाङमयातल्या भूमिका विश्वविख्यात आहेत. त्यामुळे त्यासंबंधी काही बोलण्यात अर्थ नाही. त्या दोन संमेलनातील अध्यक्षीय भाषणांनी परंपरावाद सुखी झाला. वर्ण अणि जातिव्यवस्थेला गौरव मानणाऱ्या संस्कृतीची पूजा त्या अध्यक्षीय भाषणांनी केली. पुणे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचे आमच्या अनिल अवचटांनी वर्णव्यवस्थेचा पुरस्कार केल्याबद्दल वस्त्रहरण केले होते. आणि चंद्रपूरच्या अध्यक्षांच्या भाषणात परंपरावादालाच भक्तीपूर्वक आरती गायली गेली होती. शिवाय ही दोन्ही भाषणे वाङमयाचे, वाङमयीन प्रश्नांचे कुठलेही चिंतन नसणाऱ्या गोष्टीवेल्हाळांची होती. म्हणून कीर्तने ऐकल्याचा अनुभव या दोन्ही भाषणांमुळे लोकांना मिळाला. अध्यक्षीय भाषणाला काही अर्थ असेल तर यापुढे जे अध्यक्षीय निवडणुकीला उभे राहतील त्यांना आधीच भाषणे लिहायला लावावीत. आणि ज्याचे भाषण खरोखर अभ्यासपूर्ण त्यालाच अध्यक्ष निवडून द्यावे. या सूचनेचा महामंडळाने गंभीरपणे विचार करावा. भाषण हाच निकष ठरवावा. असे झाले तर पुन्हा चंद्रपूर आणि पुणे पुनरावृत्त होणार नाही. आणि प्रवचनाच्या श्रोत्यांचे रंजन झाले तरी जीवन आणि वाङमय यासंबंधी जाण असलेल्या श्रोत्यांचा अवमान होणार नाही. कडबा खाल्यासारखे त्यांना वाटणार नाही.

ही यापूर्वीच्या अध्यक्षीय भाषणांची नजिकची पार्श्वभूमी. या पार्श्वभूमीच्या संदर्भात बार्शीच्या संमेलनातील अध्यक्षीय भाषण हे सर्वार्थांनी वेगळे असणार आहे. प्रा. सरदार संमेलनाध्यक्ष झाल्याने यावर्षी प्रथमच फार मोठ्या प्रमाणात संमेलनासंबंधी, त्यांच्या स्वरुपासंबंधी चर्चेला प्रारंभ झालेला आहे. पारंपरिक संमेलनात काय बदल हवेत, पुढील संमेलनांचा आशय काय असावा? अशा प्रकारे संमेलनाच्या प्रकृती आणि

आकृतीसंबंधीचे प्रश्न यावर्षी चर्चेला येत आहेत. व्यापक प्रमाणात हे घडत आहे. प्रा. सरदार अध्यक्ष झाल्याने हा संमेलनस्वरुपाच्या बदलाचा विचार एवढ्या निकराने होत आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. कारण सरदार अध्यक्ष होणे ही गोष्ट केवळ वाङमयातील मूल्यांतराची द्योतक नाही तर ती जीवनातील मूल्यमंथनाचीही द्योतक आहे. या गोष्टीचे श्रेय प्रा. सरदारांनी आयुष्यभर पुरस्कारलेल्या जीवनदृष्टीला आहे. आणि ही खूण या देशातील भौतिकवादाच्या, विज्ञाननिष्ठ प्रबोधनाच्या विजयाची आहे.

'संक्रमणकाळाचे आव्हान' या १९६६ साली संपादिलेल्या पुस्तकातील 'ज्ञाननिष्ठा आणि समाज परिवर्तन' या लेखात आणि 'महाराष्ट्र जीवनाच्या' (१९६०) दुसऱ्या खंडातील 'नव्या महाराष्ट्राचे भवितव्य' या लेखात त्यांचा आदर्श विचारवंत विखुरलेला आहे असे दिसते.

'सत्यान्वेषणात गढून गेलेले संशोधक आणि तत्त्वचिंतक हे कोणत्याही समाजाचे डोळे होत. जगातील विविध घडामोडींचे, प्रवृत्तींचे ते विश्लेषण करतात. त्यातील अंतःसूत्र शोधून काढतात. त्याच्या आधारे भविष्याची दिशा ते सूचित करतात. पुरुषार्थाचे नवे प्रांत काबीज करण्याच्या कार्यात हे विचारवंत नेहमीच आघाडीवर असतात. जनमत प्रभावी आणि डोळस बनविण्याचे कार्य करतात. ते देशातील वेगवेगळ्या संस्थांची घडण व कार्यपद्धती आपल्या सामाजिक उद्दिष्टांशी कितपत सुसंगत आहेत याची वारंवार छाननी करतात. लोक प्रवाहपतित किंवा प्रतिगामी बनणार नाहीत याची हेच विचारवंत काळजी घेतात. ज्ञानोपासना ही मानवी जीवन उजळून टाकणारी दुर्दम्य प्रेरणा आहे असे ते मानतात. झपाट्याने शिक्षणप्रसार व्हावा, आर्थिक प्रगतीचा वेग वाढावा आणि समाजाची नैतिक पातळी उंच व्हावी त्यासाठी ते प्रयत्न करतात. विचार करताना ते वास्तवाची पकड जरासुद्धा सैल होऊ देत नाहीत. तपशिलाचे अनुसंधान ते सुटू देत नाहीत. ते कल्पनेत वावरत नाहीत. या विचाराचा जिव्हाळ्याच्या प्रश्नांशी सांधा ठेवण्याचा ते सतत प्रयत्न करतात. प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या समाजसेवकांच्या अनुभवाशी आपले विचार ते पडताळून पाहतात. कार्यक्षेत्र मर्यादित असले तरी ते संकुचित दृष्टी ठेवीत नाहीत. प्रश्न क्षुल्लक असले तरी त्यांची भूमिका व्यापक असते. मध्ययुगीन जडतेतून आणि प्रवाहपतित्वातून निर्माण झालेल्या दोषांना ते गुणस्वरुप मानत नाहीत. अज्ञान व अंधश्रद्धा यातून लाभलेल्या बेगडी समाधानाला ते अर्थ देत नाहीत, मध्ययुगीन मूल्यांकडे ते धावत नाहीत' हे त्यांनी काढलेले विचारवंताचे चित्र मोठे लक्षणीय आहे. प्रा. सरदार हे याच आदर्शाला उतरणारे

विचारवंत आहेत. अत्यंत डोळस आणि समंजस अशी त्यांची भूमिका आहे. त्यांनीच एके ठिकाणी असे म्हटलं आहे की **'पारमार्थिक क्षेत्रात बहुजन समाजातून आजपर्यंत अनेक साधुसंत होऊन गेले आहेत. परंतु यापुढे ऐहिक जीवनाच्या प्रांतात अशा तऱ्हेचे महर्षि व समाजसेवक उत्पन्न होण्याची आवश्यकता आहे.'** प्रा. सरदारांची या विधानातून केवळ साधुसंतांचा काल संपला एवढीच दृष्टी व्यक्त होत नाही तर नव्या त्यांचा मूल्यांचा आग्रहही स्पष्ट होतो आणि मला वाटते ऐहिक जीवनात कार्य करणारे प्रा. सरदार हे आजचे एक मोठे समाज सेवक आणि महर्षिच होत.

आदिवासी भागात त्यांचे लहानपण गेले. त्या जीवनातील दारिद्र्याची दारुण दर्शने त्यांना झाली. त्यांनी या काळात बघितले ते हाडांचे सापळे. अगतिकतेचे पुतळे. लाचार आयुष्ये. आयुष्यांची स्मशाने. अब्रुचे उघडे वाघडे बेवारस प्रदर्शन. पोटांच्या भकास खाया. या महादारिद्र्याने त्यांच्या बालमनावर ओरखडे पडले. या दर्शनाने त्यांचे जीवन-दर्शन निश्चित झाले. जीवनाची ही कुरुपता त्यांच्या मनात सुरुपतेचा ध्यास चेतवून गेली. हा सुरुपतेचा ध्यास ही त्यांच्या समग्र लेखनामागील प्रेरणा आहे. तीच त्यांच्या लेखनाचे सूत्र संचालन करणारी शक्ती आहे. तीच या प्रबोधनकाराच्या विचारविश्वाची कोनशिला आहे. त्या सुरुपतेवरुन त्यांची विचारवंत नजर कधी ढळली नाही. कुठल्याही आमिषाने, दडपणाने त्यांचा शद्ब आपल्या प्रवासापासून परावृत्त झाला नाही. त्यांच्या शद्बांना प्राप्त झालेले इमान हे त्यांच्या आयुष्यविश्वाचे ब्रीद आहे.

प्रारंभी त्यांच्या मनावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला. पुढे क्रमाने भारतीय जीवनाचे प्रश्न त्यांना उमगत गेले आणि गांधी विचाराच्या मर्यादा त्यांच्यापुढे स्पष्ट होत गेल्या. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रामतीर्थ यांच्याही विचारांचा परिणाम त्यांच्यावर झाला. पुढे त्यांच्याही मर्यादा त्यांना जाणवल्या. १९४२ नंतर मात्र ते मार्क्सच्या विचारांचा अभ्यास करु लागले. ते स्वतःला मार्क्सवादी म्हणवतात. पण ते मार्क्सचे भावीक भक्त नाहीत. ते पोथीनिष्ठ कधीच नव्हते. ज्याचा ज्या वेळी उपयोगाचा भाग वाटेल तेवढा स्वीकारायचा ही त्यांची वृत्ती आहे. ते शद्बप्रामाण्यवादी नाहीत. ते परिवर्तनप्रामाण्यवादी आहेत. मार्क्सचीही प्रत्येक गोष्ट ते मानत नाहीत. बुद्ध, फुले, आंबेडकर यांचा त्यांना अपार अभिमान वाटतो. मला या ठिकाणी हे स्पष्टपणे म्हटले पाहिजे की आज प्रा. गं. बा. सरदार हे गांधीवादीही नाहीत. मार्क्सवादीही नाहीत. त्यांचा वाद आज असलाच तर गं. बा. सरदारवाद आहे. किंवा समता, स्वातंत्र्य आणि विज्ञानवाद आहे. माणसाला विचाराची पद्धती आणि जीवनाची स्वतंत्र समीक्षापद्धतीही गवसते, त्याच्या वाणी करणीवर त्याच्या व्यक्तित्वाच्या मुद्रा उठवण्याची कला

गवसते, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याच्या प्रशिक्षण अवस्थेतून जो पार पडलेला असतो तो माणूस इतर कुणा व्यक्तिच्या नावाने वाद मांडीत नसतो. तो मूल्यांच्या नावाने वाद मांडीत असतो. गं. बा. सरदार समता-स्वातंत्र्य या मूल्यांच्या नावाने वाद मांडण्यास समर्थ आहेत. व्यक्तित्वाची ही स्वयंसरणी माणसाला भक्तपातळीवरुन चाकोऱ्या चालण्याच्या अवस्थेतून वेगळी करते. तेव्हा माणूस 'स्वतंत्र' होतो. परवा त्यांच्या मुंबईला झालेल्या सत्कार सभेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना तर्कतीर्थांनी त्यांना 'फ्री थिंकर' म्हटले, आधुनिक भारतातला थोर विचारवंत म्हटले, ते या संदर्भात मला मोठे लक्षणीय वाटते.

१९३७ साली 'अर्वाचीन मराठी पूर्व पीठिका' त्यांनी सिद्ध केली. इ.स. १८०० ते १८७५ या काळातील म्हणजे चिपळूणकर पूर्व कालातील मराठी गद्याची शैली कशी उत्क्रांत झाली, जीवनाशय, वैचारिक वजनदारपणा पेलण्याची या गद्याची ताकद कशी विकसित होत गेली याचे दर्शन या संशोधन ग्रंथातून त्यांनी घडविले. वाङमयाचा आणि जीवनाचा जनकजन्य संबंध असतो. परिस्थितीचे रंग आणि प्राणकळा वाङमयाला प्राप्त होत असतात. वाङमयाचा अभ्यास हा जीवनाच्या स्थितीगतीचा अभ्यास असतो. जीवनवादी भूमिकेने केलेली गद्यवाङमयाची समीक्षा म्हणजे त्याचा हा ग्रंथ. या काळातील गद्याची प्रेरणा आणि प्रकृतीचा अभ्यास करणाऱ्यांसाठी सदर ग्रंथ म्हणजे एक मोलाचा साधन ग्रंथ होय. 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' या ग्रंथातून त्यांनी अर्वाचीन महाराष्ट्रातील प्रबोधनाचा विस्मृत इतिहास उजेडात आणला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या आधी महाराष्ट्रात स्वाभिमानी व कर्तबगार लेखकच झाले नाहीत या आंधळ्या श्रद्धेला त्यांनी हा ग्रंथ लिहून आव्हान दिले. या श्रद्धेमागे चिपळूणकरांसंबंधीची सुजवट भक्ती होती. आजच्या महाराष्ट्राची मुहुर्तमेढ रोवण्याच्या ऐतिहासिक समारंभात ज्यांची बुद्धिशक्ती सहभागी होती, पुरोगामीत्वाची महती ज्यांना पटली होती अशा या काळातील सुधारकांच्या जीवनकार्याचे वस्तुनिष्ठ दर्शन सदर ग्रंथात सरदारांनी घडवले आहे. चिपळूणकरांच्या जयजयकारात, महाराष्ट्र त्यापूर्वीच्या प्रबोधनाच्या शिलेदारांना विसरला होता. राष्ट्रवादाच्या गजरात आणि त्याला बिलगून येणाऱ्या प्रतिगामीत्वाच्या उत्सवात महाराष्ट्र त्या आधीच्या सुधारणावादाच्या मानकऱ्यांना विसरला होता. सरदारांनी या ग्रंथातून एका अर्थाने प्रतिगामीत्वाच्या गजराची अयथार्थता जशी पटवून दिली. तशी त्यांनी समतेच्या परंपरेची बाजू घेऊन लोकांपुढे तिचे सामर्थ्य आणि प्रेरकता उभी केली. मागच्या काळातील जे लक्षात ठेवावे तेच विसरले गेले होते. या जाणिवेतून त्यांनी ही उपेक्षितांची दर्शने सिद्ध केली. भाऊ

महाजन, लोकहितवादी, विष्णुबावा ब्रह्मचारी, जोतिबा फुले, विष्णुशास्त्री पंडित या पहिल्या पर्वातील प्रबोधनकारांचा वस्तुनिष्ठ परिचय, आणि पुढील पुरोगामी प्रवासाला प्रेरक होईल असा परिचय त्यांनी घडविला. सरदारांच्या पुढील सर्व लेखनाची बिजसूत्रे या ग्रंथात आहेत असे म्हणता येईल. 'संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती' १९५०, 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' १९७१, 'संत साहित्याची सामाजिक व राष्ट्रीय कामगिरी' १९६५, 'तुकाराम दर्शन' १९६८, 'रामदास दर्शन' १९७२, आणि 'एकनाथ दर्शन' १९७८ इ. ग्रंथांमधून त्याचा संतसाहित्याचा विचार त्यांनी मांडलेला आहे. संतसाहित्यासंबंधीचा हा विचार महाराष्ट्रात आज एक अधिकारी विचार मानला जातो. लालजी पेंडसे, सुंठणकर, राजवाडे, रानडे इ. सर्व विद्वानांपेक्षा सरदारांच्या मांडणीची पद्धतीच आमूलाग्र वेगळी आहे. तत्कालीन समाजव्यवस्था, जीवनमूल्ये यांच्या संदर्भातच संत वाङमयाची समीक्षा झाली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. परिस्थिती अनुकूल असल्याशिवाय केवळ विचार प्रवर्तनाने क्रांती घडत नाही. संत सामाजिक प्रश्नांच्या वाटेस गेले नाहीत. त्यांनी धार्मिक क्षेत्राकडेच आपली दृष्टी वळविली. समतेच्या व बंधुभावाच्या तत्त्वांचा पाठपुरावा करुन सामाजिक विषमतेची धार त्यांनी पुष्कळच कमी केली. सामाजिक प्रतिष्ठेपेक्षा लौकिक मानमान्यतेपेक्षा वैयक्तिक चारित्र्य श्रेष्ठ आहे हे तत्त्व लोकमनात बिंबवले. अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचा त्यांनी पुरस्कार केला. **'संत चळवळ ही सामाजिक लढ्यापासून लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ती नसून धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्यांच्या हक्कांसाठी सनदशीरपणे झगडणारी सुधारणावादी प्रवृत्तीच होती'** अशा प्रकारे त्यांनी काळ संदर्भाचे भान ठेवून संतांचा गौरव केला आहे. संतांसंबंधीची त्यांची आजपर्यंतच्या लेखनामागची भूमिका पाहिली तर ही भूमिका वेळोवेळी क्रमाने बदलत जात आहे असे दिसते. १९५० मधली त्यांची भूमिका आणि संतासंबंधी आजची त्यांची भूमिका यांत बरीच तफावत पडलेली आहे असे दिसते आणि हे लक्षण एका जीवंत मनाचे आहे. जाग्या मनाचे आहे. पोथिनिष्ठ मने आपली एकदा मांडलेली मते कधीच बदलत नाहीत. बदलणे हा ते अपमान समजतात. प्रा. सरदार हे बदलणे या घटनेतून जिवंतपणाचा अनुभव घेतात. त्यांनी अलीकडे असे म्हटले आहे की **'संतांना मी पूर्वी झुकतं माप दिलं होतं. आता मात्र मी तसं करीत नाही.'** (प्रबोधनातील पाऊलखुणा पृ. १३९) याबरोबरच त्यांनी असेही म्हटलं आहे की **'दुर्दैवाने ज्ञानेश्वरादी संतांच्या ग्रंथातील तत्वज्ञान आणि आचारधर्म यांचे निरुपण शद्बशः प्रमाण मानण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात आजही दृष्टीस पडते. या प्रवृत्तीला विद्यापीठीय अध्ययन-अध्यापनात थारा**

गवसते, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याच्या प्रशिक्षण अवस्थेतून जो पार पडलेला असतो तो माणूस इतर कुणा व्यक्तिच्या नावाने वाद मांडीत नसतो. तो मूल्यांच्या नावाने वाद मांडीत असतो. गं. बा. सरदार समता-स्वातंत्र्य या मूल्यांच्या नावाने वाद मांडण्यास समर्थ आहेत. व्यक्तित्वाची ही स्वयंसरणी माणसाला भक्तपातळीवरुन चाकोऱ्या चालण्याच्या अवस्थेतून वेगळी करते. तेव्हा माणूस 'स्वतंत्र' होतो. परवा त्यांच्या मुंबईला झालेल्या सत्कार सभेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना तर्कतीर्थांनी त्यांना 'फ्री थिंकर' म्हटले, आधुनिक भारतातला थोर विचारवंत म्हटले, ते या संदर्भात मला मोठे लक्षणीय वाटते.

१९३७ साली 'अर्वाचीन मराठी पूर्व पीठिका' त्यांनी सिद्ध केली. इ.स. १८०० ते १८७५ या काळातील म्हणजे चिपळूणकर पूर्व कालातील मराठी गद्याची शैली कशी उत्क्रांत झाली, जीवनाशय, वैचारिक वजनदारपणा पेलण्याची या गद्याची ताकद कशी विकसित होत गेली याचे दर्शन या संशोधन ग्रंथातून त्यांनी घडविले. वाङमयाचा आणि जीवनाचा जनकजन्य संबंध असतो. परिस्थितीचे रंग आणि प्राणकळा वाङमयाला प्राप्त होत असतात. वाङमयाचा अभ्यास हा जीवनाच्या स्थितीगतीचा अभ्यास असतो. जीवनवादी भूमिकेने केलेली गद्यवाङमयाची समीक्षा म्हणजे त्याचा हा ग्रंथ. या काळातील गद्याची प्रेरणा आणि प्रकृतीचा अभ्यास करणाऱ्यांसाठी सदर ग्रंथ म्हणजे एक मोलाचा साधन ग्रंथ होय. 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' या ग्रंथातून त्यांनी अर्वाचीन महाराष्ट्रातील प्रबोधनाचा विस्मृत इतिहास उजेडात आणला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या आधी महाराष्ट्रात स्वाभिमानी व कर्तबगार लेखकच झाले नाहीत या आंधळ्या श्रद्धेला त्यांनी हा ग्रंथ लिहून आव्हान दिले. या श्रद्धेमागे चिपळूणकरांसंबंधीची सुजवट भक्ती होती. आजच्या महाराष्ट्राची मुहुर्तमेढ रोवण्याच्या ऐतिहासिक समारंभात ज्यांची बुद्धिशक्ती सहभागी होती, पुरोगामीत्वाची महती ज्यांना पटली होती अशा या काळातील सुधारकांच्या जीवनकार्याचे वस्तुनिष्ठ दर्शन सदर ग्रंथात सरदारांनी घडवले आहे. चिपळूणकरांच्या जयजयकारात, महाराष्ट्र त्यापूर्वीच्या प्रबोधनाच्या शिलेदारांना विसरला होता. राष्ट्रवादाच्या गजरात आणि त्याला बिलगून येणाऱ्या प्रतिगामीत्वाच्या उत्सवात महाराष्ट्र त्या आधीच्या सुधारणावादाच्या मानकऱ्यांना विसरला होता. सरदारांनी या ग्रंथातून एका अर्थाने प्रतिगामीत्वाच्या गजराची अयथार्थता जशी पटवून दिली. तशी त्यांनी समतेच्या परंपरेची बाजू घेऊन लोकांपुढे तिचे सामर्थ्य आणि प्रेरकता उभी केली. मागच्या काळातील जे लक्षात ठेवावे तेच विसरले गेले होते. या जाणिवेतून त्यांनी ही उपेक्षितांची दर्शने सिद्ध केली. भाऊ

महाजन, लोकहितवादी, विष्णुबावा ब्रह्मचारी, जोतिबा फुले, विष्णुशास्त्री पंडित या पहिल्या पर्वातील प्रबोधनकारांचा वस्तुनिष्ठ परिचय, आणि पुढील पुरोगामी प्रवासाला प्रेरक होईल असा परिचय त्यांनी घडविला. सरदारांच्या पुढील सर्व लेखनाची बिजसूत्रे या ग्रंथात आहेत असे म्हणता येईल. 'संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती' १९५०, 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' १९७१, 'संत साहित्याची सामाजिक व राष्ट्रीय कामगिरी' १९६५, 'तुकाराम दर्शन' १९६८, 'रामदास दर्शन' १९७२, आणि 'एकनाथ दर्शन' १९७८ इ. ग्रंथांमधून त्याचा संतसाहित्याचा विचार त्यांनी मांडलेला आहे. संतसाहित्यासंबंधीचा हा विचार महाराष्ट्रात आज एक अधिकारी विचार मानला जातो. लालजी पेंडसे, सुंठणकर, राजवाडे, रानडे इ. सर्व विद्वानांपेक्षा सरदारांच्या मांडणीची पद्धतीच आमूलाग्र वेगळी आहे. तत्कालीन समाजव्यवस्था, जीवनमूल्ये यांच्या संदर्भातच संत वाङमयाची समीक्षा झाली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. परिस्थिती अनुकूल असल्याशिवाय केवळ विचार प्रवर्तनाने क्रांती घडत नाही. संत सामाजिक प्रश्नांच्या वाटेस गेले नाहीत. त्यांनी धार्मिक क्षेत्राकडेच आपली दृष्टी वळविली. समतेच्या व बंधुभावाच्या तत्त्वांचा पाठपुरावा करुन सामाजिक विषमतेची धार त्यांनी पुष्कळच कमी केली. सामाजिक प्रतिष्ठेपेक्षा लौकिक मानमान्यतेपेक्षा वैयक्तिक चारित्र्य श्रेष्ठ आहे हे तत्त्व लोकमनात बिंबवले. अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचा त्यांनी पुरस्कार केला. **'संत चळवळ ही सामाजिक लढ्यापासून लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ती नसून धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्यांच्या हक्कांसाठी सनदशीरपणे झगडणारी सुधारणावादी प्रवृत्तीच होती'** अशा प्रकारे त्यांनी काळ संदर्भाचे भान ठेवून संतांचा गौरव केला आहे. संतांसंबंधीची त्यांची आजपर्यंतच्या लेखनामागची भूमिका पाहिली तर ही भूमिका वेळोवेळी क्रमाने बदलत जात आहे असे दिसते. १९५० मधली त्यांची भूमिका आणि संतासंबंधी आजची त्यांची भूमिका यांत बरीच तफावत पडलेली आहे असे दिसते आणि हे लक्षण एका जीवंत मनाचे आहे. जाग्या मनाचे आहे. पोथिनिष्ठ मने आपली एकदा मांडलेली मते कधीच बदलत नाहीत. बदलणे हा ते अपमान समजतात. प्रा. सरदार हे बदलणे या घटनेतून जिवंतपणाचा अनुभव घेतात. त्यांनी अलीकडे असे म्हटले आहे की **'संतांना मी पूर्वी झुकतं माप दिलं होतं. आता मात्र मी तसं करीत नाही.'** (प्रबोधनातील पाऊलखुणा पृ. १३९) याबरोबरच त्यांनी असेही म्हटलं आहे की **'दुर्दैवाने ज्ञानेश्वरादी संतांच्या ग्रंथातील तत्वज्ञान आणि आचारधर्म यांचे निरुपण शब्दशः प्रमाण मानण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात आजही दृष्टीस पडते. या प्रवृत्तीला विद्यापीठीय अध्ययन-अध्यापनात थारा**

मिळता कामा नये.... त्यांतील तात्कालिक व चिरंतन भाग, जीर्णांश आणि सत्वांश हे वेगळे काढता आले पाहिजेत. त्यातील कालबाह्य झालेला विचार त्याज्य मानण्याची तयारी ठेवली पाहिजे.' (प्रबोधनातील पाऊलखुणा पृ. २४) प्रा. गं. बा. सरदारांची ही १९७५ साली पुढे आलेली भूमिका अत्यंत लक्षणीय आहे. या त्यांच्या बदललेल्या भूमिकेचा, विद्रोही विचारांचा विचार अनेक लोक फारसा करताना दिसत नाहीत. प्रा. सरदार हा काळाबरोबर चालणारा, गतिचा हात धरुन चालणारा जागृत विचारवंत आहे. तो विचारवंत शद्धप्रामाण्यवादी नाही. पोथीप्रामाण्यवादी नाही. तो विज्ञानप्रामाण्यवादी आहे. म्हणूनच यापुढे संत साहित्यासंबंधी लिहिताना ते निश्चितच आणखी वेगळे लिहू शकतील असे वाटते.

'रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा' या प्रबंधात गं. बा. सरदारांनी रानड्यांच्या विचारकार्याची अशीच वस्तुनिष्ठ मीमांसा केली आहे. **'रानड्यांचा विचार आणि प्रत्यक्ष सुधारणेचा आचार यांत विसंगती होती. समन्वयवादी वृत्तीमुळे हे घडणे अटळ होते. वास्तवाच्या मर्यादांच्या अवास्तव दडपणामुळे त्यांच्या सुधारणा विषयक भूमिकेत कच्चेपणा राहिला'** या प्रकारे रानड्यांच्या अनेक उणिवा त्यांनी दाखविल्या पण त्याबरोबरच रानड्यांचे मोठेपणही त्यांनी मान्य केले आहे.

मूर्तिपूजा, पुरोहित वर्ग, व्रतवैकल्ये, स्थल महात्म्य, धार्मिक संस्कार इ. संदर्भातील रानड्यांच्या विवेचनातून त्यांना रानड्यांच्या मर्यादा दिसतात. पण त्याबरोबर त्या काळच्या मध्यमवर्गाला चुचकारुन, कुरवाळून थोडे का होईना हलायला लावणारा रानड्यांचा विधायक दृष्टीकोन त्यांना गौरवास्पद वाटतो. **'उदारमतवादातील ग्राह्यांश आत्मसात करुन जेव्हा समाजवादी शक्ती येथे प्रबळ होतील तेव्हा ऐतिहासिक विकासक्रमाची जाण असलेल्या आपल्यातील लोकांना न्या. रानडे आणि म. फुले यांचा वारसा सांगताना नेहमीच धन्यता वाटेल'** असा मर्यादा दाखवूनही रानड्यांचा त्यांनी गौरव केला आहे.

आगरकरांवरचा त्यांचा प्रबंध अत्यंत महत्वाचा आहे. आगरकर परंपरेशी अजिबात तडजोड न करणारे. निखळ बुद्धिनिष्ठ. पण त्यांच्या विचारांना उच्चवर्णीय वातावरणाच्या मर्यादा आहेत. त्याच वर्गाचे प्रश्न त्यांनी प्रथमतः हाती घेतले. त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित असले तरी दृष्टी संकुचित नव्हती. बहुजन समाज व दलित वर्ग यांच्या संबंधीचे आगरकरांचे लेखन थोडेच असले तरी त्यांच्या तत्त्वप्रणालीतील क्रांतीकारकतेचा प्रत्यय आणून देण्यास पुरेसे आहे हे प्रा. सरदारांनी स्पष्ट केले आहे.

'दलितांना उच्चवर्णियांपैकी आगरकर अधिक जवळचे वाटतील' हे त्यांचे मत निश्चित लक्षणीय आहे यात शंका नाही. शाहू महाराज, महर्षी शिंदे, आंबेडकर, यांच्यावरही त्यांनी महत्वाचे विचारप्रवर्तक लेखन केलेले आहे. महाराष्ट्र जीवन (दोन खंड) आणि संक्रमणकाळाचे आव्हान हे दोन्ही ग्रंथ त्यांच्या संपादन कौशल्याचे बोलके पुरावे आहेत. त्यातील विचारांच्या दिशा ह्या प्रबोधनाबरोबर धावताना दिसतात.

प्रा. सरदार दलित साहित्याचा एक विद्रोही साहित्य म्हणून अत्यंत अभिमानाने पुरस्कार करतात. त्या पुरस्कारामागे शंभर नंबरी प्रामाणिकपणा आहे. या साहित्याबद्दलची आस्था आहे. दलित साहित्य म्हणजे खरेतर मराठी साहित्यातले युगप्रवर्तन होय. प्रा. सरदारांनी या साहित्याचा सतत पक्ष घेतला. 'प्रचलित समाजस्थितीबद्दल दलितांची प्रतिक्रिया एवढी तीव्र व दाहक का हे विचारवंतांनी समजून घ्यावे... सध्याची सामाजिक चौकट आमूलाग्र बदलल्याखेरीज हे सारे प्रश्न सुटायचे नाहीत... मनुष्याचे मनुष्यत्व हिरावून घेणाऱ्या प्रस्थापितांशी संघर्ष ही दलित साहित्याची प्रेरणा आहे. उच्चवर्णीयांचे वर्चस्व टिकवून धरण्यासाठी जुन्या धर्मग्रंथांनी दलित समाजावर अनेक दुष्टपणाचे निर्बंध लादले. अशा ग्रंथांना नाकारणे आणि त्यातील जुलमी व पक्षपाती दृष्टीकोनाचा धिक्कार करणे योग्यच आहे. दलित साहित्याच्या आणि दलित मुक्तिच्या आंदोलनात आपले साथीदार कोण, विरोधक कोण हे दलित साहित्यिकांनी ओळखले पाहिजे. पुनरुज्जीवनवादी प्रवृत्ती सध्या विविध स्वरुपात डोके वर काढत आहेत. तेव्हा तेजस्वी क्रांतिकारक साहित्याची आज विशेष गरज आहे.' असे साहित्य दलित लेखक निर्माण करतील आणि समाजक्रांतीच्या लढ्यात ते सदैव आघाडीवर राहतील ही त्यांची दलित साहित्याकडे पाहण्याची भूमिका आहे. दलित साहित्यापुढील धोकेही त्यांनी मांडले आहेत. प्रस्थापितापासून सावध राहण्याची सूचना त्यांनी केली आहे. Insist on yourself, never imitate या इमर्सनच्या वचनाचे स्मरण दलित लेखकांनी ठेवावे असे त्यांना वाटते. १९७५ साली मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. आणि विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबई येथे ७८ साली झालेल्या दुसऱ्या दलित साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

सामाजिक शिबिरे, आदिवासी मेळावे, दलितांचे मेळावे किंवा संमेलने अशा सर्व ठिकाणी प्रा. सरदार सतत जात असतात. भाग घेत असतात. आपला परिवर्तनाचा विचार मांडत असतात. केसरी संस्थेने घेतलेल्या विद्रोही कवीसंमेलनात ते प्रारंभापासून शेवटपर्यंत हजर होते. त्यांना या साहित्याची जशी आवड आहे तशी आस्थाही आहे. हजारो वर्षे तळागाळात रुतलेले वर्ग वर येत आहेत याचा त्यांना आनंद आहे. **'आधुनिक ललित वाङमय वाचताना मला आनंद होतो. पण हे वाङमय बहुतांशी मध्यमवर्गीय जाणिवांच्या पलीकडे गेलेले नाही, त्यातले अनुभव प्रायः क्षीणबल आहेत याची जाणीव होते. या वाङमयाला पडलेल्या मर्यादा तीव्रतेने जाणवायला लागतात; आणि मग त्यात फारसं स्वारस्य वाटत नाही'** (प्रबोधनातील पाऊलखुणा : पृष्ठ १३८) असें त्यांनी दलितेतर मराठी साहित्यासंबंधी म्हटलेलं आहे. ते अर्थपूर्ण आहे. आणि त्या पार्श्वभूमीवर त्यांची दलित साहित्याबद्दलची आस्था अधिकच मौलिक होऊन जाते.

राजकारण, अर्थकारण, समाजकारण, संस्कृती, इतिहास, साहित्य, तत्त्वज्ञान, आदिवासी, दलित, स्त्रीया, असा त्यांच्या चिंतनाला चौफेर आवाका आहे. आणि ज्याच्या प्रामाणिकपणाबद्दल, माणुसकीबद्दल, दानतीबद्दल दलित समाजातील लेखक विचारवंतांना मनःपूर्वक आदर आहे असा हा दलितेतरांमधला जवळ जवळ एकमेव माणूस आहे. त्यांनी आयुष्यात तडजोड पत्करली नाही. संयमाने पण अचलपणे ते आपल्या भूमिकेशी इमानदार राहिले. **'तुम्हाला मी विसरणार नाही. तुमचे दुःख मी बोलून दाखवीन'** असे तळमळत्या मनाने जव्हारच्या दारिद्र्यात दुःखात पिचणाऱ्या भारतीय संस्कृतीच्या बळींना त्यांनी मनोमन आश्वासन दिले होते. करुणा हे साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन आहे. करुणा म्हणजेच माणुसकी, करुणा म्हणजेच आई. करुणा हेच साहित्याचे प्रेरणास्थान आहे. प्रा. सरदारांचे विचारविश्व हे या करुणेचे दुसरे रुप आहे. त्यांना झालेल्या, होणाऱ्या वेदनांनी त्यांच्या प्रत्येकच शब्दाला प्रयोजन पुरवले आहे. अर्थ दिला आहे. ते नेहमी म्हणतात, 'मी संयमाने बोलतो ते लोकांशी संवाद कायम रहावा यासाठी. कारण ते अशक्य झाले तर पुढचा प्रवासच अशक्य होईल. डोळा स्वच्छ व्हावा. डोळा फुटू नये याची काळजी मी घेतो.' आणि हे आपल्याला पटू शकते. अखंड ज्ञानसाधना, विनय, साधेपणा, भौतिकवाद, समतोल सम्यक चिंतन इ. थोर गुणांचे आदर्शरुप म्हणजेच प्रा. सरदारांचे आयुष्य. फॅसिस्ट संस्कृतीवर आणि स्वप्नांवर आयुष्यभर प्रहार करणारा फुले, आंबेडकरांच्या परंपरेतला थोर विद्रोही म्हणजे गं. बा. सरदार. प्रतिगामीत्वाच्या बुरुजावर सतत मूलगामी प्रहार करणारा भारतीय प्रबोधनाचा आजचा

प्रमुख शिल्पकार म्हणजे प्रा. सरदार. प्रा. सरदार म्हणजे सम्यक, समतोल विचार करणारा आधुनिक भारताला बंडखोर, पँथर. असा गतिवादाच्या संगतीने चालणारा विद्रोही, भौतिकवादी, बुद्धिवादी विचारवंत, एक खराच सज्जन, समतोल वृत्तीचा माणूस, प्रबोधनाचा पुरस्कर्ता आणि समतोल चाहता साहित्यचिंतक आणि संमेलनाचा अध्यक्ष झाला, ही गोष्ट भारतीय जीवनातील आणि साहित्यातील प्रबोधनाचा, विद्रोहाचा, सुधारणावादाचा सत्कार ठरावा अशीच आहे.. शोषण व्यवस्थेच्या या समीक्षकाचे, भारतीय जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण दुःखाच्या भाष्यकाराचे, समतेचे स्वप्न पाहणाऱ्या भौतिकवादी भारतीय परंपरेचा पुरस्कार करणाऱ्या गतिवाद्याचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. ते अध्यक्ष झाल्याने जीवनातल्या आणि साहित्यातल्या प्रबोधनाला झालेल्या सुखात मी हार्दिक सहभागी आहे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

पंधरा

प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने

यांवर्षी चौपन्नावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बार्शी मुक्कामी यशस्वीपणे पार पडले. मागील काही संमेलनांचे जखमी संदर्भ ध्यानात घेता बार्शीलाही चंद्रपूर-पुणेच होणार ही बहुतेकांची खात्रीच होऊन बसली होती. पण प्रा. सरदार यांच्या समतोल नेतृत्वामुळे तसे काहीच झाले नाही. ते सुखरुप पार पडले. म्हणजे संमेलनात गोंधळ माजू नये, ते उधळले जाऊ नये असे वाटत असेल तर हेकड असलेले, विषमतेचे पुजारी असलेले, भेदभावाची अधिष्ठानमूल्ये वंदनीय मानणारे पुराणपुत्र यापुढे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे. यापुढे प्रतिगामी अध्यक्ष असला की, प्रश्न नामांतराचा नाही -, कोणत्याही निमित्ताने संमेलन उधळले जाईल असे जागृत वातावरण फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या प्रेरणांमुळे आज समाजात आणि साहित्यात निर्माण झाले आहे. ही गोष्ट महाराष्ट्रीय प्रबोधनाचा एक लक्षणीय टप्पा अधोरेखित करणारी ठरावी.

चंद्रपूर-पुणे येथील संमेलने उधळली गेल्याने जी मने दुःखी झाली होती त्यांना या संमेलनाचे यश सुखावह वाटणे कठीण आहे. बार्शी संमेलन यशस्वितेची वैभवी वाटचाल करीत आहे हे लक्षात येताच अशा काही महापुरुषांनी वेगवेगळ्या पद्धतीने असंतोषाच्या आघाड्या उभारण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या प्रयत्नांचे दिवे तग धरु शकले नाहीत. या संमेलनाच्या यशात प्रा. सरदारांच्या विचारांचा, त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीचा आणि विचाराशी फटकून न वागणाऱ्या आयुष्याचा सर्वात महनीय

वाटा आहे.

अखिल महाराष्ट्राला प्रा. सरदार यांचा आता एक समतोल मनाचा विचारवंत म्हणून परिचय झालेलाच आहे. प्रा. सरदार हे मूलतः जीवनचिंतक आहेत. आणि याही प्रांतात ते इहजीवनवादी विचारवंत आहेत. ते लोकवादी आहेत; परलोकवादी विचारवंत ते नाहीत. जीवन सुंदर व्हावे, अर्थपूर्ण व्हावे असे त्यांना वाटते. आहे ते अनर्थपूर्ण जीवन अणि त्यांची जाहिरात मारणारे साहित्य पुढेही चालावे असे त्यांना वाटत नाही. आणि याच अत्यंत रास्त संदर्भातच ते साहित्याचा विचार करतात.

प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षीय भाषणाकडे महाराष्ट्रातील विवेकनिष्ठांचे त्यामुळेच लक्ष लागले होते. आणि आजच्या साहित्यातील आणि जीवनातील खऱ्याच प्रश्नांचा अत्यंत डोळस ववस्तुनिष्ठपणे सांगोपांग विचार प्रा. सरदार यांनी या भाषणात मांडलेला आहे. या भाषणात पुस्तकी पांडित्य नाही. वाङमयातील आणि जीवनातील दुर्बोध प्रश्नांची, दुर्बोध हेतूने आणि दुर्बोध पद्धतीने केलेली चर्चा नाही. जीवनात प्रत्यही घडणाऱ्या घडामोडींचे समतोल बुद्धीनें परिशीलन करणाऱ्या, अनेक समतावादी चळवळींशी जिव्हाळ्याचे आणि सक्रिय संबंध असलेल्या जिवंत मनाच्या एका जिवंत माणसाचे हे जिवंत भाषण आहे. साहित्य संमेलनामागील प्रेरणा, साहित्यामागील प्रेरणा, मराठी साहित्याचा सद्यः काळाच्या गरजा न ओळखण्यामागील थिटेपणा, नव्याने समाजात उदयाला येणारा लेखक-वाचक वर्ग, साहित्यातील आशय आणि अभिव्यक्ती, साहित्य व्यक्तिनिष्ठ की समाजसापेक्ष, लेखकाचे स्वातंत्र्य आणि बांधिलकी, मराठीतील विचारप्रवर्तक वाङमयाचा थिटेपणा, नवी विज्ञानदृष्टी आणि वाङमय यांचे संबंध, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य आणि लोकशाही जीवनपद्धतीच्या जोपासनेचा व सामाजिक समतेच्या तत्वांची बूज राखण्याचा प्रश्न आणि नामांतराचा प्रश्न अशा आजच्या साहित्यातील आणि जीवनातील सर्वच जिवंत प्रश्नांचा आणि निकडीच्या प्रवाहांचा अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने विचार त्यांनी या भाषणात केलेला आहे. या भाषणाचे हे एक अनन्यसाधारण वैशिष्ट्य होय असेच म्हणावे लागेल.

कालपर्यंतचे साहित्यिक आणि विचारवंत यांची सामाजिक बांधिलकीची कल्पना आज उपयोगाची नाही. ती समाजाच्या कनिष्ठ जातीतील व खालच्या थरातील लोकांच्या जीवनाशी तादात्म्य पावलेली नव्हती. त्यामुळे साहित्यव्यवहार हा पांढरपेशा मध्यमवर्गीय मनोवृत्तीच्या कक्षेतच कैवल्य शोधीत होता. त्या कैवल्यामुळेच त्याला वैकल्य आलेले आहे. त्यामुळेच "**देशातील एकंदर परिस्थिती आज खूपच बदलली**

आहे; आणि निरनिराळ्या थरांतील लोकांत सर्वांगीण विकासाची आकांक्षा निर्माण झाली आहे. तेव्हा आता सामाजिक बांधिलकीच्या किंवा लोकभिमुखतेच्या कल्पनेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची वेळ आलेली आहे." असा नेक तथाकथित मराठी साहित्यिकांच्या सांप्रदायिक वर्मावर बोट ठेवणारा बंडखोर विचार त्यांनी शांतपणे मांडून टाकलेला आहे.

प्रा. सरदारांच्या शैलीचा हा एक खास विशेष आहे. ते अत्यंत गरम विचार थंड शब्दांतून मांडत असतात. त्यांचे निष्कर्ष इतके दाहक असतात, त्यांनी संशोधिलेली सत्ये इतकी जहाल असतात, त्यांची भूमिका इतकी प्रखरतम असते की कुठे तडजोडीला जागाच नसते पण त्यांनी मांडलेली विश्लेषणे आणि भाषेच्या मोडणीतील सामंजस्य यांमुळे ही दाहकताही मोहकता होऊन जाते. ही साच आणि मवाळ यांची भौतिक पातळीवरची क्रांतिकारी युती आहे. अशी वैचारिक आग अशा अनुराग शैलीतून मांडणारा विचारवंत त्यांच्याशिवाय आज मराठीत दुसरा नाही. "**पहिले संमेलन झाल्याला आता शंभर वर्षे होऊन गेली. या प्रदीर्घ कालावधीतील आपल्या साहित्यसाधनेची परिणती कशात झाली आहे? आज आपण नेमके कुठे येऊन ठेपलो आहोत? यापुढची वाटचाल कोणत्या दिशेने करणे श्रेयस्कर होईल?**" हे प्रश्न संमेलनाची कालवरची चारित्र्यसिद्धी आणि तिच्यासंबंधी तीव्र असमाधान असणाऱ्या गतिवादी मनालाच पडू शकतील असे आहेत. या प्रश्नांची खरोखरच निकडीने उत्तरे शोधली पाहिजेत आणि या संदर्भात सुचणारे विचारच मी आपल्यापुढे ठेवणार आहे असे प्रा. सरदार यांनी भाषणाच्या प्रारंभीच म्हटले आहे. या प्रश्नांनी साकार होणारा विद्रोह मागील अध्यक्षांच्या 'ढेविले अनंते' भाषणांचा विचार केल्यासच लक्षात येईल असा आहे.

तळागाळातून नवी संवेदनशीलता घेऊन येणाऱ्या लेखकांची सांस्कृतिक भूक प्रचलित मराठी साहित्य भागवू शकत नाही. ह्या साहित्याने जीवनाच्या गतिशील प्रवाहाशी फारकत घेतली आहे. ते येणाऱ्या क्षणांशी संवाद साधण्याची शक्ती हरवून बसले आहे. या प्रचलित मराठी साहित्यात नव्या वाचकलेखकाला पुरेसा वावच मिळू शकत नाही. सामाजिक एकात्मतेच्या कार्याला आणि जातिधर्मनिरपेक्ष अशा व्यापक साहित्यनिर्मितीला पोषक असे वातावरण आज साकार होत आहे. दलित, ग्रामीण अशा साहित्यप्रवाहांचा वेगळेपणा हा प्रतिष्ठित समाजातील वाङमयोपासकांच्या जाणिवांतील कोतेपणाचा, कालबाह्यतेचा द्योतक आहे. १९३० पासूनच्या मराठी वाङमयाची स्थितिशीलता त्याच्या सर्वांगीण प्रगतीला विघातक ठरलेली आहे. काळाची गरज ओळखण्याच्या बाबतीत मराठी साहित्य थिटे पडलेले आहे. खालच्या

थरातील वाचकाला या वाङमयात आपले असे काही दिसत नाही. जातिव्यवस्थेतील बंदिस्तपणात या प्रतिकूल परिस्थितीचे मूळ आहे. आपल्याकडे सामाजिक अभिसरणाचा अभाव आहे. म्हणून प्रतिभाशाली लेखकाची अनुभूतीही संस्कारजड व नेमस्त स्वरुपाची असते. आपल्या अनुभवांचे क्षेत्र सामान्यतः अगदी संकुचित आहे. मध्यमवर्गीय विचारवंत, साहित्यिक, अध्यापक व तंत्रविद्याविशारद उदासीन व असामाजिक वृत्तीचे बनत आहेत. कारण समाजपरिवर्तनाच्या आंदोलनाचे नेतृत्व आता त्यांच्याकडे राहिलेले नाही. या प्रक्रियेत त्याला दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. ही सरदारांची मराठी साहित्याकडे आणि हे पारंपरिक साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकाकडे पाहणारी भेदक दृष्टी आहे. ही सर्व विश्लेषणाची पद्धती इहवादी विचारवंतांची आहे. आणि या परखड विश्लेषणामागे मराठी जीवनाला आणि साहित्याला खरे जीवनस्वरुप कळावे आणि त्याला शक्तिसौंदर्य प्राप्त व्हावे अशी आकांक्षा असलेले एक प्रबोधननिष्ठ मन उभे आहे.

समाज आणि कला यांचा संबंध स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे की कोणतीच कला पूर्णतया समाजनिरपेक्ष असत नाही. तरीदेखील साहित्यकलेची समाजसापेक्षता कितीतरी पटीने जास्त असते. साहित्यात लेखकाच्या सौंदर्यदृष्टीबरोबर त्याच्या संस्कारित जीवनदृष्टीचा ठसा उमटतोच. आणि साहित्यात लेखकाच्या दृष्टिकोनामुळेच जिवंतपणा येतो. ललित साहित्यापासून होणारा आनंद केवळ आकृतिसौंदर्याचा असत नाही. त्याच्या आशयाची अपूर्वता, मौलिकता व अंतःसंगती यांचाही या आल्हादात प्रमुख वाटा असतो. केवळ निरामय आनंद देणे एवढेच जगातील श्रेष्ठ कलाकृतींचे कार्य नव्हते. मानवी जीवनाचा अर्थ शोधणे व त्याला अर्थपूर्णता आणणे ही प्रेरणाही त्यांच्यात होतीच. सामाजिकता आशयात ओतप्रोत भरलेली असते. आस्वादकाचे ती लक्ष वेधून घेत असते. पुन्हःपुन्हा वाचावेसे वाटते अशा अक्षरवाङमयाचा आस्वादकाच्या मनावर उमटणारा ठसा बहुतांशी आशयनिष्ठ असतो. हे सांगत असतानाच प्रा. सरदारांनी ललितकृतीच्या निर्मितिप्रक्रियेवर प्रकाश टाकलेला आहे. आणि **'स्वतःचे अनुभव, चिंतन आणि विद्याव्यासंग यांच्या साहाय्याने आपल्या भोवतालच्या सामाजिक वास्तवाची दृढ पकड घेता आल्याखेरीज केवळ कल्पकता व अंतःस्फूर्ती यांच्यावर विसंबून राहून कुणालाही उच्च प्रतीचे कलात्मक साहित्य निर्माण करता येणार नाही'** असा स्पष्ट अभिप्राय मांडलेला आहे.

ललित साहित्य व्यक्तिनिष्ठ की समाजसापेक्ष या प्रश्नाची उकलही प्रा.

सरदारांनी नव्या पद्धतीने केलेली आहे. व्यक्ती स्वतंत्र असली तरी एकाकी असत नाही. व्यक्ती आणि समाज यांचा अतूट संबंध असतो. व्यक्ती समाजातच घडते. व्यक्ती हेच समाजातील निर्मितीचे केन्द्र असते. प्रतिभावंताला आपल्या सर्जनशीलतेचा समाजातच साक्षात्कार होतो. आपले आगळेपण व्यक्तीला समाजाशी संपर्क साधूनच घडविता येते. त्यातून व्यक्तित्व सिद्ध होते. व्यक्ती आणि समाज यांचा संबंध द्वंद्वात्मक स्वरुपाचा असतो. परंपरागत रुढीपूजकांना व्यक्तीच्या प्रतिष्ठेची मातब्बरी वाटत नसते. आणि स्वयंकेंद्रित व्यक्तिवादी लोकांना सामाजिक बांधिलकीचे तत्त्व अनिष्ट वाटत असते. या संदर्भात एक समतोल, व्यापक व वास्तवलक्षी दृष्टिकोण स्वीकारण्याची गरज त्यांनी प्रतिपादिली आहे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासाचे काही नियम असतात. ते जाणून घेऊन तत्परतेने आत्मसात केल्याखेरीज विकास होत नाही. कितीतरी लोक प्रवाहपतितच असतात. पण स्वतंत्र असल्याच्या भ्रमात वावरत असतात. पूर्वसंस्कार, रुढी, जुनेनवे संकेत यांच्या पाशात ते गुंतलेले असतात. पारंपरिक संस्काराच्या तुरुंगात हे लोक बंदिवान असतात. परंतु प्रगतीला खीळ घालणारे संस्कार आणि विकास शक्य करणारे संस्कार यांतील फरक उमजून घेण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली आहे. तो मराठी लेखकांनी, कडू वाटली तरी लक्षात घेऊन आचरणात आणावी अशीच आहे. त्याशिवाय मराठी लेखकांना समाजाच्या गतितत्त्वाचा बोध होणार नाही. त्यांना सम्यक जीवनदृष्टी लाभणार नाही, आणि समाजपरिवर्तनाची निकडही तीव्रतेने जाणवणार नाही. प्रा. सरदार यांनी मराठी लेखकांच्या एका लाडक्या आजाराचे परखड निदान इथे केले आहे. आजार जोपासायचे वागवायचे नसतात. पण मराठी लेखक आजार सोडायला तयार नाहीत. तो या आजारांचा आजारी पूजकच असू इच्छितो.

मराठीतील वैचारिक साहित्याचा जुजबीपणा प्रा. सरदार यांनी दाखवून दिलेला आहे. आपला विचारवंत परभृत आहे. आपल्या देशात अनंत घडामोडी चालू आहेत. त्यांतून गुंतागुंतीचे प्रश्न उभे राहत आहेत. त्यांचे सत्य स्वरुप विशद करण्याची, त्यांची उकल करण्याचे मार्ग शोधण्याची जबाबदारी आपल्या बुद्धिमंतांनी पार पाडली नाही. आपल्या ज्ञानोपासकांना महाराष्ट्रापेक्षा युरोपची अधिक तपशीलवार माहिती असते. येथील वास्तवाला भिडणारे विचारवंत अगदीच थोडे आहेत. पूर्वीचा विचारवंत शब्दप्रामाण्यवादी होता. आता नवी पोथीनिष्ठा रुढ होते आहे. जनजीवनाशी विचारवंतांचा साक्षात संपर्क नाही. त्यामुळे ज्ञानाच्या वेगवेगळ्या प्रांतात उच्च पातळीवर मूलभूत तात्त्विक वा औत्पत्तिक विचार पुढे गेला असे दिसत नाही. प्रबोधनाचे कार्य जवळ जवळ थांबले आहे. आज देशात नवा इतिहास घडतो आहे.

समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील मोक्याच्या वळणावर ज्ञानप्रसाराला आणि विचारजागृतीला अत्यंत खालचे स्थान आहे याबद्दल प्रा. सरदारांनी मनापासून खेद व्यक्त केलेला आहे.

आपल्या समाजात विज्ञानदृष्टीची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, रुढिदास्य, चमत्कारांची ओढ, बुवाबाजी इ. गोष्टींचा प्रचार आणि प्रभाव वाढतो आहे. विज्ञानाचे अभ्यासक आणि अध्यापक हेच मुळी विज्ञानदृष्टीला पारखे झालेले आहेत. तेव्हा विज्ञानप्रसाराला विघातक ठरणाऱ्या अंधश्रद्धांविरुद्ध वेळप्रसंगी झगडण्याची तयारी ठेवली पाहिजे. आइन्स्टाईन, एडिंगटन, जेम्स जीन्स इ. लोक विज्ञानदृष्टी जनसामान्यापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करतात. आमच्या विज्ञानोपासकांना हे करता यायला हवे. ही प्रा. सरदारांची अपेक्षा रास्तच आहे. महाराष्ट्रातील तथाकथित बुद्धिजीवी विज्ञानोपासक यांच्या श्रद्धांची लीळाचरित्रे बघितली म्हणजे अभिजात विनोदाला महाराष्ट्रात बिलकूल तोटा नाही हे सत्य मनावर बिंबत जाते.

प्रा. सरदार यांचे ग्रामीण साहित्यासंबंधीचे विवेचनही मूलगामी आहे. **"ग्रामीण ही संज्ञा केवळ स्थलवाचक न घेता तिच्यात शहरात राहूनही अत्यंत विपन्नावस्थेत दिवस कंठणाऱ्या कष्टकरी वर्गाचाही समावेश करावयास हवा. कारण खेड्यातील तसाच शहरातील समाजही दुभंगलेला आहे. खेड्यातील नवोदित सधन वर्गाचे शहरातील प्रस्थापित वर्गाशी जवळचे नाते आहे. तसेच शहरात झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची अवस्था मोलमजुरी करणाऱ्या ग्रामीण लोकांप्रमाणेच हलाखीची आहे."** प्रा. सरदारांनी केलेली ही जोडणूक निश्चितच लक्षणीय आहे. ग्रामीण साहित्याच्या कक्षा रुंदावणारी ही जोडणूक आहे. नव्या ग्रामीण लेखकाला, तो तळागाळातून आलेला असल्याने मध्यमवर्गीय लेखकाच्या ग्रामीण जीवनाच्या चित्रणातील अतिरंजितता व निर्जीवता खटकते. ही ग्रामीण साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने शुभ गोष्ट होय. पण स्थितिप्रिय समाजाचे संस्कार, भाषा आणि विशिष्ट विचारसरणी या लेखकाने नाकारायला हवी. त्याचे पांढरपेशीकरण होऊ नये; त्याने प्रलोभनांना बळी पडू नये. ग्रामीण भागातील लेखकाला त्याच्याच जगातील नवा सहृदय व डोळस वाचकवर्ग लाभल्याशिवाय त्याचे वाङ्मय कसदार व समृद्ध होणार नाही. ग्रामीण साहित्याच्या विकासाची ही दिशा प्रा. सरदारांनी सुचविलेली आहे ती ग्रामीण लेखकांना निश्चितच बळदायक ठरेल यात शंका नाही. दलित साहित्यासंबंधीची प्रा. सरदारांची भूमिका सर्वश्रुत आहेच. पुन्हा या भूमिकेचा जोरकस

उच्चार या भाषणात प्रा. सरदारांनी केलेला आहे. त्यांची या 'सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या जोरदार लाटेकडे' पाहण्याची दृष्टी स्वागतकाराची आणि समर्थकाची आहे. पु. ल. देशपांडे यांच्या भाषणाचा काही प्रमाणात अपवाद वगळता दलित साहित्याचा असा खुल्या दिलाचा अधिकारी उच्चार प्रथमच मराठी संमेलनाच्या पीठावरुन या भाषणातून झालेला आहे हे स्पष्ट केले पाहिजे. 'अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता ही ईश्वरदत्त किंवा निसर्गनिर्मित नाही. ती मनुष्यकृत आहे, हे दलितांना कळले आहे. समाजाच्या हरेक क्षेत्रातील परिवर्तनाची गरज दलितांना आहे. सर्वंकष क्रांतीची निकड त्यांनाच आहे. मनुष्यत्वाची विटंबना करणाऱ्या परंपरेविरुद्ध त्यांच्या मनात उद्‌भवलेली भावना स्वाभाविकच आहे. असा दलित साहित्यातील विद्रोहाचा त्यांनी गौरवच केला आहे. व जुन्या कालबाह्य परंपरेवर प्रहार केल्याखेरीज तिच्यातील जीर्णांश निपटून काढल्याखेरीज परिवर्तन होत नाही, पण क्रांतीचे विधायक अंग ही असतेच. वास्तवाच्या आधारेच त्याची उभारणी करावी लागते. अशी विधायकतेची बाजू प्रा. सरदारांनी महत्वाची मानली आहे. दलित साहित्य ही एका सामाजिक चळवळीची आघाडी आहे हे दलित साहित्यिकांनी लक्षात ठेवले पाहिजे असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिलेला आहे.

याच संदर्भातच नामांतराच्या अनुषंगाने आपले निर्भीड मत त्यांनी मांडले. मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव द्यावे' असा ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने मंजूर केला. महाराष्ट्रातील अनेक राजकीय, सामाजिक, श्रमिक आणि युवक संघटना यांनी या ठरावाला पाठिंबा दिला. मराठवाड्यातील जनतेनेही ही मागणी उचलून धरली. शासनाचे प्रतिनिधीही आम्ही या निर्णयाला बांधलेले आहोत असे सांगत आहेत. तेव्हा या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करणे शासनाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. कारण हा प्रश्न आता केवळ नामांतराचा राहिला नाही. तर लोकशाही जीवनपद्धतीच्या जोपासनेचा व सामाजिक समतेच्या तत्त्वांची बूज राखण्याचा बनला आहे. असे स्पष्ट मत प्रा. सरदारांनी या अत्यंत नाजुक प्रश्नाविषयी बोलून दाखविले आणि हा प्रश्न साहित्यक्षेत्राच्या बाहेरचा नाही, असेही त्यांनी सांगितले. डॉ. आंबेडकरांच्यापासूनच स्फूर्ती घेऊन दलित साहित्याचा लक्षवेधी प्रवाह निर्माण झाला आहे. तेव्हा महाराष्ट्रातील सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने हा प्रश्न लवकरात लवकर सोडविला गेला पाहिजे. त्यामुळे मराठवाड्याच्या अस्मितेचा गौरवच होणार आहे. अशी अत्यंत सामंजस्याची, कटुता थांबवणारी आणि विरोधकांनाही मान्य होऊ शकणारी भूमिका प्रा. सरदारांनी मांडली आहे. मराठी साहित्य संमेलनाच्या

व्यासपीठावरुन प्रथमच ही भूमिका इतक्या निर्भीड पद्धतीने मांडली गेली आहे. प्रा. सरदार या ऐतिहासिक गौरवाचे पहिले धनी आहेत.

शेवटी त्यांनी म्हटले आहे की आपल्या मराठी साहित्याचे क्षेत्र नेहमीच जातिधर्मनिरपेक्ष राहिले पाहिजे. साहित्यिकांनी धर्मनिरपेक्ष इहवादी दृष्टिचाच अवलंब केला पाहिजे. बौद्ध विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या तरुणांचा दृष्टिकोण निःसंशय स्वागतार्ह आहे. ते बुद्धाची थोरवी वर्णन करतात. पण साहित्यातून ते सामाजिक प्रश्नांनाच वाचा फोडतात. त्यामागची त्यांची दृष्टी ऐहिकनिष्ठ असते. सर्व धर्माच्या लेखकांनी ही भूमिका स्वीकारावी. त्यामुळे साहित्यप्रसाराचे कार्य सुकर होईल. सामाजिक जीवनात तणाव आहेत तोवर साहित्यात सुसंवाद निर्माण होणार नाही. म्हणून सामाजिक एकात्मतेच्या आड येणाऱ्या शक्तींशी झगडण्याची साहित्यिकांनी तयारी ठेवली पाहिजे. हीच साहित्यिकाची आज बांधिलकी ठरते. काळाचा प्रवाह कोणत्या दिशेने पुढे जात आहे, कोणत्या नव्या शक्ती बंधमुक्त होण्यासाठी धडपडत आहेत याचा विचार मराठी साहित्यिकांनी करायलाच हवा. या प्रकारच्या राष्ट्रोन्नतीचा, समाजविकासाचा, ऐक्याचा, सामंजस्याचा, ऐहिक सुखवर्धनाचा भव्य संदेश पोटतिडिकेने त्यांनी दिलेला आहे.

प्रा. सरदारांच्या भाषणातील सामंजस्यामुळे दलित-दलितेरांत एक आत्मीयता निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आकार बार्शी संमेलनाला होता. तळागाळाच्या जीवनात उभे राहून साहित्याची मीमांसा मांडणारे हे मराठी साहित्य संमेलनातले पहिलेच अध्यक्षीय भाषण होय. तोडायचे नाही, जोडायचे ही या भाषणाची भूमिका तर गौरवास्पद अशीच आहे. आपल्या समाजातील डाव्या जगाच्या शूद्रातिशूद्रांच्या आणि सर्व पुरोगाम्यांच्या प्रतिनिधींचे हे भाषण होते. बार्शी संमेलनाने, त्यातील अध्यक्षीय भाषणाने हा एक नवा पायंडा पाडलेला आहे. पुढली संमेलने आता पुन्हा कोणीकडे जातात ते पाहावे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

सोळा दलित रंगभूमी ही क्रांतीची युद्धभूमी

रंगभूमीला दृश्य काव्य मानले जाते ते मोठे अन्वर्थक आहे. नाटक ही कला प्रयोगाशी, परफॉरमन्सशी निगडीत आहे. म्हणजे हा काना, मनाने आणि डोळ्यांनी असा उपभोगावयाचा समारंभ आहे. रंगभूमीचे हे समारभसामर्थ्य भारतीय रंगभूमीच्या इतिहासात मात्र प्रस्थापित मूल्य-व्यवस्थेच्या संरक्षणाखातर कायम रावबले गेले असेच म्हटले पाहिजे.

अगदी अलिकडच्या काळात भारतीय रंगभूमीवर मोठ्या प्रमाणात बहिष्कृत रंग खेळ मांडू लागलेले आहेत. बऱ्याच काळात रंगभूमीवर केवळ रंगाचा दरबार भरत आला. आता अलीकडे रंगभूमीवर रंगयुद्धे पेटू लागलेली आहेत.

मराठी रंगभूमीला विद्रोहाची परंपरा आहे. या विद्रोहाच्या परंपरेचा इतिहास मराठीत एका बंधविमोचनाचा इतिहास आहे. शारदा आणि सौभद्रापासून मराठी रंगभूमीवरील विद्रोहाची प्राथमिक वाटचाल सुरु होते, आजपर्यंत अनेक दलित आणि दलितेतर नाटककारांच्या लेखनाद्वारा ही वाटचाल झालेली आहे. दलित रंगभूमीने मराठी रंगभूमीवरील विद्रोहाची ही वाटचाल समाजक्रांतीच्या रणमैदानावर आणून उभी केली आहे. दलित रंगभूमीची दृःस्वप्ने जेवढी यातनांचा पाऊस पाडतात त्याहून अधिकच दलित रंगभूमीची स्वप्ने विद्रोहाचा अंगारा उधळतात.

रंगभूमीलाही मूल्यांचे गुरुत्वमध्य टाळता येत नाहीत. दलित रंगभूमीने ते अभिमानाने पत्करले आहेत. पारंपरिक मराठी रंगभूमीनेही ते मनःपूर्वक पत्करले होते. प्राचीन भारतीय रंगभूमीच्या जन्माच्या वेळी तिनेही आपल्या सोयीच्या व्यवस्थेच्या सोयीच्या मूल्यांची निशाणे खांद्यावर मिरवली होती. प्रस्थापित व्यवस्थेचा कैवार तिने

घेतला होता. विस्थापितांच्या तो दुबळयांच्या जिवावर ती नाचली होती.

भरतांनी करुन दाखविलेल्या प्रयोगात देवांनी दैत्यांना जिंकल्याचे दाखविले गेले. या प्रयोगाच्या वेळी दुखावलेल्या दैत्यांनी नाटक उधळण्याचा प्रयत्न केला, आपण देवाच्या इच्छेला अनुसरुन हा नाट्यवेद तयार केला असून त्यात आमचा तिरस्कार दाखविला गेला आहे. असे विरुपाक्ष नावाच्या दैत्याने ब्रह्मदेवाला म्हटले, यावेळी ब्रह्मदेवाच्या मुखातून वदविलेले उत्तर मोठे मजेचे आहे. समग्र कलावादी सौंदर्यशास्त्राची उच्चवर्ण-धार्जिणी वृत्ती लक्षात घेण्याच्या दृष्टीने आणि पर्यायाने कलावादी सौंदर्यशास्त्राची अत्यंत अमानुष अशी सामाजिक बांधिलकी लक्षात घेण्याच्या दृष्टीने ते उत्तर लक्षात घेणे आवश्यक आहे. ब्रह्मदेव म्हणाले, "**बाबांनो! तुम्हाला नाट्याचे मर्मच कळले नाही. तुमचा पराभव दाखविला म्हणून काय झाले? हे नाटक आहे ना? मग त्यात पराभव कोणाचाही दाखविला म्हणून काय झाले? तुमची आणि देवांची शुभाशुभकारक फळे दाखविणारा असा हा नाट्यवेद आहे.**" प्रा. दि. के. बेडेकर यांचे या उत्तरावरचे भाष्यच देणे मला आवडेल. '**कुठल्या तरी आद्य नाट्याच्या पहिल्या प्रयोगाच्या रात्रीच ब्रह्मदेवरुपी मॅनेजरवर आलेला कठिण प्रसंग लाघवी भाषणाने त्याने निभावून नेला. व आपल्या पराभवाची नाट्ये मिटक्या मारीत पाहण्याचे भोळसट असुरांनी नेहमीसाठी कबूल केले, हेच एक गमतीदार नाटक आहे?**' कालपर्यंत उपेक्षितांनी आपल्या पराभवाची नाट्ये पाहिली. हा केवळ कलावादी सौंदर्यशास्त्राचा कुप्रभाव होता. याप्रकारे परंपरेचे सातत्य टिकवू पाहणारी स्थितिशील समाजव्यवस्था या कलावादी सौंदर्यशास्त्राचा कलेला जीवनापासून तोडीत जीवनासाठीच उपयोग करुन घेत होती. अलीकडे या व्यवस्थेला भगदाडे पडत आहेत. दलित रंगभूमीने या अशा समाज व साहित्यावर घणाघाती आघात केलेला आहे.

वरील आख्यायिकेत अन्यायी कलाभूमिका मांडून दैत्यांवरील अन्यायाचे ब्रह्मदेव समर्थन करतो. तर पुढील आख्यायिकेत प्रस्थापिताविरुद्ध कलावंताने बोलणे कसे अनर्थकारक आहे ते सांगितले जाते. आख्यायिका अशीः- "भरतपुत्रांना नाट्यवेद अवगत झाला व त्यांची प्रशंसा होऊ लागली. त्यामुळे ते उन्मत झाले व आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांची कुचेष्टा करण्याकडे ते करु लागले. त्यांनी ऋषिमुनींची चेष्टा करावयासही कमी केले नाही. एकदा त्यांनी एक हास्यकारक शिल्पक (नाटुकले) केले. त्यांत ब्राह्मण ऋषि व यांची चेष्टा करण्याच्या हेतुने त्यांचे ग्राम्यधर्म दाखविले. हे शिल्पक त्यांनी ऋषिमुनींसमोरच करुन दाखविले. आपली वैयक्तिक थट्टा केलेली

पाहून ऋषि संतप्त झाले व त्यांनी क्रोधाने 'तुमचे हे अनर्थकारक ज्ञान नष्ट होवो' असा शाप दिला." (भारतीय साहित्यशास्त्र : ग. त्र्यं. देशपांडे, पृ. ३२)

या दोन्ही आख्यायिकांचा तुलनात्मक विचार होणे मोठे गमतीचे ठरेल. साधारणीकरणाचा न्याय मोक्याच्या वेळी कसा सोयीने बदलून घेतला जातो, हे इथे तुलनेने पाहण्यासारखे आहे. पहिल्या आख्यायिकेत प्रेक्षकाला (रसिकाला) दोष तर दुसरीत लेखकाला दोष दिला आहे. दोन्ही ठिकाणी प्रत्यक्षातील काहींचे वर्चस्व टिकविणे व त्याविरुद्ध आवाज काढणाराला शासन करणे, त्याची दिशाभूल करणे किंवा तत्त्वज्ञानाचा आव आणून त्याचे तोंड बंद करणे हा प्रकार घडलेला आहे. जीवनातील तत्त्वज्ञानांच्या तसेच कलेसंबंधीच्या तत्वज्ञानाच्या क्षेत्रातही हाच प्रकार झालेला आहे.

दलित रंगभूमीने पहिल्या आख्यायिकेतील फसवणूकीची अवस्था धुडकावून लावली आहे. दलित रंगभूमीचा प्रारंभच विद्रोहाने होतो. आता शाप देणारे नाहीतच असे नाही. परंतु कलावाद्यांची वारा येईल तशी पाठ फिरविण्याची वृत्ती आता या लेखकांच्या चांगली परिचयाची झाली आहे. आता कुणाचे शापही बाधू शकत नाहीत हे या क्रांतीकारी लेखकांना माहीत झाले आहे.

दलित रंगभूमीने येथील मातीचे रंगढंग बेदरकारपणे मांडावेत. येथील दलित-आदिवासी अशा उपेक्षितांच्या जगण्याचा-मरण्याचा प्रकारच निराळा होता. त्यांच्या संवेदनांची लिपी प्रस्थापित रंगभूमीला उकलता येणे शक्य नव्हते. त्याच्या भावनांची निमित्ते, प्रकृती, प्रवास आणि मागण्या या बाबी मूलतःच भिन्न होत्या. दलित जीवनाचे कलह, यातना आणि खळबळ मराठी रंगभूमीला जवळून पाहता आली नाही. आपल्यातून ती फुलविता आली नाही. माणसासारखे जगणे हीच आज दलित जीवनाची प्रमुख गरज आहे. दोन प्रबोधनाच्या लाटा त्याच्यावरुन गेल्या. त्याला डोळे उघडून पाहता आले नाही. त्याला अस्वस्थल्यासारखे वाटत आहे. त्याच्या भगिनीवर होणारे अत्याचार तो पाहतो आहे, काळोखातील झोपड्यांचे उपाशी आक्रंदन तो ऐकतो आहे, अर्धे अंग उघडे पडलेल्या जीवनाची हलाखी तो पाहतो. त्या जीवनातील श्रद्धा, लाचारी, व अडाणी मनोवस्था तो पाहतो, याप्रकारे दलितांच्या जीवनातील हा सर्वच आविष्कार तो उघड्या डोळ्यांनी पाहतो, अस्वस्थ होतो. दलित जीवनाची गरज उत्थापनाची आहे. त्याने जीवनाला अज्ञानाने, दैववादाने, आर्थिक दैन्याने, लाचारीने करकचून बांधून टाकले आहे. त्याच्या गरजा मुक्तीच्या वाटांची वाट पाहत आहेत. ह्या कर्दमात फसलेल्या दुबळ्या गर्दिला पंख हवे आहेत. बळ हवे आहे. जिद्दीचे बाळकडू

हवे आहे. फुले, आंबेडकरांची हाक त्यांच्या कानापर्यंत जायला हवी आहे. लोकशाही समाजवादाने त्यांना हृदयपूर्वक दिलेले आमंत्रण त्यांच्यापर्यंत पोचवायला हवे आहे. त्यांचे शत्रू, त्यांचे मित्र ह्यांची ओळख त्यांना व्हायला हवी आहे. त्यांच्या मनात ह्या नव्या जाणिवांची पेरणी झाली पाहिजे. रंजक पद्धतीने पण बुद्ध्याच ही आग त्यांच्या काळजापर्यंत पोचविली पाहिजे. दलित रंगभूमीने हे व्रत घेतलेले आहे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

सतरा
वाचनसंस्कृतीची दिशा आणि वाचक चळवळ

प्रत्येक माणसाला वाचता आलेच पाहिजे. वाचता येणे हा माझा माणूस म्हणून जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मला उपभोगायला मिळालाच पाहिजे हीच वाचता न येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची प्रतिज्ञा असली पाहिजे. आणि वाचता येण्यासाठी प्रत्येकाने जिवाचे रान केले पाहिजे. वाचता न येणे हे जगता न येण्यासारखे असते. वाचन जीवनाची नवनवी क्षितिजे व्यक्तीपुढे उघडून देते.

वाचता येणे पुरेसे नाही

आता वाचता येते एवढे म्हणून भागायचे नाही. कारण केवळ वाचता येणे हे ध्येय होऊ शकत नाही. वाचता येणे हे खूप वाचन करण्यासाठी आवश्यक असते. खूप चांगले साहित्य, उत्तमोत्तम ग्रंथ वाचता येण्यासाठी वाचता येण्याची गरज आहे. खूप मौलिक साहित्य वाचण्याची सवय लावून घेतली जात नसेल तर नुसते वाचता येणे उपयोगाचे नसते. वाचता येणे हे वाहनासारखे आहे. वाहन विकत घेऊन घरी गंजत ठेवून दिले तर काय होईल? तसेच वाचता येऊनही काही वाचले नाही तर काय होईल? दुसरे असे की वाहन आपल्याला कुठेही नेऊ शकते. तसे वाचनाचेही आहे. वाहन व्यवस्थित चालले पाहिजे. व्यवस्थित दिशेने गेले पाहिजे, अन्यथा विपरीत घडण्याची शक्यता असते. वाचन हे वाहनच असते. वाचन हेही आपणाला जीवनात कुठेतरी नेतच असते; पण वाचनाने आपल्याला कुठे न्यावे या प्रश्नाचे गंभीरपणे आपल्याला उत्तर माहीत असावे लागते. कुठे जायचे हे माहीत नसेल तर नुसतेच वाहन चालत राहील. वेळ बर्बाद होईल.

वाचनाचेही असेच आहे. म्हणून केवळ वाचता येऊन भागत नाही. खूप वाचण्याची सवय जडली पाहिजे. पण खूप वाचायचे म्हणजे काय खूप वाचायचे, कशासाठी खूप वाचायचे हेही ठरवावे लागते.

काय वाचायचे त्याची निवड करावी

खूप लोक वाचतात, पण केवळ मनोरंजनासाठी वाचतात. कोणताही दर्जा नसलेली मासिके-पुस्तके अनेक लोक वाचतात. त्यामुळे त्यांचा वेळ जातो आणि आयुष्यही जाते. असे वाचन म्हणजे निवड न करता चरण्यासारखे आहे. असे होऊ नये. अशा वाचनाने व्यक्तिमत्वाचा विकास होत नाही. तर व्यक्तिमत्व नष्ट होते. केवळ ते खुरटून जाते असे नाही तर मरुनच जाते. आगगाडीत, बसमध्ये लोक वाचनाच्या नावाखाली केवढा कचरा चघळत असतात! ते पाहिले म्हणजे फार वाईट वाटते. तुमच्या समाजातील लोक काय वाचतात ते मला सांगा, म्हणजे मी तुम्हाला तुमच्या समाजाच्या जगण्याचा दर्जा सांगतो असे एक लेखक म्हणाला होता ते महत्वाचे आहे. देश काय वाचतो त्यावरुन देशाची केवळ उंचीच मापता येते असे नाही तर देशाची माणुसकीही मोजता येते. माणूस काय वाचतो त्यावरुन त्याची संस्कृती मोजता येते.

ग्रंथ जसे मनोरंजन करणारे असतात तसे मनाचे पोषण करणारेही असतात. मन घडवणारे ग्रंथही असतात. आपण या ग्रंथामधून निवड करायची असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा वाचनसंस्कृतीचा या देशातला सर्वात महान आदर्श आहे. आपल्यासाठी ही केवढी गर्वाची बाब आहे? ते म्हणाले होते - "**मनोरंजनासाठी मी कधीही काहीही वाचले नाही. वाचत नाही. शिकण्यासाठी मी वाङ्मय वाचतो. मनोरंजनासाठी नव्हे. What instructs me amueses** फार महत्वाचे आहे हे बाबासाहेबांचे म्हणणे. ते आपण प्रत्येकानेच लक्षात घेण्याची गरज आहे. पुस्तकांची अनेक दुकाने असतात. त्या दुकानांमधून कोणते ग्रंथ घ्यायचे आणि वाचायचे? तर जे आपल्याला परिवर्तन शिकवतील, जे आपल्याला क्रांतीकडे नेतील, उजेडाकडे नेतील असे ग्रंथ आपण वाचले पाहिजेत.

राजकारण करणाऱ्या नेत्यांनी तर अत्यंत जबाबदारीने ग्रंथवाचन केले पाहिजे. नाहीतर ते समाजाचे दिवाळे काढण्याशिवाय दुसरे काहीच करु शकणार नाहीत. शिक्षकांनी, कार्यकर्त्यांनीही मौलिक ग्रंथ वाचले पाहिजे. अन्यथा देशाचे वाटोळे करण्याव्यतिरिक्त त्यांना दुसरे काहीही करता यायचे नाही.

आपल्या मनात धर्मातीततेचा, धर्मनिरपेक्षतेचा उजेड पसरविणारे ग्रंथ वाचले पाहिजेत. अंधश्रद्धा शिकवणारे, स्वर्गा-नरकाचे थोतांड शिकवणारे ग्रंथ वाचता कामा

नयेत. ते विकतही घेता कामा नयेत. धार्मिक ग्रंथ घेऊ आणि वाचू नयेत. वाचले तर त्यावर टीका करण्यासाठीच वाचावेत.

सेक्युलॅरिस्ट किंवा धर्मातीत दृष्टीकोण देणारे ग्रंथ वाचावेत. घ्यावेत. हे ग्रंथ आपल्याला नव्या मानवी संस्कृतीकडे नेऊ शकतात. आंबेडकर संस्कृतीकडे नेऊ शकतात.

मुलांच्या मनांवर इहवादाचे संस्कार करणारे, माणसांच्या मनांवर इहवादी मानवतेचे संस्कार करणारे ग्रंथ वाचायला हवेत. असे ग्रंथ वाचणे म्हणजे सूर्याच्या सहवासात असण्यासारखे असते. त्यामुळे योग्य दिशेने आपल्या भावनांचे आणि विचारांचे पोषण होत असते.

अनेक ग्रंथ दिशाभूल करण्यासाठीच लिहिले जातात. विषमता टिकवण्यासाठीच लिहिले जातात. असे ग्रंथ लिहिणाऱ्या प्रतिभा पशूप्रतिभाच असतात. अशा ग्रंथांपासून स्वतःला आणि आपल्या मुलाबाळांना दूर ठेवावे.

समता, स्वातंत्र्य, बंधुता, इहवाद (Secularism) शिकविणारे ग्रंथ वाचण्याची, चर्चा करण्याची सवय आपण स्वतःला लावून घ्यावी आणि त्यानुसार जगण्याचे साहस करावे. आंबेडकर संस्कृतीकडे जाण्याचा हाच सर्वात उत्तम मार्ग आहे.

या उत्तम मार्गावर चालण्याची सवय लोकांना लागावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या वाचक चळवळी निर्माण झाल्या पाहिजेत. आजचा काळ निर्वाचन काळ होत चालला आहे. जे वाचले जाते ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे वाचले जाते. मनात भ्रम निर्माण करणारे, विषमतेची पूजा शिकवणारे वाचले जाते. या सांस्कृतिक ऱ्हासातून नव्या जाणिवांच्या वाचक चळवळीच आज देशाला वाचवू शकतात. उज्ज्वल जीवनाची हमी देऊ शकतात.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

अठरा साहित्य संस्कृती मंडळापुढील खरी आव्हाने

महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे), मुंबई मराठी साहित्य संघ (मुंबई), मराठवाडा साहित्य परिषद (औरंगाबाद), विदर्भ साहित्य संघ (नागपूर) आणि मराठी साहित्य महामंडळ यांना महाराष्ट्र शासन वर्षाला प्रत्येकी एक लाख रुपये अनुदान कशाला देते हा प्रश्न साहित्य संस्कृती मंडळाला न पडणे हा मुद्दा मंडळाच्या साहित्य आणि संस्कृतीविषयक झोपेचा निदर्शक आहे. हा मुद्दा साहित्य संस्कृती मंडळाच्या कक्षेत येत नाही असे साहित्य संस्कृती मंडळ म्हणणार असेल तर साहित्य संस्कृती मंडळाला साहित्य आणि संस्कृतीविषयक कोणतीही नैतिक भूमिका नाही असा त्याचा अर्थ होईल. त्याला कोणतेही मूल्ययुक्त व्यक्तिमत्व नाही असाही त्याचा अर्थ होईल.

उच्चवर्णीयांचा प्रभाव

सामान्यतः वरील सर्व साहित्य संस्था उच्चवर्णीय हिंदूंच्या हातात आहेत. या संस्थांच्या मोठमोठ्या शहरी प्रचंड इमारती आहेत. लाखो रुपयांच्या त्यांच्या उलाढाली चालतात. उच्चवर्णीयांच्या या संस्था आधीच गब्बर आहेत. संस्थेत सत्ताधीश होण्यासाठी निवडणुकांमध्ये लाखो रुपये खर्च करण्याची ऐपत असलेल्यांच्या या संस्था आहेत. निवडणुकीसाठी सभासदसंख्या वाढविली जाते. निवडणुकीसाठी केले गेलेले सभासद हे त्या त्या संस्थेच्या नियतकालिकांचेही सभासद का म्हणून ठरवले जातात, ते अर्थातच एक मोठे गूढ आहे. या संस्था कोणते वाङमयीन कार्य करतात? कोणत्या साहित्याचे आणि संस्कृतीचे संवर्धन या संस्था करतात? यांच्या संमेलनांमध्ये दिंड्या निघतात. वारकरी भजने म्हणतात. सरस्वतीची पूजा होते. हा सर्वच विधी धार्मिक

असतो. हिंदू धर्माला उजाळा देण्याचे हे कार्य आहे. उदाहरण म्हणून सांगतो. वि.सा. संघाचे संमेलन परवाच अकोल्याला झाले. त्यातल्या दिंडीत ज्ञानेश्वरांचे वगैरे ग्रंथ असावेत. दिंडीत नाचणारे भजनकरी काय म्हणत होते?

'वाटे हळूहळू चाला
मुखाने रामनाम बोला'

हे कशासाठी? याचा साहित्याशी काय संबंध आहे? रामजन्मभूमी-बाबरी मशिदीच्या पार्श्वभूमीवर या साहित्य संमेलनातील दिंडीला काहीच अर्थ नाही? हे सर्वच अनियोजित वा आंधळेपणाने चाललेले आहे काय? वरील सर्वच संस्थांमधील किती लोक अडवाणींच्या रथयात्रेत वा कारसेवेत सामील झाले नव्हते? हा प्रश्न कोणी विचारणार आहे की नाही? मुद्दाम अकोल्यात एक परिसंवाद ठेवून दलित साहित्यावर तोंडसुख घेणारी भाषणे घडवून आणली. (उद्धव कांबळेंचा अपवाद) हे सर्व अनवधानाने होत असते काय? तर सामान्यतः असेच कार्य बाकीच्याही सर्व संस्था करतात असेच म्हणता येईल. या संस्थांना शासन दरवर्षी लाख लाख रुपये देते. यावर्षी महामंडळाच्या संमेलनाला चार लाख रुपये दिले. घटक संस्थांच्या संमेलनांनाही पैसे दिले जात असावेत. शासनाने हे जे चालवले आहे त्याचा वाङमयीन अर्थ काय होतो? त्याचा सामाजिक वा धार्मिक अर्थ काय होतो? आणि या महागाईच्या काळात निखळ हिंदुत्वाची सेवा करणाऱ्या या संस्थांना लाखो रुपये दिले जात असतील तर त्याचा "आर्थिक अर्थ" काय होतो? 'साहित्य आणि संस्कृती'चे नाव धारण करणाऱ्या साहित्य संस्कृती मंडळाला या प्रश्नांच्या संदर्भात भूमिका घेणे का आवश्यक वाटत नाही?

मूलभूत मुद्यावर भांडणे व्हावीत

मुद्दा वरील काही संस्थांच्या नियतकालिकांचे बारा हजार रुपयांचे अनुदान बंद करण्याचा नाही. असलाच तर तो फारच छोटा मुद्दा आहे. वरवरचा आहे. मंडळाच्या हे लक्षात यावे की तो मुद्दा वरवरचा यासाठी आहे की समजा उद्या अखिल भारतीय दलित साहित्य संसदेला वर्षाला एक लाख रुपये शासनाने दिले आणि संसदेचा अध्यक्ष या नात्याने मला कोणी विचारले की एक लाखाचे अनुदान मान्य करता की बारा हजार रुपये मान्य करता? दोहोंपैकी एक काहीतरी चालेल. तर मी निश्चितच पहिल्यांदा वरील दोन्ही गोष्टी पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करील आणि खूपच ताणले गेले तर बारा हजाराचा बळी देऊन एक लाख घेण्याचे मान्य करीन. त्यामुळे म्हणतो की बारा हजारांचे भांडण बारा हजाराच्या विरोधात मांडणारी मंडळी कशी भांडतात ते हसत पाहण्यासाठी

उभे केले गेलेले भांडण आहे. अशा निरुपद्रवी आणिआपले हसे होईल या मुद्यावर भांडणे होऊ नयेत. जरा मूलभूत मुद्यांवर भांडणे व्हावीत. ती उभी करायची ताकद मंडळात आहे काय? लाख लाख रुपये देणे म्हणजे प्रतिगामी वाङमयीन आणि धार्मिक शक्तींचे हात मजबूत करणे होय आणि हे भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतावादाची पायमल्ली करणारे आहे तेव्हा याच गोष्टीला विरोध झाला पाहिजे. इथून आपण सुरु करणार आहोत काय असा माझा मुद्दा आहे. शासन हे लाख लाख रुपये हिंदू धर्माचे अभियान चालवणारांना देत आहे ही गोष्ट साहित्य संस्कृती मंडळ समजावून घेणार आहे की नाही असा माझा मुद्दा आहे.

परिवर्तनाचा आवाज साहित्यात आणि समाजात बुलंद करणाऱ्या संस्थांना शासन लाखो रुपये का देत नाही. साहित्य महामंडळ त्यासाठी अग्रक्रमाने खटाटोप का करीत नाही? हे या मंडळाच्या वाङमयीन, सामाजिक आणि धार्मिक भूमिकेत बसू शकत नाही हे याचे कारण आहे. त्यामुळे महामंडळावर व त्याच्या घटक संस्थांवर साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य प्रतिनिधी म्हणून घेण्यात यावेत अशी मागणी करण्याऐवजी महामंडळाचेच प्रतिनिधी साहित्य संस्कृती मंडळावर घेण्यात यावेत यासाठी खटपट केली जाते आणि त्याप्रकारे घडते. कशासाठी हे? या संस्थांमध्ये संवाद असावा म्हणून? मग त्यासाठीच महामंडळावर व त्याच्या सर्वच घटक संस्थांवर साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य प्रतिनिधी म्हणून का घेतले जात नाहीत? त्यामुळे संवाद प्रस्थापित होत नाही काय? महाराष्ट्रात ख्रिश्चनांच्या, मुस्लिमांच्या, आंबेडकरवाद्यांच्या, आदिवासींच्या, बहुजन समाजाच्या अनेक वाङमयीन संस्था कार्य करतात. महाराष्ट्रभर अशा अनेक लहान मोठ्या संस्थांचे जाळेच पसरले आहे. संवादाचाच मुद्दा असेल तर या सर्व संस्थांचे प्रत्येकी एकेक तरी प्रतिनिधी साहित्य महामंडळावर व त्याच्या घटक संस्थांवर का घेतले जात नाहीत. ही बाब निदर्शक कशाची आहे? संवाद वाढविण्याची की घटवण्याची? देवाणघेवाणीची, संवादाची ज्यांना चाड असते त्यांची पावले फार निराळ्या दिशेने पडत असतात हे लक्षात घेण्याची गरज आहे.

साधन वंचितांसाठी शासन काय करते?

खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्यात परिवर्तनाचा उच्चार बुलंद करताहेत, तो आवाज बुलंद करण्यासाठी कोणतीही साधने नसताना जीवाचा आटापिटा करीत आहेत, त्या साधनवंचित संस्थांसाठी महाराष्ट्र शासन काय करते? त्यांना इमारती नाहीत, त्यांना उत्पन्नाची साधने नाहीत. साधी कार्यालयेही नाहीत. त्यांचे लाखो कोट्यवधींचे व्यवहार नाहीत. पदराला खार लावून आणि याच्या त्याच्या दारी

जाऊन ही मंडळी संस्था चालवीत आहेत. त्यांची माहिती महाराष्ट्र शासनाला नाही? सर्व होते आणि ही माहितीच गोळा करता येत नाही काय? नागपूरची आंबेडकरवादी साहित्यिकांची 'अखिल भारतीय दलित साहित्य संसद' आहे. आदिवासी साहित्य संस्था आहे, अमरावतीची जनसाहित्य संस्था आहे, कोल्हापुरात दलित बौद्ध साहित्य संस्था आहे, दलित आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलने घेणारी संस्था आहे. नाट्यसंस्था आहेत. अनेक संस्था आहेत. महाराष्ट्रात या गरीब संस्था कार्य करतात. दलित, बहुजन, आदिवासी, भटके विमुक्त असे परिवर्तनाच्या वाटा चालणारे सर्वच या संमेलनांमध्ये प्रचंड संख्येने सहभागी होतात. ते सर्वच...

'वाटे हळू हळू चाला'

असे म्हणत नाहीत. कारण ते इतिहासात हळूहळूसुद्धा 'चालले' नाहीत. त्यांना हजारो वर्षे झोपवले गेले होते. तुडवले गेले होते म्हणून ते आता म्हणतात...

'वाटे बिगी बिगी चाला'

आणि काय म्हणत चाला? तर राम नाम नाही. मुखाने रामनाम म्हणा असे ते म्हणत नाहीत तर

'मुखाने फुले भीम बोला'

असे म्हणत आहेत.

मी म्हणतो या नव्या परिवर्तनवादी उच्चारांची शक्ती वाढायला हवी. यांच्या उरात मनुस्मृती नाही तर हे भारतीय संविधान उरात घेऊन निघालेले लोक आहेत. ती त्यांची गरज आहे. पण मनुस्मृती उरात असलेल्यांचे सामर्थ्य वाढविले जाते. या संदर्भात साहित्य संस्कृती मंडळ भूमिका घेते की बारा हजारासाठी भांडत बसते हा प्रश्न आहे. आवळा जपण्यासाठी भोपळा घालविण्याचा हा प्रकार आहे.

मी म्हणतो दलित, बहुजन, आदिवासी यांच्या सर्व साहित्य संस्थांना इमारती नाहीत. त्या शासनाने बांधून द्याव्यात. त्यांची मोठी कार्यालये सिद्ध करुन द्यावीत. त्यांना रंगमंदिरे बांधून द्यावीत. त्यांना वर्षाला किमान प्रत्येकी दोन लाख रुपये व्यवस्थापनासाठी द्यावेत. महामंडळाच्या संमेलनाला रत्नागिरीला चार लाख दिले जात असतील तर वरील प्रत्येक संस्थेच्या संमेलनाला त्याच्या दुप्पट द्रव्य देण्यात यावे. समानता प्रस्थापित करण्यासाठी दुर्बलाला विशेष संधी, विशेष सवलत द्यावी लागते. समतेसाठी ही गोष्ट करावी लागते. साहित्य संस्कृती मंडळाने यासाठी शक्ती खर्च करावी असे मला वाटते.

तीर्थांना पाच कोटी

परवा पंढरपूर, देहू, आळंदी, शेगाव अशा पाच तीर्थक्षेत्रांना शासनाने पंचवीस कोटी रुपये देण्याचे कबूल केले. मागल्या एक दीड वर्षात हिंदू धर्माच्या वेगवेगळ्या कामासाठी निदान चाळीस पंचेचाळीस कोटी रुपये शासनाने दिले आहेत. ही बाब मंडळाला विचारार्ह वाटत नाही काय? ती त्याच्या कक्षेत येत नाही काय? मी म्हणतो हा हिंदुत्वाचा पुरस्कार नव्हे काय? संविधानातील धर्मनिरपेक्षतावादाची ही पायमल्ली नव्हे काय? फुले-आंबेडकरी चळवळीच्या पायात हे सुरुंग पेरणे नव्हे काय? ज्यावर त्यांनी मारा केला त्यालाच परत औषधपाणी आणि जीवनसत्वे देऊन शक्तिमान करणे नव्हे काय? हे शिवसेना, संघ इत्यादी प्रतिगामी शक्तींचे हात बळकट करणे नव्हे काय? इतर धर्मीयांना असे कोट्यवधी रुपये दिले असते तर संघ, शिवसेना यांनी प्रचंड विरोध केला असता. पण या संघटना बोलत नाहीत. साहित्य संस्कृती मंडळही बोलत नाही याचा अर्थ शिवसेना, संघ आणि साहित्य संस्कृती मंडळ यांची धार्मिक व सामाजिक भूमिका एकच आहे असा होत नाही काय? मंडळ शासनाचे आहे आणि वरील दान देणारे ही शासनच आहे. त्यामुळे मंडळ वरील सर्व धर्मकार्यात सामीलच आहे असा अर्थ घेता येणार नाही काय?

मी म्हणतो, साहित्य संस्कृती मंडळाने या धर्मांधता वाढवणाऱ्या शासनाच्या वरील गोष्टींना विरोध करावा. बारा हजाराच्या छोट्या गोष्टींवर भांडणे आवश्यकच आहे. पण भांडण त्याहीपुढे अधिक गंभीर गोष्टींकडे, मुळाकडे जाऊन भांडले जावे असे मला म्हणायचे आहे.

मी स्वतः अलिकडे १८-११-९० रोजी दै. लोकमतमधून व साहित्य संस्कृती मंडळाचा अध्यक्ष असताना पुण्याचे साहित्य संमेलन कोणाचे? या नावाचा लेख 'नवशक्ती'मध्ये २२-१-१९८९ रोजी लिहून यातील काही गोष्टी स्पष्टपणे मांडल्या आहेत.

तेव्हा परत साहित्य संस्कृती मंडळाला अशी विनंती करतो की मंडळाने महाराष्ट्रातील साहित्याच्या आणि संस्कृतीच्या संदर्भात मूलगामी भूमिका घेण्याची गरज आहे. त्यातील विघातक गोष्टींच्या विरुद्ध मौन बाळगून साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन व्हायचे नाही. आपण अशा मूलगामी भूमिका घेतल्या की वाईट ठरतो हे खरे. शत्रू वाढवितो हे खरे पण त्याला इलाज नाही. कारण प्रतिगाम्यांशी मैत्री करण्यात तरी काय अर्थ आहे? खरे तर आपल्या अस्तित्वाला मूलगामी भूमिका घेण्यानेच प्रयोजन प्राप्त होते. फुले-आंबेडकरांच्या विरोधात घडणाऱ्या गोष्टींकडे

विघातक गोष्टींचे हात बळकट करणाऱ्या गोष्टींकडे शांत चित्ताने पाहात बसण्याने काय साधणार? झालेच तर आपली अर्थपूर्णता आपण गमावून बसणार आहोत. 'ही हतवेला जल्शाची का पुसा मनाला' असा केशवसुतांच्या भाषेत वरील सर्व गोष्टींच्या संदर्भात मंडळाला सवाल केला तर तो वाया जाऊ नये एवढीच सदिच्छा!

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

एकोणीस

पुण्याचे साहित्य संमेलन कोणाचे?

पुणे येथील अ. भा. मराठी साहित्य संमेलनाची सांगता झाली आहे. उद्घाटन न होताच सुरु झालेले हे जगातले पहिले अद्भुत साहित्य संमेलन असावे.

उद्घाटक म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांना निमंत्रित केले गेले होते. पण राजकारणी लोकांना साहित्य संमेलनात बोलावणे इष्ट नव्हे, असा मुद्दा उपस्थित करुन काही मंडळींनी शरदराव पवारांना उद्घाटक म्हणून बोलावणाऱ्या निमंत्रणापुढे प्रश्नचिन्ह उभे केले. या निमित्ताने तीव्रपणे मतप्रदर्शन केले गेले. आता प्रश्न असा की शरद पवार राजकारणी म्हणून संमेलनाचे उद्घाटक म्हणून येण्यास अपात्र ठरत असतील तर त्याच नियमाने या पुणेरी संमेलनात इतरही सर्वच राजकारणी व्यक्ती अपात्र ठरायला हव्या होत्या, पण तसे झाले नाही. अण्णा जोशी हेच स्वागताध्यक्ष राहिले. त्यांना मात्र एक राजकारणी म्हणून या संमेलनातून वगळले गेले नाही. जी भूमिका शरद पवारांच्या संदर्भात विरोधकांनी घेतली तीच भूमिका अण्णा जोशी यांच्या संदर्भात घेतली नाही. याचा उघड अर्थ पुण्याच्या खास संमेलनात ब्राह्मणेतर राजकारणी नकोत. केवळ ब्राह्मण राजकारणी हवेत असा होतो. त्यानुसारच पुण्याचे साहित्य संमेलन संबंधितांनी घडवून दाखविले. त्यामुळे हे संमेलन जातीवादी प्रवृत्तीने उत्कटपणे प्रेरित झाले होते हे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही.

या संमेलनाने टाकलेला बहिष्कार

या वर्षीच्या पुणेरी साहित्य संमेलनाने मराठा-बहुजनसमाज आणि दलित

यांच्यावर स्पष्टपणे बहिष्कार टाकला आहे. या बहिष्काराला प्रारंभ शरद पवार यांचेपासून सुरु होतो. या ब्राह्मणी मानसिकतेने शरद पवारांना आणि पुढे तत्सम जातींच्या साहित्यिकांनाही गावकुसाबाहेर ठेवले आहे आणि दुसऱ्या बाजूने दलितांना बाहेर फेकले आहे. ना. धों. महानोर यांना कवीसंमेलनाचे अध्यक्ष केले आहे. ते शरदराव पवारांचे मित्रही आहेत. महानोरांसारखी कविता लिहिणारे कवी आणि माणसे ब्राह्मणी मानसिकतेला अतोनात परवडतात. त्यामुळे त्यांना कवीसंमेलनाचे अध्यक्ष केले असल्यास नवल नाही. यजमान संस्थेने गंगाधरराव पानतावणे यांच्या नावाचा आग्रह अध्यक्षपदासाठी धरला होता. त्याचेही कारण पानतावणे संघीय आहेत हेच होते. तेव्हा पुण्याचे साहित्य संमेलन त्याच्या चौकटीत बसणारे असल्याशिवाय ब्राह्मणेतरांना जवळ करणार नाही, हे उघड आहे.

संमेलनाच्या पत्रिकेत जनार्दन वाघमारे, या. वा. वडस्कर अशी एकदोन ब्राह्मणेतर नावे सोडली तर इतर नावे नाहीत. दलितांपैकी क्वचितच कोणाचे नाव असेल. संमेलनापूर्वीच ज्यावेळी मी वर्तमानपत्रातून परिसंवादांचे विषय वाचले, काही साहित्यिकांची नावेही वाचली त्यावेळी कवीसंमेलनाच्या निमंत्रणाला स्वच्छ नकार कळवून टाकला. मी अशा संमेलनातील कवीसंमेलनात भाग घेत नाही, याचा पत्ता संयोजकांना लागला असावा आणि केवळ तेवढ्या कारणासाठी मला कवी संमेलनाचे निमंत्रण दिले गेले असावे. पण असो. दलित साहित्य आज देशभर निर्माण होत आहे आणि जगभर त्याची अत्यंत जिज्ञासेने चर्चा सुरु आहे. त्या दलित साहित्यिकांपैकी या संमेलनात नावे नसावीत, याचा अर्थ उघड आहे. या संमेलनाने स्वतःला केवळ ब्राह्मण या मूठभर जातीपुरते मर्यादित करुन टाकले आहे. आणि मराठा, बहुजन, दलित आदिवासी व भटके विमुक्त यांच्यावर व त्यांच्या साहित्यावर बहिष्कार टाकला आहे.

संमेलनात मान्यवर उपस्थित होते ते पुढील प्रमाणेः शिवाजी सावंत, बाबा कदम, पंडित महादेवशास्त्री जोशी, सौ. सुधा जोशी, सुनिताबाई देशपांडे, जोत्स्ना भोळे, वसंत शांताराम देसाई, माधव गडकरी, ना. सं. इनामदार, शांता शेळके, सुशिल पगारीया, नरुभाऊ लिमये, मुकुंदराव किर्लोस्कर, शांताबाई किर्लोस्कर, अनुराधा पोतदार, नारायण सुर्वे, शंकर वैद्य, सुधाकर जोशी, अशी आणखी दहा/पाच लोकांची नावे संमेलनाला उपस्थित मान्यवर म्हणून दिली आहेत. हे संमेलन या एवढ्याच मान्यवरांमुळे अखिल भारतीय कसे काय होते ते कळायला मार्ग नाही. यात दलितांमधले नाव चुकुनही दिसत नाही. त्यामुळेच हे संमेलन जातीयवादी आहे. हे भटांचे संमेलन आहे असे संमेलनस्थळी म्हटले गेले. प्रामुख्याने एका जातीवाल्यांचे हे

संमेलन असतांना आणि एका प्रस्थापित मानसिकतेचे हे संमेलन असताना हे अखिल भारतीय असे काय होते. नव्या परिवर्तनवादी प्रवाहांचे स्वागत तर नाहीच पण या वाङमयीन प्रवाहांची वेगळी साहित्य संमेलने कशाला? असा परिसंवादही या संमेलनात ठेवला गेला आहे. हे संमेलन भरवणाऱ्या मराठी साहित्य महामंडळ या संस्थेत केवळ प्रस्थापित लोकच आहेत. आणि साहित्य महामंडळाशी संलग्न असलेल्या वि. सा. संघासारख्या इतरही सर्व संस्था मुख्यत्वे याच मंडळींच्या हातात आहेत. त्यामुळेच महाराष्ट्र राज्याच्या साहित्य संस्कृती मंडळावर महामंडळाचे आणि त्याच्याशी संलग्न असलेल्या सर्व साहित्यसंस्थांचे प्रतिनिधी असावेत अशी मागणी केली गेली. म्हणजे साहित्य संस्कृती मंडळावरही आपले वर्चस्व असावे हा त्यामागचा धूर्त हेतू. मुख्यमंत्र्यांनी याप्रकारे वाङमयीन कार्य करणाऱ्या या उच्चवर्णीय साहित्य संस्थांना प्रत्येकी एक एक लाख रुपयांचे वार्षिक अनुदान दिले. वरील मंडळींनी ते मिळवून घेतले. खाजगी पद्धतीने अत्यंत अडचणीमधून दलितांच्या, आदिवासींच्या, बहुजनांच्या, भटक्याविमुक्तांच्या काही साहित्य संस्था काम करीत असतात. त्यांना असे वार्षिक अनुदान शासनाने दिले नाही. किंबहुना असे अनुदान मिळवून घेण्याचे कसबच त्यांच्यात नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ब्राह्मणेतर म्हणून उद्घाटनाला चालले नाहीत. पण अण्णा जोशी ब्राह्मण म्हणून चालले. ही परिस्थिती लक्षात घेता, मुख्यमंत्र्यांनी लाखा-लाखांचे वार्षिक अनुदान कोणाला दिले या प्रश्नाचे उत्तर मिळते. मुख्यमंत्री याप्रकारे जातीयवाद्यांचे हात बळकट करतात, असे कोणी म्हटले तर ते वावगे ठरायचे नाही. मुख्यमंत्रयांच्याही आता हे लक्षात आले असेलच असे वाटते.

निमंत्रणात भेदभाव का?

मराठी पत्रकार परिषदेला संमेलनाचे निमंत्रण नाही. पण महाराष्ट्र राज्याच्या साहित्य संस्कृती मंडळालाही साधे निमंत्रण नाही. महाराष्ट्राच्या वाङमयीन व्यवहाराशी साहित्य संस्कृती मंडळाचा काहीच संबंध नाही काय? हे मूठभरांचे संमेलन या समाजातील बाकीच्या बहुसंख्य लोकांशी असे का वागले या प्रश्नाचे उत्तर शोधायला हवे.

या वर्षी महात्मा जोतिराव फुल्यांची निर्वाणशताब्दी आहे. फुल्यासंबंधी वा आपल्या समाजपरिवर्तनासंबंधी एखादा परिसंवाद संमेलनात ठेवायला हरकत नव्हती. दलित साहित्यावर एखादा परिसंवाद असायला हवा होता. पण हे संमेलन नकारात्मक मनाने वर्तमानाशी संबंधित आहे. पण होकारात्मक मनाने हे फक्त भूतकाळाशी बांधलेले आहे. अमूक वेगळी संमेलने हवीत कशाला या विषयावरुनही आपणाला याचा प्रत्यय

येऊ शकतो. मागल्या वर्षी चंद्रपूरच्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात गांगलांच्या जाणेरड्या लेखांच्या पार्श्वभूमीवर "महात्मा फुल्यांचे क्रांतीकार्य माणुसकीच्या सुगंधासाठीच" हा परिसंवाद आम्ही घेतला. यावर्षी कल्याणला होणाऱ्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात आम्ही, "महात्मा फुले, बहुजन आणि दलित यांना जोडणारा दुवा" हा विषय परिसंवादासाठी ठेवला आहे. फुले आमचे नेते आहेत. ते आमचे महापुरुष आहेत. पुण्याच्या संमेलनाचा फुल्यांशी काय संबंध आहे? ज्योतिराव फुल्यांनी पुण्याच्या पहिल्या संमेलनाच्या वेळी न्या. रानडे यांना **"त्यांच्यात मिसळल्याने आम्हा शूद्रादि अतिशुद्रांचा काही एक फायदा होणे नाही, यावद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे"** हे जे सांगितले होते ती स्थिती अजूनही तशीच आहे असेच जणू पुण्याच्या या साहित्य संमेलनाने ९० सालीही जाहीर केले आहे.


खरे तर संमेलनाच्या उद्घाटनाच्या वेळी संमेलनाला प्रचंड गर्दी असते. पण लोकसत्तेत आठ हजारांचा आकडा आहे तर महाराष्ट्र टाईम्समध्ये पाच हजारांचा आकडा आला आहे. खरे काय समजायचे? मी अखिल भारतीय दलित साहित्य संसदेचा अध्यक्ष आहे आणि या संस्थेने गेल्या वर्षी चंद्रपुरात अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन घेतले त्याला पस्तीस ते चाळीस हजार लोक हजर होते. पु. ल. देशपांडे या संमेलनाचे उद्घाटक होते तर के. ज. पुरोहित हे प्रमुख अतिथी होते. या दोघांनीही आम्ही एवढे संमेलन यापूर्वी कधी पाहिले नाही, अशी जाहीर कबुली दिली, या संमेलनात सर्व परिवर्तनवादी लेखक साहित्यिक सहभागी होते. तिथे कोणती जात नव्हती. जाणीव होती महाराष्ट्राबाहेरील किमान पाच-सहा राज्यांमधील साहित्यिक सहभागी होते. त्या पार्श्वभूमीवर दलित साहित्य संमेलनाच्या तुलनेने पुण्याचे संमेलन कितीतरी लहान होते. या संमेलनाचे नाव बदलण्याची, त्याचे अखिल भारतीय हे विशेषण काढून टाकण्याची कुणी मागणी केली तर नवल वाटायला नको.

हे सर्व लक्षात घेतले तर निराळ्या परिवर्तनवादी संमेलनाची गरज का आहे? कोणाला आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळायला प्रत्यवाय नसावा.

मराठी साहित्य महामंडळाने अशी जातीपुरती संकुचित संमेलने भरवू नयेत. मराठा-बहुजन-दलित-आदिवासी-भटके विमुक्त यांच्यावर बहिष्कार टाकणारी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने भरविल्याचा आभास निर्माण करु नये कारण वरिलांना वगळून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कोणालाच भरवता यायचे नाही. पण जातियवाद्यांचे, विशिष्ट उच्चवर्णीय जातीचे राजकीय निवडणुकीच्या तोंडावर संमेलन भरविणे हा राजकारणाचाही भाग असू शकतो. गैरसोयीच्या

राजकारण्यांना टाळत टाळत सोयीच्या राजकारणात शिरण्याचा हा प्रकार असतो. हे आमच्या लक्षात येत नाही असे नाही. पण आमची इच्छा आहे, संकुचितांची संकुचित असू नये पण त्यांची इच्छाच असेल तर मग इलाज नाही!

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗



वीस संघीय साहित्य संमेलन

अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे ६४ वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन यावर्षी कोकणात रत्नागिरी येथे भरणार असल्याचे संबंधितांना ज्ञात आहेच. मराठी साहित्यविश्वाला हेही माहीत आहे की या संमेलनासाठी होणारी अध्यक्षीय निवडणूक दरवर्षीच कोणत्या ना कोणत्या वादाच्या वावटळीत सापडते. या निमित्ताने निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांच्या अनेक अज्ञात लीळा बाहेर येतात. अनेक उखाळ्यापाखाळ्या काढल्या जातात. त्यामुळे साहित्याचे क्षेत्र हे मोठे मान-मान्यतेचे, सौहार्दाचे आणि प्रतिष्ठेचे आहे ही लोकांच्या मनातील समजूतही धुळीस मिळते.

चुकीची निवडणूक पद्धत

या संमेनलनासाठी होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीच्या पद्धतीचा महाराष्ट्रातील साहित्यिकांनी अत्यंत गंभीरपणे विचार करायची गरज आहे. ही गरज निवडणुकीत घडणारे प्रकार पाहिले आणि या प्रकारांनी निवडून येणाऱ्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या संमेलनाचे स्वरुप पाहिले की अधिकच प्रकर्षाने जाणवते. पण या संमेलनासाठी होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीचाच नव्हे तर मराठी साहित्य महामंडळाचा, त्याच्या कामाच्या पद्धतीचा आणि या मंडळातर्फे भरणाऱ्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचाही अत्यंत गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. हे महामंडळ कोणाचे? हे मराठी साहित्य संमेलन कोणाचे? महामंडळाशी संलग्न असलेल्या साहित्यसंस्था कोणाच्या? साहित्याच्या नावाखाली वरील सर्वच घटक समाजकारण आणि धर्मकारण करीत आहेत. मराठी साहित्य महामंडळ, त्याच्या घटक साहित्य (एखाद दुसरी घटक संस्था वगळता) संस्था आणि अ.भा. मराठी साहित्य संमेलन या

संस्था म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मराठी साहित्यातील छावण्या होत हे निर्विवाद. या संमेलनाचा अध्यक्ष कोण असावा याचा निर्णय साहित्यातील या संघछावण्याच घेतात.

उदा. मराठी साहित्य महामंडळ आणि त्याच्या घटकसंस्था आणि साहित्य संमेल्लन घेणारी यजमान संस्था यांनी या अध्यक्षीय निवडणुकीसाठी ठरविलेले एकूण मतदार यावर्षी २७० आहेत. त्यातले २५४ मतदार हे ब्राह्मण आहेत. केवळ सोळा मतदार ब्राह्मणेतर आहेत. याचा स्वच्छ अर्थ असा की मराठी साहित्य महामंडळ आणि त्याच्या सर्वच घटकसंस्था या ब्राह्मणांच्या हातात आहेत. ज्यांच्या हातात या संस्था आहेत ते सर्वच बहुधा संघवाले वा संघपरिवारातले लोक आहेत.

ब्राह्मणांचे राखीव कुरण

१९५० पूर्वी मराठी साहित्याचे क्षेत्र ब्राह्मणांचे राखीव कुरण होते. लेखक ब्राह्मण होते. वाचकही ब्राह्मणच होते आणि समीक्षकही ब्राह्मणच होते. याप्रकारे निर्मिती आणि निर्णय या दोन्ही क्षेत्रांवर ब्राह्मणांचीच सत्ता होती. बाहेरच्यांना या राखीव कुरणात मज्जाव होता. मनुस्मृतीप्रणित मराठी साहित्यशास्त्राला त्याकाळी कोणीही ब्राह्मणेतर चालत नव्हता. एखाददुसरा अपवाद वगळला तर काल-परवापर्यंतच्या सर्व संमेलनाध्यक्षांची केवळ नावे पाहिली तरी या संमेलनावर व मराठी साहित्यावर या ब्राह्मणी वृत्तीची एकछत्री सत्ता कशी चालत होती त्याचे प्रत्यंतर येते. साहित्याचे क्षेत्र जसे कालपरवापर्यंत केवळ ब्राह्मणांसाठी आरक्षित होते तसे अध्यक्षपदही आरक्षितच होते.

ब्राह्मणेतरांचा प्रवेश

१९५०-६० नंतर मराठीत क्रमाने ब्राह्मणेतर माणसे साहित्याचे निर्माते म्हणून, वाचक आणि टीकाकार म्हणून प्रवेशू लागली. मार्क्सवादी साहित्य, आंबेडकरवादी साहित्य, ग्रामीण साहित्य आणि आदिवासी साहित्य या नावांनी महाराष्ट्रात परिवर्तनवादी चळवळी शक्तिशाली झाल्या. साहित्यातील ब्राह्मणी वर्चस्वाला त्यामुळे तडे जाऊ लागले. अखिल भारतीय दलित साहित्य संमेलने महाराष्ट्रात भव्य प्रमाणात होऊ लागली. (अ.भा. मराठी साहित्य संमेलनांच्या किमान पाच पटींनी तरी ही संमेलने मोठी असतात.) ग्रामीण साहित्य संमेलने होऊ लागली. आदिवासी साहित्य संमेलने आणि जनसाहित्य संमेलने भरु लागली. ख्रिस्ती साहित्य संमेलने, बौद्ध साहित्य संमेलने भरु लागली आणि दलित, आदिवासी व ग्रामीण या ब्राह्मणेतर घटकांना एकत्र बांधण्याच्या प्रयत्नातून दआग्रा साहित्य संमेलनेही भरु लागली. मराठी

साहित्यक्षेत्रात ब्राह्मणेतरांची ताकद वाढू लागली. साहित्य क्षेत्रात आपल्या विरोधकांची ताकद वाढणे याचा अर्थ जीवनातील इतरही महत्वाच्या क्षेत्रावरील आपली सत्ता ढासळणे असते. हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लक्षात येताच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रमुख जसा ब्राह्मणाशिवाय कोणी चालत नाही तसा मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्षही ब्राह्मणाशिवाय कोणी असू नये. संघीय असलेल्या ब्राह्मणाशिवाय कोणी असू नये यादृष्टीने संघाने कार्य करायला प्रारंभ केला.

सुर्वे का पराभूत होतात?

त्यामुळे कवी नारायण सुर्व्यांना मतांसाठी फिरावे लागते. एकटेच ते स्वतःसाठी फिरतात. त्यांना अगदी कमी मते पडतात आणि अत्यंत वाईट पद्धतीने ते पराभूत होतात. महाराष्ट्राच्या वाङमयीन जाणकारीला हे लांच्छनास्पद नाही असे कोण म्हणेल? डॉ. पठाणांना ही साहित्यातील संघशक्ती अध्यक्ष म्हणून निवडून देते त्याचे कारण पठाण मुसलमान आहेत हे नाही तर डॉ. पठाण हे संघाच्या सांस्कृतिक भूमिकेत अगदी चपखल बसतात हे आहे. संताच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार करणारे डॉ. पठाण संघाला आपलेच वाहतात. ब्राह्मणेतर संघवाल्यांना संघवाले अध्यक्षीय निवडणुकीसाठी उभे करतात पण एक तर त्यांना पाडण्यासाठी किंवा निवडून आलाच असा एखादा ब्राह्मणेतर संघवाला तर औदार्याची जाहिरात करण्यासाठी. पण यासाठीही दलितांमधील असो वा बहुजन समाजातील असो ते ज्याला पुढे करतात तो उमेदवार त्यांच्यात समरस होणाराच असावा लागतो. खास संघाचा ब्राह्मण उमेदवार असला तर संघाचे कार्यकर्ते त्या त्या घटकसंस्थेच्या मतदारांकडे, अध्यक्षाकडे जाऊन मोर्चेबांधणी करतात आणि नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुंना विद्यापीठात सर्व प्राध्यापक संघाचे ब्राह्मणच घ्या जसा जसा आदेश संघप्रमुखाकडून जातो तसेच आदेश या संमेलनाचा अध्यक्ष अमुकच, आपला संघवालाच व्हायला हवा असे आदेश संघप्रमुखाकडून जातात. तशा मोहिमा आखल्या जातात. तसा प्रचार साहित्यात केला जातो.

महामंडळात संघवाले

महामंडळात संघवाले आहेतच. सर्व घटकसंस्थांच्या कार्यकारिणींमध्ये मुख्यत्वे (एखादी घटक संस्था वजा जाता) संघवाले आहेतच. त्या त्या घटकसंस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य या निवडणुकीत मतदार असतातच. शिवाय आजीव सभासदांमधूनही ठरलेले मतदार घेतले जातात. हे मतदार घेताना ती विशिष्ट संस्था ज्या प्रदेशात कार्य करीत असेल त्या भागातील साहित्यिकांमधून घेतले जात नाहीत तर

कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांच्या म्हणजे संघवाल्यांच्या कुटुंबातून वा मित्रमंडळीतून घेतले जातात. त्यामुळे संघाचा माणूस अध्यक्ष होण्याचा मार्ग मोकळा होऊन जातो. निदान संघ म्हणेल तोच मनुष्य निवडून येईल हे ठरुन जाते.

हे मतदार घेताना वाङमयीन निकष वापरला नसल्याने ही सर्व अध्यक्षीय निवडणूक अर्थातच साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाची होत नाही हा मुद्दा वेगळा. पण जो मनुष्य निवडून येतो, अध्यक्ष होतो त्या माणसाला या निवडीने आपला सत्कार झाला असे वाटणे हा या सर्व प्रकारातला सर्वात मोठा विनोद असतो. मराठी साहित्य क्षेत्रातला हा सर्वोच्च बहुमान आला कोणत्या वाटेने? या पद्धतीने कोणाचा सन्मान होऊ शकतो काय? कोणत्याही अर्थाने या निवडीचा साहित्यातील निवडीशी संबंध नसतो. त्यात कोणताही वाङमयीन निकष नसतो. त्यात असते ते हिंदुत्ववादी समाजकारण आणि फॅसिस्ट राजकारण! रत्नागिरीला होणाऱ्या संमेलनाच्या निवडीसाठी ९४.०७ टक्के मतदार ब्राह्मणांमधले आहेत. एवढे आरक्षण? इथे निकष गुणवत्तेचा आहे की जातीचा? इथे गुणवत्तेचा निकष का लावला जात नाही? अध्यक्ष निवडण्याची ही अत्यंत घाणेरडी पद्धती आहे. ती महामंडळाने बदलावी. सर्व घटक संस्थांमध्ये बहुसंख्य ब्राह्मणेतरांचा, दलितांचा आणि आदिवासी व ग्रामीणांचा अंतर्भाव होणार नसेल आणि अध्यक्षीय निवडणुकीसाठी बहुसंख्य मतदार ब्राह्मणेतरांमधून घेतले जात नसतील तर महाराष्ट्रातील सर्व ब्राह्मणेतर व संघीय वृत्तीच्या साहित्यिकांच्या व्यतिरिक्तच्या साहित्यिकांनी व नागरिकांनी मराठी साहित्य महामंडळावर, त्याच्या घटक संस्थांवर व अ.भा. मराठी साहित्य संमेलनावर बहिष्कार टाकावा. कोणीही तिकडे फिरकू नये. होऊ द्यावे त्यांचे अ.भा. संघीय ब्राह्मण साहित्य संमेलन.

महाराष्ट्र शासनाने महामंडळाला व त्याच्या घटक संस्थांना वर्षाला प्रत्येकी लाखा लाखाचे अनुदान मंजूर केले आहे. प्रत्यक्ष संमेलनालाही एक लाख रुपये शासनाकडून मिळतात. त्यासंबंधीही सर्व ब्राह्मणेतर साहित्य संस्थांनी व साहित्यिकांनी पुरोगामी महाराष्ट्र शासनाला जाब विचारावा.

संघीय संमेलनापासून अपेक्षाच नाही

फुले स्मृतीशताब्दी, आंबेडकर जन्मशताब्दी वर्षांमध्ये मागल्या संमेलनात पुण्यात काय विचार झाला. ब्राह्मणेतर साहित्य प्रवाहांविषयी काही विषय त्यात होता काय? नाही. या सर्वच गोष्टी आता हे संघीय संमेलन कटाक्षाने बाजूला ठेवीत आहे असा याचा

अर्थ आहे. जास्तच काळजीपूर्वक दूर ठेवीत आहे असा याचा अर्थ आहे. १८८५ साली ज्योतीराव फुले त्याकाळच्या अशाच ब्राह्मणांच्या साहित्य संमेलनाला उद्देशून म्हणाले होते --

'ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यास ते हक्क त्यांच्याने खुषीने व उघडपणे देववत नाहीत व चालू वर्तनावरुन अनुमान केले असता,पुढेही देववणार नाहीत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकातील भावार्थांशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही. कारण त्यांच्या पूर्वजांनी आम्हावर सूड उगविण्याच्या इराद्याने, आम्हास दास केल्याचे प्रकरण त्यांनी आपल्या बनावट धर्मपुस्तकात कृत्रिमाने दडपले. याविषयी त्यांच्यातील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरुन आम्हा शूद्रादि अतिशूद्रास काय काय विपत्ति व त्रास सोसावे लागतात हे त्यांच्यातील उंटावरुन शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारास व मोठमोठ्या सभास्थानी आगांतूक भाषण करणारास कोठून कळणार? हे सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकास जरी पक्के माहीत होते तरी त्यांनी फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरिता डोळ्यावर कातडे ओढून त्याला इंग्रज सरकारातून पेन्शन मिळताच तो पुनः अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोवळा बनून आपल्या शूद्रादी अतिशूद्रास नीच मानू लागला व आपल्या पेन्शनदात्या सरकारने बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धा सोवळ्याने बोट लावण्याचा विटाळ म्हणू लागला! अशीच का शेवटी ते सर्व आर्य ब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नती करणार! असो. यापुढे आम्ही शूद्र लोक, आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांना भुलणार नाहीत. सारांश, त्यांच्यात मिसळ्ल्याने आम्हा शूद्रादि अतिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे' यात आजही काय फरक पडला आहे? फरक पडला असेल तर एवढाच की आज ब्राह्मणेतर समाजात संख्येनेही अधिक आणि गुणवत्तेनेही अनेक उत्कृष्ट साहित्यिक निर्माण झाले आहेत. त्यामुळे आज त्यांना फार जाणीवपूर्वक आणि कौशल्याने टाळले जाते.

मराठी साहित्य संमेलनाची आजची प्रकृती अंतर्बाह्य ब्राह्मणी आहे. अगदी अ पासून ज्ञ पर्यंतच्या सर्व प्रक्रियेवर ब्राह्मणी वर्चस्व आहे याच संकुचित आणि प्रतिगामी प्रवृत्तीचा पगडा त्याच्यावर आहे. हे वर्चस्व अबाधित राहावे यासाठीच संघाचे सर्व लोक प्रयत्न करतात. बाहेरच्यांना घटकसंस्थांपासून महामंडळापर्यंत प्रवेश नाकारला जातो.

सगळी दारे खिडक्या आतून ही संघवाली मंडळी बंद करुन घेतात.

संघाचे प्रायव्हेट लिमिटेड संमेलन

याचा अर्थ स्पष्ट आहे. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाला त्यांनी संघाचे प्रायव्हेट लिमिटेड केलेले आहे. संघ व ब्राह्मणाव्यतिरिक्तच्या साहित्यिकांनी या संमेलनात मग कशाला जायचे? या बाकीच्यांचे तिथे कार्य आहे. त्यांच्या त्या उत्सवाशी, त्यांच्या त्या रंजक सोहळ्याशी, त्यांच्या त्या मिरवणुकीशी ते करतात त्या वाङमयीन चर्चांशी, ते पारीत करतात त्या ठरावांशी बाकीच्यांचा काय संबंध आहे. संघेतर महाराष्ट्राने या सर्व गोष्टींचा अत्यंत तातडीने आणि गंभीरपणे विचार करावा आणि ज्योतिबा फुल्यांनी १८८५ सालच्या 'त्यांच्या' संमेलनावर टाकला तसा त्यांच्या यावेळपासूनच्या येत्या सर्वच संमेलनांवर बहिष्कार टाकावा. "अखिल भारतीय इहवादी मराठी साहित्य महामंडळ" स्थापन करावे. अ. भा. फुले आंबेडकरवादी साहित्य महामंडळ काढावे. या परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या ध्वजाखाली सर्व संघेतर महाराष्ट्राने एकत्र यावे. असे समाजक्रांतीचे आणि साहित्यक्रांतीचे संयुक्त विचारपीठ हेच संघेतर महाराष्ट्राचे खरे संमेलनपीठ आहे. संस्कृतीपीठ आहे. अशा विचारपीठावर महाराष्ट्रातील सर्व प्रकाशपूज्यकांनी, सूर्यकुलाच्या सर्व साहित्यिकांनी आणि साहित्यप्रेमी लोकांनी एकत्र यावे. 'मराठी साहित्य महामंडळाच्या संमेलनांवर बहिष्कार टाकावा.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

एकवीस विलास सारंग यांची 'गर्भवती'

'गर्भवती' हे नाव या कथेला अत्यंत समर्पक असेच नाव आहे. कथा-नायकाच्या आयुष्यात पुढे जी निर्वाणीची भली-बुरी स्थित्यंतरे घडून येतात, त्या स्थित्यंतरांच्या मुळाशी हे गर्भवतीपणच आहे.

ही कथा शिल्पकाराची या नात्याने एका कलावंताची कथा आहे. ज्याचे कलावंतपण धोक्यात आलेले आहे, जो हे कलावंतपण जगविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो आहे आणि शेवटी त्या प्रयत्नात यशस्वी होतो आहे अशा कलावेड्या, सर्जनासक्त मनाची ही कथा आहे.

मुळात कथानायक कमर्शियल आर्टिस्टची नोकरी करणारा आहे. सोळा वर्षाची ही नोकरी सोडून तो शिल्पकलेकडे वळतो. शिल्पकलेला वाहून घेण्याचा निश्चय तो करतो. वयाच्या चाळीसाव्या वर्षापर्यंत या कलावेडाखातरच तो लग्न टाळतो. परंतु नोकरी सोडल्यापासून घरीच काम करु लागल्यामुळे त्याचा एकटेपणा अधिकच गडद होऊ लागतो. आणि पुढे उरलेले आयुष्यही एकटे काढायचे या कल्पनेने त्याच्या पोटात खड्डा पडतो आणि तो लग्न करतो.

शिल्पक्षेत्रात मोठे काम करायचे हे त्याचे ध्येय आहे. या ध्येयसाधनेतले सहा महिने वासनापूर्तीसाठी द्यायचे त्याने ठरविलेले असते. त्यानंतर तो आपल्या कामगिरीकडे निरामय मनाने वळणार होता. पण घडते ते निराळेच. लग्नानंतर पत्नीची पहिलीच पाळी चुकते आणि क्रमाने त्याच्या वासनेचा कोंडमारा तीव्र होत जातो, त्यामुळे सहा महिन्यांचे गणित चुकते. आणि सहा महिन्यानंतर वासनेच्या पाशातून बाहेर पडण्याऐवजी झालेल्या या कोंडमाऱ्यामुळे तो वासनेचा अधिकच गुलाम होऊ लागतो. वासनाशमनात वासनेचे दास्यत्व संपले असते पण वासनेचा झालेला कोंडमारा त्याला

वासनेचेच गुलाम करुन टाकतो. त्यामुळे तो अधिकच वासनावेडा होतो. या काळात गर्भवतीचे शिल्प त्याने घडवायला घेतलेले असते. त्याच्यातल्या माणसाकडून पत्नी गर्भवती होऊ शकली पण त्याच्यातल्या कलावंताला मात्र गर्भवतीचे शिल्प घडविता येत नाही. आणि या जाणिवेने तो स्वतःवरच चिडतो. मनात कुठेतरी खीळ बसलीसे वाटते. या मनोवस्थेत लग्न, बायको, मुल हे एक वेगळेच आयुष्य आहे, विवाहाच्या मार्गाने हे सगळेच आयुष्य आपल्यावर आक्रमण करायला लागलेले आहे. विवाहोत्तर वासनापूर्तीच्या काळाचे मांडलेले गणित लग्नानंतर पत्नीची पहिलीच पाळी चुकल्यामुळे चूक ठरले आहे आणि परिणामी वासनेपासून दूर जाणे शक्य होण्याऐवजी वासनेप्रीत्यर्थ त्याची व्याकूळ फरफट होऊ लागली. दूर जाण्याऐवजी तो संसारात रुतून जाऊ लागला. क्रमाक्रमाने, धिमेपणाने, अनिवार्यपणे लग्न, पत्नी, मूल हे वेगळेच आयुष्य आपला ताबा घेत आहे या जाणिवेने तो हैराण होतो. त्याला वासना हवी पण वासनेची गुलामगिरी नको आहे आणि वासना तर त्याच्या ताब्यात राहायला तयार नाही. पत्नीच्या गर्भारपणामुळे तिचा अवरोध होतो आणि ती अधिकच बेफाम होते आणि ही बेफाम वासना त्याच्या आयुष्याचे केंद्र होते. तो माणूस आहे आणि हा माणूसच कलावंतही आहे. या माणसाच्या जीवनातील घडामोडींचे परिणाम त्याच्यातील कलावंतावरही होत आहेत. या कलावंत मनाचे त्यामुळे केंद्रच ढळून जाते आणि त्याला गर्भवतीचे शिल्प साधत नाही. लग्न, मुले, संसार हे एक सत्य होते. वासना हे मोठे सत्य होते; तो तर विलक्षण पाश होता. पण त्याच्यातील कलावंताने वेगळ्याच सत्याचा ध्यास घेतला होता. लग्न टाळत आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या पाशांपासून दूर जात त्याने त्या सत्याचा इतकी वर्षे पोटतिडकीने पाठपुरावा केला होता. ते सत्य त्याला आपल्या छिन्नीने खोदून काढावयाचे होते. बायको-मुलांच्या पाशात संपून ते सापडणार नव्हते, वासनेच्या वातचक्रात ते लाभणार नव्हते. केवळ अत्यंत टोकदार एकाग्रता साधून एकटेपणाच्या विश्वात स्वतःला कोंडून घेतल्यानेच ते सत्य सापडणारे होते. आणि वासनेचा कोंडमारा झाल्यामुळे तर तो वासनेच्या डोहात अधिकच बुडत चालला होता. 'जन मर्यादा धरुन कसे अमर्याद ते मज गवसे' किंवा 'जीव धावतो वर वर जाया चैतन्यापाठी हाय सुटेना दृढदेहाच्या परी बसल्या गाठी' किंवा 'काढ सखे गळ्यातले तुझे चांदण्यांचे हात' इ. मान्यवर उद्‌गारांवरुन ध्येय आणि पाश असा झगडाच वेगवेगळ्या संदर्भात व्यक्त झाला आहे. 'फ्लोबेर'नेही कौटुंबिक आयुष्याच्या सत्याकडे पाठ फिरवून वेगळ्याच सत्याच्या शोधार्थ स्वतःला शब्दांच्या विश्वात कोंडून घेतले होते.

या कथेच्या नायकाचे नाव 'जीवन' आहे. या झगड्यात तो कलावंताचे जीवन मिळवितो. कलावंताचे जीवन आणि ते संपविणारे, विवक्षित चुकीमुळे वासनावेड जडलेले जीवन अशा संघर्षात 'कोणती वाट चोखाळावी?' या प्रश्नाला 'कलावंताचे जीवन'

हे उत्तर तो शोधतो. एका अर्थी त्याचे 'अस्तित्व' सिद्ध करणारा निर्णयच तो घेतो.

कथेत नायकाच्या मनात दुपारच्या वेळी उफाळून आलेल्या वासनेचे, पत्नीच्या गर्भारपणामुळे त्याला व्याकूळ, अगतिक करणाऱ्या वासनेचे तपशिलवार चित्रण आहे. पण कथेत रात्रीच्या वेळी अनावर झालेल्या त्याच्या वासनेचे चित्रण नाही. तो सर्व भाग सारंगांनी दाराच्या प्रतिकातून मांडला आहे. गंजलेले खिळे सरिताच्या पोटात घुसवून तिची दोन्ही बाजूंची कातडी फाडून काढणारे दार म्हणजे त्याची अनावर वासनाच होय. शुद्ध हरपून ती पलंगाच्या कडेवर कोसळली. तिच्या पोटातून उमळून ओघळणाऱ्या रक्ताच्या लोटामध्ये एक पांढूरका लहान देह दिसू लागला. रक्तानं माखलेला. दार झुलायचं कमी झालं होतं. खिळ्यांची खळखळ मंदावली होती. दाराचे प्रतिक फारसे कलात्मक नसले तरी ते विध्वंसक वासनेचे प्रतिक नक्कीच आहे. आपल्यातील कलावंताला नष्ट करणारे पाश, आपल्या वासनेचा कोंडमारा करणारे हे गर्भारपण त्याला नष्ट करायचे होते. दाराला-वासनेला तो आवरत होता पण दारच विजयी झाले. इथेही माणूस आणि कलावंत यांच्यातील अंतरही सूक्ष्मपणे साकार होते. त्याच्यातील कलावंताच्या जीवावर उठलेली, त्याचा कोंडमारा करणारी वासनाच आता अनावर होऊन या कोंडमारा करणाऱ्या अवस्थेच्या जीवावर उठते. या वासनेच्या अनावरतेमागे त्याच्यातील कलावंताच्या जगण्याच्या जिद्दीचे बळ आहे.

लग्नानंतर सरिताला लगेच गर्भ राहिला नसता (ही चूक पुढे दोघांनाही कळते) तर हे टळते का? कदाचित सातव्या महिन्यात वासना अशी अविवेकी झाली नसती. वैषयिक संदर्भात होणाऱ्या कोंडमाऱ्यामुळेही तो असा अनावर झाला असावा. त्यातून मुक्त पत्नीच्या प्राप्तीसाठी गर्भ-निर्मूलनाच्या घटनेपर्यंत त्याला जावे लागले. गर्भारपणाशिवाय प्रदीर्घ काळपर्यंत त्याला सरिता लाभली असती तर ही पुढची त्याच्या कलावंत जीवनात निर्माण झालेली खिळ संभवली नसती. परंतु त्याच्या वासनेचा कोंडमाराच त्याला वासनेचे गुलाम बनवितो. आणि या गुलामीतून कलावंताला वाचविण्यासाठी वासनेचा अनावरपणाच त्याची सोबत करतो. म्हणजे विवाहानंतर गर्भधारणेचा काळ लांबवावा हे शिकविणारी लैंगिक शिक्षणाच्या संदर्भातली ही एक चांगली बोधकथा ठरते. वासनेला शहाणे करणे, तिचे रास्त हक्क तिला प्रदान करणे त्याची निकड ही कथा सांगते आणि ते झाले नाही तर माणसाच्या आणि माणसातील कलावंताच्या जीवनात कशा विपरीत घडामोडी होतात याचे चित्रण ही कथा करते. हेच सांगण्यासाठीच स्त्रीची गर्भवती ही अवस्था या कथेत लेखकाने नायिकेच्या भूमिकेसाठी

निवडली आहे. शृंगार, उत्तान शृंगार रेखाटायचा असता तर लेखकाने कामशास्त्रात निपूण अशी एखादी वेश्या नायिकेच्या भूमिकेसाठी वापरली असती किंवा एखादी अविवाहित तरुण प्रेयसी घेतली असती. पण जिथे शृंगार अशक्य अशी सात महिन्यांची 'गर्भवती' लेखकाने नायिका म्हणून उभी केलेली आहे ती शृंगाराचा प्रकर्ष सांगण्यासाठीच होय असे समजणे योग्य ठरणार नाही. ही एका बाजूने शृंगाराची अशक्यता आणि तिच्या गर्भारपणामुळे नायकाच्या वासनेची बेफामता यांच्यातील अंतर्विरोधाचे खरे तर कारणच लेखक सांगतो आहे. लग्नानंतर पाचसात महिने गर्भधारणा लांबली असती तर कथा झाली त्या पद्धतीने सुरु झाली नसती, रमली त्या पद्धतीने वासनाचित्रात रमली नसती आणि झाला आहे तसा तिचा शेवटही झाला नसता. कारण या कथेतील नायकाचया कथाजीवनात भलीबुरी स्थित्यंतरे घडवून आणणाऱ्या मूळ घडामोडी कलावंत - 'माणसाच्या' जीवनात निर्माण झालेल्या आहेत आणि या सर्व घडामोडींचा प्रारंभ लग्नानंतर सरिता लगेच गर्भवती होणे या मूळ घटनेशी निगडित आहे.

ही कथा याप्रकारे विवाह, वासना, गर्भधारणा, कलावंत, कलानिर्मिती आणि कला यांच्यातील गुंतागुंतीचा नातेसंबंध स्पष्ट करणारी कथा आहे. एका अर्थी ती कलावंताचया मुक्तीची कथा आहे. पण वासनेच्या कोंडमाऱ्यापासून मुक्ती या अर्थाने माणसातील कलावंताच्या मुक्तीची ती कथा आहे. आणि मुळात या संदर्भात निर्माण होणाऱ्या गुलामीचा संदर्भ, लैंगिक संदर्भातील अज्ञानाशी आहे.

गर्भपात झाल्यानंतर क्षणभर त्याने त्या रक्ताळलेल्या दृश्याकडे पाहिले, आणि तो स्टूडिओत निघून गेला. स्टूडिओचेंदार धाडकन लावून घेतले. एका बाजूने या क्षणीच्या क्रूर वासनातृप्तीमुळे, तिच्या कोंडमाऱ्यातून मुक्ती झाल्यामुळे आणि पुढील वासनापूर्तीची शक्यता सिद्ध झाल्यामुळेच तो कलानिर्मितीसाठी मोकळा झाला. दुसऱ्या बाजूने वासनेच्या होणाऱ्या कोंडमाऱ्यामुळेच सातव्या महिन्यातही तो असा अविवेकी झाला, पाशवी पातळीवरुन गर्भपाताला कारण झाला. कथेच्या मध्यभागात त्याच्या या बेफाम वासनेचे तपशिलवार वर्णन एका तीव्र निषेधाचा भाग म्हणूनच येताना दिसते. अडाणपणा आणि त्याच्यापोटी जन्माला येणारा पिसाटपणा सांगण्याच्या हेतूनेच ते वासनेचे चित्र येते. अशी अविवेकी वासना निषेधिणे हाच लेखकाचा इथे हेतु आहे. आणि अविवेकी वासनेच्या मूळाशी असलेले वैवाहिक जीवनाच्या संदर्भातील अडाणपण अधोरेखित करणे हाच अभिप्राय इथे कथालेखकाचा असावा असे वाटते.

'वैद्यकशास्त्रात सर्व गुह्यांगांचे वर्णन असते, पण ते अश्लील नसते; कारण तिथे प्रयोजनच वास्तवाचे ज्ञान असे आहे. काही जण मुद्दाम जीवनातील अश्लील जिज्ञासा पुरविण्यासाठी अजिंठ्याला जातील म्हणून अजिंठा अश्लील नव्हे... मर्ढेकरांच्या काव्यात मैथून, लिंग, ढुंगण सारखे शद्व आहेत. पिस्टनसारख्या कल्पना आहेत. त्या कवितेचा किंवा कडव्याचा अगर ओळीचा सामान्य परिणाम, रतिप्रेरणेची जागृती, अगर अपेटन्सीज टुवर्डस सेक्स असा होईल असे काहीही नाही.' हे प्रा. नरहर कुरुंदकरांचे म्हणणे लेखकाचा हेतू, वाचकाचा हेतू आणि विवक्षित संदर्भकक्षेत त्या त्या शद्वाचा-विवेचनाचा परिणाम इत्यादी संदर्भात महत्वाचे आहे. मी केलेल्या वरील विश्लेषणाला पूरक म्हणून ते नोंदवून संपवितो.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

बावीस आभार, लालूप्रसाद, हार्दिक आभार

प्रि य ना. लालूप्रसाद यादव यांस अख्ख्या जगातील, संपूर्ण भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील सर्व आंबेडकरवादी आणि आंबेडकरप्रेमी जनतेच्या वतीने कृतज्ञतापूर्वक जयभीम.

कमाल केलीत लालूप्रसाद तुम्ही, मजा आला. बिहारमधल्या सर्वात मोठ्या विद्यापीठाचे म्हणजे बिहार विद्यापीठाचे नाव एका दणक्यात तुम्ही बदलून टाकले. त्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नाव आपण आणि आपल्या मंत्रीमंडळाने दिले. एक लोहारकी म्हणतात ती ही. नुस्ताच तुम्ही आणि तुमच्या मंत्रिमंडळाने बिहार विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नामांतर करायचा निर्णय घेतला नाही, केवळच ठराव पारीत केला नाही तर त्या निर्णयाची लगेचच अंमलबजावणीही करण्यात आली. लालूप्रसाद, निर्णय असा असावा. आपणही निर्णय घेऊन चालढकल करु शकला असता. निर्णयाला वाऱ्यावर बेवारस सोडू शकला असता. आपणच घेतलेल्या निर्णयाचे निवडणुकींकडे लक्ष ठेवून धिंडवडे काढू शकला असता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे राजकारण आपणही करु शकला असता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चाहत्यांच्या तोंडाला आपणही पाने पुसू शकला असता. त्यांच्या भावनांचा निवडणुकीच्या हाटात लिलाव करुन बोली आपणही बोलू शकला असता. दलितांची पाच-पन्नास गावे त्यानिमित्ताने सहज जाळता आली असती. किमान शेदोनशे दलितांना सहजच जाळून, कापून किंवा मारुन काढता आले असते. वड्याचे तेल असे तुम्हीही वांग्यावर करु शकला असता. नामांतरांचे निमित्त करुन दलितांवरचे, खूप दिवसांपासूनचे साठवलेले राग तुम्हालाही काढता आले असते.

काहींचे डोळे काढता आले असते. काही भगिनींची नागव्याने धिंड काढता आली असती. दलितांवर सूड घेण्यासाठी नामांतराचा मुद्दा वापरणे तुम्हाला सहज शक्य झाले असते. दलितांची चळवळ दडपण्यासाठी नामांतराचे निमित्त पुढे करुन दडपशाहीचा क्रूर प्रयोग तुम्हालाही करता आलाच नसता असे नाही. अनेक ठिकाणी गोळीबार करता आले असते. अनेकांचे जीव घेता आले असते. अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांकरवी बेदम मारता आले असते. हजारो बायामाणसांना तुरुंगात डांबता आले असते. हजारो लाखोंच्या सभा अश्रूधूराने, लाठीहल्ल्यांनी बेचिराख करता आल्या असत्या. गर्दीतून जिपा बेदरकार सोडता आल्या असत्या. दलितांशी गोड बोलून निवडणुकांचे उखळ पांढरे करता आले असते. नामांतराचे गाजर दलितांपुढे धरुन त्यांना राजकीय स्वार्थासाठी गाढवासारखे राबवून घेता आले असते. लालूप्रसाद, तुम्हालाही दलितांच्या उत्कट आणि नवजागृत भावनांशी पुढली बारापंधरा वर्षे आट्यापाट्याचा खेळ खेळता आला असता. काहीच द्यायचे नसतानाही देतोदेतोचा भूलभुलय्या उभा करुन दलितांच्या निष्ठांची तुम्हाला अमानुष चेष्टा करता आली असती. तुम्हालाही वेळकाढूपणा करता आला असता. तुम्हालाही सत्तेसाठी सत्त्याची लक्तरे वेशीवर टांगता आली असती. पण तुम्ही हे केले नाही. तुम्हाला शक्य असूनही नामांतराचे राजकारण तुम्ही केले नाही. तुमचे आभार मानायचे ते यासाठी! तुमच्याबद्दल कृतज्ञता बाळगायची ती यासाठी! राजकारणाचा हेतू मूल्यांची प्रतिष्ठा वाढविणे हा असतो. निदान असावा. केवळ खुर्चीसाठी वेडे झालेले राजकारण कोणत्याही गोष्टीला केवळ साधन मानते. कोणत्याही गोष्टीला असे राजकारण बाजारात उभे करते. अशा राजकारणाने संस्कृतीशी फारकत घेतलेली असते आणि माणुसकीच्या प्रेतावरच त्या राजकरणाचे उत्सव साजरे होत असतात.

आपले आणि आपल्या मंत्रिमंडळाचे अभिनंदन करायचे ते यासाठी! आपण मूल्यांची प्रतिष्ठा वाढविली. आपल्या मंत्रिमंडळाने बिहारच्या सर्वश्रेष्ठ विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देऊन स्वतःला उज्ज्वल करुन घेतले आहे.

लालूप्रसाद, तुमचे हार्दिक अभिनंदन यासाठी की बिहारमधल्या लोकांशी बोलायला पाहिजे, बिहारमधल्या लोकांशी बोलले पाहिजे अशा युक्तयांचा अवलंब नामांतर लांबवण्यासाठी तुम्ही केला नाही. तुम्ही आणि तुमच्या मंत्रिमंडळाने धडक निर्णय घेतला आणि ठरावाची अंमलबजावणीही आपण सुरु केली. तुम्ही आमच्या महाराष्ट्रासारखे केले असते तर तुम्ही नामांतर कधीच करु शकला नसता. महाराष्ट्रात नामांतर न करण्याची पद्धती वापरली जाते. तुमचे अभिनंदन यासाठी की तुम्ही ती पद्धती

नाकारली.

लालूप्रसाद, तुम्ही मंडल आयोगाच्या संदर्भातही अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. मंडल आयोगाची लढाई अर्थातच अजून संपली नाही. ती परत नव्या तयारीने आणि नव्या पद्धतीने सुरु व्हायला पाहिजे. मागील दीड-दोन वर्षात आपले नाव कानावर सारखे दुमदुमत आहे. वर्तमानपत्रांमधून आपली धाडसी वक्तव्ये अधूनमधून वाचतो. आपण अगदी अचूक दिशेवर पावले टाकत आहात हे लक्षात येते. आपल्या कृती आणि उक्ती या गोष्टी केवळ राजकारणी माणसाच्या व्यक्तित्वात न बसणाऱ्या अशा आहेत. केवळच राजकरणी माणूस सत्तेच्या ध्येयधोरणाने निर्णय घेतो. त्याच्या कृतीउक्तींना खुर्चीच्या लाळघोट्या मर्यादा असतात. खुर्चीधार्जिणे असे ते राजकारण असते. आपण राजकारणी आहात पण केवळ राजकारण या शद्वाच्या कक्षेतच आपले व्यक्तिमत्व बसत नाही. आपण त्याहीबाहेर खूप विस्तारलेला आहात. आपण राजकारणासाठी मूल्यांचा बळी देणारे राजकारणी नाहीत तर मूल्यांसाठी राजकारणाचा उपयोग करुन घेणारे राजकारणी आपण आहात. असे राजकारणी फार कमी असतात. असेच एक व्यक्तिमत्व अलीकडच्या काळात केंद्राला लाभले होते पण ते पचले नाही. ते बाहेर फेकले गेले. पण अशा छोट्यामोठ्या पराभवांनी मूल्यांची महत्ता कमी करता येत नाही. आपण मूल्यांची महत्ता प्रस्थापित करणारे मुख्यमंत्री आहात. आपण मूल्यांच्यामागे धावणारे राजकराणी आहात असे आम्हा आंबेडकर-प्रेमींना वाटते म्हणून आम्ही आपले मनापासून आभार मानतो आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने विद्याभूषण आहेत. सतत अभ्यास, सतत चिंतन आणि सतत लेखन हेच बाबासाहेबांचे आयुष्य झाले होते. एक अखंड ज्ञानाराधना, एक अखंड व्यासंग हेच त्यांच्या आयुष्याचे वर्णन करावे लागेल. शिवाय कोणत्यातरी एकाच क्षेत्रात बाबासाहेबांची बुद्धिमत्ता बांधली गेली होती असेही नाही. तिला ज्ञानाचे कोणतेही क्षेत्र वर्ज्य नव्हते. कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र अशा बहुतेक सर्वच शास्त्रांमधील सर्वोच्च पदव्या बाबासाहेबांनी त्या त्या शास्त्रात मूलभूत संशोधन करुन मिळविलेल्या होत्या. एखाद्या ज्ञानकोशासारखे, एखाद्या विश्वकोशासारखे त्यांचे व्यक्तिमत्व होते. हे व्यक्तिमत्व त्यांनी अखंड व्यासंगाने घडविले होते. हे व्यक्तिमत्व ना आकाशातून पडले होते ना बापजाद्यांच्या पुण्याईने त्यांना फुकट मिळाले होते. हे अथांग व्यक्तित्व कष्टातून, अखंड परिश्रमातून उगवले होते. अभावातून प्रखरपणे साकार झाले होते. भारतातल्या या सर्वश्रेष्ठ विद्याधराचे नाव आपण बिहार विद्यापीठाला दिले. एका ज्ञानसागराचे नाव आपण दिले. एका विद्यावीराचे, एका ज्ञानसम्राटाचे नाव

आपण बिहार विद्यापीठाला दिले. लालूप्रसाद तुमचे नाव बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व मुलांनी आपापल्या काळजावर कोरुन ठेवले आहे. तुम्ही एकदा म्हणाला होतात लालूप्रसाद की "हम अपने काम से लोगों के दिल में जगह बनाएंगे." आमच्या हृदयात तुम्ही नेहमीसाठी एक स्थान निर्माण केले आहे. गौरवाचे स्थान. गर्वाचे स्थान. आम्हाला तुमचा गर्व वाटतो लालूप्रसाद.

तुम्ही प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला दिले त्यावेळी भारताच्या लोकशाहीच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू दाटून आले असतील. या देशाचा इतिहास आपादमस्तक थरारला असेल आणि अमानुष परंपरांनी माना खाली घातल्या असतील. भारतीय संविधानाचा गळा गदगदला असेल. त्यातील धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व रोमांचित झाले असेल. विचारही न करणारे लोक या देशात खूप आहेत. पण तुम्ही केवळ विचार करुनच थांबला नाहीत तर तुमच्या धडाकेबाज पद्धतीने तो विचार जगलात तुम्ही लालूप्रसाद! शक्य असते तर तुमच्या गळ्यात गौरवाचा हार घालून जीव भरुन तुम्हाला जयभीम केला असता. ते नाही करता येत. पण मला आणि बाबासाहेबांच्या इतरही सर्व कोट्यवधी मुलांना हे करता आले नाही तरी संपूर्ण भारतातल्या आंबेडकर समाजाने तुमच्या गळ्यात कोट्यवधी हार घातले आहेत आणि भरुन आलेल्या मनाने तुम्हाला कोट्यवधी धन्यवाद दिले आहेत.

हे सर्व लोक माणुसकीसाठी हपापलेले लोक आहेत लालूप्रसाद. त्यांनी अपमान गिळले. खस्ता खाल्ल्या. वंचना आणि तुच्छता झेलली. त्यांना हजारो वर्षे समता मिळाली नाही. स्वातंत्र्य मिळाले नाही. या देशातील माणसांकडून त्यांना माणुसकीचा अनुभव क्वचितच आला. त्यांना इथे पशूच खूप भेटले. माणसे क्वचित भेटली. त्यामुळे माणूस भेटला की हे मनापासून गहिवरुन येतात. तुम्ही बिहार विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव दिले आणि या सर्वांची इतिहासभर जळली पोळली मने चाफ्याच्या झाडांसारखी गदगदून आली. या देशातले हे सारे लोक काय मागताहेत लालूप्रसाद? पोटभर समता मागताहेत. घोटभर पाणी मागत आहेत. माणुसकी उघडी पडून देश बदनाम होणार नाही इतके वस्त्र मागत आहेत. डॉ. आंबेडकरांनी आदर्श म्हणून चितारला तो माणूस प्रत्येकापाशी मागत आहेत. ते ईश्वर मागत नाहीत. स्वर्ग-मोक्ष मागत नाहीत. पुनर्जन्म मागत नाहीत. माणूस म्हणून जगू इच्छिणारी ही माणसे देशभर फिरत माणूस मागताहेत. आणि माणूस मागणारी ही माणसे त्यांना माणूस म्हणून उभे करणाऱ्या आंबेडकरांची अथांग करुणा मागत आहेत. या लोकांनी १९७८ साली महाराष्ट्रातल्या एका विद्यापीठासाठी आपल्या माणुसकीच्या या शिल्पकाराचे नाव मागितले. ही फार

मोठी मागणी नव्हती. पण या देशाचे संविधान लोकशाहीच्या विरोधकांचे चेहरे १९७८ पासून वाचत आहे. भारतीय लोकशाहीच स्वतः दांभिकांची, दाखवेखोरांची शिरगणती करते आहे. इथे नामांतर होत नाही. बाबासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात तरी महाराष्ट्रातल्या मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर होईल अशी आशा बाबासाहेबांच्या अनुयायांना होती. पण जन्मशताब्दी वर्षाचीही आता संध्याकाळ होत आली आहे. आणि अवतीभोवतीच्या घटनांची धर्मांध साक्ष काढली तर नामांतर होणे इथे शक्यच नाही असेच वाटते.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासाठी दलितांनी पुरेशी किंमत दिली. तीनशे तीस गावांवर हल्ले झाले. दोनशे कुटुंबांवर अत्याचाराची आग सांडली. सतराशे पंचवीस घरे बेचिराख करण्यात आली होती. पोचिराम कांबळे, जनार्दन मोवाडे, सोमाजी यांचे आणि अलीकडे पोचिरामचा मुलगा चंदर कांबळे यांचे निर्घृण खून करण्यात आले. नागपूरातही अत्याचार झाले. लोकांनी लाठ्या झेलल्या. लोक जेलमध्ये गेले. हे असेच खूप खूप झाले. लोकांनी किंमत दिली पण बदल्यात त्यांना प्रतारणेशिवाय काय मिळाले? फसवणुकीशिवाय काय मिळाले? ही आमच्या महाराष्ट्राची कथा लालूप्रसाद! आता लोकांच्या लक्षात यायला लागले आहे की खायचे दात वेगळे आहेत आणि दाखवायचे दात वेगळे आहेत.

महाराष्ट्रात गेली बारा-तेरा वर्षे केले गेले तसे आंबेडकराच्या चाहत्यांच्या आणि अनुयायांच्या नाजूक आणि उत्कट भावनांशी खेळ खेळण्याचे क्रौर्य तुम्ही केले नाही लालूप्रसाद. तुम्ही खऱ्या अर्थाने लोकशहीचे सुपुत्र ठरलात. तुम्ही बिहारची शान वाढविली. तुम्ही लोकशाहीची मान उन्नत केली. आम्हाला तुमच्यासारखी माणसे हवी आहेत. आमच्या परिवर्तनाच्या चळवळीला एक नाही, हजारे-लाखो-कोट्यवधी लालूप्रसाद हवे आहेत. आमच्या महाराष्ट्रात तुमच्यासारखी माणसे असती तर गद्दरच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने नागपूरात दलितांना पोलिसांनी बेदम मारले नसते. महाराष्ट्रात तुमच्यासारखा माणूस असता तर दलित रंगभूमीला नाटके करायला बंदी घातली गेली नसती. प्रश्न ऐरणीवर येत आहेत पण तुमच्यासारखा माणूस इथे असता तर हे प्रश्न निर्माण होण्याची गरजही भासली नसती.

महाराष्ट्र ही बाबासाहेब आंबेडकरांची कर्मभूमी. प्रमुख अशी कार्यक्रमभूमी. महाराष्ट्रात बाबासाहेबांनी परिवर्तनाचे युगप्रवर्तक प्रयोग केले. येथील दलित-बहुजनांना महाराष्ट्राच्या प्रयोगशाळेतच त्यांनी क्रांतीची सूत्रे समजावून सांगितली. प्रयोगाची मांडणी करुन दाखविली. त्या महाराष्ट्रात नामांतराच्या

निमित्ताने डॉ. आंबेडकरांचा गेली बारा-तेरा वर्षे अपमान होतो आहे. हा भारताच्या संविधानाच्या शिल्पकाराचा, माणुसकीच्या घटनाकाराचा संतापजनक अपमान आहे. लालूप्रसाद पण तुम्ही मात्र बाबासाहेब आंबेडकर बिहारचे असावेत तसा त्यांचा गौरव करुन ठेवला. 'लोकांच्या हिताची गोष्ट, चांगली गोष्ट लोकांच्या विरोधात जाऊनही करावी लागते' असे बाबासाहेबच म्हणाले होते. पण इथे धर्मान्ध, परंपरावादी, चातुर्वर्ण्यवादी आणि जातीवादी शक्तींच्या भावनांना जपण्यासाठी धर्मनिरपेक्षतावादी भावनांना तुडविले जाते. परिवर्तनवादी मनांचा अवमान केला जातो. ही लोकशाहीची विटंबना आहे लालूप्रसाद! तुम्ही म्हणाला होता "**उन्हे चाणक्य बनने दिजिए, लेकिन पाटलिपुत्र में मैं चंद्रगुप्त की तरह उभरुंगा.**" आमच्याकडे चाणक्यच उभरत आहेत. चाणक्यच होत आहेत. तुमचे आभार मानायचे ते तुम्ही चाणक्य होणे टाळले याबद्दल. तुम्ही भारतीय लोकशाहीचे कर्तबगार सुपूत्र होऊन दाखविले याबद्दल. भारतीय संविधानाचा गौरव वाढविल्याबद्दल. आम्ही सर्वच, अगदी जगभरचे बाबासाहेब आंबेडकरांचे चाहते आणि अनुयायी तुमचे मनःपूर्वक ऋणी आहोत. कृतज्ञ आहोत. बाबासाहेबांचे नाव बिहार विद्यापीठाला दिल्याबद्दल आभार लालूप्रसाद, तुमचे शतशः हार्दिक आभार.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

तेवीस नामांतर

आज उणी-पुरी चौदा वर्ष होत आहेत. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न तसाच लोंबकळत पडलेला आहे. का? नामांतर का होत नाही? नामांतराला विरोध कोणाचा आहे? या विरोधाचे स्वरुप काय आहे? हा विरोध सामाजिक आहे काय की धार्मिक आहे? या विरोधामागे महाराष्ट्राच्या राजकारणातील कोणत्या दृश्य-अदृश्य शक्तींच्या भूमिका उभ्या आहेत? मागल्या चौदा वर्षात ज्यांनी हे नामांतर होऊ दिले नाही ते कोण आहेत? नामांतर होण्याची चिन्हे आज तरी दिसत नाहीत. तेव्हा नामांतर होईल काय? त्यासाठी काय व्हावे लागेल अशा प्रश्नांच्या अनुषंगाने इथे थोडी चर्चा करायची आहे.

लोकशाही प्रश्नांकीत झाली

अनेक विद्यार्थी संघटनांनी, सामाजिक संघटनांनी, साहित्य संमेलनांनी, युवक संघटनांनी, राजकीय पक्षांनी नामांतराला समर्थन दिले होते. खुद्द मराठवाडा विद्यापीठ कार्यकारिणीने बाबासाहेबांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याचा ठराव मंजूर केला होता. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रीमंडळानेही नामांतराचा निर्णय घेतला होता. शरद पवार मुख्यमंत्री असताना शासनाच्या दोन्ही सभागृहांनी नामांतराचा ठराव बिनाविरोध पारीत केला होता. लोकशाही इथे प्रश्नांकित होते! दोन्ही सभागृहांनी पास केलेल्या ठरावाची आता चौदा वर्ष होत आली तरी अंमलबजावणी होत नाही याचा अर्थ लोकशाही तत्त्वानुसार घेतलेल्या निर्णयाला इथे काहीही अर्थ नाही. लोकशाहीचा हा पराभव आहे. लोकशाहीचा हा अपमान आहे. नामांतराचा हा लोंबकळत ठेवला गेलेला प्रश्न लोकशाहीचे दिवाळे जाहीर करायला लावणरा प्रश्न आहे. नामांतराला विरोध

करणारांनी आपण लोकशाहीचे किती आणि कसे मारेकरी आहोत ते एकदा समजावून घेतले पाहिजे. एवढेच नव्हे तर लोकशाहीसंबंधी आणि डॉ. आंबेडकरांसंबंधी आपण कोणत्या नाकाने बोलणार आहोत त्याचाही विचार केला पाहिजे.

दांभिकपणाची कमाल

नामांतराला बगल देणे म्हणजे केवळ दलितांचा अपमान करणे अशी सोयीची समजूत कोणी करुन घेवू नये. बाबासाहेबांच्या फोटोला किंवा पुतळ्याला हार घालून आणि एखाद्या समारंभात त्यांच्या नावाचा उच्चार करुन कृतार्थ होता येते असे वाटणाऱ्यांची संख्या इथे भरपूर आहे. पण नामांतराचा प्रश्न लोंबकळत ठेवून बाबासाहेबांच्या फोटोला वा पुतळ्याला हार घालणे आणि त्यांच्या नावाचा उच्चार करणे हा केवळ दांभिकपणा असतो हे विसरु नये.

या देशाला सेक्युलॅरिझमकडे नेणारे संविधान देणारे डॉ. आंबेडकर, या देशातील शिक्षणाला सेक्युलॅरिझमकडे नेण्यासाठी शिक्षणाची प्रक्रिया गतिमान करणारे आंबेडकर आणि भारतीय समाजाच्या मनाला सेक्युलॅरिझमशी जोडणारी क्रांतीनैतिकता धम्मबद्ध करणारे आंबेडकर समजावून घेणे या देशातील लोकांना परवडत नाही असे दिसते. त्याशिवाय काही येथील काही मंडळींनी नामांतराला विरोध केला नसता. तेव्हा एका बाजूने बाबासाहेबांचे तोंडदेखले नाव घ्यायचे आणि दुसऱ्या बाजूने आंबेडकरांच्या विचाराला, आंबेडकर संस्कृतीला आणि नामांतराला नाकारायचे, हा दांभिकपणाचा कळस होय असेच म्हटले पाहिजे.

विरोधामागे हिंदुत्ववाद

नामांतराच्या मागे प्रारंभापासून छुप्या वा प्रकट पद्धतीने हिंदुत्ववाद्यांनी विरोध केला आहे. या विरोधामागे परंपरावादी आणि जातीयवादी मन उभे आहे. वर्ण जातीवादी मनाने वर्ण-जाती मोडण्याचा धसका घेतला आहे. बौद्ध संस्कृती किंवा आंबेडकर संस्कृती या देशात प्रस्थापित झाली तर हिंदूसंस्कृतीचा दारुण पराभव इथे होईल आणि आपण उघड्यावर पडू असे समतेची भीती बाळगणारांना वाटणे साहजिक आहे. मराठवाड्यातील सर्वसामान्य जनतेच्या मनात आंबेडकर महार आहेत, ते महारांचे राज्य इथे आणू इच्छितात, हे कोणी भरविले? सर्वसामान्य जनतेला हे जहर हिंदूमधल्या राजकारण्यांनी, कार्यकर्त्यांनी आणि शिकल्यासवरल्या लोकांनी पाजले. हे मूठभर लोक देशाच्या संविधानाच्या शिल्पकाराची अजूनही जात पाहतात. नामांतराला विरोध करणारे मन जातीच्या अहंकाराने धुंदावलेले मन आहे. आंबेडकरांच्या समता संस्कृतीचा

विरोध करणारे प्रतिगामी मन आहे. या लोकांनी मराठवाड्यातील सर्वसामान्य जनतेच्या मनात आंबेडकर द्वेष पसरविला आहे. या हिंदूत्ववादी राजकारण्यांच्या, कार्यकर्त्यांच्या आणि सुशिक्षितांच्यासाठी महाराष्ट्र शासन कोणती भूमिका घेत आहे त्याचाही विचार झाला पाहिजे. महाराष्ट्र शासन याप्रकारे आंबेडकर द्वेष पसरविणाऱ्या लोकांच्या कारवायांना मान देऊन नामांतर करीत नसेल तर हे शासन हिंदूत्ववाद्यांच्या कलाने वागते आणि भारतीय संविधानातील सेक्युलॅरिझमची पत्रास बाळगीत नाही असा त्याचा अर्थ होईल. पण असे होऊ नये असे वाटत असेल तर महाराष्ट्र शासनाने सेक्युलर भूमिकेशी प्रामाणिक राहून तातडीने नामांतर करावे असे मला वाटते.

नामांतराच्या श्रेयाची माळ

अगदी प्रारंभी नामांतराचे आंदोलन पेटले त्यावेळी श्रेयाचा मुद्दा उपस्थित झाला आणि नामांतर त्यामुळे होऊ शकले नाही असे समजले जाते. बाबा आढवांना नामांतराचे श्रेय जाणार नसेल तर नामांतरच होऊ द्यायचे नाही. असे घडले असेल तर मुद्दा गंभीर आहे. त्याचे फार वेगवेगळे अर्थ होतात. खुद्द बाबा आढावच मग नामांतर विरोधाची अदृश्य आघाडी उभी करु शकतात. शासन त्यांचे, मुख्यमंत्री त्यांचे आणि या बळावर ते नामांतराला कोलदांडा देऊ शकतात असा त्याचा अर्थ होईल. ते काहीही असले तरी आज मात्र महाराष्ट्र शासनाला नामांतर करायला काय हरकत आहे असा प्रश्न आहे.

शासनानेच श्रेय घ्यावे

शरद पवार आता मुख्यमंत्री नाहीत आणि बाबा आढावांचा आता श्रेयासाठी निघालेला मोर्चाही नाही. २७ जुलैला आंदोलन कोणते स्वरुप धारण करते ते आताच सांगता यायचे नाही. तेव्हा त्याआधीच म्हणजे सगळी आंदोलने शांत असताना ना. सुधाकरराव नाईकांनी नामांतर करुन टाकावे. असे झाले तर श्रेयासाठी भांडणारांचा एक तीव्र मुद्दा नामांतराच्या प्रक्रियेतून आपोआपच वजा होऊन जाईल. मुख्यमंत्र्यांना या निमित्ताने अशी विनंती करावीशी वाटते की परिवर्तनाचा कोणताही मुद्दा लोकांच्या मर्जीने अमलात आणता येत नाही. निदान विषमतेच्या अमानुष परंपरा असलेल्या या देशात परिवर्तनाशी निगडीत कोणतीही गोष्ट लोकांच्या मर्जीने शक्य होणार नाही. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे सेक्युलॅरिझम इत्यादी गोष्टी लोकांच्या इच्छेपुढे नमून प्रत्यक्षात आणता येणार नाहीत. ही गोष्ट एखाद्या लालूप्रसाद यादवाला महाराष्ट्रापासून दूर राहूनही कळते आणि फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात मात्र या संदर्भात गहन अंधार असतो याचा अर्थ सुखद नाही, हे उघड आहे.

लालूप्रसाद यादवांची पद्धती हीच परिवर्तनाची योग्यतम पद्धती होय. चर्चा, मनपरिवर्तन, सामोपचाराची बोलणी या गोष्टी लालूप्रसाद करीत बसले असते तर लालूप्रसाद यादव पाटण्याच्या विद्यापीठाला कधीही बाबासाहेबांचे नाव देऊ शकले नसते. लोकशाहीचा मथितार्थ लोकांच्या उन्नयनाची गोष्ट लोकांच्या विरोधात जाऊनही करणे हा आहे. हे आपण विसरता कामा नये.

बाबासाहेबांची जन्मशताब्दी आणि नामांतर

महाराष्ट्र शासनाला विनंती करावीशी वाटते ती ही की शासनाने एप्रिल १९९३ पर्यंत बाबासाहेबांच्या जन्मशताब्दीचा काळ वाढविला आहेच. या कालात नामांतर झाले नाही तर पुढे कधी होणे शक्य नाही. हे नामांतरवाद्यांच्या लक्षात आले आहे. तेव्हा कोणाच्याही रेट्याने वा आंदोलनाचा परिणाम म्हणून नामांतर होण्यापेक्षा, निवडणुकीच्या राजकारणाची सोय म्हणून नामांतर होण्यापेक्षा महाराष्ट्र शासनाने अत्यंत अनपेक्षितपणे नामांतराची अंमलबजावणी करावी आणि स्वतःला सन्माननीय करुन घ्यावे.

सत्ता मिळविण्याच्या प्रक्रियेतील एक अनुकूल वा प्रतिकूल मुद्दा म्हणून नामांतराचा कोणीही वापर करीत असेल, आपले मंत्रीपद वा आमदारपद टिकविण्यासाठी म्हणून या मुद्याचा वापर कोणी करीत असेल तर तो बाबासाहेबांचाही अपमान होईल आणि नामांतरासाठी जे मेले त्यांचा, नामांतर व्हावे असे ज्यांना वाटते त्या सर्वांचा आणि त्याहून भारताच्या संविधानाचा तो घोर अपमान होईल. हे सर्व टाळून केलेले नामांतरच खरे सन्मानाचे नामांतर होईल असे मला प्रांजळपणे वाटते.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

चोवीस पँथरपुढील आव्हाने

पँथरपुढे आज अनेक जळती आव्हाने आहेत. जीवनाच्या सर्व क्षेत्रांमधून उभी राहिलेली ही आव्हाने आहेत. राजकारण, धर्म, समाज, शिक्षण अशा सर्व क्षेत्रातील ही आव्हाने आहेत. ही आव्हाने अशी जटील आहेत, इतकी भयानक आणि सर्वव्यापी आहेत की अशी आव्हाने असलेल्या समाजाचे, राष्ट्राचे आणि त्यातील माणसांचे जगणे सर्वस्वी प्रश्नार्थक होऊन जाणे.

वरील सर्व क्षेत्रांमधील आव्हानांची नुसती ओळख जरी झाली तरी आपल्या समाजाचे केवढे अधःपतन झालेले आहे ते सहज लक्षात येऊ शकेल.

वरील क्षेत्रांमधील आव्हाने पाहिली की भारतीय समाजाचा केवढा नैतिक ऱ्हास झालेला आहे, अनंत तीव्र विसंगतींनी त्याचे जगणे कसे फाटून गेले आहे आणि मूल्यदर्शी जगण्याला हा समाज केवढा पारखा झालेला आहे त्याची लाज आणणारी जाणीव सहजच होऊ शकेल.

या समाजाचे मन भ्रष्टाचारी झालेले आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शिक्षण या क्षेत्रातील भ्रष्टाचार आकाशातून सांडत नाहीत, ते समाजाच्या मनातून फुलत असतात. एक भयावह नैतिक अराजक या समाजात आज माजलेले आहे. नैतिक मूल्यांशी, मानवप्रतिष्ठेच्या मूल्यांशी प्रचंड निर्दय फारकत या समाजाने घेतलेली आहे.

अन्यायमुक्तीचा संदेश

पँथर ही जातीपुरती संघटना नव्हे. पँथर ही संपूर्ण अन्यायग्रस्त भारताला अन्यायमुक्त करु इच्छिणारी संघटना आहे. ही संघटना बाबासाहेब आंबेडकरांच्या गंभीर

तत्त्वज्ञानाशी आणि या तत्त्वज्ञानानुसार करावयाच्या समाजक्रांतीशी बांधलेली एक अत्यंत जबाबदार संघटना आहे.

सर्वच माणसांना मुक्तपणे उजेडू देणारा समाज हे या संघटनेचे ध्येय आहे आणि या ध्येयाच्या आड येणाऱ्या सर्व प्रकारच्या कुरुपतांच्या विरुद्ध विद्रोह पुकारुन माणसांच्या व्यक्तिमत्वांना मुक्तपणे फुलू देण्याचा मार्ग मोकळा करण्याचा विडा या संघटनेने उचललेला आहे.

संघटनेची प्रतिज्ञा

एक मनुष्य एक मूल्य हे बाबासाहेबांनी दिलेले माणसासंबंधीचे सर्वश्रेष्ठ स्वप्न या संघटनेने आपल्या भाळावर कोरलेले आहे. सर्वांनी भावाभावांसारखे वागावे ही या राष्ट्राला गौरव वाटावा अशी प्रतिज्ञा या संघटनेची आहे. समाजजीवनासंबंधीची या संघटनेंची सौंदर्यभावना अत्यंत तीव्र आहे. त्यामुळे सामाजिक असुंदराची अत्यंत उत्कट जाणीव या संघटनेला होते.

या देशातील बुद्धीप्रामाण्यवादाचा वारसा बाबासाहेबांकडून या संघटनेने निष्ठेने स्वीकारला आहे. पण या अशा संघटनेपुढे आज अनेक आव्हाने दात विचकीत उभी आहेत. या आव्हानांची तीव्रपणे जाणीव होऊ शकेल, त्यांच्याशी मुकाबला करु शकेल अशा संघटनेची आज नितांत गरज आहे. पँथर हे करु शकेल काय? पँथर हे करु शकत नसेल, वरील आव्हानांना ती मूठमाती देऊ शकत नसेल, तर पँथरने स्वतःला संपवून टाकणेच योग्य होईल. पण मला स्वतःला प्रामाणिकपणे वाटते की मनात आणले तर पँथर हे करु शकते. पँथरने हे जाणावे, पँथरने त्या संदर्भात तीव्र नैतिक भूमिका घ्यावी, पँथरने संघटना म्हणून स्वतःला अत्यंत प्रभावी करावे आणि आपण अस्तित्वात असण्याचा गौरव सिद्ध करावा या सद्भावनेने मी लिहितो आहे.

आंबेडकरी समाजाचे दायित्व

संपूर्ण अन्यायपीडित भारताची ही संघटना व्हावी हे खरेच. सनदशीर अशा लोकशाही मार्गाने तिने लढे उभारावेत हेही खरेच असले तरी प्रारंभ करतानाच हे लक्षात येते की जो आंबेडकरी समाज या देशातील आमूलाग्र क्रांतीचे नेतृत्व करणार आहे त्या समाजाची सामाजिक आणि राजकीय अवस्था आज काय आहे?

या समाजात सामाजिक क्षेत्रात प्रबोधनाचे, क्रांतीविचार फुलविण्याचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पूर्णतः अभाव आहे. हा इलाखा या संदर्भात कोणीही दुष्काळग्रस्त इलाखा म्हणून जाहीर करावा अशी त्याची अवस्था आहे. कारण उघड आहे. या क्षेत्रात

द्यावे खूप लागते. मिळत मात्र काहीही नाही. त्याला निर्वाहासाठी काही मिळत नाही. मान मिळत नाही. तो खराच बुद्धिप्रामाण्यवादी विचार सांगत असला तर त्याला प्रतिसादही मिळत नाही. त्याची उपेक्षा होते. वेड्याचे घर उन्हात तसे त्याचे घर नेहमीच उन्हात असते. आंबेडकरी समाजात आज सामाजिक कार्यकर्त्यांची शक्ती नाही. ही सगळी उपेक्षा, अपमान आणि गैरसोय सहन करीत समाजाच्या विझलेल्या मनाला चेतवीत, दिशाशून्य मनाला उजेडाच्या वाटेवर आणित फिरणारा कार्यकर्त्यांचा वादळी वर्ग नाही.

राजकारणाची ओढ नको

सर्व लोक या क्षेत्रात राजकारणाच्या श्रीमंत कुरणाकडे धावून जाताना दिसतात. तिथे मोहाची झाडे आहेत. तिथे लगबग अनेक गोष्टी मिळतात. स्टार व्हॅल्यू येतो. समाजाचे क्षेत्र मात्र या राजकारणात झेपावत जाणाऱ्या लोकांकडे उपाशी मनाने पाहात राहते. सामाजिक क्षेत्राची अवस्था या संदर्भात रेल्वे प्लॅटफॉर्मसारखी झालेली आहे. राजकारणाची गाडी येईपर्यंतच माणसे या प्लॅटफॉर्मवर थांबतात. गाडीची वाट पाहण्यासाठी थांबावेच लागते म्हणून थांबतात.

अर्थात हेही उगीचच घडणार नाही. समाजक्षेत्रात सतत उलंगवाडीचा मोसमच असावा अशी तरतूद तर कोणी करीत नसेल? अशी तरतूद सत्ताधारी मंडळी करीत असतात, पण हे राजकारणाच्या गाडीत बसून जाऊ पाहणाऱ्यांच्या लक्षात येत नाही. एकदा या गाडीची चटक लागली की ही मंडळी स्वतःला बाजारात मांडतात, त्याचे विशेष काहीच नाही पण ते आंबेडकर विकायला लागतात त्याची खंत वाटते. हे आंबेडकरांचे विक्रेते नेते, स्वतःच्या राजकीय आणि आर्थिक स्वार्थासाठी स्वतःला विकणारे नेते हे पँथरपुढले अत्यंत जटील आव्हान आहे.

जोवर हे आव्हान आहे तोवर आंबेडकरी चळवळीला कोणीही पुढे नेऊ शकणार नाही हे उघड आहे. पँथरला या आव्हानाकडे दुर्लक्ष करणे जमत असेल तर पँथरला काहीही जमणे कठीण आहे.

नेत्यांचे स्वार्थी वर्तन

आंबेडकरी नेत्यांच्याच संदर्भात थोडे बोलायचे तर राजकारणात तस्करी करणारे सर्वच नेते एकदमच राष्ट्रीय पातळीवरचे होऊन जातात. पाहता पाहता नेते गब्बर होतात आणि चळवळ होती तशीच कंगाल राहते. नवोदित नेत्यांचे स्वार्थी वर्तन सत्ता लक्षात घेते आणि या नेत्यांना गुंडाळून घेते. आंबेडकरी समाजाचे आजचे राजकारण अगदी बिनचेहऱ्याचे राजकारण झालेले आहे. बाबासाहेबांवरील निष्ठा, प्रामाणिकपणा,

निःस्वार्थीपणा, त्यागवृत्ती आणि समाज-परिवर्तनाची कळकळ या गोष्टी कशा आणि कुठे गहाळ झालेल्या आहेत त्याचा विचार समाजातील सर्वांनीच करायला हवा आहे. सत्तेने या राजकारणाची चौफेर मोडतोड केलेली आहे. नेत्यांचे निर्बिजीकरण सत्तेने केलेले आहे. या आव्हानाला तोंड देऊनच पँथरला अर्थवान होता येईल, अन्यथा नाही.

आंबेडकरी समाजातही नाना पातळ्यांवरची पडझड झालेली आहे. खरी आंबेडकरी नैतिकता सर्वांपर्यंत पोचविण्याची गरज आहे. आंबेडकरी चळवळींत छुप्या आणि प्रकट पद्धतींनी वावरणारे हिंदुत्ववादी समाजाची दिशाभूल करीत आहेत. अस्मितेचे हिंदुत्ववादी आदर्श चारुन ते लोकांच्या मनातील आंबेडकरी आग विझवीत आहे. धर्मसत्तेच्या घरी हे आंबेडकर गहाण टाकीत आहेत. हे आव्हान पँथर टाळूच शकत नाही. पँथर ते टाळणार नाही याची खात्री वाटते.

पँथरपुढील आव्हान

बाबासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात दलितांवरील अत्याचार वाढत आहेत. येथील प्रतिगामी आणि आंबेडकरविरोधी शक्तींना आंबेडकर तत्त्वज्ञानातील क्रांतीसामर्थ्य कळले आहे. आंबेडकरी जनतेवरील अत्याचार हा त्याचा पुरावा मानायला हवा. पँथरला एका बाजूने आंबेडकरांचे क्रांतीरुप अधिकाधिक प्रज्वलित करीत न्यायचे आहे तर दुसऱ्या बाजूने सगळा बहिष्कृत भारत या बंधमुक्तीच्या मोर्चात सामील करुन घ्यायचा आहे. हे आव्हान पँथरलाच स्वीकारावे लागेल.

अंधश्रद्धांचे आव्हान आहे, दारुसारख्या भंयकर व्यसनांचे आव्हान आहे, अत्यंत फालतू गोष्टींवरुन परस्परात भांडत राहण्याच्या क्षूद्र प्रवृत्तीचे आव्हान आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांचे आव्हान आहे अशी अनेक आव्हाने आहेत. स्वतःला मोठे साहित्यिक म्हणवीत आंबेडकरांच्या क्रांतीविचाराला प्रतिगाम्यांच्या शिबिरात नेऊन बांधणाऱ्या आंबेडकरद्रोह्यांचे आव्हान आहे, पोटजातींची दुर्गंधी जपणाऱ्या आणि पसरवणाऱ्या व्यवस्थेच्या एजंटांचे आव्हान आहे. अशी खूप आव्हाने आहेत.

वरील सर्व आव्हाने अत्यंत भीषण आहेत. पण पँथरपुढे सर्वात जटील आव्हान आहे ते पँथरच्या पडझडीचे. पँथरला खूपदा तुटावे लागले. फिनिक्स पक्षाप्रमाणे खूपदा आपल्याच गरम राखेतून जन्म घ्यावे लागले. उड्डाणे घ्यावी लागली. पँथर आहे आणि ती जिवंत आहे, पण या पँथरची आज खूप मोडतोड झाली आहे. महाराष्ट्राच्या सत्ताकांक्षी राजकारणाने पँथरची अत्यंत दयनीय अवस्था केलेली आहे. या पडझडीतून पँथर समर्थपणे कशी उठू शकेल असा प्रश्न आहे. या प्रश्नाला उत्तरच नाही असे नाही. ज्याला उत्तर नसते असा प्रश्नच संभवत नसतो. तर याही प्रश्नाला उत्तर आहे. ते उत्तर म्हणजे 'कार्यकर्ता' हे होय.

पँथरची पडझड कार्यकर्त्यांच्या अभावामुळे झालेली आहे. पँथर प्रचंड शक्तीशाली व्हावी हे स्वप्न बाळगणारा मी एक मनुष्य आहे म्हणूनच मला या पडझडीचे अत्यंत वाईट वाटते. समाज कार्यकर्त्यांच्या जीवावर जीव द्यायला तयार असतो. कार्यकर्ता ही महाशक्ती आहे. कार्यकर्ता हा समाजाच्या वाटचालीत पायांची भूमिका करतो. कार्यकर्ता वेगाची आणि योग्य दिशेची भूमिका वठवीत असतो. तो समाजाचा डोळाही असतो आणि नैतिक आधारही असतो. कार्यकर्ता कसा असावा यासंबंधीही विचार झाला पाहिजे.

कार्यकर्ता कसा असावा

१) आंबेडकरी क्रांती तत्त्वावर त्याची जिवापाड निष्ठा असावी. या तत्त्वज्ञानाची खोल समज त्याला असावी. प्राप्त परिस्थितीचे अचूक विश्लेषण त्याला करता यायला हवे.

२) कार्यकर्ता प्रामाणिक असावा. जनतेच्या उत्थानाचे ध्येय हेच त्याचे ध्येय असावे. स्वतः त्याने वाकू नये. मोडू नये.

३) तो निःस्वार्थी असला पाहिजे. प्रतिष्ठेचा आणि पैशाचा मोह त्याला पडता कामा नये. निःस्वार्थी ही कार्यकर्त्यांची शक्ती असते. ती नसेल तर कार्यकर्ता कार्यकर्ता म्हणून उभाच राहू शकत नाही.

४) कार्यकर्ता निर्व्यसनी असावा. दारु, सिगारेटस्, पाने यांच्या फार मोठ्या परंपरा विद्यमान आहेत. या परंपरांचे अत्यंत खंदे पाईकही डकरताना दिसतात. पँथरच्या कार्यकत्यनि या दिवाळखोर परंपरेशी अत्यंत उत्कट मनाने फारकत घेतली पाहिजे. वरील धुंद परंपरेशी काडीमोड घेणाऱ्या कार्यकर्त्याला समाज डोक्यावर घेईल.

५) त्यागाचे बाळकडू ज्यांना मिळाले ते उत्तम कार्यकर्ते होऊ शकतात. त्याग कार्यकर्त्याला प्रतिष्ठा देईल. त्यागाने कार्यकर्त्यांच्या शद्बांना मोल प्राप्त होईल. त्याच्या प्रत्येक कृतीत प्रभाव भरला जाईल.

६) कार्यकर्ता होणे ही केवढी मोठी जबाबदारी आहे हे कार्यकर्ता होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने ओळखले पाहिजे. कार्यकत्यनि नेता होण्याचे कटाक्षाने टाळले पाहिजे. कार्यकत्यनि कार्यकर्ताच असण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. कार्यकर्त्याजवळ उत्कट संवेदनशीलता आणि सत्यासाठी, न्यायासाठी वाट्याला येतील त्या दुःखांना कवटाळण्याचे धाडस असले पाहिजे. संग्राहक वृत्ती, संघटनकौशल्य आणि लोकांना प्रेरणासूत्रे देण्याची शक्ती त्याच्यात पाहिजे. कार्यकर्ता हे जागृत ऊर्जायन असते.

अशा कार्यकर्त्यांची पँथरला गरज आहे. अशा असंख्य कार्यकर्त्यांनी पँथर प्रभावी झाली तरच आजच्या पडझडीतून पँथर नवे उड्डाण घेऊ शकेल.

पँथरपुढे वरीलप्रमाणे अनेक आव्हाने आहेत. ती सोपी नाहीत. पण पँथरने मनात आणले तर कठीणही काही नाही. पँथरने हे मनात आणावे. पँथरने या देशातील अन्यायग्रस्तांना आधार द्यावा, येथील पीडितांना न्याय द्यावा असे मला वाटते. सर्व क्षेत्रांतील अन्याय जाळणारी प्रभावी आग होणाऱ्या पँथरची आज नितांत गरज आहे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

पंचवीस

दलित पँथर हा आंबेडकरी युवा शक्तीचा धगधगता हुंकार

२३ ऑगस्ट १९७२ मध्ये जन्म झाल्यापासून आजवर वेगवेगळ्या कारणांसाठी पँथर दोनदा बरखास्त करण्यात आली. एकदा आणिबाणीच्या काळात १९७५ मध्ये राजा ढाले यांनी इतर कोणालाही विश्वासात न घेता तिला बरखास्त केले आणि १९८९ च्या उत्तरार्धात दलित नेत्यांच्या ऐक्याच्या संदर्भात रामदास आठवले यांनी इतर पँथर्सच्या भावनांना न जुमानता दुसऱ्यांदा पँथर बरखास्त केली. याशिवाय राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण अशा जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील दांभीक थोरामोठ्यांनी तिला अनेकदा फोडण्याचा प्रयत्न केला, तिला नष्ट करण्याचे मुत्सद्दी प्रयत्न केले. हे सर्व वेळोवेळी झाले तरी पँथरची गरज कालही जिवंतच होती. आजही ही गरज जिवंतच आहे. मी तर असे मानतो की पँथर ही या प्रतिगामित्वाने आणि अमानुषत्वाने ठार वेड्या झालेल्या समाजाची एक चिरंतन आवश्यकता आहे. पँथर हा आंबेडकरी युवाशक्तीचा धगधगता हुंकार आहे. आंबेडकर समाजाच्या जगण्यातले ते तारुण्य आहे. कोणत्याही समाजात विद्रोह, क्रांती घडावी अशी ओढ असणारी एक मानसिकता आहे. या मानसिकतेला प्रकर्षाने मूल्यगर्भ परिवर्तनाचा ध्यास लागलेला असतो. आंबेडकरी प्रेरणेचे अग्निजल पिऊन जन्माला आलेल्या पँथरच्या रुपाने ही मानसिकता आपल्या समाजात वावरते आहे म्हणून पँथर ही चिरंतन आवश्यकता आहे असे मी म्हणतो.

बरखास्तीचे लेबल लावले नाही

पँथर बरखास्त व्हावी ही खुद्द पँथरची वा पँथरसमाजाची इच्छा कधीच नव्हती. ती

१९७५ मध्येही नव्हती आणि १९८९ मध्येही नव्हती. त्या वेळी आपापल्या सोयीखातर पँथरच्या नेत्यांनी पँथरसमाजाच्या विरोधात जाऊन पँथर बरखास्त केली आहे. त्यामुळे बरखास्तीचे लेबल आपल्या छावणीच्या मस्तकावर पँथरने कधीही लावले नाही. १९७४ नंतरच्या बरखास्तीनंतरही पँथर पँथर्समध्ये जीवंत होतो. १९८९ नंतरच्या बरखास्तीकरणानंतरही ती पँथर्सच्या रक्तामधून हिमतीने धावतच आहे.

निर्णय चुकीचा

आठवलेसारख्या दमदार नेत्याने मुळात पँथर बरखास्त करण्याचा घेतलेला निर्णयच चुकीचा होता, दलित नेत्यांच्या राजकिय ऐक्याच्या जुगारी मुद्यावर पँथरसारख्या समाजक्रांतीसाठी लढणाऱ्या डिफेन्सला कुलूप ठोकण्याची गरजच नव्हती. या कुलूप ठोकण्याने हजारो पँथर्सची आसवे अपमानित झाली. या आसवांमागे एक उजेडाचा इतिहास होता. या आसवांच्या पाठीशी असलेला, उपाशीतापाशी राहण्याचा, लाठ्याकाठ्या खाण्याचा, बंदुकीच्या गोळ्या झेलण्याचा, संकटाशी आणि मृत्यूशी खेळण्याचा एक इमानदार इतिहास उभ्याउभ्या जखमी झाला होता. घोर अपमानित झाला होता. त्यामुळे पँथर बरखास्त करण्याचा निर्णयच चुकीचा होता. इकडे दुसऱ्या बाजूने ज्या हेतूसाठी हा निर्णय घेतला होता त्या हेतूच्या राजकारणभर चिंध्या झाल्या. नंतर तर पँथर बरखास्त करण्याची मुळात नसलेली गरजही संपली होती. पण तो निर्णय मागे घेतला गेला नाही. अर्थात हे आठवलेंच्या बाजूने घडत गेलेले असले तरी पँथर्सच्या बाजूने यातले काहीही वैध नव्हते. पँथर जिवंतच होती. पँथर बरखास्त करणारे लोक आपले काम करीत होते आणि या सर्वच अनधिकृत हुकुमशाहीला देशोधडीला लावून पँथर आपले काम करीत होती. पँथर होत्कारामध्येही जीवंत होती. नकार झेलतही जिवंतच होती.

असे का घडले? पँथरच्या या विशिष्ट जीवनशैलीतच पँथरच्या अस्तित्वाची गरज दडलेली आहे. रामदास आठवले मंत्री झाल्याने पँथर एका चांगल्या नेत्याला अंतरली हे खरेच आहे. अशावेळी पँथरचे अत्यंत शक्तिशाली संघटन बांधणे अत्यंत आवश्यक आहे असे मी मानतो.

पँथरची जन्मवेदना

१९७२ सालच्या महाड साहित्य संमेलनात डॉ. म. ना. वानखेडे यांनी निग्रो साहित्याचे आणि ब्लॅक पँथरचे प्रभावी चित्र रेखाटले. त्यातून आणि त्याकाळच्या महाराष्ट्रात निर्माण होणाऱ्या दलित साहित्यातून दलित पँथरचा जन्म झाला. पँथरच्या

जन्माची नाळ अशी आंबेडकरवादी विचारजागृतीशी आणि आंबेडकरवादी साहित्याशी जोडलेली आहे. पँथरमध्ये प्रारंभी आणि नंतरही बहुतांश कार्यकर्ते साहित्यिक होते. बहुतांश साहित्यिक पँथरचे कार्यकर्ते होते. शिवाय पँथरमध्ये प्रत्यक्ष सहभाग नसलेल्या अनेक विचारवंताचा आणि साहित्यिकांचा पँथरला पाठिंबा होता. या सर्वांच्या रुपाने पँथरच्या पाठीशी समग्र समाजक्रांतीचे शक्तिशाली तत्त्वज्ञान आणि आंबेडकरी चळवळ उभी आहे.

यापुढच्या पँथरनेही हा वारसा केवळ जपायला हवा असे नाही तर आपल्या तपस्येने तो समृद्ध करायला हवा. आंबेडकरी चळवळ ही प्रकाशमूल्यांची चळवळ आहे. एका प्रज्ञासूर्याने उभारलेली ती चळवळ आहे. विद्याव्यासंग, दूरदृष्टी, मनाचा समतोलपणा, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि विज्ञानदृष्टी या मूल्यांसाठी जीवाचे रान करण्याची जिद्द, नेतृत्वनिरपेक्षता, त्याग, समांतर चळवळींना समजावून घेण्याइतका उदारपणा, भोवतीच्या जीवनातील क्रॉनिक आणि वेळोवेळी उद्भवणारे इतरही आजार समजावून घेण्याची शक्ती आणि स्त्रिया, आदिवासी, भटके, विमुक्त, कामगार या आणि अशाच इतरही नागवल्या जाणाऱ्या घटकांसाठी आकाशपाताळ एक करण्याची जिद्द व ताकद या गोष्टीची जोपासना पँथरने केली पाहिजे.

ही आंबेडकरी मूल्यांची चेष्टा

टोकाची आत्मकेन्द्रितता आणि तत्त्वविषयक संभ्रम असला की त्याचा नामदेव ढसाळ होतो. नेतृत्वाची अमानुष भुक माणसांना जमिनीवर उतरुच देत नाही. मग आर. पी. आय. चे काय किंवा पँथरचे काय तुकडे पडतात. चळवळी राजकारणाच्या शर्यतीत धावायला लागतात. प्रस्थापित सत्ताधाऱ्यांच्या तालावर हास्यास्पद होत नाचत राहतात. आपले काही नेते जनता पार्टीत, काही काँग्रेसमध्ये, होते व आहेत. काहींचा घरोबा शिवसेनेशी तर काहींचा संघाशी, तत्वाची शिंगे मोडूनच या माणसांना राजकारणात उंडारावे लागते. यातून फक्त आंबेडकरी मूल्यसरणीची निर्दय चेष्टा तेवढी होते. फक्त आंबेडकरवाद तुडवला जातो. आंबेडकरवादाला याप्रकारे सत्ताकांक्षेने आंधळ्या झालेल्या दलित नेत्यांकडून अपमानित होऊ द्यायचे नसेल तर यापुढे पँथरने पहिल्या पातळीवर दलितांची एकी घडवून आणावी आणि दुसऱ्या पातळीवर दलित नेत्यांना वठणीवर आणावे. चेंबुरमध्ये १९८९ च्या शेवटी एकीसाठी ज्या प्रकृतीचा ज्वालामुखी उसळला होता तसाच पण सतताधारांचे खेळणे न होणारा आणि न विझणारा ज्वालामुखी पँथरने जन्माला घालायला हवा आहे.

सर्व दलितांनी एक व्हावे आणि एकमुखी राजकारण करावे. कोणातही आधी

सामील न होता स्वबळावर निवडणूका लढवाव्या. आंबेडकरवादाशी जुळणारा पक्ष सत्ताधारी होत असेल तर त्याला सहकार्य करावे, आपले संघटीत अस्तित्व कायम टिकवावे. संघटीत अस्तित्व ही एक प्रभावी शक्ती असते आणि राजकारणापासूनच्या इतर सर्व क्षेत्रात तिचा दरारा चालतो. समाजाला संरक्षण, न्याय, समता या गोष्टी मिळण्याच्या व क्रमाने साकार होणाऱ्या समाजक्रांतीच्या दृष्टीने अशी शक्ती अस्तित्वात असणे व तिची जपणूक करणे ही गोष्ट कोणत्याही परिवर्तनवादी समाजासाठी आवश्यक असते. पँथरने पहिल्या क्रमांकावर हे ध्येय ठेवायला हवे. पण या सोबत भटक्या - विमुक्तांसह आदिवासी वा स्त्रिया यांच्यासह भव्य मोर्चेबांधणीही सूरु ठेवली पाहिजे.

अन्यायग्रस्तांसाठी पँथर

वरील सर्वांचे प्रश्न पँथरला स्वतःचे प्रश्न वाटायला हवेत. कुठल्याही क्षेत्रातल्या अन्यायाविरुद्ध पँथरने हल्ला बोल केले पाहिजे. प्रश्न शेतकऱ्यांचा असेल, मजूरांचा वा खाण कामगारांचा असेल, वेश्यांचा, देवदासींचा असेल, हुंड्याचा, बलात्काराचा असेल, कोणत्याही प्रकारच्या कोणाच्याही छळाचा असेल पँथरने त्या त्या प्रश्नावर अत्यंत जबाबदारीने आणि मनःपूर्वक भूमिका घ्यायला हवी. पण अशी भूमिका घेताना व त्यामागे चळवळ उभी करतांना मुळात हा सर्व समाज धर्मांधांच्या, अंधश्रद्धांच्या आणि जातीवर्णाच्या हलकट संस्कारांपासून मुक्त करायचा आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनूयायी या नात्याने ही जबाबदारी इतिहासाने विश्वासून आपल्या खांद्यावर टाकलेली आहे याचे भान पँथरबंधूनी ठेवायला हवे आहे.

पुराणमतवादी शक्तीचा प्रभाव

या देशात ब्राह्मणी आणि भांडवली या दोन अशूभ शक्तींची आतून पक्की युती झालेली आहे. बाकी सर्व प्रतिगामी व धर्मांध संघटना प्रतिगमित्वाच्या कैफात अंधपणे प्रबोधनाचा चेहरा विद्रूप करीत नाचणाऱ्या शिवसेनेसारख्या संघटनांच्या सर्वच संघटना वरील युतीच्या पोटी जन्माला आलेली संतान आहे. राम जन्मभूमी - बाबरी मशीद या मार्गाने पुराणमतवादी शक्ती आजही या देशाला थांबवून ठेवीत आहेत. खिळवून ठेवीत आहेत. ही गोष्ट इहवादी शासनाची अब्रू चव्हाट्यावर मांडणारी आणि भारतीय संविधानाला अपमानित करणारी आहे. जुन्या मंदिरांनीच या देशाच्या प्रगतीचा मार्ग इतका भयानक पद्धतीने बंद करुन ठेवला आहे. तिथे नवी मंदिरे बांधण्याची परवानगीच इहवादी शासनाने का द्यावी? या अंगाने एखादी घटनादुरुस्ती का होत नाही? पँथरला हे

समजावून घ्यायला हवे आहे आणि या राष्ट्राच्या पाऊलवाटेवरील हे आणि असेच इतरही अडथळे ठोकरुन लावून त्याच्या प्रवासापुढे प्रकाशाची फुले अंथरायची आहेत.

ग्रामीण विभाग जातीय शक्तींच्या कचाट्यात सापडला आहे. परत पँथरने या जातीवाद्यांपुढे प्रचंड दहशत निर्माण केली पाहिजे. एका दराऱ्याचा इतिहास पँथरला आहे. हिंदुत्ववादी शक्ती फक्त सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रातच पिळवणूक करीत नाहीत. परिवर्तनाचे मार्ग रोखीत नाहीत तर राजकारणातही या शक्ती मुखवटे घालून सक्रीय आहेत. मुखवटे अनेक आहेत. आर्थिक समतेचा मुखवटा, फुले-आंबेडकरांचा मुखवटा असे अनेक मुखवटे आहेत. पण थोडे खरवडले की आत हिंदुत्ववादी शक्तीचा वावर आहे अशी मोठी विचित्र परिस्थिती आहे.

दुर्बल घटकांना मातृभूमी नाही

देशाची जमीन कधी नव्हे इतकी आज तापायला लागलेली आहे. इतिहासभर व्यवस्थेने केलेली गुन्हेगारी आता प्रश्न होऊन देशाच्या अस्तित्वावर तुटून पडलेली आहे. हे प्रश्न आसवांनी विझत नाहीत. या प्रश्नांना गोरगरिबांच्या रक्ताची भयानक तहान लागलेली आहे. राष्ट्र तत्त्वशून्यतेत होरपळून निघत आहे. मूठभर प्रतिगामी आणि भांडवली शक्तीच्या आगीत राष्ट्रच राख होत चालले आहे. या देशात आज दुर्बल घटकांना मातृभूमी नाही. बहिष्कृत भारत आज पुन्हा नव्याने नव्या आगीत सापडलेला आहे. **"ही हतवेला जलशाची का पुसा मनाला"** असा सवाल आपल्याला उत्तर मागतो आहे.

खूप प्रश्न आहेत. मुळात संपूर्ण व्यवस्थेत उलथपालथ होण्याची नितांत गरज आहे. ज्वालामुखीच्या विवराच्या तोंडी देश उभा आहे. या समाजाची संपूर्ण मानसिकता पुसून त्या मनाच्या कोऱ्या पाटीवर समतेचे कृतार्थ चरित्र लिहायचे आहे. आज पँथरची गरज आहे. पँथरच या जबाबदार संघटनेची गरज आहे. खूप शक्तीशाली, खूप मोठ्या, खूप विवेकी आणि खूप तत्वनिष्ठ पँथरची गरज आहे. आंबेडकरी पँथरची गरज आहे. राजकारणातील पदाचा मोह नसलेल्या सेवाभावी लोकांनी पँथरचे मनगट बळकट करावे, नेतृत्वाचा आजार न झालेल्या लोकांनी पँथर व्हावे, साहित्यिकांनी आणि विचारवंतांनी पँथरमध्ये यावे, पँथरच्या पाठीशी राहावे. पँथर ही प्रबोधनाची गरज आहे. ती क्रांतीची मागणी आहे. सर्व पँथर्सनी, एकत्र यावे. सर्वांनी एक प्रचंड माहोल उभा करावा. त्या माहोलची पँथर ही खरी गरज आहे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

सव्वीस संविधान संस्कृतीच्या विजयासाठी नामांतर

जुलै १९७८ रोजी महाराष्ट्र शासनाच्या विधीमंडळात नामांतराचा ठराव एकमताने संमत झाला. या गोष्टीला आता चौदा वर्षांचा कालावधी लोटलेला आहे. तरी औरंगाबादेला असलेल्या मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामांतर होत नाही. महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या कोट्यवधी लोकांच्या जिव्हाळ्याचा हा प्रश्न अपमानास्पद अवस्थेत आजवर पडून आहे. भारतीय संविधानाशी एकनिष्ठ असलेल्या आणि लोकशाहीवर भरोसा असलेल्या कोट्यवधी पुरोगाम्यांपुढे या घटनेचे गंभीर प्रश्नचिन्ह उभे केलेले आहे.

संविधानाचा अवमान

महाराष्ट्राच्या विधीमंडळात एकमुखाने संमत झालेल्या नामांतर ठरावाची अमंलबजावणी करायचे टाळल्याने राज्यविधीमंडळ ज्या भारतीय संविधानाशी प्रतिबद्ध आहे त्या संविधानाचीच पायमल्ली झालेली आहे. एवढेच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत आणि नामांतर टाळण्यासाठी देशाच्या संविधानाच्या शिल्पकारालाच अवमानित केलेले आहे. सेक्युलॅरिझमविरोधी शक्तींचा मान राखण्यासाठी, धर्मान्ध मानसिकतेला कुरवाळण्यासाठी महाराष्ट्र शासन भारताच्या संविधानातील सेक्युलॅरिझमलाच वाटाण्याच्या अक्षदा लावीत आहे. रामजन्मभूमीवाले न्यायालयाचा निर्णय धाब्यावर बसवितात हे जसे संविधानाच्या आणि त्यातील सेक्युलॅरिझमच्या विरोधी आहे तसे शेगावच्या गजानन महाराजाच्या यात्रेला येणारांसाठी दोन कोटी बेचाळीस लाख रूपये

महाराष्ट्र शासनाने देणे हेही भारतीय संविधानाच्या आणि त्यातील सेक्युलॅरिझमच्या विरोधीच आहे. माझ्यासारख्या माणसापुढे प्रश्न पडतो तो असा की या देशात संविधानाचा वाली कोण आहे? या देशात सर्वात जास्त अनाथ, सर्वात जास्त दयनीय आता संविधान झालेले आहे. समता स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि सेक्युलॅरिझचा आधार असलेले संविधानच आज देशात अगतिक आणि पोरके झालेले आहे. देशात सर्वसामान्य माणसाच्या, इथल्या नागवलेल्या माणसाच्या उज्ज्वल उद्याची हमीच देशात आज हवालदिल झालेली आहे. देश संविधानाच्या मार्गदर्शनानुसार चालावा पण आज देशांतील धर्मांध शक्ती संविधानाशी उद्धटपणे वागत आहेत. देशातील धर्मसंस्कृती रक्तात मुरलेले लोक संविधान संस्कृतीला अजूनही नकार देत आहेत असा त्याचा अर्थ आहे.

१९७८ पासून आजवर महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष सत्तेवर आहे. शरद पवार हेही फुले आंबेडकरांचे नाव घेत होते. ना. सुधाकरराव नाईक -- ही फुले आंबेडकरांचे नाव घेतात. महाराष्ट्रीय प्रबोधनाचा पवार आणि नाईक दोघेही गौरव करतात. पण मग शरद पवारांनीही नामांतर केले नाही आणि सुधाकरराव नाईकांनीही आजवर नामांतर केले नाही याचा अर्थ काय आणि कारण काय?

सत्ता आणि संस्कृती

महाराष्ट्रात सत्तेवर असलेला काँग्रेस पक्ष नामांतर करीत नाही. याचे कारण सत्ता आणि संस्कृतीच्या फारकतीत सापडू शकेल. कोणत्याही पक्षाचे सरकार असो या सरकारने विधीमंडळात संमत झालेलया ठरावाची अमंलबजावणी केलीच पाहिजे. असे करणे हेच संविधान संस्कृतीचा सन्मान करणे ठरते. संविधान संस्कृती म्हणजे इहवादी संस्कृती. या संविधान संस्कृतीचा अवमान कोणत्याही पक्षाचे शासन असले तरी त्याला करता येऊ नये. संविधान संस्कृती ही शासनाची जीवननिष्ठा असली पाहिजे. ही जीवननिष्ठा कशी सिद्ध होईल? संविधान संस्कृती की सत्ता असा पेच राज्यकर्त्यापुढे पडला तर सत्तात्याग करावा लागला तरी चिंता नाही, संविधान संस्कृतीचा बळी जाऊ देणार नाही अशी प्रतिज्ञा शासनाची असायला हवी. पण आज दिसते ते हे की सत्तेसाठी संविधान संस्कृतीचा बळी देणे माणसे पत्करतात आणि सत्ता ही संस्कृतीशून्य गोष्ट आहे असे जणू कबूल करुन टाकतात. महाराष्ट्राचे शासन नामांतर करीत नाही याचा अर्थ संविधान संस्कृतीच्या पराभवाचे दुःख या शासनाला होत नाही असा आहे. नामांतर करण्यासाठी प्रतिगामी शक्तीचा राग ओढवून घ्यावा लागेल, पण या नामांतराच्या प्रश्नाची दुर्दशा हे सांगते आहे की धर्मांध आणि प्रतिगामी शक्ती विजयी झाल्या तरी महाराष्ट्र शासनाला त्याचे दुःख नाही. पण नामांतर करून संविधान संस्कृती इथे विजयी

व्हावी या दिशेने महाराष्ट्राच्या शासनाची पावले पडताना दिसत नाही.

संविधान संस्कृतीचा प्रश्न

नामांतराचा प्रश्न हा आंबेडकरांच्या अनुयायांचा केवळ नाही. हा प्रश्न आता देशांतील सर्वच संविधान संस्कृतीच्या लोकांचा झालेला आहे. लोकशाहीच्या तत्त्वानुसार एकदा घेतलेला निर्णय धर्मशाहीच्या रेट्यानुसार कसा बदलला जातो? आम्हा सर्वांचा प्रश्न असा आहे की महाराष्ट्र शासन हे संविधाननिष्ठ लोकशाहीनिष्ठ शासन आहे की धर्मनिष्ठ शासन आहे?

नामांतराची लढाई केवळ आंबेडकरांच्या अनुयायांची नाही. या देशातील सर्वच संविधाननिष्ठांनी नामांतराचा प्रश्न आपला प्रश्न मानला पाहिजे. संविधानातील सेक्युलॅरिझमचे ज्यांना अगत्य आहे आणि लोकशाही अपमानित होऊ नये असे ज्यांना वाटते त्या सर्वांनाच नामांतराची लढाई आपली वाटली पाहिजे. नामांतरासाठी पुढे येऊन आंबेडकर केवळ दलितांचे नाहीत तर ते आमचेही आहेत हे दलितेतरांनाही या निमित्ताने अधिकच धवधवीतपणे सिद्ध करता येईल.

एखाद्याला मंत्रीपद, चार दोन लोकांना कुठल्या मंडळाचे, महामंडळाचे अध्यक्षपद देणे हा पर्याय नामांतराला असूच शकत नाही. नामांतराच्या तोंडाला पाने पुसण्याची ती एक यशस्वी ठरणारी पद्धत ठरू शकते. तेव्हा नामांतराच्या संदर्भात ही पद्धती वापरून शासनाने स्वतःला संविधानविरोधी असल्याचे सिद्ध करू नये. अजूनही वेळ गेलेली नाही. जन्मशताब्दीची तार एप्रिल १९९३ पर्यंत शासनाने ताणलेलीच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी हीच नामांतराची उत्तम वेळ आहे हे जाणून महाराष्ट्र शासनाने तातडीने नामांतर करावे आणि महाराष्ट्राचे शासन, काँग्रेसचे सरकार भारतीय संविधान संस्कृतीचे विरोधक आहे, ते लोकशाहीच्या विरोधी आहे आणि ते सत्तेसाठी धर्मांधाच्या दडपणाखाली वागते या सर्व आरोपातून स्वतःची सुटका करून घ्यावी.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

सत्तावीस राष्ट्रीय शिक्षण आणि संविधानातील सेक्युलॅरिझम

राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना स्पष्ट झाल्याशिवाय सदर विषयाची चर्चा दिशाशून्य होत जाणार यात शंका नाही. संकल्पना ही स्वभावतः वादग्रस्त असते, ती अनेक ध्रुवीअसते, किमान द्विध्रुवात्मक ती असतेच हे सर्व खरे असले तरी भारत देशातील राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना वादग्रस्त असण्याचे कारण असू नये. याचा अर्थ असा की या देशाला एक लोकशाही उरात वागविणारे, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या श्रेष्ठ जीवनमूल्यांना प्राण मानणारे आणि या महान जीवनमूल्यांना Secularism च्या आशयसौंदर्याने अर्थवान करण्याची प्रतिज्ञा करणारे संविधान आहे. महान सेक्युलर फिलॉसॉफर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हे संविधान शिल्पित केले असून त्यांच्या प्रज्ञेची सेक्युलरप्रभा या संविधानभर पसरलेली आहे.

भारतातील राष्ट्रीय शिक्षण हे या संविधानातील मार्गदर्शक जीवनमूल्यांना प्रमाण मानणारे असले पाहिजे हे उघड आहे. भारतातील राष्ट्रीय शिक्षण हे संविधानसंस्कृतीचा गौरव वाढविणारे, या संस्कृतीला अभिप्रेत असलेला संविधाननिष्ठ मानव आणि समाज निर्माण करण्याच्या प्रतिज्ञेने कार्य करणारे असले पाहिजे.

संविधानसंस्कृती म्हणजे काय?

संविधानसंस्कृती ही भारताच्या संविधानात चितारली गेलेली संस्कृती आहे. सुधारणा, परिवर्तन आणि विज्ञानदृष्टीला आपले जीवनध्येय मानणारी ही संस्कृती आहे. असे एकावन्नाव्या अनुच्छेदावरून म्हणता येते. तसेच लोकांच्या सुधारणेचा,

उज्ज्वलतेचा कोणताही कायदा करताना कोणत्याही धर्माची पत्रास बाळगली जाऊ नये असे विसाव्या कलमाचे म्हणणे आहे. संविधान Secular आहे याचा अर्थ ते धर्मातीत आहे. इहवादी आहे. संविधान निधर्मी आणि निरीश्वरवादी आहे. संविधानाचा हा गाभा कपाटातील संविधान नावाच्या एका पुस्तकात कुजवण्यासाठी नाही. एका पुस्तकाची शान वाढविणे हे ध्येय या वैचारिक गाभ्याचे नाही तर राज्यकारभार करणारी माणसे आणि संपूर्ण समाजच निधर्मी आणि निरीश्वरवादी क्रमाने करीत न्यावा यासाठी या तत्त्वाचा संविधानात अंतर्भाव झालेला आहे. त्याशिवाय संविधानातील Secularism हा शब्द पोकळ ठरेल. जीवनाच्या उन्नयनाचा कायदा करताना धर्माचा मुलाहिजा ठेवला जाणार नाही हा आदेश निरर्थक होईल. तेव्हा समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या महान जीवनमूल्यांना प्राणाहून प्रिय मानत साकार होणारी उन्नयनशील अशी निधर्मी आणि निरीश्वरवादी जीवनशैली म्हणजे संविधान संस्कृती होय.

प्राचीन भारतीय परंपरा आणि संविधानसंस्कृती :

संविधानसंस्कृतीचा प्रारंभ विसाव्या शतकाच्या पाचव्या दशकात झाला असला तरी या संस्कृतीची पूर्वपरंपरा सिंधुसंस्कृतीपासून सांगता येते. आपला देश हा जडवादाची समृद्ध परंपरा असलेला देश आहे. मोठमोठे विचारवंत तर हे सांगतातच पण द.ग.गोडसे यांच्यासारखा जीवनवादी कलामीमांसकही **"या आविष्कारांच्या पोतांतून व्यक्त होणाऱ्या जाणिवा व जीवननिष्ठा तपासल्यास, ऐहिक जीवनाची जडवादी भारतीय कल्पना किती संपन्न, समृद्ध व विशाल होती हे दिसून येते."** अशा गौरवपूर्ण शब्दात या जडवादाचे शक्तीसौष्ठव मांडून आखवितो ते लक्षात घेण्यासारखे आहे. तेव्हा भारताच्या संविधानातून साकार होणाऱ्या जडवादी संविधानसंस्कृतीला प्राचीन भारतात समृद्ध पूर्वपरंपरा आहे. ती Secularism ची परंपरा आहे. चार्वाक, बुद्ध या मार्गाने आंबेडकरांपर्यंत या परंपरेचा समृद्ध विकास झालेला आहे. या संस्कृतीचे समृद्ध असे Secular नीतीशास्त्रही आहे.

भारताचा इतिहास असे सांगतो की या जडवादी संस्कृतीकडे देशाने जेव्हा जेव्हा पाठ फिरविली तेव्हा तेव्हा हा देश भौतिक विकासाच्या दृष्टीने कंगाल झाला. आणि नैतिकदृष्ट्या कफल्लक झाला. या निधर्मी आणि निरीश्वरवादी सेक्युलर संस्कृतीची अवहेलना भारतीय समाजाने ज्या ज्या काळात केली त्या त्या काळात या समाजाचे जगणे कुंठीत झाले. हा समाज त्या त्या काळात प्रवाहपतित झाला. त्याच्या जगण्याला प्रेतकळा आली. भारताची खरी संस्कृती मुळात Secular म्हणजे निधर्मी आणि

निरीश्वरवादी होती. आध्यात्मिक संस्कृतीने तिला विकृत करण्याचा प्रयत्न केला असला तरी भारताच्या संविधानाने या प्राचीन भारतातील Secular संस्कृतीचाच वारसा प्रमाण मानला आहे ही गोष्ट स्वच्छपणे लक्षात घेतली पाहिजे. तेव्हा आजची संविधानसंस्कृती ही प्राचीन भारतातील आध्यात्मिक संस्कृतीला झुगारून देऊन त्यातील जडवादी अर्थात Secular संस्कृतीचाच वारसा पुढे नेणारी संस्कृती आहे. हे स्पष्ट आहे.

संविधान संस्कृती आणि राष्ट्रीय शिक्षण

संविधानातील या वारशाला समृद्ध करणारे शिक्षण हेच खरे राष्ट्रीय शिक्षण ठरते. भारतीय संविधानाचे ध्येय हेच राष्ट्रीय शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. संविधानाच्या मूल्यादर्शांना नाकारणारे, त्याकडे पाठ फिरविणारे शिक्षण हे केवळच अराष्ट्रीय शिक्षण असणार नाही तर ते राष्ट्राचा घात करणारे, राष्ट्रद्रोही आणि राष्ट्राचे वाटोळे करण्यासाठी कटिबद्ध झालेले शिक्षण आहे असा त्याचा अर्थ आहे. राष्ट्रीय शिक्षणाने संविधान संस्कृती लोकांच्या अंतर्मनांपर्यंत न्यावी, संविधानसंस्कृतीविरोधी नैतिकतांवर फुल्या मारून या नैतिकता लोकांच्या तुच्छतेचा विषय कसा होतील यासाठी झटावे, असे करणारे शिक्षणच केवळ राष्ट्रीय शिक्षण ठरेल.

या दृष्टीने पाहू जाता आपल्या शिक्षणात संविधानविरोधी किंवा Secularism विरोधी गोष्टींचा इतका भरणा आहे की त्यामुळे आपल्या समाजात एका मर्यादेपलीकडे Secular मतेच जन्माला येत नाहीत. याचे कारण येथील शिक्षणसंस्था (पाठ्यक्रम निश्चित करणारे-पाठ्यक्रम शिकविणारे या अर्थाने) सेक्युलॅरिझम विरोधी लोकांच्याच ताब्यात आहे. राष्ट्रपतींनी तिरूपतीच्या बालाजीच्या दर्शनाला जाऊन डोक्यावरील केस काढणे आणि महाराष्ट्राच्या राज्यपालांनी पावसासाठी प्रार्थनेचा आदेश देणे या गोष्टी सेक्युलॅरिझमच्या वाट्याला, या पातळीवरून येत असतात तर हे सर्वच पर्याय सेक्युलॅरिझमला विरोध करणारे, तो इथे सुप्रतिष्ठित होऊ नये यासाठी प्रयत्न करणारे पर्याय आहेत. हे कसे नाकारणार? देवभोळे, अंधश्रद्धावीर या शिक्षणातून तयार होत आहेत. गणपतीच्या पुढे रांगा लावणारे, जातीयवादी आणि परंपरावादी लोक या शिक्षणातून तयार होत आहेत. वर्णचौकटीबाहेर जाणारांचा सूड घेणारी, मंडल आयोगाला विरोध करणारी मने ज्या शिक्षणातून निर्माण होत आहेत ते शिक्षण संविधानसंस्कृतीचा या अर्थाने राष्ट्रीय शिक्षणाचा पराभव करीत निघालेले शिक्षण आहे.

राष्ट्रीय शिक्षणाचे उद्दिष्ट संविधानसंस्कृतीला प्रमाण मानणारी मानसिकता निर्माण करणे हेच असले पाहिजे. हे आपण स्वतःशी स्पष्ट करून घेतले नाही आणि त्याच्याशी प्रामाणिक राहून आपण शिक्षणाचे स्वरूप निश्चित केले नाही तर आपण केवळ धर्मांधतेचा अंधार वाढवू शकू! समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाची पायमल्ली करणारा परंपरावादी मानवच आपण या देशात निर्माण करू शकू. विषमता हेच वास्तव मानणारा, जातीयता आणि दैववाद यांना अपर्यायी मानून चालणारा, विचार करण्याच्या प्रक्रियेपासूनच स्वतःला तोलून घेणारा समाज आपण निर्माण करू शकू! आजवर याहून फारसे निराळे असे काही घडलेले नाही. आणि Bucle म्हणजो त्याप्रमाणे - " They who do not feel the darkenss, will never look for the light" आपल्या समाजावर 'ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान' हाच संस्कार परंपरावादी मंडळी राष्ट्रीय शिक्षणाच्या नावाखाली आजही करताना दिसत आहे. भोवतीचा अंधार जाणवू नये आणि लोकांनी प्रकाशाकडे जावू नये याची पूर्ण व्यवस्था येथील धार्मिक-अध्यात्मिक परंपरांनी कडेकोटपणे करून ठेवलेली आहे. आजच्या राष्ट्रीय शिक्षणात या परंपरांचा शिरकाव होणार नाही याची खबरदारी घेतली गेली पाहिजे. आपल्या संविधानाने ज्या एका Secular संस्कृतीची सुंदर इमारत उभी केली आहे आणि ज्या जडवादी भारतीय परंपरेचा वारसा तिच्या पाठीशी उभा आहे ती निधर्मी आणि निरीश्वरवादी परंपराच आजच्या शिक्षणाने प्राणपणाने अंगिकारली पाहिजे. त्याशिवाय या शिक्षणाला शिक्षण म्हणवून घेता येणे अशक्य आहे.

शासन आणि शिक्षण :

शासन संविधाननियंत्रित असणे आवश्यक आहे. तसे असेल तरच शिक्षण शासननियंत्रित असण्याला अर्थ आहे. शासनाने संविधान संस्कृतीचा प्रचारच सर्वशक्तीनिशी करावा. संविधानसंस्कृतीशीच शासनाने बांधिलकी मानावी अन्यथा शासन आपला अस्तित्वात असण्याचा हक्क गमावून बसू शकेल. तेव्हा निधर्मी आणि निरीश्वरवादी Secular शासन असेल तर राष्ट्रीय शिक्षणाने गर्वाने अशा शासनाचे नियंत्रण पत्करावे, पण शासन संविधान संस्कृतीचा अवमान करीत असेल तर राष्ट्रीय शिक्षणाने निधड्या छातीने शासनमुक्त होऊन आपला Secular बाणा सिद्ध करावा.

---

२ **Bucle : History of civilization** : डॉ. आंबेडकर यांच्या **Riddles in Hinduism** च्या प्रस्तावनेतून उद्धृत (Writing and speeches Vol. 4)5oÂŸ

राष्ट्रीय शिक्षण आणि शिक्षक :

संविधानसंस्कृतीचा आशय वाहून नेणारे राष्ट्रीय शिक्षण देणारा शिक्षक क्रांतिविरोधी असून चालणार नाही. कालचा आणि आजचाही शिक्षक मुख्यत्वे व्यवस्थेचीच भाटगिरी करताना दिसतो. तो परंपरावादी अर्थात आध्यात्मिक संस्कृतीचा एजंट म्हणून, कार्यकर्ता म्हणून कार्य करताना दिसतो. हा प्रतिक्रांतीवादी शिक्षक संविधानसंस्कृतीचा वाहक होऊच शकत नाही. तो संविधानसंस्कृतीला एक तर विकृत करील किंवा विद्यार्थ्यांच्या मनातीलSecularism विरोधी संस्कारांना उज्ज्वला आणि युरिया अशी नवी खते देईल. व्यवस्थेचा शिक्षक नव्याचा उपयोग नेहमीच जुन्याला इज्जत यावी, उजाळा मिळावा यासाठीच करताना दिसतो. संविधानसंस्कृतीला प्रमाण मानणाऱ्या शिक्षकाने शिक्षणाला व्यवस्थेचा कार्यक्रम मानू नये तर समाजपरिवर्तनाचे आंदोलन मानावे. संविधान संस्कृतीला प्रमाण मानणारे शिक्षण ही क्रांतीची प्रयोगशाळा होय. ते परिवर्तनाचे Work-shop होय हे मानले पाहिजे. शिक्षक हा केशवसुतांसारखा

"जुने जाऊ द्या मरणालागुनी
जाळूनी किंवा पुरूनी टाका"

असा माणुसकीची बेअब्रू करणाऱ्या जुन्याचा कडवा विरोधक असला पाहिजे. भारतातील Secular जीवनशैली आणि विचारपरंपरा हा कधीही जुना न होणारा वारसा आहे. हे शिक्षकाला कळले नाही तर तो शिक्षक कसला? आणि हा वारसा उजेडाचा आहे, समतेचा आहे. हा वारसा समृद्ध करणे हेच शिक्षक म्हणून आपले जन्मप्रयोजन आहे हे मानणारा शिक्षक हाच खरा संविधान - संस्कृतीचा सभासद होऊ शकतो.

मागल्या शतकामध्ये आपल्या देशात एक प्रबोधन सुरू झाले. प्रबोधन म्हणजे अध्यात्माने झोपवलेला, Secularism विरोधी संस्कारांनी जडमूढ केलेला समाज जागवणे, त्याला प्रकाशगामी करणे म्हणजे प्रबोधन. आपल्या प्रबोधनकारांनी आपापल्या परीने या करपलेल्या समाजाला प्रफुल्लित करणाऱ्याचा प्रयत्न केला. फुले - आगरकर आणि आंबेडकर ही या दृष्टीने आमच्या प्रबोधनातील सेक्युलॅरिझमची तत्त्वदृष्टया चढती सूर्यमालिका आहे. या प्रबोधनसूर्यांनी भारतातील Secularism चा वारसा समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. हे समाजशिक्षक राष्ट्रीय शिक्षकांचे जीवनादर्श असले पाहिजेत. कोणत्याही विषयाचा शिक्षक असो त्यांच्या मुखाने फुले-आंबेडकर-आगरकर बोलले पाहिजेत. त्याच्या शिकविण्यामागे ही Secular अशी संविधानसंस्कृती असली पाहिजे. असा शिक्षक स्वतःच विद्रोह असतो.

विद्यार्थी ही फळे असतील तर शिक्षक विद्रोहाचे साक्षात झाड़ असतो. असा शिक्षकच Secular असलेल्या भारतीय संविधानसंस्कृतीची पेरणी मनामनात करू शकतो. यापेक्षा राष्ट्रीय शिक्षण वेगळे मानणे हे संविधानसंस्कृतीकडे पाठ फिरविणे, राष्ट्रद्रोह करणे आणि अराष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करणे ठरेल.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗

अठ्ठावीस

समरसतावाद की आंबेडकरवाद?

लोकसत्तेच्या ४ सप्टेंबर १९९२ च्या अंकातील मूळ मुद्याला स्वभावानुसार पूर्ण बगल देणारे पानतावणेंचे निवेदन वाचले. पानतावणे चिडलेले आहेत आणि चिडचिड करणे हे हरलेल्या मनाचे लक्षण असते. अर्थात ते चिडलेले आहेत त्यांचे कारण मी (आणि इतरही अनेकांनी) त्यांचा समरसतावादीपणा लोकांपुढे मांडला हे आहे. पण अश्लील लेखन वा हिंसाचाराची चिथावणी ही खोटी कारणे सांगून ते ऊर बडवून घेत आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आंबेडकरी चळवळीला विकृत आणि प्रभावशून्य करण्यासठी सामाजिक समरसतेची स्थापना केलेली आहे. आधीपासूनच संघमनस्क असलेलया पानतावणेंनी ४ डिसेंबर १९८८ रोजी पुण्यात समरसता परिषदेचे उदघाटन केले. त्यांचे उद्घाटकीय भाषण अस्मितादर्शच्या ऑनोडि १९८८ च्या अंकात प्रकाशितही झालेले आहे. या भाषणात त्यांनी समरसतेचा अगदी मुरलेल्या संघभक्ताने करावा तसा ठासून पुसस्कार केलेला आहे. ते भाषण आपण मुळातून वाचावे. नमुन्यादाखल काही विधाने पहा -

१. **"सामाजिक समरसताप्रेमी बंधुभगिनीनो!" अशी भाषणांची सुरवात आहे.**

२. **"अशा चळवळीचे मनापासून स्वागत करणारा मी आहे."**

३. **"सर्वसमभाव किंवा सामाजिक समरसता अशा भिन्न संज्ञांचा उद्घोष करून महाराष्ट्रात समाजप्रबोधनाचा विचार मांडला गेला -**

मांडला जात आहे."

४. "सामाजिक समरसतेचा विचार हा खऱ्या अर्थाने गतिमान समाजनिर्मितीचा विचार आहे."

५. "हा संवाद (समरसतेचा) स्वातंत्र्यपूर्वकाळात किंवा स्वातंत्र्योत्तर पहिल्या - दुसऱ्या दशकात मूळ धरु लागला असता तर आज ज्याची फळे वेगळी दिसली असती. आणि आज ज्या संशयाने किंवा अविश्वासाने ह्या उपक्रमाकडे पहिले जाते, कदाचित ही दृष्टी बदलली असती."

६. "सामाजिक समरसता ही एक अखंड व दीर्घ परिक्रमा आहे."

७. "सामाजिक समरसता ही समाजाच्या सर्वांगिण सुधारणेचा एक महत्वपूर्ण दुवा आहे."

८. "कोणाला आवडो न आवडो परंतु फुले (जोतीबा) हे सामाजिक समरसतेसाठी सर्वशक्तीनिशी झुंजणारे भारतातील पहिले पुरूष होत. म्हणून त्यांना मानाचा पहिला मुजरा करावा लागेल."

हे आणि असेच अनेक उतारे आहेत. ही विधाने पानतावणेंनी केली हे आपण क्षणभर विसरून जा आणि ही विधाने करणारे मन आंबेडकरवाद्यांचे आहे की संघाचे आहे त्याचा विचार करा. त्यांनी इतरही मांडलेली काही मते अशी :

१. "डॉ. आंबेडकरांचे प्रेरणास्थान भगवद्गीता" (तरूण भारत, नागपूर, १०.९.८३)

२. "वीर सावरकरांचे साहित्य आणि सामाजिक सुधारणेचे विचार अत्यंत ज्वालाग्रही होते. मात्र ते विचार अनुयायांना पचले नाहीत. परिणामी त्या विचारांना युतीची जोड मिळाली नाही. त्या विचारांना कृतीची जोड मिळाली नाही. त्या विचारांना कृतीची जोड मिळाली असती तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे वीर सावरकरांनाही दलित समाजाने डोक्यावर घेतले असते" (दै. नागपूर पत्रिका : नागपूर, १४.७.८९)

३. "बाबासाहेबांचा पिंड हा आध्यात्मिक होता परंतु तो पोथिनिष्ठ नव्हता. आणि म्हणूनच बुद्ध, फुले आणि कबीर या अध्यात्मवादी पण पोथीनिष्ठ व परंपरा श्रेष्ठ नसलेल्या गुरूंशी त्यांनी शिष्यत्वाचे नाते जुळू शकले" (तरूण भारत : नागपूर : आंबेडकर जन्मशताब्दी विशेषांक, १९९०)

आपला विश्वास बसू शकणार नाही पण ही मते पानतावणेंचीच आहेत. कोणत्याही आंबेडकरवाद्याला वरील सर्व मते पटूच शकत नाहीत. "आमचा धर्म व घटना या दोहापैकी एक गोष्ट आम्ही स्वीकारली पाहिजे. एक तर धर्माला जिवंत ठेवले पाहिजे किंवा घटनेला जगवले पाहिजे. दोन्ही गोष्टी एकाच ठिकाणी राहू शकत नाही."(बाबासाहेबांचे अखेरचे भाषणः सारनाथ,१९५६) बाबासाहेब धर्मातीत भूमिका स्वच्छपणे घेतात. आणि निरीश्वरवादी तर ते आहेतच. ही सॅक्युलर भूमिका आहे. त्रिशुद्ध आणि केवळ इहनिष्ठ नैतिक भूमिका ही आहे. बाबासाहेबांना अध्यात्मवादी ठरविणे म्हणजे हिंदूच्या रांगेत नेऊन बसविणे होय. गीतेसंबधीची (प्रतिक्रांतीवादी ग्रंथ) बाबासाहेबांची भूमिका सर्वांना माहीतच आहे. मग बाबासाहेबांनी गीतेपासून प्रेरणा घेतली असे कोणाला खुष करण्यासाठी पानतावणे सांगत आहेत त्याचा विचार आपण करावा. सावरकरांसंबंधी बाबासाहेब काय म्हणाले होते तेही आपण जाणताच. हे पानतावणे सावरकरांची बाजू कां घेतात? सावरकरांनी बाबासाहेबांच्या धम्म स्वीकाराला केवढा विरोध केला होता हेही सर्वांना माहीत आहेच. ब्राह्मणवादाविरुद्ध बंड उभारणारे फुले समरसतेसाठी कार्य करणारे पहिले पुरुष होतहे मानणे म्हणजे फुल्यांचा गांगलांपेक्षाही मोठा अपमान करणे होय. मी आंबेडकरवादी असल्याने मला स्वतःला समरसतेचा पुरस्कार करणे अजिबात मान्य नाही. हेडगेवार-आंबेडकर यांना एकत्र आणणे, हिंदूराष्ट्रवादी, अध्यात्मवादी, ईश्वरवादी आणि वर्णव्यवस्थावादी संधाशी बुद्धराष्ट्रवादी, निरीश्वरवादी आणि मानवतावादी आंबेडकरी आंदोलनाला जोडणे हा वैचारिक भ्रष्टाचार आहे असे प्रामाणिकपणे मला वाटते. पानतावणे मात्र संधाच्या समरसतेचा पुरस्कार करतात. पानतावणे एकटे संधाशी समरस झाले तर माझे काहीच म्हणणे नाही पण पूर्ण आंबेडकरवादी चळवळीला संधाशी समरस व्हायला ते सांगतात ह्याचा संताप येतो. म्हणून या प्रवृत्तीला मी विरोध करतो. संधाशी रमरस व्हा हे सांगणारे पानतावणे चुकत आहेत की संधाशी, हेडगेवारांशी समरस होणे हे घातकीपणाचे आहे हे सांगणारा की मी चुकतो आहे त्याचा निर्णय आंबेडकरी जनतेने घेण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे.

समरसता परिषदेचे भाषण हे पानतवणेचे खरे अवघड जागीचे दुखणे आहे. त्या भाषणातील उतारे मी दिले आहेत. पानतावणे यांनी संधाशी समरस होण्याचा आग्रह धरुन आंबेडकरी चळवळीला मारणाऱ्याच्या बाजूने कार्य केले आहे. ते भाषण त्यांना आंबेडकरवादापासून संघात घेऊन गेले आहे. मी हे सांगीतले या बद्दल पानतावणे मला कोर्टात खेचत आहेत. पण समरसतेचे त्यांनी समर्थन केले ते मुद्दे त्यांच्या लेखनात ते

कुठेही येवू देत नाहीत. कटाक्षाने या मुद्दयांना ते बगल देत आहेत आणि खोटी कारणे पुढे करून लोकांची सहानुभूती लाटण्याचा अनाठाई प्रयत्न ते करीत आहेत. आता उदाहरणच पहा-

१. "पण याचीही दक्षता घ्यावी लागणार आहे. ते प्राप्त काळावर नजर ठेवून हातचलाखी करित असतील, त्यातील दुष्टावा आणि अप्रतिष्ठा परजत असतील, तर त्या दंभचा स्फोट करावा लागणर आहे. **हातचलाखी करणाऱ्यांचे हात कलम करावे लागणार आहेत.** " पानतावणेंचा हा उतारा पहा आणि

२. "धम्मबंधूनो! ही घडी शांत बसण्याची नाही आहे. सर्व मुकाटपणे पाहण्याची ही वेळ नव्हे. या समरसतेच्या घुशींचा बंदोबस्त केला नाही तर सर्व घर पोखरले जाईल हे लक्षात घ्या. तेव्हा शात बसू नका! यावेळी आपण काय केले पाहिजे त्याचा विचार करा. बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी आपण आहात. आपण या घरभेद्यांना घर फोडू देणार? चळवळ मारु देणार? बबाबासाहेबांना हिंदू करु देणार? पुन्हा मनूचे राज्य येऊ देणार? विचार करा. उद्या जिकडे तिकडे मनूचे पुतळे बसविले जातील आणि या पुतळयांचे उद्‌घाटन करायला योग्य माणूस म्हणून ते पानतावणे यांचीच निवड करतील. तेच या चळवळीला मारण्याच्या मोहिमेचे नेते आहेत. धम्म बंधूंनो! आपणास पुन्हा विनंती करतो की या समरसतावाद्यांपासून आंबेडकरी चळवळ वाचवा आपण कामाला लागा."

हा माझा उतारा पहा. पहिला उतारा पानतावणेंच्या उद्‌घाटकी भाषणाला आहे. ते समरसतेविरुद्ध जाणाऱ्यांचे हात तोडण्याचा हुकूम समरसताप्रेमी बंधूभगिनींना देतु आहेत. तर मी (दुसऱ्या) माझ्या लेखात समरसतावाद्यांपासून आंबेडकरी चळवळ वाचविण्यासाठी कळकळीचे आवाहन करतो आहे. माझ्या समाजप्रबोधन करणाऱ्या उताऱ्यात पानतावणेंना हिंसाचाराची चिथावणी दिसते. हे त्यांचे मराठीचे ज्ञान! आणि ते हात तोडण्याचे आदेश देतात तिथे काय प्रेम आहे काय? मी आंबेडकरवादी-लोकशाहीवादी मनुष्य हिंसाचाराची भाषा वापरुच शकत नाही. वरील माझा उतारा रिप. गार्ड मधल्या ५.७.९२ च्या लेखातील असून वरील उतारा पानतावणेच्या वकिलाने अधोरेखित करुन पाठविला आहे. आणि त्यात मी हिंसाचाराची चिथावणी दिल्याचा खोटाच आरोप त्यांनी केला आहे. आपण सुबुद्ध आहात. हिंसाचाराची चिथावणी कोण कोणाला देत आहे त्याचा निर्णय आपण निश्चित करु शकाल! पानतावणेंचे उतारे

देऊन मी ते संघवाले आहेत हे सिद्ध केले आहे हे खरे पानतावणेचे दुखणे आहे पण हे दुखणे न सांगता ते दुसरेच काही सांगत आहेत. "दुखते कुठे आणि सांगतो कुठे!" तसे हे आहे.

माझ्यावरिल अश्लील लेखनाचा आरोपही असाच खोटा आहे. मी पानतावणेंना माझा स्पर्धक कधी मानले नाही. आंबेडकरी साहित्यातील एक प्रमुख कवि म्हणून, कादंबरीकार (रमाई) म्हणूनव प्रवासवर्णनकार म्हणून माझी नोंद केली जाते. मी आंबेडकरवादी सैद्धांतिक समीक्षा लिहितो आणि वैचारिक लेखनातील निरीश्वरवादी नैतिक मूल्यांचा आग्रह धरतो. पानतावणे कोणत्याही अर्थने ललित लेखक नव्हते आणि पोटात समरसता बाळगणाऱ्या त्यांच्या इतर लेखनाचा दर्जा महाराष्ट्राला माहीत आहेच. तरी दलित साहित्याचे अध्वर्यू म्हणवून घेताना त्यांची जीभ कशी कचरत नाही याचे नवल वाटते. पण पानतवणेंनी दलित साहित्याचे खरे अध्वर्यू असलेल्या डॉ. म.ना. वानखेडेंसंबंधी मुखवटा ही एकांकिका (अस्मितादर्श दि. अ.७६) लिहून अश्लीलतम लेखन केलेले आहे. चांगले सृजनशील साहित्य निर्माण करुन साहित्य समृद्ध करण्याऐवजी त्यांनी साहित्यातील मान्यवरांचे अत्यंत असभ्य आणि अश्लीलतम पद्धतीने चारित्र्यहनन केले आहे. डॉ. वानखेडे यांच्या हयातीत तर त्यांनी हे अत्यंत घाणेरडे लेखन केलेच पण त्यांच्या मृत्युनंतरही त्यांच्यावर पानतावणेंनी अत्यंत असभ्य लेखन केले आहे. 'मुलाखत : एका आंबेडकरवादी कविची ' या नावाने अस्मितादर्शच्या ऑनोडी १९८९ व जाफेमा १९९० या दोन अंकांमधून सुमारे १३-१४ पाने अत्यंत खोटारडे आणि अश्लीलतम लेखन माझ्यासंबधी त्यानी केले आहे. एवढेच नव्हे तर वामन निंबाळकर, विलास वाघ, अविनाश डोळस, भाऊ पंचभाई अशा अनेकांसंबधी त्यांनी असेच अश्लीलमतम लेखन केले आहे. **अश्लील लेखनाचे अध्वर्यू** मात्र पानतावणे जरुर आहे. याला त्यांनीच प्रारंभ केला. पानतावणेना जरा झणझणीत उत्तर द्यावे म्हणून समुचितच्या अंकात असे लेखन समुचितमधून येणार अशी फक्त सात ओळींची जाहिरात मी दिली. पण भालचंद्र फडके, बाबा दळवी, म. सु. पाटील अशा माझ्यावर प्रेम करणाऱ्या शेकडो चाहत्यांनी मी असे लिहू नये असा सल्ला दिला. तुम्ही पातळी सोडू नका असे मला ह्यांनी सांगितले लगेच एक-मे-जून १९९० च्या अंकात मी तसे लेखन न छापण्याचा खुलासा समुचितच्या १७२ व्या पानावर छापला आहे. **'कुत्रा माणसाला चावला तर त्याची बातमी होत नाही पण माणूस कुत्र्याला चावला तर त्याची बातमी होते. समुचितमध्ये वरिल मुलाखत आम्ही छापली असती तर ती बातमी झाली असती, ते आम्हाला होऊ द्यायचे नव्हते.'** असे त्या खुलाशात म्हटले

आहे. तेव्हा अश्लीलतम लेखनाची फारच मोठी जमा पानतावणेंच्या खात्यावर आहे. त्या खोल डोहात पानतावणेंनी उतरुन स्वतःला अडचणीत टाकू नये असे मनापासून वाटते.

तेव्हा हिंसाचाराचा आदेश पानतावणेच देतात आहेत. समरसतेला विरोध करणाऱ्या आंबेडकरवाद्यांचे व एकूणच परिवर्तनवाद्यांचे हात कलम करा असे ते 'समरसताप्रेमी बंधूभगिनींना' सांगत आहेत. पण कुठेही हिंसेची भाषा न करणाऱ्या माझ्यावर मात्र अत्यंत निराधार आणि खोटा आरोप ते करीत आहेत. माझी बदनामी करीत आहेत.


अश्लीलतम लेखनाचे अजोड धनी स्वतः पानतावणे आहेत. पानतावणेंसंबधी शेकडो गोष्टी आम्ही लिहू शकलो असतो पण आमच्यापैकी कोणीही त्या लिहिल्या नाहीत. पण "**चोराच्या उलट्या बोंबा**" प्रमाणे पानतावणे माझ्यावर तसा खोटा आरोप करीत आहेत. पानतावणेंनी लिहिलेले या संदर्भातले लेखन कोणीही वाचावे. पानतावणे कसे विकृत आहेत, कसे पातळी सोडून त्यांनी लिहिले आहे आणि आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांसंबंधी हे असभ्य, खोटे लेखन करुन आंबेडकरी चळवळीच्या विरोधकांना केवढे सुख त्यांनी दिले आहे त्याचा पडताळा त्यांना येवू शकेल.

आम्ही हरलो नाहीत. हरणार नाही. आमची लढाई वैचारिक आहे. विचारांनीच आम्ही ती लढू. आमच्या बाजूने सत्य आहे. महाराष्ट्रातील आंबेडकरवादी व परिवर्तनवादी लोक हेच माझ्यासाठी न्यायालय आहे. पानतावणे चिडचिड करताहेत कारण त्यांच्याजवळ निराधार आरोप करण्याशिवाय काहीही नाही. सुमारे तीन वर्षापूर्वी मी त्यांनी माझ्यावर केलेल्या अश्लीलतम लेखनाला उत्तर देण्याचा समुचिमधून निर्धार केला होता. आता तीन वर्षानंतर पानतावणें ते उकरून काढीत आहेत त्याचे कारण मी समरसतेवर मोठा ग्रंथ लिहितो आहे. त्यातून त्यांचे भयंकर सत्यस्वरूप उघड होईल पण ते होऊ नये, मला आळा बसावा म्हणून पानतावणे वरील खोटे आरोप करून मला चूप बसविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांचा बोलविता धनी कोण असावा हेही आपण ओळखले आहेच.

मी संघसमरसतेत आंबेडकरी चळवळ नेणाऱ्या पानतावणेंविरुद्ध लिहिले, हेगडेवार - आंबेडकर युती करणाऱ्या, समरसतेला खऱ्या अर्थाने गतिमान समाज - निर्मितीचा विचार मानणाऱ्या, समरसतेला सर्वांगिण सुधारणेचा दुवा मानणाऱ्यां, आणि जोतिबा फुल्यांना समरसतेसाठी कार्य करणारा पुरूष म्हणणाऱ्या पानतावणें विरूद्ध लिहिले. असे करणे म्हणजे हिंदूत्वाशी, ब्राह्मणवादाशी, आंबेडकरी चळवळ जोडणे असून त्यामुळे आंबेडकरी चळवळ नष्ट होईल म्हणून मी समाजाला

समरसतावाद्यांपासून सावध राह्यला सांगणारे लेखन केले. आंबेडकवादी या नात्याने मी माझे काम केले आहे. संघाशी समरसता की आंबेडकरवाद या झगड्यात संपूर्ण आंबेउकरवादी आणि परिवर्तनवादी समाज आबेडकरवादाच्या बाजूनेच उभा राहील याची मला खात्री आहे.

⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗ ⊗





REFBK-0026834

डॉ. यशवंत मनोहर यांचे इतर साहित्य

कविता

१. उत्थानगुंफा : कॉन्टिनेंटल, पुणे, दु.आ. १९८० (राज्य पुरस्कार १९७८.७९)
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य : सुनील, नागपूर - १९८२
३. मूर्तिभंजन : श्रीविद्या, पुणे १९८५

कादंबरी

४. रमाई : अमोल प्रकाशन, अमरावती, १९९१ (वासाडे पुरस्कार, वरोरा, १९९२)

प्रवासवर्णन

५. स्मरणांची कारंजी : समुचित : नागपूर १९८७ (राज्य पुरस्कार १९८८-९८)

साहित्यसमीक्षा

६. दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप : नागपूर १९७८
७. स्वाद आणि चिकित्सा, नागपूर १९७८
८. बाळ सीताराम मर्ढेकर : साहित्य अकादेमी. दिल्ली १९८७
९. निबंधकार : डॉ. आंबेडकर : संघमित्रा, नागपूर. १९८८
(राज्यपुरस्कार १९८८-८९)
१०. दलित साहित्य चिंतन : संघमित्रा, नागपूर. १९८८
११. आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा : प्रियदर्शी, कोल्हापूर १९९१
१२. समाज आणि साहित्यसमीक्षा, सुगावा, पुणे, १९९२
१३. बालकवी : साहित्यप्रसार केन्द्र, नागपूर १९९२
१४. प्रा. शरदचंद्र मुक्तिबोधांची कविता : (संपा) साहित्य अकादेमी, दिल्ली, १९९२
१५. आंबेडकर आणि साहित्य : १९९२

वैचारिक साहित्य

१६. डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म : डॉ. आंबेडकर प्रकाशन, यवतमाळ, १९८७
१७. प्रबोधविचार : महाबोधी, नागपूर, १९८९
१८. मंडल आयोग : भ्रम आणि सत्य : प्रथमावृत्ती : रमेश जीवने, आंबेडकर प्रकाशन, यवतमाळ, १९९०, दु. आ. अशोक खंडाळे, चंद्रपूर,१९९१.
१९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक शक्तिवेध : संघमित्रा, नागपूर १९९१
२०. बुद्ध आणि त्याचा धम्म सारतत्व, प्रियदर्शी, कोल्हापूर, १९९१
२१. आपले महाकाव्यातील नायक : शंबूक-कर्ण-एकलव्य, संघमित्रा, नागपूर, १९९१
२२. आपल्या क्रांतीचे शिल्पकार : आंबेडकर - फुले - बुद्ध, महाबोधी, नागपूर, १९९१
२३. आंबेडकर संस्कृती : कल्पना, नागपूर. १९९१
२४. सत्यशोधक समाजाचा जाहिरनामा, अमरावती, १९८८
२५. डॉ. आंबेडकर वादी विद्रोही निबंध, ऋचा प्रकाशन, नागपूर १९९२



डॉ. यशवंत मनोहर

डॉ. यशवंत मनोहर हे आंबेडकरवादी विचारवंत आहेत; आणि कोणत्याही प्रतिक्रांतीविचाराशी आंबेडकरवाद जोडणे त्यांना साफ नामंजूर आहे.

एक मान्यवर विद्रोही कवी, सुप्रतिष्ठीत प्रवासवर्णनकार, 'रमाई' कादंबरी लिहिणारे नामवंत कादंबरीकार, आंबेडकरी सौंदर्यशास्त्राचा आग्रह धरणारी समीक्षा लिहिणारे समीक्षक आणि धर्मातीत व ईश्वरातीत अशा इहवादी (Secular) आंबेडकरवादाचा आग्रह धरणारे विचारवंत म्हणून डॉ. यशवंत मनोहर सर्वपरिचित आहेत.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्धधम्म', 'प्रबोधनविचार', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक शक्तिवेध', 'बुद्ध आणि त्याचा धम्म : सारतत्व', 'आंबेडकर संस्कृती', 'महाकाव्यातील आपले नायक : शंबूक-कर्ण-एकलव्य' या अनेक वैचारिक पुस्तकानंतर 'आंबेडकरवादी विद्रोही निबंध' या पुस्तकातून आजच्या अनेक ज्वलंत समस्यांवर डॉ. मनोहरांनी प्रकाश टाकलेला आहे.



ऋचा प्रकाशन
नागपूर